9923

# बेन हूर

१५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. 9923




REFBK-0009814

# वेनहर

# BEN HUR

BY

**L. WALLACE**

REFBK-0009814

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

अनुक्रम 2554 वि: चारित्र

क्रमांक ........ नों: दि: 2-1-59

1123

परवानगीनें मराठींत अनुवादित केलें

किंमत दीड रुपया (रु. १·५०)

प्रकाशक :
र. ना. हर्षे, बी. एस्सी.
( डब्ल्यू. डी. सी. एस्., मेथडिस्ट चर्च
बॉम्बे कॉन्फरन्स करितां )
" ऐवी टॉवर्स," लॉरेन्स रोड, पुणें १

◆ ◆ ◆

दुसरी आवृत्ति १९४२ प्रति १०००
तिसरी आवृत्ति सप्टेंबर १९५८ प्रति १०००

◆ ◆ ◆

मुद्रक :
केशव गणेश शारंगपाणी
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५/१ शिवाजीनगर, पुणें ४.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ लें | 'अरेरे ! ते तरुणपणीं जिवलग मित्र होते' | १ |
| प्रकरण २ रें | बेनहरची अस्वस्थता | ६ |
| प्रकरण ३ रें | दुर्दैवी अपघात | १० |
| प्रकरण ४ थें | जन्मठेपेचा कैदी | १७ |
| प्रकरण ५ वें | समुद्रावरील लढाई | ३३ |
| प्रकरण ६ वें | शोधाला सुरवात | ४४ |
| प्रकरण ७ वें | नवीन ओळखी | ५२ |
| प्रकरण ८ वें | सूडाची योजना | ५९ |
| प्रकरण ९ वें | मुक्तता करणाराचें वर्तमान | ६३ |
| प्रकरण १० वें | संपत्ति व मिळकत परत मिळते | ७७ |
| प्रकरण ११ वें | शर्यती | ८६ |
| प्रकरण १२ वें | कपटी डाव | ९७ |
| प्रकरण १३ वें | शोधाची बातमी | १०३ |
| प्रकरण १४ वें | तुरुंगांतून मुक्तता | १०७ |
| प्रकरण १५ वें | आई-बहिणीला बेनहरचें दर्शन | ११० |
| प्रकरण १६ वें | क्रांतीची तयारी | ११६ |
| प्रकरण १७ वें | मोहपाश | १२२ |
| प्रकरण १८ वें | बेनहरला येशूचें दर्शन | १३० |
| प्रकरण १९ वें | येशूचीं अद्भुत् कृत्यें | १३५ |
| प्रकरण २० वें | महारोगापासून मुक्तता | १४१ |
| प्रकरण २१ वें | खऱ्या प्रेमाची ओळख | १४९ |
| प्रकरण २२ वें | विश्वासघात | १५६ |
| प्रकरण २३ वें | मनाचा गोंधळ | १५९ |
| प्रकरण २४ वें | वधस्तंभ | १६४ |

# प्रस्तावना

आशिया खंडाच्या अगदीं पश्चिम टोंकाला पालस्ताईन नांवाचा एक देश आहे. आमच्या कथानकाला आरंभ होण्याच्या वेळीं, सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं, तो देश निरनिराळ्या भागांत विभागला गेलेला होता. सर्व भागांतील लोक मूळ एकाच वंशाचा विस्तार होता, तरी पण या भागांतील लोकांमध्यें परस्पर बराच भेद होता. आमच्या कथानकांत पालस्ताईन देशाच्या केवळ दोनच भागांचा, म्हणजे यहुदिया व गालील, यांचा संबंध येतो. पहिल्या भागांत या लोकांच्या राजधानीचें शहर आहे. श्रेष्ठ संस्कृतीचें, काल्पनिक किंवा खऱ्या, तें ठिकाण असल्यामुळें त्यांच्यांत आढ्यता व बडेजाव यांचें प्रस्थ माजलेलें होतें. गालील प्रांतांतील लोक खेडवळ, शेतवाडी करणारे, व मेंढरें बकऱ्यांचे कळप पाळणारे असे होते. त्यांचा याजक लोकांशीं संबंध फार थोडा येत असल्यामुळें त्यांच्यावर याजकांचें वजन बेताबाताचेंच असे, व ते कमी दुराग्रही होते.

हल्लीं यहुदी धर्म म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धर्माचे ते सर्व अनुयायी होते. अदृश्य, अनादिअनंत आत्मा, सगळ्या जगाचा व मानवजातीचा उत्पन्नकर्ता, अशा एका देवाची भक्ति या धर्मांत शिकवलेली आहे. आपला वंश ईश्वरानें विशेष प्रकारें निवडलेला असल्यामुळें आपण सर्वश्रेष्ठ होय व बाकीचे झाडून सारे मानववंश आपल्यापेक्षां कनिष्ठ होत असा ह्या लोकांचा दृढ विश्वास होता.

ज्याप्रमाणें ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थान देश जिंकून घेतला होता त्याचप्रमाणें तेव्हां रोमी लोकांनीं पालस्ताईन देश जिंकून आपल्या साम्राज्याला जोडला होता.

ज्याप्रमाणें ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानांतील राजेरजवाडे यांना त्यांच्या प्रांतांत स्वतंत्रता देऊन आपले मांडलिक म्हणून ठेवलें.

होतें, त्याचप्रमाणें रोमी लोकांनीं प्रथम यहुदिया प्रांत हेरोद राजाच्याच सत्तेखालीं ठेवून त्याला आपला मांडलिक करून ठेवलें होतें. परंतु हा हेरोद मरण पावल्यावर त्याचा मुलगा त्याच्या गादीवर आला. तेव्हां या लोकांच्या निरनिराळ्या पक्षांत इतके तंटेबखेडे माजले कीं, रोमी लोकांनीं यहुदी राज्यसत्ता संपुष्टांत आणली आणि यहुदिया प्रांतावर रोमी सुभेदाराची नेमणूक केली. या लोकांच्या मुख्य याजकाला राजवाड्यांत राहून न्यायसभा भरवण्याचा अधिकार देण्यांत आला. पण रोमी सुभेदारालाही राजवाड्याचा एक भाग देण्यांत आला. त्याचे सैनिक त्याच्या बरोबरच रहावयाचे. ज्यामध्यें मरणदंडाची शिक्षा नसेल असेच खटले चालवण्याचा अधिकार मुख्य याजक व त्याची न्यायसभा यांना दिलेला होता.

ईश्वरानें विशेष प्रकारें विशिष्ट भवितव्यासाठीं निवडलेले असे लोक आपण आहों, असा यहुदी लोकांचा दृढ विश्वास असल्यामुळें त्यांना त्यांच्यावरील रोमी सत्ता असह्य वाटे व ज्या दिवशीं आपण हें रोमी सत्तेचें आपल्या मानेवरील जूं फेंकून देऊं तो सुदिन आज ना उद्यां येणारच येणार असें मनोराज्य ते करीत. त्यांच्या संदेष्ट्यांनीं एका भावी मशीहाविषयीं त्यांना वचन देऊन ठेवलें होतें. त्यावरून हा पुरुष प्रख्यात पुढारी व सेनानी असा निघून परकीय रोमी लोकांना हांकून देऊन यहुदी लोकांच्या स्वराज्याची पुन्हा स्थापना करील अशी या लोकांची दृढ समजूत होऊन बसलेली होती. उलटपक्षीं ज्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर रोमी लोकांनीं तत्कालीन ज्ञात जग पादाक्रांत केलें होतें त्या सामर्थ्याबद्दल त्यांना अति अभिमान वाटे व ते जित राष्ट्रांना तुच्छ लेखीत. शिवाय आपल्या कायदेकानूंची शुद्धता व न्यायदानपद्धत यांविषयींही ते आढ्यता मिरवीत. परंतु त्यांच्यावर व त्यांच्या वर्तनावर असणारें धर्माचें वजन बहुतेक नाहींसें झालें होतें म्हटलें तरी चालेल. त्यांना उच्च नैतिक पातळीवर जाण्याची स्फूर्ति देईल असा त्यांच्या अनेक दैवतांचा स्वभावच नव्हता. विषयोपभोग व हरएक प्रकारचा ऐषआराम यांचा पगडा त्या दैवतांवर पूर्णपणें बसला होता.

# बेनहर

९०४

## प्रकरण १ लें

### ‘ अरेरे ! ते तरुणपणीं जिवलग मित्र होते ’

‘ नवीन सुभेदार उद्यां येथें येणार आहे असें का तूं बोललास ? ’

यहूदीयाच्या माजी राजाच्या राजवाड्याजवळील एका बागेंतल्या कारंज्याजवळ चबुऱ्यावर दोन तरुण, एक एकोणीस वर्षांचा व दुसरा सतरा वर्षांचा, बसले होते. त्यांच्यापैकीं धाकटयानें आरंभीं नमूद केलेला प्रश्न दुसऱ्या तरुणाला केला.

दुसऱ्यानें उत्तर दिलें, ‘ होय, उद्यां येणार. ’

‘ तुला हें कसें समजलें ? ’

‘ तुमचा मुख्य याजक माझ्या बाबांना ही गोष्ट सांगत असतां ती माझ्या कानीं पडली. त्याच्या बोलण्याच्या खरेपणावर माझा विश्वास नसला तरी, एखाद्या विशेष प्रसंगासाठीं म्हणून सैनिक आपलीं शस्त्रास्त्रें व सामानसुमान घासूनपुसून स्वच्छ करीत आहेत आणि कोणी थोर व्यक्ति व त्याचा परिवार यांना रहावयास योग्य असा वाड्याचा रिकामा भाग बनवण्याची धामधूम सुरू आहे, हें प्रत्यक्ष मीं पाहिलें आहे. ’

धाकटा त्यावर कांहींच बोलला नाहीं. बहुतकरून त्यानें वरील तरुणाच्या बोलण्याचा शेवटला भाग बरोबर ऐकला नसावा; कारण मुख्य याजकावर दुटप्पी वर्तनाचा जो आरोप त्यानें केला तो ऐकून त्याला थोडासा राग आला. त्याचा सोबती पुढें म्हणाला,

‘ आपण दोघांनीं याच बागेंत मागें एकमेकांचा निरोप घेतला होता. त्यावेळीं तुझे शेवटचे शब्द “देवाची शांति तुझ्याबरोबर असो,” आणि

माझे, "देवता तुझें रक्षण करोत," असे होते. तुला आठवतात का ते ? त्या गोष्टीला आज किती वर्षें झालीं बरें ?'

'पांच.'

'तूं स्वतःला भाग्यवान् म्हटलें पाहिजे. ज्यांना सौंदर्य हेंच दैवत वाटतें. ते ग्रीक तुझ्या विकास पावलेल्या सौंदर्याची स्तुतीच करतील.'

दुसऱ्यानें या स्तुतीकडे लक्ष न देतां म्हटलें, 'होय, पांचच्च वर्षें झालीं त्या गोष्टीला. आपल्या वियोगाचा प्रसंग मला चांगलाच आठवतो. तूं रोमला जावयास निघाला होतास. तुझ्यावर माझी फार प्रीति म्हणून मीं कितीतरी रडलों. आतां सुशिक्षित व एखाद्या राजपुत्रासारखा होऊन तूं आला आहेस. पण तूं गेलास त्या वेळीं जसा होतास तसाच जर राहिला असतास तर बरें झालें असतें असें आपलें मला वाटतें.'

ह्या दोन तरुणांपैकीं एक रोमी व दुसरा यहुदी होता. दोघेही खानदानी घराण्यांतले होते. जेव्हां मेसलाचे वडील यरुशलेमांतील लष्करी तुकडीवर होते तेव्हां हे दोघे खेळगडी झाले होते. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतला इंग्रज मुलगा आपल्या हिंदुस्थानी सोबत्यांना सोडून इंग्लंडला जातो व विद्याभ्यास संपवून परत हिंदुस्थानला येतो, त्याचप्रमाणें रोमी मेसला आज पांच वर्षांनीं रोमहून यरुशलेमास परत आला होता. या वेळीं तो आपल्या वडिलांच्या पलटणींत कनिष्ठ अम्मलदार म्हणून आलेला होता. जातीय श्रेष्ठत्वाची कल्पना त्याच्यामध्यें पक्की भिनून गेली होती व श्रेष्ठ लष्करी वैभव प्राप्त करून घेण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या अंतःकरणांत मुळावली होती. आपलीं मतें मान्य नसणाऱ्यांस तुच्छ लेखणें व एकंदर जीवनाविषयीं स्वार्थी व उपरोधिक वृत्ति ठेवणें हीं रोमी स्वभावाचीं वैशिष्ट्यें मेसलामध्यें चमकूं लागलीं होतीं.

यहूदा बेनहर पुढें म्हणाला,

'तुला मिळालेल्या संधींचा तूं योग्य उपयोग केलास. आपल्या शिक्षकांपासून तूं बरेंच ज्ञान संपादन केलेंस. एखाद्या विद्वानाप्रमाणें तुझ्या बोल-

ण्याचा ओघ वहातो खरा, पण त्यांत विषाची नांगी असते. माझा जिवलग मित्र मेसला जेव्हां पांच वर्षांपूर्वी दूर गेला तेव्हां त्याच्या स्वभावांत विषबीज नव्हतें. जगाच्या प्राप्तीसाठींही त्यानें आपल्या मित्राचें मन कधींही दुखवलें नसतें.'

'मीं तुला कसें रे दुखवलें ?'

'ज्या मुख्य याजकाविषयीं तूं आपल्या बोलण्यांत इतकी तुच्छता दाखविलीस तो हल्लीं आमच्या धार्मिक नियमानुसार नव्हे पण रोमी सत्तेच्या कृपेनेंच आपल्या पदावर आहे हें जरी खरें, तरी ज्यांनीं आमच्या विश्वासाचा व भक्तीचा गाभा जो प्रभु त्याला आपल्या सेवेनें गेलीं हजार वर्षें संतुष्ट केलें त्याच मुख्य याजकांच्या मालेंतील एक मणी हा मुख्य याजक आहे.'

मेसला मोठ्यानें हंसून म्हणाला,

'तो अन्यायानें मोठ्या पदावर चढला हें तूं कबूल करतोस तरी देखील मीं त्याच्याविषयीं अविश्वास दाखवतांच तुला राग आला. माझ्या मित्रा, यहुदा, यहूदी असणें म्हणजे काय ? सर्व मनुष्यें व वस्तु एवढेंच नव्हे तर पृथ्वी व स्वर्ग हीं देखील पालटतात, पण यहूदी कालत्रयीं पालटत नाहीं. त्याच्याजवळ बदल ही चीज नाहींच. मूळारंभीं जसा त्याचा पूर्वज होता तसाच तो. हें मीं काढलेलें यहूदी मनुष्याचें शब्दचित्र आहे हो.'

इतकें बोलून त्यानें अंगठा केंद्र धरून आपल्या बोटानें वाळूवर एककेंद्री वर्तुळें काढलीं.

मेसला पुन्हां म्हणाला, 'ही माझ्या अंगठ्याची खूण वाळूवर उमटली आहे ती तुझा देव व मंदिर यांचें दर्शक व बोटाच्या खुणा तुझ्या कुलपतींचे दर्शक आहेत. आणखी कांहीं उरलेंच नाहीं. चित्रकला, खोदींव कामाची कला, बांधकामाची कला, वक्तृत्व, वगैरे बाबतींत तुम्हीं काय प्रगति केली ? युद्धांत सहा दिवसांमध्यें जें कांहीं तुम्ही मिळवितां तें शब्बाथ दिवशीं घालवतां, कारण त्या दिवशीं तुम्ही लढतच नाहीं मुळीं.

मग मीं तुम्हांला कां बरें हसूं नये ? आपल्या लोकांच्या भक्तीनें संतुष्ट राहणारा तुमचा देव आम्हां रोमी लोकांचा मुख्य देव, जो जोव्ह, त्याच्यापुढें कांहींच नाहीं. आम्हीं रोमी लोकांनीं सगळ्या जगाला गवसणी घालावी म्हणून जोव्ह आम्हांला आपल्या गरुडांचें साह्य देतो. तुमचे शिक्षक व तूं यांचें सर्व लक्ष एवढ्याशा यहूदीया प्रांताशीं व त्याच्या कारभाराशीं खिळून राहिलें आहे. आमचे शिक्षक तर असें शिकवतात कीं ज्ञान कुठेंहि मिळो तें मौल्यवानच होय.'

तरुण यहूदी जाण्यासाठीं उठून उभा राहिला. त्याचा चेहरा किंचित् रागीट झालेला होता. त्याला हात धरून थांबवीत, मेसलाच आणखी म्हणाला, 'यहूदा, आणखी क्षणभर ऐकून घे. मी इतक्या वर्षांनीं आलों. तूं माझें स्वागत करण्यासाठीं व शक्य असल्यास आपली बाळपणची मैत्री ताजी करण्यासाठीं येथें आलास हा खरोखर तुझा चांगुलपणा आहे. माझ्या गुरूचे शेवटचे शब्द असे होते, "जा आणि नांव कमव." आणि लक्षांत ठेव कीं मंगळाची (युद्धदैवत मार्स) सर्वत्र सत्ता चालते व इरसला ( आंधळ्या स्नेहदेवतेस ) पुनः दृष्टि प्राप्त झाली आहे. सद्गुण म्हणजे व्यापारी अवाहिऱ्याजवळचा माल. इरसचा नाश होवो पण मंगळाचा जयजयकार होवो. यहुदा, मी तर योद्धा होणार, पण तूं रे काय होणार ? मला खरोखरच तुझी दया येते. संधीवांचून सगळें आयुष्य ! वनदेवता तुझें साह्य करोत.'

यहुदा जाण्यासाठीं पाऊल उचलूं लागला. तरी मित्राचें बोलणें ऐकत असतां त्याच्या चेहऱ्यावरील रोमी गर्विष्ठपणाची झांक त्याच्या नजरेस पडल्यावांचून राहिली नाहीं.

'पण माझ्याविषयीं म्हणशील तर मी आफ्रिका, हिंदुस्थान, सिथिया वगैरेमध्यें कीर्ति व संपत्ति मिळविण्यासाठीं हातावर शीर घेऊन लढणार. हा यहूदीया प्रांत संपत्तिमान् आहे. कोणीतरी रोमी हा लुटणारच, मग मींच कां तो लुटूं नये ? आणि मित्रा यहुदा, मी या भागावर सुभेदार झालों म्हणजे तुला मुख्य याजक बनवीन बरें का !'

मेसलाचे शब्दच नव्हेत पण त्याची बोलण्याची ढवही यहूदी मनुष्याच्या अंतःकरणाला घरे पाडणारी होती. यहूदी लोकांचा जीवनक्रम तुच्छ मानण्याचें त्याला शिक्षणच मिळालें होतें. एकनिष्ठा, अब्रू, व सत्य या प्रधान सद्गुणांविषयीं स्वार्थांधतेनें तुच्छता दर्शविण्याची वृत्ति. त्याचें सगळें बोलणें अहंपणाचें होतें. आपण ज्याला आपला जिवलग मित्र मानलें होतें तोच अशा प्रकारें प्रिय यहूदीया प्रांत लुटण्याची इच्छा प्रगट करूं लागलेला पाहून या यहूदी तरुणाला परकीय सत्तेचें शल्य अधिकच टोंचूं लागलें. तो रागानें निघून जातां जातां म्हणाला,

'मला वाटतें आतां आपण दोघांनीं आपापल्या घरीं जावें हें उत्तम मी येथें आलों नसतों तर बरें झालें असतें. मी मित्राच्या शोधासाठीं आलों, पण मला...'

तितक्यांत मेसला म्हणाला, 'तुला रोमी भेटला असेंच ना ?' लगेच तो उठला व यहूदाच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला,

'हे सौंदर्यसंपन्न यहूदा, मी तुझ्या उपयोगीं पडेन. मी मनापासून तुला साहाय्य करीन. खरोखर माझी तुझ्यावर प्रीति आहे. तूं माझें ऐक आणि शिपाईपेशा धर. मृतदेवतांविषयींचा सर्व वादविवाद सोडून दे, आणि इतरांप्रमाणें तरवारीच्या जोरावर कीर्ति व संपत्ति मिळव.'

मग ते दोघे बागेच्या फाटकाशीं येऊन पोहोंचले तेव्हां यहूदानें आपल्या खांद्यावरील मेसलाचा हात काढीत म्हटलें,

'तुझें मन मीं चांगलें ओळखलें आहें, कारण तूं रोमी आहेस; पण मी इस्राएली आहें म्हणून तूं मात्र माझें मन जाणूं शकत नाहींस. आपल्या दोघांची पूर्वींची मैत्री पुनः तशी रहाणें शक्य नाहीं अशी तूं माझी खात्री केलीस व म्हणूनच माझें मन विव्हळ झालें आहे. आतां आपण जाऊं. माझ्या पूर्वजांच्या देवाची शांति तुला लाभो.'

मेसलानें यहूदा दृष्टीआड होईपर्यंत त्याच्याकडे पाहिलें व मानेला हिसका देऊन म्हटलें, 'आतां असेंच. सत्ता. स्नेहदेवतेचा अंत व मंगळाचा जोर.'

◆ ◆ ◆

## प्रकरण २ रें

# बेनहरची अस्वस्थता

अशा रीतीनें बेनहर मेसलाचा निरोप घेऊन निघाला तों थेट यरुशलेम नगरांत आला. ह्या नगरांतील रस्ते दहा किंवा बारा फुटांपेक्षां रुंद नव्हते. यांतल्या एका रस्त्यानें जात असतां बेनहर दोन रस्त्यांच्या टोंकांशीं असलेल्या एका दुमजली वाड्यापाशीं पोहोंचतांच थबकला. हा वाडा बाहेरून एखाद्या भुईकोट किल्ल्यासारखाच दिसत होता, कारण त्याच्या पहिल्या मजल्याच्या भिंतीला रस्त्याच्या बाजूला खिडकी वगैरे कांहींच नव्हतें. शिवाय दरवाजे फार मोठे असून त्यांना जाड जाड अडसर व सुळे लावलेले होते. बाहेरून पडणाऱ्या शत्रूच्या धडकांना दरवाजांनीं दाद देऊं नये हा यांतील हेतु. बेनहरनें एका दरवाजावर ठोकलें तेव्हां देवडीवाल्यानें आंतून लहानशी दिंडी, उघडली व तो आंत गेला. जातां जातां त्याला एक चौक लागला. तेथें आंगणांत एका भागांत कोंबडीं, बकरीं, कबुतरें वगैरे दिसत होतीं, तर दुसरीकडे दळणकांडण, भांडींकुंडीं घासणें, मसाला वाटणें, स्वंयपाकपाण्याची तजवीज, वगैरे मोठ्या कुटुंबांत चालावयाच्या अनेक संसारविषयक गोष्टी चालल्या होत्या. हा तरुण त्या चौकांतून दुसऱ्या लहानशा वाटेनें एका सुंदर बागेंत गेला व तेथें पायऱ्या चढून दुसऱ्या मजल्याच्या गच्चीवर जाऊन पोहोंचला. या मजल्यावर निरनिराळ्या बऱ्याच खोल्या होत्या. गच्चीवर देखील छाया केलेली असल्यामुळें तो जसा कांहीं व्हरांड्याच बनला होता. एका खोलीच्या दारावरील पडदा बाजूला करून हा तरुण आंत गेला व मोठ्या कोंचावर अंग टाकून त्यानें उशींत डोकें खुपसलें.

अशा स्थितींत आपण किती काळ होतों हें त्याचें त्यालाच सांगतां आलें नसतें. कोणीं तरी त्याला मारलेली हांक जेव्हां त्याला ऐकूं आली तेव्हां अंधार पडलेला होता. त्यानें उत्तर देतांच त्याची मिसरी दासी आंत आली.

अगदीं लहानपणापासून हिनें ह्या तरुणाला आपल्या अंगाखांद्यावर खेळवलें होतें व ही नेहमीं ह्या तरुणाच्याच दिमतीला असे. हिचें नांव अमरा होतें.

ती म्हणाली, 'रात्र होऊन अंधार पडला आहे. जेवण तयार आहे. माझ्या बाळाला अजून नाहीं का भूक लागली ?',

त्यानें उत्तर दिलें 'मला भूक नाहीं.'

'तुला बरें वाटत नाहीं का ?'

'मला झोंपच येते आहे.'

'तुझी आई तुला हांक मारून तुझी चौकशी करीत होती.'

'आतां आई कोठें आहे ?'

'गच्चीवरील वसंतभवनांत.'

त्या देशांत धाब्याच्या घरांसारखीं सपाट छपराचीं घरें बांधण्याची चाल होती; आणि उन्हाची तिरीप नाहींशी होतांच खालीं चांगली हवा खेळत नसलेल्या खोल्यांत होणाऱ्या तलखीपासून सुटका करून घेण्याकरतां कुटुंबांतील मंडळी गच्चीची वाट धरीत असे. बेनहर पायऱ्या चढून गच्चीवर गेला. तेथें एका कमानदार ओटयावर तक्क्याला टेंकून आपली आई बसली आहे असें बेनहरच्या दृष्टीस पडलें. तिचा पोषाख साधा पण उंची होता. तिच्या हातांतील पंख्यावर बसवलेले मौल्यवान् खडे चांदण्यांत चकाकत होते. बेनहर हळूच जाऊन तिच्याजवळ बसला व त्यानें आपलें डोकें तिच्या मांडीवर टेंकलें. तिनें त्याला जवळ घेऊन म्हटलें,

'लाडक्या, तुला बरें वाटत नाहीं असें अमरा सांगत होती.' बेनहर म्हणाला, 'आई, आई, आज मला किती तरी गोष्टींविषयीं विचार करावा लागला. मीं काय व्हावें तें मला सांग ना आई ? आपल्या नियमशास्त्राचें एक असें बंधनच आहे कीं प्रत्येक इस्राएली मुलानें कोणता ना कोणता तरी कामधंदा शिकलाच पाहिजे. मोठा श्रीमंत किंवा खानदानी घराण्यांतील

मुलगा असला तरी त्यालाही हें बंधन लागूंच आहे. मीं काय व्हावें ? मीं मेंढरें पाळावीं, का जमीन कसावी, किंवा मीं कारकून अथवा शास्त्री व्हावें ? आई, मला साह्य कर आणि मीं काय करावें तें मला सांग.'

ती म्हणाली, 'आज मंदिरांत तूं कांहीं विशेष उपदेश ऐकला असावा असें मला वाटतें.'

बेनहर म्हणाला, 'तसें नाहीं. मी मंदिरांत नव्हे पण राजवाड्यांत गलों होतों. तेथें मेसलाची व माझी भेट झाली.'

'तुझें मन अस्वस्थ करण्यासारखें तो मेसला तुला असें काय बोलणार ?'

'तो परत आला तो अगदींच बदलून गेलेला. मला पुन्हां त्याचें दर्शन नको.'

'तुझ्या म्हणण्याचा अर्थ मेसला पक्का रोमी बनून आला आहे, असाच ना ?'

'अगदीं हेंच तो बोलला. तो लहानपणीं देखील मर्मभेदी थट्टा करी. ज्यांना राजदरबारीं मान्यता मिळे अशांचीही तो टर उडवी हें खरें, तथापि आजपर्यंत आपल्या देशाविषयीं व धर्माविषयीं त्यानें कधींच अनादर दाखवला नव्हता. आज प्रथमच आपला देव व चालीरीती यांविषयीं तुच्छतेचे उद्गार त्याच्या तोंडून निघालेले माझ्या कानीं पडले. अगोदरच त्याचें बोलणें मर्मभेदी आणि वर उद्दामपणाची झांक यामुळें तें अधिकच असह्य झालें.'

थोडा वेळ शांत राहून पुन्हां तोच म्हणतो, 'आई, मला समजावयास पाहिजे आहे तें हेंच कीं आपल्यापेक्षां रोमी श्रेष्ठ आहेत हा जो त्यांचा पूर्वग्रह, त्याला कांहीं आधार आहे का ? कोणत्या बाबतींत मीं त्या मेसलापेक्षां कमी आहें ? मीं लष्करी पेशा पत्करून तरवारीच्या बळावर संपत्ति व कीर्ति कां मिळवूं नये ? मीं ग्रीक लोकांतल्या कवीसारखा कवि किंवा कारागिरासारखा कारागीर कां बनूं नये ? आई, माझ्या सगळ्या

अस्वस्थतेचें मूळ हेंच आहे. तर मला सांग कीं, ज्या ज्या गोष्टी रोमी करूं शकतो त्या सर्व माझ्यासारख्या इस्राएली मुलानें कां करूं नयेत ?'

आपल्या मुलाच्या आयुष्यांतील आणीबाणीची वेळ येऊन ठेपली आहे हें आईनें जाणलें. म्हणून मुलाच्या जीवनाचा पाया मजबूत घातला जाऊन इस्राएल वंशाच्या थोर, उदात्त ध्येयाकडे त्याची दृष्टि लागावी अशा प्रकारें मुलाला विचारपूर्वक उत्तर दिलें पाहिजे ही गोष्टहीं तिच्या लक्षांत आली.

ती शांत स्वरानें म्हणाली, 'बाळ, मेसलाचा जन्म कुलीन घराण्यांत झालेला आहे.अनेक पिढ्यांनीं त्या कुळाची कीर्ति राखली आहे पण आपल्या कुटुंबाच्या प्राचीनतेच्या जोरावर किंवा संपत्तीच्या जोरावर जर मेसला आपला श्रेष्ठपणा स्थापन करूं पहात असेल तर तूं त्याच्याशीं बिनदिक्कत सामना कर. आपल्या इस्राएल कुटुंबाची बिनचूक पूर्वपरंपरा इतक्या प्राचीन काळापासून राखून ठेवण्यांत आली आहे कीं रोमशहराचा पाया घातला गेला त्याच्या पूर्वींदेखील शेंकडों वर्षांचा कौटुंबिक पुरावा आज मिळूं शकतो. त्या वेळेपासून"हर"घराणें प्रमुख घराण्यांतील एक मानण्यांत येत आहे. योद्धा,मुत्सद्दी,कवि, वक्ता, कायदेकानू करणारा, व संदेष्टा इतक्या नात्यांनीं आपल्या मोशेची बरोबरी करणारा एक तरी कैसरबादशहा झाला आहे का ? त्यांच्यांतील गोड बोले लोक भविष्यकाळाविषयींचें शुभाशुभ कोंबड्याच्या आंतड्यावरून शोधतात. आपले संदेष्टे प्रत्यक्ष देवाच्या तोंडून ऐकलेले संदेश लोकांना सांगतात. आपला देव अनादि अनंत असून त्याच्या हातांत वर्तमान, भूत, भविष्य अशा तिन्ही काळांच्या नाड्या आहेत. अशा देवाचे संदेश ऐकून मोठमोठ्या बलिष्ठ राजांची गाळण उडून गेलेली आहे. जर मान व संपत्ति यांवरून मोठेपणा ठरवावयाचा असला तर मेसलाची बरोबरी करण्यास भिण्याचें तुला काडीमात्र कारण नाहीं. पण जे कोणी हलक्या मनाचे असतात ते असल्या गोष्टींवर स्वतःचें श्रेष्ठत्व-स्थापण्यास पाहतात.

'आतां, बाळ, तूं काय करावयाचें याविषयीं माझें म्हणणें असें आहे कीं तूं प्रभूची, इस्राएलांच्या परमेश्वराची, सेवा कर. रोमची सेवा तूं करूं नये. अब्राहामाच्या संतानाला परमेश्वराच्या मार्गाशिवाय अन्य मार्गांत गौरव नाहीं, पण त्याच्या मार्गांत तें पुष्कळ आहे.'

तें ऐकल्यावर यहूदानें विचारलें, 'तर मग आई, मला सैनिक होतां येईल ?'

आई म्हणाली, 'येईल म्हणजे ? कां नाहीं होतां यायचें. तूं कैसराची सेवा न करतां परमेश्वराची सेवा करशील तर सैनिक होण्यास देखील तुला माझी परवानगी आहे.'

आईनें घातलेली अट त्याला मान्य होती. त्याचें मन शांत झालें व त्याला तत्काळ गाढ झोंप लागली. आईनें मुलाच्या डोक्याखालीं एक उशी दिली व त्याच्या अंगावर एक शाल टाकिली. मग तिनें मोठ्या प्रेमानें हळूच त्याला कवटाळून ती निजावयास निघून गेली.

◆ ◆ ◆

## प्रकरण ३ रें

## दुर्दैवी अपघात

दुसऱ्या दिवशीं सकाळीं संगीताच्या आवाजानें बेनहरची झोंप मोडून तो जागा झाला. डोळे उघडून पहातो तों त्याची पंधरा वर्षांची धाकटी बहीण, तिर्झा, त्याच्या अंथरुणाच्या कडेवर बसून आपल्या तंतुवाद्यावर एक गोड प्रेमगीत गात आहे असें त्याला दिसून आलें. तिचें गाणें संपलें असें पाहतांच तो मोठ्यानें म्हणाला, 'फार गोड !'

'गाणें का ?'

'होय, गाणें, व गाणारें पण !!'

'गेल्या महिन्यांत नाटकगृहांत एका ग्रीक गायकानें गायलें तें मीं शिकून घेतलें.'

‘ पण त्यानें तें तर ग्रीक भाषेंत गाइलें होतें. ’

तिर्झेनें अभिमानी स्वरांत म्हटलें, ‘ पण मीं तर इब्रींत गाइलें. ’

‘ माझी बहीण आहेच तशी हुशार, ’ असें म्हणून त्यानें हंसत हंसत तिच्या खांद्यावर चापट मारली.

तिर्झा म्हणाली, ‘ अमरा सांगत होती कीं, काल तुला भयंकर अपघात झाला होता आणि तुला अगदीं बरें वाटत नाहीं. ती तुझी न्याहारी येथेंच घेऊन येणार आहे. तुला खालीं यायची गरज नाहीं. ’

‘ अग तिर्झाताई, पण मी तर लांब जाणार आहे. ’

‘ कोठें ? कधीं ? आणि कशाला तो ? ’

‘ मी रोमला जाणार. ’

‘ खरेंच का ? तर मग मी येईन तुझ्याबरोबर. ’

‘ छे छे, तूं येथें आईजवळ राहिलें पाहिजे. आपण दोघेंहि तिला एकटी सोडून गेलों तर ती प्राण तरी ठेवील का ? तुला आपल्या नियमशास्त्राचें बंधन ठाऊकच आहे, कीं प्रत्येक इस्राएली मुलानें कोणता ना कोणता तरी एक धंदा शिकून ठेवलेला असला पाहिजे. मी शूर वीर होणार, आणि युद्धाचें शिक्षण घेण्यास रोमी छावणीपेक्षां चांगलें स्थान मिळणें शक्यच नाहीं. ’

तिनें चकित होऊन म्हटलें, ‘ पण तूं सैनिक झालास तर मारला जाशील. ’

‘ परमेश्वराची इच्छा तशी असली तर तसें होईल, पण सर्वच सैनिक मारले जातात असें नाहीं. ’

तेव्हां ती अधीरतेनें म्हणाली, ‘ पण तूं खचित् रोमसाठीं लढणार नाहींस ना ? ’

बेनहर म्हणाला, ‘ आं ! तुला देखील रोमचा द्वेष वाटतो ना ! सगळें जगच रोमला कंटाळलें आहे. तिर्झा, तर मग मी तुला तुझ्या प्रश्नाचें जें उत्तर आतां देत आहें त्याचें मूळ त्या द्वेषांतच सांपडेल. ऐक. मी रोमसाठीं देखील लढेन, पण त्याचा मोबदला म्हणून आज ना उद्यां केव्हांतरी एक दिवस रोमच्याच विरुद्ध लढण्याची कला मला साधली पाहिजे. ’

तो तितकें बोलून थांबला तों अमरा न्याहारी घेऊन तेथें आली. तेव्हां आपला दूर जाण्याचा बेत अमराला न कळविण्याविषयीं बेनहरनें बहिणीला हळूंच बजावलें. त्याची न्याहारी संपते न संपते तोंच फार लांबून लष्करी बाजाचा आवाज ऐकूं येऊं लागला. तेव्हां तीं दोघें भावंडें धांवतच गच्चीच्या कठड्यापाशीं जाऊन त्या समोरच्या चिंचोळ्या रस्त्याकडे त्यांनीं लांबवर नजर टाकली. येत असलेल्या सैन्याच्या आघाडीला गोफणगुंडावाले व तिरकमठेवाले यांची टोळी येत होती. त्यांच्यामागून नखशिखान्त लष्करी पोशाखांत सहस्र पायदळ सैनिकांची पलटण येत होती. या सैनिकांच्या हातांतील ढाली व भाले, दौड करीत येत असतां, चकाकत होते. त्यांच्यामागून बाजेवाले व त्यांच्यामागें एक अंमलदार अंगांत चिलखत घातलेला असा येत होता. त्याच्या डोक्यावर शिरस्त्राणाऐवजीं पानांचेंच एक शिरोभूषण घातलेलें होतें. त्याच्या पाठोपाठ त्याच्या शरीररक्षक स्वारांचें पथक व सर्वांच्या शेवटीं घोडदळ सैन्याची एक तुकडी येत होती. चिलखत घातलेल्या व डोक्यावर पानांचें शिरोभूषण असलेल्या स्वाराचा घोडा मोठा भव्य व पाणीदार असून त्याच्या अंगावर बहुमोल भूषणें होतीं, त्यावरून हाच तो सरसेनापती व्हॅलेरिअस ग्राटस असें ओळखतां येण्यासारखें होतें; आज येणारा नवीन अंमलदार तो हाच होता. ह्याच्याच कारस्थानामुळें एका नवीन याजकाची मुख्य याजकाच्या पदावर नेमणूक झाली होती. पण सर्व यहूदी लोकांच्या मतें त्या याजकाचा ह्या सर्वश्रेष्ठ धार्मिक पदावर हक्क पोहोंचत नव्हता, व म्हणून यरुशलेमांतील लोकांना हा रोमी अंमलदार आधींच अप्रिय झालेला होता. हा अंमलदार आपल्या लव्याजम्यासह रस्त्यांतून चालला असतां त्याला पाहण्याकरितां रस्त्यालगतच्या घरादारांतून जमलेल्या लोकांकडून तुच्छतेच्या व त्याला देण्यांत येणाऱ्या शिव्याशापाच्या आरोळ्यांवरून लोकांची असंतुष्टता व्यक्त होत होती. कित्येक स्त्रियांनीं तर खिडक्यांतून वहाणा देखील रस्त्यानें चाललेल्या त्या स्वाराकडे फेंकल्या ! तथापि सैनिक असल्या गोष्टींकडे लक्ष न देतां बेपर्वाईनें

आपल्या तालावर चालले होते, पण सरसेनापतीच्या चेहऱ्यावर तो प्रकार पाहून रागाची छटा दिसूं लागली व त्याच्या कपाळाला आंठ्या पडल्या.

सरसेनापती ग्राटस हा बेनहरच्या वाड्याखालून जाऊं लागला तेव्हां त्याला अधिक चांगलें पाहतां यावें म्हणून बेनहर गच्चीच्या कठड्याजवळच्या छपराच्या कोंपऱ्यावरील कौलारूवर हात टेंकून पुढें वांकला. पण दुर्दैवानें भयंकर प्रसंग ओढवला. त्याच्या हाताखालचें कौल निसटलें. तें धरण्याचा प्रयत्न करीत असतां खालून जाणाऱ्या लोकांन्श सावधगिरीची सूचना देण्यासाठीं बेनहर मोठ्यानें ओरडला. पण त्याचें तें ओरडणें व पडत असलेलें कौल धरण्यासाठीं त्यानें केलेली धडपड ह्यामुळें खालून पाहणारांस त्याच्या मनांत भलताच हेतु असल्याची शंका आली. त्यानें मुद्दाम तें फेंकून मारलें असा त्यांचा समज झाला. तें कौल सरसेनापतीच्या उघड्या डोक्यांत इतक्या जोरानें पडलें कीं, तो एकदम मृतवत् होऊन घोड्यावरून खालीं पडला. इकडे घरांच्या गच्च्यांवरून व दारांखिडक्यांतून पहात असलेल्या लोकांना वाटलें कीं, बेनहरच्या हातून न कळत धांदलीमुळें झालेली ती भयंकर गोष्ट त्यानें मुद्दामच केली व त्यांनीं त्याच्या स्तुतिपर आरोळ्या मारून त्यांच्या हातांत सांपडलें तें घेऊन खालीं शिपायांच्या अंगावर ते फेंकून मारूं लागले. सरसेनापतीच्या सभोंवतीं सैनिकांचें कडेंच पडलें. वरून पडणाऱ्या दगडधोंड्यांपैकीं आणखी कांहीं लागूं नये म्हणून सैनिकांनीं आपल्या ढालींचें छतच सरसेनापतीच्या अंगावर बनवलें.

बेनहरचें तोंड खर्कन उतरलें. तो आपल्या बहिणीला म्हणाला, 'तिर्झा, तिर्झा, आतां आपल्या कुटुंबाचें कसें होणार ? माझ्या हातून आज रोमी सुभेदार मारला गेला आहे.'

तिर्झा भयचकित झाली. तिनें त्याच्या गळ्यांत हात घातला व कांहींसें कौतुकास्पद रीतीनें त्याच्याकडे पाहिलें. पण ती कांहीं बोलली नाहीं.

यहूदा बहिणीला म्हणाला, 'तिर्झा, पण मीं ही गोष्ट जाणून बुजून केलेली नाहीं.'

यावर तिर्झा कांपऱ्या स्वरानें व हलक्या आवाजांत म्हणाली, 'आतां सरकारी लोक करतील तरी काय ?'

बहिणीच्या या प्रश्नाचें उत्तर देण्याचें धैर्य यहूदाला झालें नाहीं. जर ग्राटस मेला नसला तर त्याचा सूड कोणत्या थरापर्यंत जाईल कोण जाणें. पण तो जर मेलाच असला तर लोकांच्या दांडगाईबद्दल सैनिक काय अनर्थ करतील ह्याचाहि अंदाज करतां येणें शक्य नव्हतें. त्यानें खालीं वांकून पुन्हा एकदां रस्त्याकडे नजर टाकली.

मग चटकन् बहिणीकडे पाहात तो हर्षभरित स्वरानें म्हणाला, 'तिर्झा, इस्त्राएलांच्या देवाला धन्यवाद असो. सुभेदार मेला नाहीं. तो जिवंत आहे. आतां मी त्यांना स्पष्ट करून सांगेन कीं, ही भयंकर गोष्ट केवळ अपघातामुळेंच घडली. आपल्या बाबांनीं केलेली पूर्वीची एकनिष्ठ कामगिरी लक्षांत घेऊन ते आपल्या कुटुंबाला धक्का लावणार नाहींत असें मला वाटतें.'

हर घराण्याचा नेता कांहीं काळापूर्वीं तारूं फुटून बुडून मेला होता. तो रोमच्या फार उपयोगीं पडलेला असल्यामुळें तो जेव्हां जेव्हां रोमची सफर करी तेव्हां तेव्हां त्याला बादशहाची भेट होत असे.

परंतु या बहिणभावांची ती आशा व्यर्थ ठरली. कारण त्यांच्या पायांखालीं असलेल्या वाड्याच्या मोठ्या दरवाजावर सैनिक धाडधाड धक्के मारीत असल्याचा आवाज त्यांना ऐकूं आला. दरवाजा फोडून आंत घुसलेल्या सैनिकांनीं वाड्याच्या चौकांत चाकरनोकरांची कापाकापी सुरू केल्यामुळें चोहोंकडून किंकाळ्या व आकांत ऐकूं येऊं लागला. सर्वांत भयंकर किंकाळी यहूदाच्या कानीं पडली, ती त्याच्या आईची होती. ती ऐकतांच यहूदा तिच्या साह्यासाठीं तीरासारखा धांवला. आईला एका सैनिकानें धरलेली पाहून तो त्या सैनिकाच्या अंगावर झडप घालणार तोंच त्याला दुसऱ्या सैनिकांनीं कैद केलें. तितक्यांत कोणीसें मोठ्यानें म्हटलें,

'हाच तो पोरगा.'

तेव्हां लिजन नामक पलटणींतील एका चिलखत घातलेल्या अम्मलदारानें म्हटलें, ‘काय, हा ! हा तर अजून कोंवळा मुलगा आहे.’

त्यावर मेसला आपल्या नेहमींच्या मर्मभेदी स्वरानें म्हणाला, ‘खरेंच कीं काय ! हें नवीन तत्त्वज्ञान दिसतें ! दुसऱ्याला ठार मारण्याइतका त्याचा द्वेष करणारें मनुष्य प्रौढ वयाचें असावें लागतें, असा सिद्धांत रोमच्या तुमच्या प्रोफेसरापुढें मांडला तर तो त्यावर काय उत्तर देईल ? तुम्हीं ह्याला कैद केलें आहेच. ती त्याची आई व बहीण. एवढेंच हें सगळें कुटुंब.’

आई व बहीण यांच्यावरील प्रेमासाठीं यहूदा मेसलाशीं झालेलें भांडण विसरून गेला. तो मेसलाला काकुळतीच्या स्वरानें म्हणाला, ‘हे माझ्या मित्रा, मेसला, या वेळीं त्या दोघींना तूं साह्य कर. आपली दोघांची बाळपणापासूनची जिवलग मैत्री लक्षांत आण. मी तुझा जिवलग मित्र यहूदा आहें. मला एवढी भिक्षा घालच.’

मेसला त्या दुसऱ्या अंमलदाराला उद्देशून म्हणाला, ‘तुम्हांला माझा आणखी कांहीं उपयोग होण्यासारखा नाहीं येथें आतां. खालीं रस्त्यांत आतां विशेष मौज. स्नेहभावनेला मूठमाती. पराक्रमाची कमान चढती.’

तितकें बोलून मेसला तडक तेथून निघून गेला. यहूदा मनांत समजला. त्याच्या अंतःकरणाला पीळ पडून त्यानें प्रार्थना करीत म्हटलें,

‘हे देवा, तुझी सूडाची घटका येईल तेव्हां ह्या अधमावर माझाच हात पडूं दे.’

यहूदा मोठ्या शिकस्तीचा प्रयत्न करून त्या रोमी अंमलदाराच्या थोडा जवळ गेला व त्याला आर्जवी वाणीनें म्हणाला,

‘महाराज, माझी आई व बहीण यांना धक्का लावूं नका. त्यांच्यावर दया दाखवा. ह्या दयेबद्दल देव तुमच्यावर दया करील.’

यहूदाच्या आर्जवाचा इष्ट परिणाम त्या अंमलदारावर झाल्यासारखें दिसलें तरी त्यानें खालील हुकूम सोडला :

'या दोन्ही स्त्रियांना गढीवर घेऊन चला. त्यांचा कोणत्याहि प्रकारें छळ न होऊं देण्याची खबरदारी घ्यावी. ह्या तरुण मुलाच्या मुसक्या बांधून त्याला खालीं रस्त्यावर घेऊन चला. त्याला द्यावयाची शिक्षा मागून समजेल.'

यहूदानें आपल्या आईकडे व बहिणीकडे एकदांच नजर टाकिली व मग हातांनीं आपलें तोंड झांकून धरलें. त्या एका क्षणांत त्याच्यामध्यें विलक्षण क्रांति होऊन गेली. एका क्षणांत त्या तरुण मुलाचा प्रौढ मनुष्य बनला. या क्षणापर्यंत त्याच्यावर बहुतेक सर्वस्वी आईच्या वजनाची पकड होती. तो आईवर इतका अवलंबून रहात असे कीं त्याला लिवलिवीत समजण्यांत येऊं लागलें होतें. त्यानें आतां आपल्या तोंडावरील हात काढून वर पाहिलें, तेव्हां त्याच्या तोंडावरील कोमलपणा कोठच्या कोठे नाहींसा झाला होता !

चौकांत बिगुलाचा आवाज होतांच वाड्यांत सैनिकांनीं चालविलेली लुटालूट थांबली. वाड्यांत सर्वत्र अव्यवस्था होऊन गेली होती. वाड्यांतील सर्व नोकरचाकर, घोडे, गुरेंढोरें, कोंबडीं वगैरे सर्वांना रस्त्यावर काढण्यांत आलें. फोडलेले दरवाजे तात्पुरते दुरुस्त करण्यांत आले. यहूदाला रस्त्यांतून चालवलें तेव्हां त्यानें चोहोंकडे अगदीं निरखून पाहिलें, पण त्या जमावांत त्याला त्याची आई किंवा तिर्झा दिसली नाहींत. अकस्मात् इतका वेळ रस्त्यांत मृतवत् पडलेली एक स्त्री उठली व तिनें धांवत जाऊन त्याच्या पायांना घट्ट मिठी मारली.

यहूदानें तिला ओळखून म्हटलें, 'अमरा, माझी प्रेमळ दासी अमरा. अमरा, तुझें साह्य आतां परमेश्वरच करील. मी असमर्थ आहें.' चटकन् हलक्या स्वरांत तो म्हणाला, 'अमरा, माझी आई व तिर्झा यांच्यासाठीं तुला जगलें पाहिजे. त्या परत वाड्यांत येतील. आणि...'

एका सैनिकानें तिला यहूदापासून दूर केलें व धरून ठेवलें, पण ती तेव्हांच त्याच्या हातांतून निसटली व मुजबी दुरुस्त केलेला दरवाजा

लावून कांहीं सैनिक वाडा बंद करण्याच्या बेतांत होते तों ही अमरा आंत घुसून चौकांतून पलीकडे निघून गेली.

तरी अंमलदार सैनिकांस म्हणाला, 'राहूं द्या तिला आंतच. आपण दरवाजा बंद करून शिक्कामोर्तब करून टाकूं. ती आंत अन्नावांचून मरून जाईल.'

अंमलदाराच्या हुकुमाप्रमाणें दरवाजा बंद करण्यांत येऊन त्यावर रोमी सरकारचें शिक्कामोर्तब झालें. दुसऱ्याच दिवशीं तेथें दरवाजावर पाटी लागली त्यावर असें लिहिलेलें होतें:

'ही मालमत्ता बादशहाची झाली आहे.'

◆ ◆ ◆

## प्रकरण ४ थें

## जन्मठेपेचा कैदी

मागिल प्रकरणांत आलेली हकीकत घडल्यावर दोन दिवसांनीं 'सैन्यांतील शिपायी, सैन्यांतील शिपायी!' असा रस्त्यांत खेळणाऱ्या मुलांचा एकच ओरडाआरडा ऐकून नासरेथ गांवांतल्या घरांतील माणसें दचकून काय प्रकार आहे तें पाहण्यासाठीं दारांत आलीं.

रस्त्याच्या एका बाजूनें लांब धुराळा उडत होता व सैनिकांच्या अंगांतील चिलखतें उन्हांत चकाकत होतीं. ही सैन्याची टोळी अगदीं गांवांत येऊन पोहोंचली तेव्हां लोकांना समजलें कीं, एका कैद्याच्याबरोबर बंदोबस्तासाठीं असलेली ही सैनिकांची टोळी होती. ह्या कैद्याचे हात जाड दोरीच्या एका टोंकानें घट्ट बांधलेले होते व तिच्या दुसऱ्या टोंकाला केलेला फांसा घोड्याच्या गळयांत अडकवलेला होता. हा कैदी अगदीं थकून-भागून गेलेला दिसत होता, कारण जेव्हां सैनिक गांवच्या विहिरीवर पाणी पिऊन थोडी विश्रांति घेण्यासाठीं म्हणून थांबले तेव्हां त्यानें एकदम जमिनीवर अंग टाकलें, व तो निश्चेष्ट पडला. त्यानें कोणाजवळ शब्दही

काढला नाहीं. तेथें जमलेल्या गांवकऱ्यांना त्या कैद्याची दया आली, पण त्याच्यासंबंधीं प्रश्न करण्याचें धैर्य कोणाला होईना.

गांवाकडल्या वाटेकडे नजर टाकून कोणींसें मोठ्यानें म्हटलें, 'हा पहा योसेफ सुतार इकडे येत आहे' तेव्हां सर्वांचे डोळे तिकडे लागले. एक म्हातारा मनुष्य व त्याच्याबरोबर सुमारें सतराएक वर्षांचा एक तरुण असे दोघे येत होते. त्यांच्या हातांत सुतारकीचीं हत्यारेंपात्यारें बरींच होतीं. एक बाई पुढें झाली व येणाऱ्या म्हाताऱ्यापाशीं जाऊन त्याला म्हणाली,

'अहो योसेफ गुरुजी, हा कैदी कोण, त्यानें गुन्हा काय केला, व आतां त्याचें काय होणार, वगैरे माहिती त्या सैनिकाला विचारून तर पहा.'

योसेफ दिसण्यांत भारदस्त, रीतीभातींनीं सभ्य, व मितभाषणी होता. तथापि त्यानें त्या कैद्याकडे एकदां नजर टाकली व मग धीटपणानें त्या सैनिकांवरील अंमलदाराजवळ जाऊन आशीर्वाद देत म्हटलें, 'परमेश्वराची शांति तुमच्यावर असो.'

तेव्हां त्या अंमलदारानें म्हटलें, 'आणि तुमच्यामध्येंही देव-देवतांची शांति वास करो.'

'तुमचा कैदी अगदीं पोरसवदा दिसतो.'

'वयानें म्हणाल, तर तो तसा आहे.'

'त्यानें असा अपराध तरी काय केला बरें?'

'तो खुनी मनुष्य आहे.'

त्या अंमलदाराचें तें उत्तर ऐकून जमलेल्या गांवकऱ्यांना फार आश्चर्य वाटलें. तरी योसेफनें आपली चौकशी पुढें चालवीत विचारलें,

'तो इस्राएली आहे का?'

'तो यहूदी आहे. बेनहर नांवाचा एक मोठा धनाढ्य व्यापारी होता; त्याचें नांव तुमच्या ऐकण्यांत आलें असेल.'

योसेफनें म्हटलें, 'मीं त्यांना प्रत्यक्ष पाहिलें होतें.'

'हा कैदी त्यांचाच मुलगा.'

तें ऐकून लोकांच्या तोंडून सहानुभूतीचे उद्गार निघाले व ते फार हळहळले.

तो अंमलदार पुढें म्हणाला, 'परवांच्या दिवशीं यरूशलेमांतील भर-रस्त्यांतून थोर ग्राटस जात असतां त्या कैद्यानें आपल्या वडिलांच्या वाड्याच्या गच्चीवरून कौल मारून त्याचा खून करण्याचा प्रयत्न केला. थोडक्यांत चुकलें व सुभेदाराचा प्राण बचावला.'

सर्व लोकांच्या अंगावर शहारे उठल्यासारखें दिसलें, कारण त्यांच्या नियमशास्त्रांत खून करण्यास मनाई केलेली होती.

योसेफनें अंमलदाराला विचारलें, 'ह्याला शिक्षा सुनावली का?'

त्यानें उत्तर दिलें, 'होय. जन्मभर सक्तमजुरी.'

योसेफ व अंमलदार यांचें संभाषण चालूं असतां इकडे योसेफबरोबर आलेल्या तरुणानें त्या कैद्याकडे एकवार नजर टाकली. लागलीच त्यानें आपल्या हातांतील हत्यारांपात्यारांची पिशवी खालीं ठेवून तो नीट विहिरी-वर गेला. त्यानें पाण्यान एक मडकें भरलें आणि पहाऱ्यावरील सैनिकांची त्याला मना करण्याची इच्छा असती तरी त्यांनीं तसें करण्यापूर्वींच तो चपळाई करून त्या जमिनीवर निश्चेष्ट पडलेल्या कैद्याजवळ जाऊन त्याला पाणी पिण्याचा आग्रह करूं लागला.

ह्या तरुणानें दुर्दैवी बेनहरच्या खांद्यावर हात ठेवतांच त्यानें हळूहळू डोळे उघडले व पाणी पिण्यास सांगणाऱ्या तरुणाच्या चेहऱ्याकडे निर-खून पाहिलें. हा चेहरा कोमल व दुसऱ्यामध्यें आपुलकीची भावना उत्पन्न करणारा, तथापि प्रेमपूर्ण व पवित्र हेतूची छाया पसरलेला, हवें तें कर-ण्याचें सामर्थ्य अंगीं असल्याचें प्रमाण पटवणारा असा असल्यामुळें, बेन-

हरला मरेपर्यंत त्याचें कधीं विस्मरण झालें नाहीं. हालअपेष्टा, दुःख, व अन्याय यांमुळें बेनहर अगदीं काहून गेला होता, व त्याला असह्य वेदना होत होत्या, तरी त्याच्या मनांत सूडाच्या भावनेनें काहूर उठवलें होतें. तथापि या तरुण सुताराच्या भेदक दृष्टीपुढें आपलें अंतःकरण वितळून जात आहे, व आपण एकाद्या बालकाप्रमाणेंच बनत आहों असें बेनहरला वाटलें. त्यानें मडक्याला तोंड लावलें व तो घटांघटां बराच वेळ पाणी पीत राहिला.

दोघांपैकीं एकाच्याही तोंडून अक्षरदेखील बाहेर पडलें नाहीं. पण जो हात त्या कैद्याच्या खांद्यावर प्रथम पडला होता तोच हात बेनहरच्या भव्य मस्तकावर ठेवला गेला व त्याला अस्फुट आशीर्वाद दिला गेला. कैद्याचें पाणी पिणें आटोपतांच तो तरुण सुतार चटकन् उठला, त्यानें तें मडकें विहिरीवर नेऊन ठेविलें, व पुन्हां योसेफजवळ येऊन आपली हत्यारांची पिशवी घेऊन तो उभा राहिला. तेथें जमलेली सर्व गांवकरी मंडळी व तो अंमलदार यांनीं हें त्याचें सगळें कृत्य पाहिलें होतें. त्या अंमलदाराच्या मनावर ह्या दृश्याचा कांहींतरी सुपरिणाम झाल्यासारखें दिसलें, कारण निघण्याची तयारी झाल्यावर तो अंमलदार त्या कैद्याजवळ गेला व त्यानें त्याला हात धरून वर उठवलें आणि एका स्वाराच्या मागें घोड्यावर बसविलें, व ती टोळी आपल्या मार्गाला लागली.

यहूदा बेनहर व नासरेथकर येशू यांची अशा विलक्षण प्रकारें पहिलीच भेट होऊन त्यांचा अल्पावधींत वियोगही झाला.

रोमला ह्या काळांत आपल्या अफाट साम्राज्यावर आपली सत्ता अबाधित राखण्यासाठीं समुद्रावर मोठें आरमार जय्यत तयार ठेवावें लागे. आरमारांतील सर्व गलबतें वल्ह्यांच्या व शिडांच्या जोरावर विशेष अवलंबून असत. सर्वांत मोठ्या गलबतांत वल्हीं मारावयाच्या जागांच्या ज्या रांगा असत त्यावर त्यांना नांवें दिलेलीं असत. एकावर एक अशा 'दोन रांगांचें' किंवा 'तीन रांगांचें' गलबत असें नांव असे.

हे वल्हीं मारणारे म्हणजे लढाईतील कैदी किंवा जन्मठेपेची सक्तमजुरीची शिक्षा झालेले असे कैदीच असत. अशा लोकांची संख्या हवी तेवढी मिळण्यासारखी असल्यामुळें ह्या वल्हीं मारणारांवर लवमात्र दया-माया दाखवण्यांत येत नसे. मरेमरेतों त्यांच्याकडून काम करवून घेण्यांत येई. सर्वसाधारणपणें एकदां या कामावर कैदी आला म्हणजे वर्ष दोन वर्षांत, किंवा फार तर तिसऱ्या वर्षीं, त्याला मृत्यु यावयाचाच. बेनहरला कायमचा निकालांत काढावा म्हणून रोमी सुभेदारानें त्याला ही जन्मठेपेची शिक्षा देऊन गलबतावर वल्हीं मारण्याच्या कामा-वर पाठवलें.

ह्या वेळीं एजियन समुद्रांतील बंडखोर बलिष्ठ चांचे लोकांच्या हल्ल्यां-मुळें रोमच्या व्यापाऱ्याला मोठाच धक्का बसून तो डबघाईस आला होता. धाडसी व चतुर नायकांच्या हाताखालीं हे चांचे लुटारू बेलाशक व्यापारी जहाजांवर अचानक हल्ला करून तीं लुटीत. ह्यांच्या लूटमारीमुळें रोमसाठीं बाहेरून येणाऱ्या अन्नसामुग्रीचाच तुटवडा पडण्याचें भय उत्पन्न झालें, मग रोमसाठीं बाहेरून येणाऱ्या ऐषआरामाच्या वस्तूंविषयीं बोलावयासच नको. चैनीच्या गोष्टींचा पुरवठा रोमला बाहेरील देशांकडून होत असे. लुटींत मिळणारी संपत्ति व विजय यांमुळें हे चांचे सरदार असाधारण धाडसी व बेडर बनले होते.

अशी आणीबाणीची वेळ आलेली पाहून पश्चिम युरोपांतील युद्धांत गुंतलेला प्रसिद्ध विजयी रोमी दर्यासारंग क्विंटस एरियस नांवाचा होता. त्याला इकडे बोलवण्यांत आलें, आणि भूमध्यसमुद्रांतील चांचे लोकांच्या लूटमारीचा नायनाट करण्याच्या कामावर त्याची नेमणूक झाली व त्याच्या हाताखालीं शंभर लढाऊ जहाजांचें बलिष्ठ आरमार देण्यांत आलें. या कामीं विजय प्राप्त झाल्यास क्विंटसवर पदव्या व संपत्ति यांचा वर्षाव होईल हें जाणून तो आपल्या नव्या कामगिरीवर जाण्यास निघण्याच्या वेळीं त्याच्या मित्रमंडळीनें त्याला एक मोठी मेजवानी दिली व त्यांनीं त्याला देवदेवतांच्या संरक्षणावर सोंपवून निरोप दिला. लागलीच तो

आपल्या अस्ट्रिया नामक निशाणाच्या जहाजावर गेला. त्यानें गलबताची कसून तपासणी केली. मग वल्हीं मारणारांच्या म्होरक्याला बोलावून त्याला तो म्हणाला,

'तुझ्याजवळ वल्हीं मारणारे किती इसम आहेत ?'

'दोनशें बावन.'

'आणि तुझ्या कामाच्या वेळा ?'

'दर दोन तासांनीं सोडवणूक.'

या गलबतावर वल्हीं मारावयाच्या रांगा डेकच्या खालीं एकावर एक अशा ठेवलेल्या होत्या. सर्वांत खालची रांग आंखूड, वरची लांब, व मधली मध्यम अशी होती. गलबताच्या मध्यभागीं केबिन होती. तिची लांबी साठ फूट व रुंदी तीस फूट होती. ती मोठ्या दिवाणखान्यासारखीच होती. उजेडासाठीं वरच्या बाजूला तीन दरवाजे होते. ही केबिन हेंच गलबतावरील सर्व लोकांचें घर. जेवणखाण, निजणें, व काम संपलें म्हणजे विश्रांति घेणें वगैरे गोष्टींची जागा हीच.

केबिनच्या मागल्या बाजूस उंच जागीं असलेल्या ओटाचासारख्या जागीं वल्हीं मारणारांचा म्होरक्या बसावयाचा. येथून सर्व वल्हीं मारणारे त्याला दिसत व तोही त्यांना दिसे. त्याच्यापुढें एक मेज होतें. वल्हीं मारणारांना खूण म्हणून तो म्होरक्या आपल्याजवळच्या हातोडचानें मेजावर ठोके मारावयाचा. त्याच्या डोक्याच्यावर मुख्य दर्यासारंगाची रहावयाची जागा होती. हिची व्यवस्था व टापटीप विशेष असे. सुंदर कोंच, मेज, खुर्ची, वगैरे सामानसुमान उत्तम प्रकारचें होतें.

ह्या रोमी आरमारावरील बेनहर ह्या एकाच व्यक्तीच्या भवितव्याचा आपल्या कथानकाशीं संबंध असल्यामुळें वल्हीं मारणारांच्या परिस्थितीकडेच आपल्याला विशेष लक्ष द्यावयाचें आहे. त्यांचें जीवन अतिशय खडतर असे. त्यांना कामाचा बोजा फार व विश्रांतीला फारच थोडा वेळ मिळे. त्यांना एकमेकांशीं बोलावयास किंवा डेकवर जाण्यास परवानगी नसे. त्यामुळें पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्या ठिकाणीं आपण आहों हें कळण्याचा

त्यांना मार्ग नव्हता. वल्हीं मारण्याचें काम एकदां साधलें म्हणजे तें यंत्रासारखें चालणारें. त्याला डोक्याची किंवा बुद्धीची गरज पडत नाहीं.

युद्धांतील कैदी किंवा जन्मठेपेचे गुन्हेगार कैदी यांचाच सगळा भरणा वल्हीं मारणारांमध्यें असावयाचा हें मागें आलेंच आहे. अफाट रोमीसाम्राज्यांतून ह्या लोकांना एकत्र केलें जात असे, म्हणून साता समुद्रावर वावरणाऱ्या रोमी आरमारावरील वल्हीं मारणारांमध्यें गोथ्स, ग्रीक, ब्रिटिश, शिद्दी, जर्मन, अरब, यहुदी, आयरिश, इत्यादि सर्व लोक दृष्टीस पडावयाचे. या वल्हीं मारणारांच्या मालकांना, आरमारी अधिकाऱ्यांना, ह्या कैद्यांपासून केवळ काम, मरेमरेतों काम, घ्यावयाचें एवढेंच माहीत. त्यांना या लोकांसंबंधींच्या कसल्याही गोष्टीचें सुख ना दुःख. शिवाय हे लोक हवे तितके मिळण्यासारखें असल्यामुळें अधिकाऱ्यांना त्यांचा जीव कस्पटाप्रमाणें वाटे. म्हणून ते ह्यांच्याकडून इतकें जबर काम करवून घेत कीं, ना कोणी कधीं आजारी ना म्हातारा व्हावयाचा. कामाखालीं थोड्याच काळांत त्याची इहलोकींची यात्रा संपे.

रोमी मालकांना ह्या दुर्दैवी कैद्यांविषयीं तिळमात्र आस्था वा कळकळ नसे. त्याचप्रमाणें या कैद्यांनासुद्धां रोमच्या कल्याणाची काडीमात्र पर्वा नसे. अर्थात् लढाईच्या प्रसंगीं ह्या वल्हीं मारणारांच्या राजनिष्ठेचें नांवच घ्यावयास नको ! तथापि ते शत्रूंना जाऊन मिळणें अशक्य होतें, कारण हे कैदी वल्हीं मारण्याच्या जागेला सांखळदंडांनीं अडकवून टाकलेले असावयाचे. त्यामुळें प्रसंगीं गलबतावर आग लागली तर हे जळून मरावयाचे, किंवा गलबत बुडालें तर हे समुद्राच्या तळाशीं जावयाचे.

क्विंटस एरियसनें वल्हीं मारणारांच्या म्होरक्याजवळ चौकशी करणें संपवल्यावर गलबतावरील सुकाण्या, मुख्य तांडेल, कोठीवाला वगैरे सर्व लहानथोर कामगारांजवळ विचारपूस केली. त्यांनीं सर्व व्यवस्था अगदीं ठाकठीक आहे अशी त्याची खात्री करून दिली. तेव्हां पूर्व दिशेला झपाट्यानें प्रवास करण्यासंबंधींचे हुकूम सगळ्या आरमाराला दिल्यावर क्विंटस एरियस दर्यासारंगाच्या उच्च बैठकीवर ठेवलेल्या आराम खुर्चीवर

जाऊन विसावा घेत बसला. येथून त्याला गलबतावर चालू असलेला सर्व कारभार चांगला दिसे. तो येथें बसून वल्हीं मारणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें बारकाईनें निरीक्षण करूं लागला. गलबताच्या दोन्ही बाजूंना साठासाठांची एक एक टोळी तासांमागून तास सतत, म्होरक्या हातोड्यानें मेजावर मारीत असलेल्या ठोक्यानुसार वल्ह्यांचे आघात करीत होती. कांहीं वल्हीं मारणारांमध्यें क्विंटस एरियसला कमीपणा दिसून आला, तेव्हां या चांचे लोकांवरील स्वारींत यश मिळाल्यास त्यांच्यांतील कैदी या नालायक वल्हीं मारणारांच्या बदली कामावर ठेवावयाचे असें त्यानें आपल्या मनाशीं ठरवूनही टाकलें.

तितक्यांत त्याच्या आरामखुर्चीच्या अगदीं समोर दिसणाऱ्या एका वल्हीं मारणाऱ्याकडे क्विंटसचें लक्ष विशेष खेंचलें गेलें. हा मनुष्य आपलें वल्हें अशा सफाईनें पण साहजिकपणें मारी कीं, तें साधारण पहाणाराला, तो कैदी आंग मोडून काम करीत नाहीं असें वाटण्यासारखें होतें. पण बारीक निरीक्षण करणाराला त्या कैद्याचें वल्ह्याची मूठ पकडणें व त्याच्या वल्ह्याचा झोंक या गोष्टींवरून असें लक्षांत येण्यासारखें होतें कीं त्याची वल्हें मारण्याची सफाई व साहजिकपणा हीं त्याच्यामधील बुद्धिमत्ता व निग्रहशक्ति यांचें दर्शक होत. क्विंटसच्या लक्षांत तो प्रकार तेव्हांच आल्यामुळें त्याचें लक्ष त्या कैद्याकडे अधिकच लागलें. त्याला दिसून आलें कीं, तो वल्हीं मारणारा कैदी अगदीं तरुण आहे. पण तें पाहून त्या तरुणाविषयीं त्याचें मन तिळमात्र द्रवलें नाहीं, उलट तो तरुण असल्यामुळें रोमसाठीं वल्हीं मारण्याचें तें काम तो अधिक वर्षें करूं शकेल असा विचार त्याच्या मनांत आला. कमरेला असलेल्या लहानशा फडक्या-शिवाय त्या तरुणाच्या अंगावर वस्त्रच नसल्यामुळें त्याच्या शरीराची प्रत्येक हालचाल स्पष्ट दिसत होती. तो तरुण वर पाहील तेव्हां त्याच्या चेहऱ्याचें अधिक बारीक निरीक्षण करण्याच्या हेतूनें क्विंटस टपून बसला होता, आणि जणूं त्याच्या मनांतील हेतु ताडूनच कीं काय त्या तरुण कैद्यानें मान वर केली व त्याच क्षणीं त्याची व क्विंटसची नजरानजर झाली.

क्विंटस एरियस स्वतःशींच आश्चर्यानें म्हणाला, 'यहूदी ! आणि अगदीं तरुण ?' दर्यासारंगाची नजर आपल्याकडे विशेष लागलेली आहे असें लक्षांत येतांच त्या तरुणानें केवळ क्षणभरच वल्हें थांबवलें. पण वल्हीं मारणारांच्या म्होरक्याच्या कावळ्यासारख्या नजरेंतून ही गोष्ट निसटली नाहीं व हें त्यानें मेजावर दणकन आवाज करून त्या तरुणाच्या लक्षांत आणून दिलें. तो तरुण क्षणार्धांत भानावर येऊन पूर्ववत् आपलें काम बिनचूक करूं लागला. एरिसनें सतत चार दिवस, वेळ सांपडेल त्याप्रमाणें, ह्या तरुण कैद्याचें निरीक्षण चालवलें. चौथ्या दिवशीं त्यानें वल्हीं मारणारांच्या म्होरक्याला आपल्यापुढें बोलावून विचारलें,

'साठाव्या बाकावर बसलेल्या कैद्याची तुला माहिती आहे का ?'

त्यावर म्होरक्यानें उत्तर दिलें, 'तो आमचा सर्वांत उत्तम वल्हें मारणारा आहे.'

'तो यहूदी असून अगदींच तरुण आहे.'

'महाराजांची नजर भेदक आहे.'

'त्याचा स्वभाव कसा काय आहे ?'

तो पूर्ण आज्ञाधारक आहे. त्यानें आजपर्यंत एकदां व एकच विनंति मला केली; आणि ती तरी काय, तर वेळोवेळीं गलबताच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला त्याला बदलण्यांत यावें, एवढीच.'

'त्याला त्यानें कारण काय सांगितलें ?'

म्होरक्या म्हणाला, 'त्यानें मला म्हटलें "जे लोक एकाच बाजूला बसून सतत वल्हें मारतात त्यांचें अर्धें अंग बधीर होतें असें माझ्या नजरेस आलें आहे, व मग वादळासारख्या किंवा लढाईसारख्या आकस्मिक प्रसंगीं बाजू बदलण्याची गरज पडते तेव्हां असे वल्हीं मारणारे निकामी ठरतात."'

दर्यासारंग क्विंटस म्हणतो, 'ही कल्पना अगदीं नवीन दिसते. ह्या तरुण कैद्याचा पूर्व इतिहास तुला माहीत आहे का ?

'नाहीं, त्यांतलें अक्षरही माहीत नाहीं.'

'त्याचें काम संपून त्याला विश्रांति देण्याची वेळ झाली म्हणजे त्याला एकट्याला माझ्याकडे पाठव.'

दोन तास होतांच साठ नंबर दर्यासारंगापुढें येऊन उभा राहिला व म्हणाला, 'मला आपणांपुढें येऊन उभें राहण्याची आज्ञा झाली आहे.'

उंच, कणखर, उन्हांत तुळतुळीत दिसत असलेली व नसानसांतून घट्ट तांबडेलाल रक्त सळसळत असलेली ती आंगकाठी एरियसनें न्याहळून पाहिली. ह्या तरुणाचा बांधा व आंगकाठी पाहून त्याला आनंद वाटला व त्याच्या मनांत नाटकगृहांतील करमणुकीचा विचार येऊन गेला. शिवाय ह्या तरुणाच्या सभ्य चालीरीतींचाही त्याच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्यानें कैदी होण्यापूर्वींचे दिवस बऱ्याच चांगल्या स्थितींत घालवले असले पाहिजेत, हें त्या तरुणाच्या आवाजावरून स्पष्ट दिसून येत होतें. त्याची दृष्टि सतेज आणि निष्कपट, आणि विलक्षण पाणीदार दिसत होती, पण तिला उद्दामवृत्तीची दर्शक म्हणतां येण्यासारखें नव्हतें. दर्यासारंगाच्या तीव्र, भेदक नजरेला जेव्हां त्या तरुण कैद्याची नजर भिडली तेव्हां दर्यासारंगाला दोषैकदृष्टि, द्वाष्टपणा, किंवा क्रौर्य यांची छटा त्या तरुणांत दिसली नाहीं, पण असह्य दुःखयातना फार दिवस भोगाव्या लागत असल्यामुळें होणारी तळमळ स्पष्ट दिसून येत होती. मनांतून नसतांनाही धनी गुलामाशीं बोलतो त्या स्वरानें नव्हे. पण वडील मनुष्य लहानाला बोलतें त्या सहृदयतेनें भरलेल्या स्वरांतच तो रोमी दर्यासारंग त्या तरुण कैद्याशीं बोलूं लागला.

'तूं सर्वांत उत्तम वल्हें मारतोस म्हणून तुमचा म्होरक्या सांगतो.'

'आमच्या म्होरक्याचें तें सौजन्य आहे.'

'तूं ही सक्तमजुरी बरेच दिवस करीत आहेस काय?'

'सुमारें तीन वर्षें.'

'हें वल्हीं मारण्याचेंच काम?'

'एवढ्या अवधींत एक दिवससुद्धां ह्या कामाशिवाय गेला नाहीं.'

'हें काम फारच कठीण आहे. हें एकसारखें वर्षभर करून ज्याची प्रकृति ढासळली नाहीं असा मनुष्य विरळा सांपडतो, आणि तूं तर अजून तरुणच आहेस !'

'दुःख सहन करण्याच्या बाबतींत आत्म्याचा भाग बराच असतो, म्हणून त्याच्या जोरावर, ज्या परिस्थितींत अधिक सशक्त व सुदृढ लोकांचा निभाव लागत नाहीं त्या परिस्थितींत अशक्त मनुष्य सहज टिकाव धरूं शकतो, ही गोष्ट उदारहृदयी एरियस महाराजांच्या स्मरणांतून क्षणभर निसटल्यासारखी दिसते.'

'तुझ्या बोलण्यावरून तर तूं यहूदी दिसतोस.'

'जो अगदीं पहिला रोमी या जगांत झाला त्याच्या पूर्वींच्या काळापासून अनेक पिढ्या माझे पूर्वज इब्री असत.'

त्या वल्हीं मारणाऱ्याच्या चेहेऱ्यावर अभिमानाची झांक मारलेली पाहून एरियस म्हणाला, 'तुझ्या वंशाचा दुर्दमनीय अभिमान तुझ्यामध्यें जागृतच आहे.'

'अभिमानाला खरा जोर बंधनामध्यें सांपडलें असतांच फार असतो.'

'तुला अभिमानाला अशी जागा तरी कोणती आहे ?'

'मुख्य गोष्ट मी यहूदी आहें हीच.'

एरियस म्हणाला, 'मीं कधीं यरूशलेम पाहिलेलें नाहीं. पण मीं तेथल्या अमीरउमरावांविषयीं ऐकलेलें आहे. त्यांच्यापैकीं एक माझ्या चांगला ओळखीचा होता. तो व्यापारी असल्यामुळें नेहमींप्रमाणें एकदां व्यापारासाठीं गलबतें घेऊन सफरीला गेला. तो माझा व्यापारी मित्र राजा होण्याला लायक असा पुरुष होता. बरें, पण तुझा दर्जा काय आहे ?'

'मला वल्हीं मारणाराच्या स्थानावरून उत्तर द्यावें लागत आहे खरें. मी जन्मठेपेचा कैदी आहें. माझे वडील यरूशलेमांत राजपुत्रच होते,

आणि व्यापाराच्या धंद्यानिमित्त जलपर्यटणें करीत. रोममध्यें त्या थोर ऑगस्टस बादशहाच्या दिवाणखान्यांतील आदरातिथ्याचा लाभ माझ्या वडिलांना अनेकदां झालेला होता.'

'त्यांचें नांव काय?' असें दर्यासारंगानें मध्येंच विचारलें.

'इत्थमार हर.'

दर्यासारंग तें उत्तर ऐकून चकित होऊन गेला. त्यानें हात वर करून म्हटलें, 'काय, तूं हर वंशांतला आहेस?' त्याच्यानें थोडा वेळ अगदीं बोलवलेंच नाहीं. किंचित् वेळानें मन स्थिर करून त्यानें विचारलें, 'तुला अशा अवस्थेंत पडण्याला काय कारण झालें?'

या प्रश्नाचें उत्तर देण्यास त्या तरुणाला आपलें मन आंवरून धरून स्वस्थ करण्याचें विशेष अगत्य होतें. थोडा वेळ जाऊं देऊन त्यानें दर्यासारंगाकडे निर्भय वृत्तीनें पहात म्हटलें,

'प्रोक्युरेटर व्हॅलेरियस ग्राटस यांचा खून करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप माझ्यावर ठेवण्यांत आला होता.'

एरियस अधिकच चकित होऊन म्हणाला, 'तुझ्यावर, आणि असला आरोप? तूं आणि तो खुनी! ती गोष्ट तर सगळ्या रोम शहरभर पसरली होती, इतकेंच नव्हे पण मीं भरसमुद्रांत आपल्या आरमारी गलबतावर असतां ती गोष्ट माझ्या कानीं आली.'

दोघांनीं एकमेकांकडे कांहीं वेळ स्तब्धपणें निरखून पाहिलें. मग एरियस म्हणाला, 'मला वाटलें होतें कीं, हरचें घराणें जगांतून समूळ नष्ट झालें.'

त्या तरुण कैद्याच्या तोंडावरची अभिमानाची छटा तत्काळ लोपली. त्याच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. तो तशाच स्थितींत रुद्ध कंठानें म्हणाला,

'आई, आई! लाडकी मिर्झा ताई! कोठें आहेत त्या दोघी? हे थोर मनाच्या रोमी गृहस्था, त्यांच्याविषयीं आपणाला कांहीं माहिती असली तर ती सांगण्याची मेहेरबानी होईल का या दासावर? त्या दोघी अद्याप जिवंत आहेत, का मेल्या? मीं अशा या स्थितींत तीन वर्षांचा काळ कंठला.

प्रत्येक घटका म्हणजे असह्य वेदनापूर्ण आयुष्य म्हटलें तरी चालेल. त्यांची मला मुळींच बातमी नाहीं. त्यांच्याविषयीं अवाक्षरही माझ्या कानीं पडलें नाहीं. वादळ, प्लेग, लढाई वगैरेसारख्या भीषण प्रसंगीं इतर लोक प्रार्थना करीत असतां मी उपहासानें हंसलों कारण ह्या माझ्या अघोर, स्थितींत दिवस कंठण्यापेक्षां मरण शतपटीनें चांगलें. माझी आई व प्रेमळ बहीण यांच्या ताटातुटीचें दुःख विसरण्यासाठीं मीं वल्ह्यावरच एकाग्र मन केलें; आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांची ती तशी दुर्दशा होण्याला कारण माझाच हा हात. मी—'

'तूं आपला अघोर अपराध कबूल करतोस का?' असें त्याला एरियसनें दरडावून विचारलें.

त्या वेळीं बेनहरच्या चेहेऱ्यांत जो विलक्षण फरक झाला तो पहाण्यासारखा होता. त्याच्या हातांच्या मुठी वळल्या, त्याचा आवाज चढला, व त्याच्या डोळ्यांत तेज चमकूं लागलें. तो म्हणाला,

'माझ्या वाडवडिलांचा देव जो अनादि अनंत परमेश्वर त्याच्याविषयीं आपण ऐकलेंच आहे. त्या परमेश्वराची सत्यता, सर्वसमर्थता, आरंभापासून इस्राएलांचा पाठीराखा होण्यांत प्रगट झालेली त्याची दिव्य प्रीति या सर्वांचें स्मरण करून मी सांगतों कीं, मी निर्दोषी आहें. महाराज, मला विश्वासाचा काडीमात्र तरी आधार द्या. माझ्या अंतर्यामीं दिवसेंदिवस दाट होत जाणाऱ्या अंधारांत लहानसा तरी प्रकाशाचा किरण घाला.'

त्या तरुण कैद्याचें तें अंतःकरण पिळवटून निघालेले शब्द ऐकून एरियसचें हृदय द्रवलें व त्याचा कंठ भरून आला; म्हणून तो खुर्चीवरून उठला व डेकवर फिरूं लागला. थोडया वेळानें त्यानें विचारलें,

'तुझ्यावरील आरोपाची चौकशी झाली नाहीं काय?'

'नाहीं; केव्हांही नाहीं.'

त्या रोमी माणसानें चकित होऊन विचारलें, 'आं! चौकशी नाहीं; साक्षीपुरावा नाहीं; मग तुला दोषी कोणीं ठरवलें?'

रोमी साम्राज्याच्या वैभवाला ओहोटी लागण्यास आरंभ होण्याच्या ह्या काळांतही रोमी लोकांचें आपल्या कायदेकानूंवर व न्यायपद्धतीवर विलक्षण प्रेम असून त्यांना त्यांविषयीं असाधारण अभिमान वाटत असे.

तरुण कैदी पुढें म्हणाला, 'सैनिकांनीं माझ्या मुसक्या बांधल्या व मला फरफरां ओढीत नेऊन गढींतील एका खोलींत बंद करून टाकलें. नंतर मला कोणीं भेटलें नाहीं व माझ्याशीं कोणीं कांहीं बोललेंही नाहीं. दुसऱ्याच दिवशीं सैनिकांच्या पहाऱ्यांत मला समुद्रकांठीं आणलें व तेव्हांपासून आतांपर्यंत जन्मठेपेचा कैदी म्हणून येथें गलबतावर वल्हें मारण्याचें काम मी करीत आहें.'

'तुझी चौकशी करण्यांत आली असती तर तूं काय रे सिद्ध करून दाखवलें असतेस ?'

'मी अगदीं तरुण आहें व रोमशीं स्नेहभाव बाळगणाऱ्या कुटुंबांत माझा जन्म झालेला आहे. असलें अघोर कृत्य करून मला काडीचाही लाभ होणें नाहीं, पण उलट माझ्या कुटुंबाचा विध्वंस होऊन घरादाराचा नाश होणार हें न समजण्याइतका कांहीं मी अजागळ नाहीं. माझ्या वडिलांनीं केलेल्या सेवेनें संतुष्ट होऊन रोमनें माझ्या वडिलांचा मोठा मानमरातब केलेला होता आणि मला सर्वथा अनोळखी अशा ग्राटसला ठार मारण्यास अल्पसुद्धां कारण नव्हतें. शिवाय माझ्या मनांत त्याला मारावयाचें होतें असें क्षणभर मानलें, तरी तो लिजन नामक प्रसिद्ध पलटणींतील सैनिकांच्या पथकाच्या मध्यभागीं, दिवसा ढवळ्या, आणि भर रस्त्यांतून मिरवत चालला असतां मी तें दुष्ट कृत्य करण्याचा प्रयत्न करीन इतका माथेफिरू मी होणें शक्य नाहीं. तसें केल्यास मला प्राणाहून प्रिय असलेल्या आप्तजनांसकट सर्वस्वाची होळी झाल्याशिवाय रहाणार नाहीं ही उघड दिसणारी गोष्ट माझ्या लक्षांत आल्यावांचून रहाणें अशक्य होतें. व्यक्तिशः लाभाच्या दृष्टीनें पाहिल्यास माझा हात असलें कृत्य करण्यास पुढें झालाच नसता; शिवाय इस्राएलाच्या प्रत्येक संतानाला नियमशास्त्र हें श्वासोच्छ्वास करण्याच्या क्रियेइतकेंच मौल्यवान् वाटतें; माझा हात वर झाला असता तरी त्या नियमशास्त्रानें तो थोपवून धरला असता. हें कृत्य आमच्या पवित्र नियमशास्त्राविरुद्ध आहे.'

तरुण कैद्याच्या तोंडांतून निघणारा वरील प्रत्येक शब्द एरियस सावधानतेनें ऐकत होता. गुलाम म्हटला कीं, तो लबाड असावयाचाच अशी जनामनाची दृढसमजूत; आणि जर तो तरुण खोटें सांगत असला तर तें सांगण्याची त्याची शैली तरी असाधारण म्हणावी लागली असती. जर त्याचें म्हणणें खरें धरलें तर त्याच्या बाबतींत भयंकर अन्याय घडला असें म्हणणें भाग पडतें. एरियस हा अत्यंत न्यायप्रिय मनुष्य. कोणतीही अन्यायी गोष्ट त्याच्या नजरेस आली म्हणजे तत्काळ तो अन्याय दूर करण्याची इच्छा त्याच्या अंत:करणांत उत्पन्न झालीच म्हणून समजावें.

व्हॅलेरियस ग्राटस इतकें अन्यायी वर्तन करण्यासारखा मनुष्य आहे हें एरियसला यापूर्वींच माहीत होतें म्हणून असो, किंवा बेनहरच्या वडिलांची व त्याची तशीच जिवलग मैत्री होती म्हणून असो, पण आतां आपलें राजदरबारीं असलेलें वजन खर्चीं घालून या तरुण कैद्याला मुक्त करण्याकडे त्याच्या मनाची ओढ लागली. आपण असें केलेंच पाहिजे असें तो मनांत स्वत:शीं म्हणाला देखील. तथापि त्या तरुण कैद्याला याविषयीं अवाक्षर तो बोलला नाहीं. तो पुन्हां मनाशींच म्हणाला, 'आतां आपल्याला चपळाई केली पाहिजे, आणि या आणीबाणीच्या वेळीं सर्वांत सरस असलेला वल्हीं मारणारा हातचा गमावणें योग्य होणार नाहीं. शिवाय थोडे दिवस थांबून हा तरुण खरोखरच हरचा मुलगा आहे अशाविषयीं खात्री करून घेतां येईल.' कांहीं वेळ स्तब्धता राहिली. मग एरियस कैद्याला म्हणाला,

'तुझी सगळी हकीकत मीं ऐकली. जा तूं आपल्या जागीं परत आतां.'

बेनहरनें एरियसच्या चेहेऱ्याकडे बारीक नजरेनें व उत्सुकतेनें बराच वेळ पाहिलें होतें तरी त्याला आशेला आधार दिसला नाहीं, आणि म्हणून तो आज्ञा झाल्याप्रमाणें जावयास निघतां निघतां म्हणाला,

'हे न्यायप्रिय रोमी सज्जना, आपल्याला पुन्हां माझी आठवण कदाचित् झाल्यास मीं आपल्या आईविषयीं व बहिणीविषयीं कांहीं वर्तमानाची भिक्षा आपल्याजवळ मागितली होती एवढें ध्यानांत आणावें.'

बेनहर निघून चालला असतां त्याच्या कणखर व चपळ आंगकाठीकडे टक लावून पहात एरियस म्हणाला, 'हे देवतांनो, नाटकगृहांतील खेळांसाठीं किती लायक तरुण हा ! किती वेगवान धांवणारा हा असेल ! तरवार खेळण्यास किती बांधेसूद व सशक्त हात हा !' एरियसच्या तोंडून तसे उद्गार निघण्याचें कारण असें होतें कीं, त्या काळीं मल्लांच्या कुस्त्या, मनुष्यांमनुष्यांमधील द्वंद्व युद्धें, क्रूर, हिंस्र श्वापदांशीं मनुष्यांच्या झटापटी, वगैरे खेळ मनोरंजनासाठीं पहाण्याची रोमी लोकांना अतिच आवड असे, आणि म्हणून जे गुलाम या युद्धकलेंत निपुण असतील त्यांना मागणी फार मोठी असे.

आपल्या कामावर जाणाऱ्या तरुण कैद्याला पुन्हां हांक मारून एरियसनें विचारलें, 'थांब थोडा, आणि तूं जर या कैदेंतून मुक्त झालास तर काय करण्याची तुझी इच्छा आहे तें मला सांग.'

'मी आयुष्यांतील आपल्या आद्य कर्तव्याकडे वळेन. मी आपल्या आईला व बहिणीला त्यांच्या पूर्वींच्या सुस्थितींत आणून ठेवण्यासाठीं जिवापलीकडे धडपड करीन. त्यांचें फार नुकसान झालें आहे हें खरें, तरी माझ्या पूर्वजांच्या देवाला साक्ष ठेवून मी सांगतों कीं, मी त्यांना पहिल्याहून अधिक सुखांत ठेवण्यासाठीं आपली शिकस्त करीन.'

एरियसच्या अपेक्षेहून अगदींच निराळें उत्तर त्या तरुणानें दिलेलें ऐकून त्याची निराशा झाली.

तो त्या तरुणाला म्हणाला, 'पण कदाचित् त्या दोघींचें कांहीं बरें-वाईट यापूर्वींच होऊन गेलें असल्यास काय करशील ?'

तें ऐकून बेनहरचें तोंड उतरलें व तो आपल्या अंतःकरणांतील खळबळ शांत करूं लागला. लवकरच मन शांत करून तो म्हणाला,

'हे महाभाग एरियस, मी आपणांस खरें तेंच सांगतों. आमच्या कुटुंबावर ओढवलेल्या भयंकर प्रसंगाच्या आदल्याच रात्रीं युद्धकला शिकण्याची परवानगी मीं आपल्या आईपासून मिळविली होती. माझी तीच इच्छा, महत्त्वाकांक्षा, आजहि आहे; आणि युद्धकलेचें शिक्षण घेण्यास

या पृथ्वीवर रोमी छावणी हें एकच ठिकाण असल्यामुळें मी रोमी सैन्यांत भरती होईन.'

एरियस म्हणाला, 'तुझ्यासारख्याला नाटकगृहांतील क्रीडांगणच अधिक चांगलें. असो. आतां तूं जा, आणि तुझ्यामाझ्यामध्यें जें संभाषण झालें त्यामुळें भलत्याच आशेच्या नादीं लागूं नको. तूं कांहीं रोमी नाहींस.'

आतां मात्र बेनहर तेथून परत कामावर जात असतां कांहींसा आनंदी दिसत होता. कारण त्याच्यामधील निराशेच्या घोर अंधारांत आतां त्याला आशेचा किरण दिसूं लागला. तसें पाहिलें तर विशेष आशा करण्यास कांहीं आधार नव्हता.

त्यानें मनांतल्या मनांत प्रार्थना करीत म्हटलें,

'हे परमेश्वरा, तुला अत्यंत प्रिय असलेल्या इस्राएलाचें मी संतान आहें. या वेळीं मला साह्य कर अशी माझी तुला नम्र प्रार्थना आहे.'

◆ ◆ ◆

## प्रकरण ५ वें

# समुद्रावरील लढाई

अफाट समुद्रावर आपण पृथ्वीच्या कोणत्या भागीं आहों हें कांहींच समजत नाहीं. अशा स्थितींत कित्येकदां दिवसांचे दिवस हेलकावे खात असतां कशी स्थिति होते याची कल्पना करणें फार कठीण पडतें, मग त्याचें वर्णन करणें अशक्य झाल्यास नवल नाहीं. गेल्या तीन वर्षांत बेनहरची अशीच स्थिति झाली होती. एवढ्या अवधींत एरियस पुढें येऊन उभा राहिला. तीच त्याची डेकवर येण्याची पहिली वेळ. आज पुष्कळ दिवसांपासून बेनहरच्या बसावयाच्या जागेच्या वर असलेल्या फटींतून सूर्यप्रकाशाचे जे कांहीं थोडे किरण आंत येत त्यांच्याकडे तो नेहमीं बारकाईनें लक्ष देऊं

लागला होता, व म्हणून त्यांवरून आपण कोणत्या दिशेला चाललों आहों हें त्याला चांगलें ओळखतां येऊं लागलें होतें. याच साधनाच्या साह्यानें त्याला असें कळून आलें कीं, आपलें गलबत पूर्वेच्या रोखानें चाललें आहे; अर्थात् आतां आपल्या मायदेशाचें, पवित्र पालस्ताईन देशाचें, दर्शन होईल अशी आशा त्याच्या अंत:करणांत साहजिकच उत्पन्न झाली. पण कांहीं वेळानें गलबताची दिशा बदलून तें उत्तर दिशेनें जाऊं लागलेलें पहातांच नवीन उगवलेला तो आशेचा अंकुर करपून गेला.

एरियसचें गलबत युबियन किनाऱ्याशीं गेलें तेव्हां तेथल्या रहिवाशांकडून चांचे लुटारूंच्या हालचालींविषयीं त्याला थोडीशी माहिती मिळाली. या लुटारूंनीं त्या किनाऱ्यालगत असलेलीं गांवें व शहरें यांवर हल्ले करून तीं लुटून फस्त केलीं असल्यामुळें सर्व लोकांना त्यांची भयंकर दहशत बसली होती. एक व्यापारी गलबत सुदैवानें त्यांच्या हातांतून निसटून सुरक्षित आलें होतें. त्यावरील लोकांनीं लुटालुटीची व कत्तलीचीं इतकी भयंकर हकीकत सांगितली कीं, ती ऐकून लोकांच्या तोंडचें पाणीच पळालें होतें. सर्व प्रकारचें व्यापारी दळणवळण बहुतेक बंद पडल्यासारखेंच झालें होतें. या वेळीं चांचे लोकांचें बळ अति वाढलें होतें. पूर्वेकडील समुद्रांची संपूर्ण माहिती असलेले ग्रीक लोक या चांचे लोकांचे पुढारी झाल्यामुळें ते मोठ्या कुशलतेनें आपल्या सफरी करीत.

शेवटीं या रोमी दर्यासारंग एरियसनें, मोठ्या चातुर्यानें चांचे लोकांचें सगळें आरमार एका आखातांत घुसेल अशा प्रकारें आपल्या आरमाराच्या हालचाली केल्या व त्याच्या अंदाजाप्रमाणें सर्व गोष्टी बरोबर जुळल्या हें पाहून त्याला साहजिकच समाधान वाटलें. या आखाताची लांबी पन्नास कोस व रुंदी दहा कोस होती, व त्याच्या तोंडाशींच एक मोठें बेट होतें. एरियसनें आपल्या आरमाराचे दोन विभाग केले. तो स्वत: पन्नास लढाऊ गलबतांचा तांडा आपल्या बरोबर घेऊन त्या बेटाच्या एका बाजूनें पुढें सरला व त्यानें दुसरा भाग दुसऱ्या बाजूनें पाठविला. चांचे लोकांचें आर-

मार आपल्या एकेका विभागापेक्षां मोठें असणार ही गोष्ट एरियस जाणून होता. तथापि, शत्रूची गलबतांची संख्या जास्त असतांही रोमी लोकांचें धैर्य व शिस्त यांच्या सामर्थ्यावर त्याचा एवढा दांडगा विश्वास होता कीं, आपल्या आरमाराच्या दोन भागांपैकीं शत्रूच्या सगळ्या आरमाराशीं एकस्थानेंच तोंड देण्याची वेळ पडली तरी आपली सरशी झाल्यावांचून रहाणार नाहीं याबद्दल त्याची खात्री होती.

नित्यक्रमाहून आज कांहींतरी विशेष गोष्ट घडणार अशी पहिली सूचना बेनहरला डेकवरून येणाऱ्या धूपाच्या वासावरून मिळाली.

तो मनांत स्वतःशीं म्हणाला, ‘दर्यासारंग एरियस आपल्या दैवतांना बळी अर्पण करीत आहे खास. आतां आपल्या आरमाराची कोणाशीं तरी लढाई होण्याचा रंग दिसतो. खरेंच का घडेल हें ?’

या तीन वर्षांच्या अवधींत बऱ्याच लढायांत त्याचें गलबत होतें, तरी एकही लढाई त्यानें प्रत्यक्ष पाहिली नव्हती. तथापि आरमारी लढाईचें बहुतेक स्वरूप त्याला चांगलें ठाऊक झालें होतें. अशी आरमारी लढाई व्हावयाची असली म्हणजे देवदेवतांना बळी अर्पण करणें ही पहिली गोष्ट होय असा नियम बेनहरला कळून आला होता. पण त्याला या बाबीसंबंधीं फार वेळ तर्क करीत बसावें लागलें नाहीं. दर्यासारंगाची स्वारी डेकवरून खालच्या भागीं आली. सैनिकांना शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज होण्याचा हुकूम सुटला. तीरांचे जुडगे, भाल्यांचे भारे पुढें आले व त्याचप्रमाणें तेलांत भिजवलेल्या कापशी चेंडूंनीं भरलेल्या टोपल्या तेथें आणल्या गेल्या.

वल्हीं मारणाऱ्या गुलामांची गुलामगिरी पूर्ण स्वरूपांत दिसण्याची वेळ आली. मागें सांगण्यांत आलेंच आहे कीं, गुलाम रोमशीं राजनिष्ठेनें बांधले गेलेले नसत, म्हणून लढाईसारख्या आगीबाणीच्या प्रसंगीं हे गुलाम रोमच्या शत्रूला सामील होणार नाहींत अशी हमी देतां येण्यासारखी नव्हती. शिवाय हे शत्रु गुलामांच्या जातीचे निघाल्यास गुलाम काय करतील हें निराळें सांगावयास नकोच होतें. वल्हीं मारावयाच्या प्रत्येक जागेला एक सांखळ-दंड होता. लढाईच्या तयारीचा एक भाग म्हणून एक अंमलदार तेथें आला

व त्यानें वल्हीं मारणाऱ्या सर्वांचे पाय त्या सांखळदंडांत पक्के अडकवून टाकले. गुलामगिरींतील अपमानाचा कळस असा हा प्रकार असल्यामुळें बेनहरला असह्य वेदना झाल्या. दर्यासारंगाशीं त्याचें जें बोलणेंचालणें झालें होतें त्यावरून त्याला एवढीच आशा या वेळीं वाटली होती कीं एरियस ह्या अपमानापासून तरी त्याचा बचाव करील, म्हणजेच त्याला जागेशीं जखडून टाकण्यांत येणार नाहीं. अंमलदारानें पहिल्या नंबरच्या कैद्यापासून पाय जागेशीं जखडण्यास व त्याला कुलूप ठोकण्यास आरंभ केला. एकामागून एक असा क्रम सुरू झाला. बेनहर मधून मधून आशेनें दर्यासारंगाच्या चाहुलीचा कानोसा घेई व कांहीं ऐकूं आलें नाहीं म्हणजे निराश होई. होतां होतां त्याचा साठ नंबर आला. बेनहर अगदींच अस्वस्थ झाला. त्यानें निराश होऊन पाय पुढें केला. त्याचा पाय सांखळदंडांत अडकवून त्याला कुलूप बसणार तोंच, दर्यासारंग एरियस यानें त्या कुलपें ठोकणाऱ्या अंमलदाराला आपल्याकडे हांक मारली. बेनहरला तर या वेळीं जणूं काय आपल्यासभोंवतींचा काळाकुट्ट अंधार एकदम नाहींसा होऊन आपण चक्क प्रकाशांत आलों असेंच वाटलें. दर्यासारंग त्या अंमलदाराशीं काय बोलला त्यांतलें अक्षरहि बेनहरला ऐकूं गेलें नव्हतें. आपल्या पायावर चढवलेला सांखळदंड खालीं पडला एवढेंच त्यानें पाहिलें. मग त्यानें आपलें वल्हें इतक्या जोरानें वांकवलें कीं त्याचा दांडा मोडतो कीं काय असाच भास झाला. वल्हीं मारणारांच्या म्होरक्यानें दर्यासारंगाचें लक्ष साठाव्या नंबराकडे वळवून म्हटलें, 'काय ह्याचें शरीरसामर्थ्य हें!'

त्यावर एरियस त्याला म्हणतो, 'आणि काय हा तेजस्वीपणा! हातांपायांत बेड्या नसलेला असाच तो अधिक चांगला. यापुढें त्याला कधीं बेड्या घालण्यांत येऊं नयेत.'

गुडुप अंधारांत कांहीं तास वल्ह्यांच्या जोरावर हें आरमार जात होतें. उजाडण्याच्या सुमारास पहारेकरी टेहेळ्यानें दर्यासारंग एरियस याला चांचे लोकांचीं गलबतें दृष्टीच्या टप्प्यांत आल्याचें वर्तमान कळवलें. आत्मविश्वासानें अगदीं शांतपणें अखेरची तयारी करण्यासंबंधींचे त्यानें हुकूम सोडले. म्होर-

क्याची आज्ञा होतांच वल्हीं मारणाऱ्यांनीं वल्हीं थांबवलीं. वल्हीं मारणाऱ्या प्रत्येक गुलामाला आतां काय होणार आणि काय नाहीं हें कळेना. तितक्यांत त्यांना दुसऱ्या गलबतांवरील वल्ह्यांचे पाण्यावर होणारे आघात ऐकूं येऊं लागले व दुसऱ्या गलबतांच्या वल्ह्यांनीं उत्पन्न केलेल्या लाटांवर आपलें गलबत डुलत आहे असें या दर्यासारंगाच्या निशाणाच्या गलबतावरील गुलामांना वाटलें. आतां त्यांच्या प्रथम लक्षांत आलें कीं, आपलें आस्ट्रिया गलबत आतां एकटेंच नाहीं, तर दुसरीं पुष्कळ गलबतें त्याच्याजवळ जमा झालीं असून लढाईच्या उद्देशानें त्यांची फळी बनवण्याचें काम चालू झालें आहे. हा शत्रु कोण असावा ? जागांशीं सांखळदंडानें जखडून टाकलेल्या या गुलामांच्या मनांत, 'आलेले शत्रु आपले लोक तर नसतील ना ?' असा विचार येऊन गेला.

डेकवरून खूण होतांच म्होरक्यानें आपल्या समोरील मेजावर हातोड्याचा दाणकन आवाज केला तेव्हां सर्व वल्हीं मारणाऱ्या गुलामांनीं एकजुटीनें वल्ह्यांचे हात मारले. गलबतानें मोठी झांप पुढें टाकली. गलबतावर एकच धामधूम सुरू झाली. कर्णे, तुताऱ्या, बिगुल वगैरे वाद्यांचे नाद निघूं लागले. एकाएकीं सर्व वल्हीं मारणाऱ्यांना एवढा धक्का बसला कीं, ते जागांवरून उडून खालीं पडले. त्यांच्या गलबतानें आपल्या लोखंडानें मढवून काढलेल्या चोंचीसारख्या पुढल्या भागानें चांच्यांच्या एका गलबताला अतिशय जोरानें ठोंस मारली होती म्हणून हा एवढा धक्का बसला. खलाशी लोकांनीं तेलांत भिजवून तयार ठेवलेले चेंडू आतां पेटवून ते शत्रूच्या भोंक पाडलेल्या गलबतावर टाकण्याचा सपाटा चालवला. मग पुन्हा त्यांची धांवपळ सुरू झाली. आतां गलबत एका बाजूला बरेंच कलंडलें. चोहोंकडून रोमी सैनिकांच्या विजयसूचक आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या. गलबतावरील मोठ्या यारीच्या ( क्रेनच्या ) सांखळदंडांत शत्रूचें एक गलबत जखडलें जाऊन उंच उचललें गेलें व मग समुद्रांत बुडवण्यांत आलें. मग धुराच्या लोटामधून तें गलबत चाललें. मनुष्यांचें मांस जळाल्याच्या घाणीनें वातावरण भरून गेलें. तेव्हां या गलबतावरील वल्हीं मारणाऱ्या गुलमांना कळून चुकलें कीं,

गलबतांना आग लागल्यामुळें त्यांच्यावर आपापल्या जागीं सांखळदंडांनीं जखडून टाकलेले दुर्दैवी गुलाम जळून मरत आहेत त्याची ही घाण होय. ते सर्व एकमेकांच्या तोंडाकडे वेड्यासारखे पाहूं लागले.

असा प्रकार होत असतां हें दर्यासारंगाचें गलबत चाललेंच होतें. एकाएकीं तें थांबलें. सर्व वल्हीं मारणारांच्या हातांतून वल्हीं हिसकावून घेतल्यासारखें झालें. या गलबताच्या आजूबाजूला दुसऱ्या गलबतांची गडबड, व डेकवर चाललेला गलबला ऐकूं येत होता. केव्हां केव्हां जखमी झालेल्या रोमी सैनिकांना वरून खालीं आणतांना दृष्टीस पडे. तितक्यांत बेनहरच्या अगदीं पायांपाशीं वरून कोसळलेलें एक शरीर पडलें. हें पडलेलें शरीर उत्तरेकडे रहाणाऱ्या गौरवर्णी रानटी लोकांतल्या मनुष्याचें होतें ही गोष्ट बेनहरनें तेव्हांच ओळखली, व तो समजला कीं या रानटी लोकांनीं आपल्या दर्यासारंगाच्या गलबतावर चढाई केली असून त्यांची व रोमी सैनिकांची हातघाईची लढाई गलबताच्या वरच्या भागीं चालूं आहे. वल्हीं मारणाऱ्यांचा म्होरक्या रोमी होता व म्हणून तो आपल्या रोमी शिस्तीला अनुसरून जागचा न हालतां मेजावर हातोडी खेळवीत दर्यासारंगाच्या दुसऱ्या हुकमाची शांतपणें वाट पहात होता. वल्हीं मारणाऱ्या गुलामांनीं त्याच्याकडे मुळींच लक्ष न देतां सांखळदंडापासून मुक्त व्हावें म्हणून सारखी धडपड चालवली. पण कांहीं केलें तरी आपण सुटूं शकत नाहीं असें पाहून ते हताश झाले.

पण बेनहर हा मोकळा होता. परमेश्वरा, तो किती मनापासून या संधीसाठीं तुझी प्रार्थना करी व किती उत्कंठेनें अशा संधीची वाट पहात असे हें केवळ तुलाच ठाऊक. वल्हीं मारणाऱ्या म्होरक्याचें अचल धैर्य व कडक रोमी शिस्तीनुसार वर्तन पाहून बेनहरनें मनांत त्याची तारीफ केली. पण स्वतः तो रोमचें कांहीं लागत नव्हता. उलट रोमविषयीं द्वेष व सूड हेंच त्याच्या मनांत घोळत होते. आप्तांची हांक बेनहरच्या कानीं आली व त्यांच्याकडे जाण्याची त्याची फार इच्छा होती. तो तेथून निघून जाण्याच्या बेतांत होता तितक्यांत त्याच्या लक्षांत आलें कीं.

तो रोमी न्यायाच्या पकडींत होता. जोंपर्यंत या पकडींतून तो मुक्त झाला नाहीं तोंपर्यंत पृथ्वीवर कोठेंही स्वतंत्र नागरिक म्हणून त्याला वावरतां येणें अशक्य होतें. जमिनीवर किंवा समुद्रावर आपण कितीही लांब गेलों तरी रोमच्या सत्तेचा पाश चुकवतां येणें शक्य नाहीं हें बेनहर जाणून होता. कायद्याच्या कचाट्यांतून मुक्त झाल्याशिवाय त्याला स्वदेशांत आपल्या आप्तांकडे जाहीरपणें जातां येणें शक्य नसल्यामुळें जगांत अन्य तऱ्हेनें आयुष्य घालवण्यापेक्षां मरण बरें असें त्याला वाटलें. आतां त्याची सगळी आशा दर्यासारंग एरियस याच्या सुप्रसन्नतेवर अवलंबून होती. तिकडे वर एरियस व त्याचे सैनिक यांच्यावर चांचे शत्रूंचा हल्ला होत होता त्यामुळें मोठा गोंगाट बेनहरला ऐकूं आलाच होता. तो मनांत म्हणाला, ' या झटापटींत एरियस मारला गेला तर—अब्राहामाचा देव करो व असें न घडो. आपलें वचन पूर्ण करण्यास मेलेलें मनुष्य कांहीं परत येत नाहीं. दर्यासारंग मारला जाणार नाहीं. तो मारला जातां कामा नये. त्याच्या मृत्यूनंतर जन्मठेपेचा कैदी म्हणून जिवंत रहाण्यापेक्षां त्याच्याबरोबर लढतां लढतां मरणेंच बरें.'

इतकें मनांत बोलून बेनहर ताडकन् उभा राहिला. डेकवर जाणाऱ्या शिडीवर त्यानें उडी मारली. अर्धी शिडी चढून तो गेला असेल नसेल तों मोठी प्रचंड खळबळ उडाली आणि त्या गलबताचे दोन तुकडे झाले. भराभर आंत पाणी शिरून बेनहर पाण्याखालीं गेला. तथापि शिकस्तीचा प्रयत्न करून तो वर आला. तितक्यांत सुदैवानें त्याला आधार देण्यासाठीं एक वहाती फळी त्याच्या अगदीं हाताशीं आली. बेनहरला आशा उत्पन्न झाली. त्याच्या सभोंवतीं दोन्ही पक्षांत लढाई चालूच होती. पाण्यांत पडलेले लोकदेखील शत्रूच्या नरडीचा घोट घेण्यासाठीं त्याच्यावर हल्ला करीत होते. वहात्या फळ्यांवर आधार घेऊन बसलेल्यांचाहि लढाईचा आवेश कमी झाला नव्हता. बेनहरला मिळालेली फळी फारच मोठी होती, तरी त्यानें अंगांत होतें तितकें सामर्थ्य एकवटून मोठ्या मुष्किलीनें ती लढाईच्या दंगलीपासून बऱ्याच दूर अंतरावर नेली. तितक्यांत त्याच्या अगदीं जवळ पाण्याखालून वर येणाऱ्या

माणसाचे दोन हात कांहीं आधार मिळण्यासाठीं पाण्यावर आघात करूं लागलेले त्याच्या दृष्टीस पडले. त्या मनुष्याचें डोकें पाण्याच्या वर आलें तेव्हां तें फार भयंकर दिसत होतें. पण बेनहरनें तेव्हांच दर्यासारंग एरियसला ओळखलें व त्याच्या तोंडून आनंदाची आरोळी निघाली. एरियस पुन्हा खालीं जाणार तोंच त्याच्या शिरटोपाची सांखळी धरून बेनहरनें त्याला आपल्याजवळ ओढून घेतलें, आणि त्याला फळीवर चढवलें. त्याच वेळीं जवळून जाणाऱ्या एका गलबताच्या वल्ह्यांच्या तडाख्यांत ती फळी सांपडणार तोंच बेनहरनें मोठ्या नेटानें ती बाजूला काढून घेतली.

समुद्राच्या पृष्ठभागावर जिकडे तिकडे जळणाऱ्या गलबतांचा उजेडच उजेड पसरला होता व लढाईच्या धुमाकुळाचा गोंगाट उत्तरेकडच्या दिशेनें ऐकूं येऊं लागला. कोणत्या बाजूचा जय झाला तें समजण्यास बेनहर-जवळ कांहीं साधन नसल्यामुळें उजाडेपर्यंत स्वस्थ रहाणें प्राप्त होतें. मग त्यानें फळीवर बेशुद्ध स्थितींत असलेल्या दर्यासारंग एरियसला सावध करण्याचा प्रयत्न चालवला. लवकरच मदत न मिळाल्यास एरियस मरणार आणि बेनहरला तर एरियस मरतां कामा नये असें वाटत होतें, पण त्याचा सगळा उपाय हरला तेव्हां आपल्या पूर्वजांच्या रीतीप्रमाणें त्यानें प्रार्थनेंत परमेश्वराचा धांवा सुरू केला.

लवकरच एरियस शुद्धीवर येऊन बोलण्याइतकी त्याला शक्तीही आली.

तेव्हां तो बेनहरला म्हणाला, 'पहा, आपल्या दोघांची सुरक्षितता ही या लढाईचा जो शेवट लागला असेल त्यावर सर्वस्वीं अवलंबून आहे. आज तूं माझ्या विशेष कामीं आला आहेस. आपण या सध्यांच्या संकटांतून सुदैवानें पार पडलों तर रोमी मनुष्याची कृतज्ञता कशी असते तें तुला पटवून देईन. पण तुझ्याकडून आणखी एक काम मला करवून घ्यावयाचें आहे. तूं तें करशील असें वचन मला दे.'

बेनहर म्हणाला, 'नियमशास्त्राची मान्यता असलेलें कोणतेंही काम मी आपल्यासाठीं करण्याचें वचन देतों.'

'तूं खरोखरच का यहूदी हर याचा मुलगा आहेस ?'

'मी बोललों तें अगदीं सत्य आहे.'

तेव्हां एरियस म्हणाला, 'त्या गृहस्थावर माझें मनापासून प्रेम होतें. तो माझा जिवलग मित्र झालेला होता. जर तूं त्याचा पुत्र असलास तर तुला हें माहीतच असेल कीं, अपकीर्ति झालेल्या रोमीनें जीव ठेवूं नये असें आमच्या तत्त्वज्ञान्यांनीं रोमी बालकांना शिक्षणच दिलेलें आहे. ही माझ्या बोटांतली आंगठी पहा. ही घे आणि आपल्या करंगळींत घालून ठेव.'

बेनहरनें एरियसच्या सांगण्याप्रमाणें ती आंगठी आपल्या बोटांत घातली.

तेव्हां एरियस पुढें म्हणाला, 'रोममध्यें धनिक लोकांत माझी गणना होते. तूं ही माझी आंगठी रोममध्यें माझ्या कारभाऱ्याला दाखव, आणि ही तुला कशी मिळाली ती हकीकत त्याला सविस्तर सांग; आणि मग त्याच्या हातीं असलेली सगळी संपत्ति जरी तूं मागितलीस तरी तो तत्काळ तुला ती देईल. दैववशात् मीच जगलों तर मी याहीपेक्षां अधिक तुझा उतराई होईन. मी तुला तुझ्या मायेच्या माणसांत नेऊन बसवीन. ऐकलेंस ना मीं काय म्हटलें तें ?'

'ऐकल्याशिवाय मला गत्यंतरच नाहीं.'

'तर मग प्रतिज्ञापूर्वक मला वचन दे. देवतांची शपथ...'

'महाराज, तसें आपण सांगूं नका. मी यहूदी आहें.'

'ठीक आहे. तुझ्या देवाच्या नांवानें शपथ घे. नाहींतर तुला वाटेल त्या तऱ्हेच्या प्रतिज्ञेवर मला वचन दे.'

बेनहर म्हणाला, 'पण महाराज, आपली इच्छा काय, आपलें काम काय, तें तर मला समजूं द्या; आणि खात्री बाळगा कीं, नियमशास्त्राविरुद्ध नसलेलें कोणतेंही काम मी तडीस नेईन.' मध्येंच उत्तर दिशेला बोट दाखवून तो म्हणाला, 'माझ्या वाडवडिलांचा देव धन्य होय. तें पहा, उत्तर दिशेकडून एक गलबत इकडे येत आहे.'

'तें कोणत्या राष्ट्राचें आहे हें सांगतां येईल का ? त्याच्यावरचें निशाण नाहीं का तुला दिसत ?'

'नाहीं. त्याच्यावर निशाणच नाहीं.'

तेव्हां दर्यासारंग एरियस म्हणाला, 'तर मग प्रतिज्ञापूर्वक वचन दे कीं, हें येणारें गलबत चांचे लोकांचें निघाल्यास तूं मला फळीवरून पाण्यांत लोटून देशील म्हणून. रोममध्यें असें गाजविलें जावो कीं क्विंटस एरियसहि आपल्या लढाऊ जहाजाबरोबर समुद्राच्या तळाशीं गेला.'

बेनहर म्हणाला, 'छे, छे, महाराज, असली गोष्ट माझ्या हातून होणार नाहीं. हें करणें आमच्या नियमशास्त्राविरुद्ध आहे. म्हणून तुमचा प्राण घेण्यांत साह्य करण्यापेक्षां मी तुमच्याबरोबरच समुद्राच्या तळाशीं येण्यास आनंदानें तयार आहें. ही आपली आंगठी परत घ्या. आपण दिलेल्या वचनांतून मी आपणांस मुक्त करतों. जरी या वेळीं मी जन्मठेपेचा कैदी गुलाम असलों तरी मी इस्राएलाचें संतान आहें व स्वतंत्र आहें. ही घ्या आपली आंगठी.' एवढें बोलून त्यानें आंगठी एरियसपुढें केली.

पण ती घेण्यास एरियसनें हात उचलला नाहीं.

तेव्हां बेनहर म्हणाला, 'जर आपण ही परत घेत नाहीं तर, रागानें किंवा तुच्छ समजून नव्हे पण मला महान् उपकारापासून मुक्त करून घेण्यासाठीं ही समुद्रालाच अर्पण करतों.' त्यानें ती समुद्रांत टाकिली.

तेव्हां एरियस त्याला म्हणाला, 'तरुणा, तूं ही वेडेपणाची गोष्ट केलीस. ही माझी शेवटली सेवा करावयाचें तूं अमान्य केलेंस तर माझ्या हातांनीं ती गोष्ट करणें मला थोडेंच अशक्य आहे ? पण जाऊं दे तें. मला वाटतें आपल्या दोघांची वेळ भरली'

तितक्यांत बेनहर हर्षित स्वरानें म्हणाला, 'महाराज, तें येणारें गलबत आणखी जवळ आल्यानें मला त्याच्या डोलकाठीवर रोमी शिरटोप घातलेला दिसतो आहे व तें गलबत येतां येतां पाण्यावर जीव बचावण्यासाठीं धडपड करणाऱ्या मनुष्यांना गलबतावर घेत आहे.'

बेनहरचें तें बोलणें ऐकून एरियसला हुषारी वाटली व तो गंभीरपणें म्हणाला,

'हे तरुणा, तूं आपल्या देवाचे आभार मान. आपल्या पक्षाचा जय झाला आहे. मोठ्यानें आनंदसूचक आरोळ्या मार व त्या गलबताचें लक्ष आपल्याकडे वेधेल असें कर. चांचे लोकांचा पाठलाग करणें थांबवतां कामा नये. अजून देखील रोममध्यें माझा मानमरातब वाढण्याचें चिन्ह दिसतें. आणि हे तरुणा, मी तुला आपला मुलगा मानून आपल्या संपत्तीचा वारस करीन. मीं तुला सांगितलेंच आहे कीं तुझ्या वडिलांची व माझी जिवलग मैत्री होती. यहूदी हा रानटी मनुष्य नव्हे हें त्या मित्रानेंच मला प्रथम पटवून दिलें.'

एरियसचा लढाईविषयीं अंदाज बरोबर निघाला. दर्यासारंगाच्या विभागाबरोबर लढाई होऊन पराभव पावलेलें चांच्यांचें आरमार पळून जात असतां रोमी आरमाराच्या दुसऱ्या विभागाच्या तावडींत सांपडून त्याचा पार धुव्वा उडून गेला. चांच्यांच्या आरमारांतील वीस लढाऊ जहाजें रोमींच्या हातीं लागलीं तीं विजयोत्सवाच्या प्रदर्शनांत दाखवण्यासाठीं बरोबर घेऊन विजयी रोमी आरमार रोमला निघालें.

रोममध्यें विजयी दर्यासारंग म्हणून एरियसचा विशेष मानसन्मान होऊन त्याचा दर्जा वाढला. एरियसनें मोकळ्या मनानें व प्रेमळपणानें आपला मानीव मुलगा म्हणून त्या बांधेसूद सुंदर बेनहरची आपल्या मित्रमंडळीला ओळख करून दिली. त्याच्या पूर्वायुष्याविषयीं अवाक्षर काढण्यांत आलें नाहीं, पण दर्यासारंगाचा प्राण वांचवण्यांत त्यानें दाखविलेलें धैर्य व शौर्य यांचे गोडवे गाण्यांत आले. थोड्याच दिवसांनीं रोमी कायद्यानुसार दत्तकविधानाचा समारंभ करण्यांत आला व बेनहर हा एरियसचा कायदेशीर वारसदार पुत्र झाला.

◆ ◆ ◆

## प्रकरण ६ वें

# शोधाला सुरवात

एक गलबत अंत्योखिया बंदरांत आलें. त्या काळच्या रोमी साम्राज्याची पूर्वेकडील राजधानी म्हणण्यासारखें हें अंत्योखिया शहर होतें. गलबताच्या डेकवर उतारूंची गर्दी झालेली होती. ह्या गर्दींत एक यहूदी तऱ्हेचा मौल्यवान् उंची पोषाख घातलेला सभ्य व सुशिक्षित असा एक तरुण फारच उठून दिसत होता. अर्थात् त्याच्याकडे त्याच्या बरोबरच्या प्रवासी लोकांचें विशेष लक्ष गेल्यास नवल तें काय ? तथापि तो सर्वांपासून बहुधा थोडासा दूरच राही. त्याच्याशीं बोलण्याचा प्रयत्न करणारांच्या प्रश्नांना ह्या तरुणाकडून सभ्यपणाचीं पण अगदीं त्रोटक उत्तरें लॅटीन भाषेमध्यें मिळत. दुसरी लक्षांत येण्यासारखी गोष्ट म्हणजे त्याचें शरीर बांधेसूद असून त्याचे हात तर फारच बळकट दिसत होते. आपण बेनहरला पाहिल्याला आज पांच वर्षें होऊन गेलीं आहेत, तथापि त्याला ओळखतां येणार नाहीं इतकें कांहीं त्याचें रूप पालटलें नाहीं. हल्लीं सर्वसाधारणपणें तो एरियसचा दत्तकपुत्र म्हणून आपल्या रोमी नांवानें ओळखला जातो. तरी पण त्याच्या पोषाखावरून त्याला आपल्या यहूदी कुलांतील जन्माचा किती अभिमान होता तें दिसून येतें.

बेनहर ज्या गलबतावरून प्रवास करीत होता तें अंत्योखिया बंदरांत शिरलें त्याच वेळीं आणखी दोन गलबतें बंदरांत शिरत होतीं. प्रत्येक गलबतावरील खलाशी, दुसऱ्या दोन्ही गलबतांवरील खलाशांना पिंवळ्या जर्द निशाणांनीं खुणा करून क्षेमकुशल विचारूं लागले. या पिंवळ्या निशाणाच्या खुणांविषयीं गलबतावरील उतारू आपापसांत तर्कवितर्क करूं लागले. कोणालाच त्यांच्या अर्थाविषयीं खरी कल्पना होत नाहीं असें पाहून दुसऱ्या एका यहूदी तरुणानें आपण होऊन मंडळीला

त्या खुणांचा अर्थ सांगितला. तीं तिन्हीं गलबतें एकाच मालकाचीं असल्यामुळें सर्व खलाशी एकमेकांच्या ओळखीचे होते व म्हणून बरेच दिवसांनीं गांठी पडतांच ते एकमेकांना कुशल प्रश्न विचारीत होते.

'ह्या मालकाचीं पुष्कळशीं गलबतें आहेत काय ?'

'होय, त्याच्याजवळ अनेक गलबतें आहेत. तो फार संपत्तिवान् आहे आणि अशा स्थितींत नेहमींप्रमाणें याच्याविषयींही लोकांत पुष्कळ तर्क-कुतर्क चालू आहेत. ह्याला इतकी संपत्ति तशाच कांहीं कृष्णकृत्याशिवाय लाभली नाहीं असें आपलें लोकमत. मागें यरूशलेमांत हर नामक एका अत्यंत प्राचीन घराण्याचा एक नेता लक्षाधीश होता.'

येथपर्यंतची वरील हकीकत बेनहर सहजगत्या म्हणून ऐकत होता, पण हर घराण्याचें नांव त्या बोलणाऱ्या यहूदी तरुणानें उच्चारतांच बेनहरच्या अंतःकरणांत विलक्षण कालवाकालव झाली. तथापि त्यानें मोठें आत्म-संयमन करून आपल्या मुद्रेवर तसें कांहीं दिसूं दिलें नाहीं.

तो यहूदी तरुण पुढें सांगूं लागला. तो म्हणाला, 'या लक्षाधीश हर नेत्याचा व्यापार पूर्वपश्चिमेकडील दोन्ही देशांत दांडगा चालत असे. ह्या लक्षाधिशाच्या पेढीची एक शाखा या अंत्योखिया शहरांत होती व तिचा सगळा कारभार सायमनीडस नांवाच्या मनुष्याच्या हातीं असे. तो नांवानें ग्रीक पण वास्तविक यहूदीच होता. हा लक्षाधीश एका सफरींत गलबत फुटल्यामुळें बुडून मरण पावला, तरी पण त्याचा व्यापार-उदीम भरभराटींत चालला. पुढें एक दिवस या लक्षाधिशाच्या अगदीं तरुण असलेल्या मुलानें यरूशलेम शहरांतील रस्त्यांत सुभेदार ग्राटसचा खून करण्याचा प्रयत्न केला ! तो प्रयत्न फसल्या दिवसापासून लक्षा-धीशाच्या त्या तरुण मुलाचा आजपर्यंत पत्ताच नाहीं. ग्राटसनें त्या सगळ्या कुटुंबावर सूड उगवून त्याचा नायनाट करून टाकला व त्याची ती सर्व मालमत्ता जप्त केली. तथापि त्या लक्षाधिशाच्या संपत्तीपैकीं मोठमोठ्या रकमांचा थांग ना पत्ता. त्याच धांदलींत सायमनीडस यानें स्वतःच्या नांवानें स्वतंत्र व्यापार सुरू केला व अल्पकाळांतच तो या

अंत्योखिया शहरांत सर्वांमध्यें सधन व्यापारी बनला. म्हणून लोकांत असा संशय पसरलेला आहे कीं, त्या मयत लक्षाधिशाच्या गडप झालेल्या मोठमोठ्या रकमांच्या पायावरच सायमनीडसची संपत्तीची इमारत रचली गेली असावी. ग्राटसनें दोनदां सायमनीडसला पकडलें व हर घराण्यांतील संपत्तीचा छपवलेला भाग काढून देण्यासाठीं त्याचे नानातऱ्हेनें हाल केले, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याचें आपलें एक ध्रुपद कीं, जें कांहीं माझ्यापाशीं आहे तें सगळें न्यायानें माझें आहे; त्यांत हर घराण्याचें कांहींसुद्धां नाहीं. असें म्हणतात कीं, ग्राटसच्या कामदारांनीं सायमनीडसला इतका झोडपला कीं, त्याच्या अंगांत एकदेखील हाड धड ठेवलें नाहीं. तरी पण तो अति चिवट. त्याचा व्यापार वाढतच गेला आणि आतां तर सगळ्या रोमी साम्राज्यांत व्यापार करण्याचा परवाना त्यानें खुद्द रोमच्या बादशहापासून काढला असल्यामुळें ग्राटस त्याच्या केंसालाही धक्का लावूं शकत नाहीं.’

त्या यहुदी तरुणाचें बोलणें संपलें. तथापि गलबतांतून बंदरावर उतरण्यापूर्वीं बेनहरनें त्या नवख्या यहुदी तरुणाजवळ जाऊन त्याला विचारलें,

‘यरूशलेमांतील त्या मयत लक्षाधीश व्यापाऱ्याचें नांव आपण काय बरें सांगितलें ?’

‘यरूशलेमचा अमीर हर.’

‘त्याच्या कुटुंबाची वाट कशी काय झाली ?’

‘त्याच्या तरुण मुलाला निःसंशय जन्मठेपेची शिक्षा होऊन त्याला गलबतावर वल्हीं मारण्याच्या कामावर पाठविण्यांत आलें व तेथेंच त्याचा अंतही झाला असेल. त्याची आई व बहीण या दोघी तेव्हांपासून बेपत्ता झालेल्या आहेत. यहूदीया प्रांतांत सडकेच्या बाजूला असलेल्या अनेक रोमी किल्ल्यांपैकीं, एखाद्या तुरुंगामध्यें त्यांचा केव्हांच अंत होऊन गेला असावा.’

तें ऐकल्यावर बेनहर जड अंतःकरणानें गलबतावरील अगदीं एकीकडच्या भागीं गेला. त्यानें ऐकलेल्या शोकजनक गोष्टींमुळें त्याचें मन

इतकें कांहीं अस्वस्थ होऊन गेलें कीं, गलबत बंदराजवळ येत असतां सभोंवतींची व अंत्योखिया शहराची अपूर्व शोभा पाहण्याकडे त्याचें लक्ष गेलें नाहीं. बंदरांत उतरतांच बेनहरनें सायमनीडसचा शोध केला. अंत्योखियांत नगरशेटचा शोध लागण्यास फारसा वेळ लागला नाहीं. शहरांतून जातां जातां बेनहर एका मोठ्या टोलेजंग वखारीशीं आला. अनेक गलबतांतून आलेल्या निरनिराळ्या मालाचे ढीग वखारींत पडलेले होते; बेनहरनें मालकाविषयीं विचारपूस करून त्याच्या भेटीची इच्छा दर्शविल्यावरून वखारींतील एका गुमास्त्यानें त्याला जिन्यानें गच्चीवर जाण्यास सांगितलें. तथें मागच्या बाजूला एक मोठा बगीचा असून त्यांत एक चिरेबंदी बैठें घर बेनहरला दिसलें. एका नोकरानें पुढें होऊन त्याला दिवाणखान्यांत नेलें.

ह्या दिवाणखान्यांत एका उंच पाठीच्या व रुंद हातांच्या भव्य आरामखुर्चीवर मऊमऊ उशा ठेवलेल्या असून त्यांवर एक गृहस्थ पाठ टेंकून बसलेला होता, आणि एक तरुणी त्या खुर्चीच्या पाठीशीं टेंकून उभी होती. बेनहरनें मोठ्या अदबीनें फार लवून त्या दोघांना प्रणाम केला. तो इतका खालीं वांकला होता म्हणूनच खुर्चीवर बसलेल्या गृहस्थानें उचललेला हात व क्षणभर त्याला बसलेला दचका हीं त्याच्या दृष्टीस पडलीं नाहींत. बेनहरनें मान वर करून त्या दोघांकडे पाहिलें तेव्हां तीं दोघें शांतपणें त्याच्याकडे न्याहाळून पहात आहेत असें त्याला आढळलें. त्यांच्या मनांत कांहीं चलबिचल झाल्याचें चिन्ह त्यांच्या मुद्रेवर मुळींच दिसत नव्हतें. बेनहरच्या पहिल्याच नजरेंत त्याला दिसून आलें कीं, खुर्चीवर बसलेल्या गृहस्थाची शरीरप्रकृति अगदींच खालावलेली आहे. त्याच्या अंगावरील रेशमी सैल झगा व खुर्चीवरील उशा गिरद्या यांमुळें तें व्यंग साधारणपणें कोणाच्या सहज लक्षांत येण्यासारखें नव्हतें. त्याचें डोकें मात्र एखाद्या राजाला देखील शोभण्यासारखें होतें.

बेनहर त्याला उद्देशून म्हणाला, 'सायमनीडस नांवाचे धनाढ्य यहूदी व्यापारी आपण असलां तर आपला आद्य पूर्वज आब्राहाम याचा देव जो परमेश्वर त्याची शांति तुम्हांवर व तुमच्या कुटुंबावर असो.' शेवटचे शब्द ता त्या तरुणीकडे पाहून बोलल्याचा भास झाला.

'होय, माझेंच नांव सायमनीडस. मीही तुला आशीर्वाद देतों. माझ्या भेटीला आलेल्यांचें नांव मला कळेल तर बरें.'

तरुणानें उत्तर केलें, 'माझें नांव यहूदा. हर घराण्यांतील इत्थमार यांचा मी मुलगा आहें.'

'जे यरूशलेमचे धनवान् अमीर त्यांच्यासाठीं आमचें हें घर उघडें आहे.' मग त्या खुर्चीवरील गृहस्थानें मागें उभ्या असलेल्या तरुणीला म्हटलें, 'त्यांना बसावयास आसन देऊन त्यांचा सत्कार कर.' पण बेनहरनें त्याच्यापुढें करण्यांत आलेलें आसन व द्राक्षारसानें भरलेला पेला हीं दोन्ही न स्वीकारतां म्हटलें,

'आपण मला अगांतुक समजूं नये एवढीच माझी विनंती आहे. ज्या गलबतानें मी या शहरांत आलों त्यावरील कोणीसें मला सांगितलें कीं, तुम्ही माझ्या वडिलांना चांगलें ओळखीत होतां; फार काय पण तुम्ही त्यांचे अत्यंत विश्वासू कारभारी होतां.'

तो गृहस्थ म्हणाला, 'धनाढ्य अमीर हर यांचे व माझे कशाप्रकारचे संबंध होते याविषयीं माहिती सांगण्यापूर्वी तुम्ही खरोखर त्यांचे पुत्र आहां अशी माझी खात्री झाली पाहिजे. पुरावा दाखवा.'

यावर बेनहरला कांहींच उत्तर देतां येईना. त्या गृहस्थाची मागणी सयुक्तिक होती. पण बेनहरला अशा मागणीची कांहींच कल्पना नसल्यामुळें त्याच्याजवळ पुरावा असणें शक्य नव्हतें. त्याच्या स्वतःच्या समजुतीप्रमाणें त्याला ओळखील असें कोणीही जिवंत नव्हतें. त्याचा पालक बाप जिवंत असता तरी हा कोठें सांपडला एवढेंच तो सांगूं शकला असता. बेनहरला क्षणभर कांहींच सुचेना. मग तो त्याला म्हणाला,

'आपण ऐकत असाल तर मी आपली सविस्तर हकीकत सांगतों,' आणि त्यानें येथपर्यंत वाचकांना ठाऊक असलेली, एरियसचा दत्तक मुलगा होई-पर्यंतची, सगळी हकीगत सांगितली. मग तो म्हणाला, 'हा माझा पालक बाप, माझ्यावर अगणित उपकारकर्ता, फारच धनवान् होता. तत्त्वज्ञान

किंवा राज्यकारभार, किंवा एखादी कला यांसंबंधींचें शिक्षण घेण्याची माझी इच्छा असती तर त्यानें हजारों रुपये खर्च करण्यास मागें घेतलें नसतें. पण जन्मजात यहूदी, आपला धर्म व आपली पवित्र जन्मभूमि कधींतरी विसरेल काय ? मीं शस्त्रविद्या व युद्धकला यांच्या हरएक बाबीविषयींचें पूर्ण अध्ययन केलें. रणमैदानावर किंवा नाटकगृहांतील क्रीडांगणावर झुंजलेल्या अनेक द्वंद्वयुद्धांत मी विजयी झालों आहें. मी मी म्हणणाऱ्यांना मीं पराभूत केलें आहे. या माझ्या विजयाच्या दर्शकचिन्हांनीं माझा रोम येथील वाडा गच्च भरून गेला आहे. वैयक्तिक लष्करी निष्णात ही पदवी मला प्राप्त झाली आहे. आतां रणांगणावर सैन्यांच्या तुकड्यांच्या हालचाली कशा कराव्या हें शिकण्यासाठीं मी हल्लीं पार्थियन लोकांविरुद्ध रोमी लोकांच्या चाललेल्या मोहिमेंत सामील झालों आहें. ह्या माझ्या एकंदर धोरणांत मुख्य दोन हेतु आहेत. पहिला हेतु माझी आई व बहीण यांचा शोध लावण्यास उपयोगी पडतील अशा ओळखीपाळखी करावयाच्या आणि दुसरा मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. तो तुमच्या लक्षांत आलाच असला पाहिजे.'

ही हकिकत सांगत असतां बेनहरचें अंत:करण कळवळून तो थकून गेला. तेव्हां एस्तेरनें आग्रह करीत पुढें केलेला द्राक्षारसाचा पेला या वेळीं त्याच्यानें मागें सारवेना. तो त्यानें पिऊन टाकला. बेनहरनें सांगितलेली सगळी हकिकत सायमनीडसनें शांतपणें लक्ष देऊन ऐकली, पण त्याच्या अंत:करणावर त्यामुळें कांहीं परिणाम झाल्याचें त्याच्या चेहेऱ्यावर कांहींच चिन्ह दिसलें नाहीं.

तेव्हां बेनहर पुढें म्हणाला, 'माझ्या हकिकतीनें तुमची खात्री झालीसें दिसत नाहीं. असो. मी अमीर व्यापारी इत्थमर हरचा मुलगा आहें. याला कोणताही पुरावा मी या वेळीं देऊं शकत नाहीं म्हणून मी आपला निरोप घेतों. पण तुम्ही माझ्या वडिलांचे नोकर म्हणून तुमच्याजवळून कारभाराचा हिशेब घ्यावा या हेतूनें मी आज तुमचा शोध करून तुम्हांला भेटण्यास आलों नव्हतों ही गोष्ट लक्षांत ठेवा. तुम्ही ती संपत्ति माझ्यापुढें ठेवली असती तरी मी तुम्हांला, "ती तुमचीच आहे, घ्या," असें म्हटलें असतें.

माझा हितकर्ता जो एरियस त्यानें मला मरतांना पुष्कळ संपत्ति दिली असल्यानें मी धनवान् बनलों आहें. मला कसलीही ददात नाहीं. माझी आई व धाकटी बहीण, तिर्झा, यांची कांहींतरी माहिती तुमच्याकडून मिळेल या आशेनेंच या वेळीं मी आपणांकडे येऊन हा भेटीचा त्रास दिला. आहे का तुम्हांला त्या दोघींविषयीं कांहीं माहिती ?'

तें बेनहरचें कळवळीचें बोलणें ऐकून एस्तेरच्या डोळयांत चटकन् पाणी आलें. पण तिच्या वडिलानें अगदीं संथपणें म्हटलें,

'अमीर हर यांना मी ओळखीत होतों व त्यांच्या कुटुंबांवर ओढवलेल्या आपत्तीविषयींची हकिकतही मला माहीत आहे. त्या कुटुंबांतील माणसांचा शोध करण्याची मीं आपल्याकडून खटपट केली पण मला त्या कामांत यश आलें नाहीं. त्यांचा मागमूसही नाहींसा झाला.'

बेनहरला दुःख असह्य होऊन तो जोरानें कण्हला व म्हणाला, 'दुसरी आशाही आतां जळून गेली. यापुढें जगण्यांत सूड घेण्यावांचून दुसरें कांहीं ध्येय मला उरलेंच नाहीं. माझें दुःख कमी होण्यासाठीं म्हणून मी आपण होऊन, तुमच्याकडे येऊन तुम्हांला त्रास दिला याबद्दल मला क्षमा करा. बरें, येतों मी.'

सायमनीडस म्हणाला, 'सुखरूप जा.' एस्तेरचा तर कंठ भरून आल्यामुळें तोंडांतून तिनें शब्दही काढला नाहीं.

बेनहर दृष्टीआड होतांच सायमनीडसच्या आंगांत नवचैतन्य आल्यासारखें दिसलें. तो म्हणाला,

'एस्तेर, चटकन् घंटी वाजवून नोकराला बोलाव.'

एस्तेरनें वडिलांच्या सांगण्याप्रमाणें केलें. तत्काळ शेजारच्या खोलींतून एक मनुष्य आला. त्याला सायमनीडस म्हणाला,

'मलख, मी तुला एक काम सांगणार आहें. सूर्य उगवावयास चुकेल. पण तुझ्याकडून हें काम चुकतां कामा नये. आतांच एथून एक तरुण मनुष्य गेला. त्याच्या सांवलीप्रमाणें त्याच्यावर त्याला नकळत पाळत ठेव, आणि रोज रात्रीं येऊन तो तरुण दिवसभर काय काय बोलतो व

८८९४

करतो, कोणाच्याबरोबर सोबतीनें रहातो, कोणकोणाला भेटावयास जातो, इत्यादि, त्याच्या दिनक्रमांतील सर्व गोष्टी मला येऊन कळवीत जा. त्याच्याशीं मैत्री जोड आणि त्याचा जीवनक्रम व अंतर्यामींचा हेतु यांविषयीं तुला त्याच्याकडून जितकें काढून घेतां येईल तितकें काढून घेऊन मला सांगत जा. तो तेथून निघून जाऊं लागला तरी तूं त्याच्या मागोमाग रहावयाचें. त्याची पाठ कधीं सोडावयाची नाहीं. तूं माझा हस्तक आहेस याविषयीं त्याला काडीमात्र संशय येतां कामा नये.'

मलख निघून गेल्यावर सायमनीडस मोठमोठ्यानें हंसला. तें पाहून एस्तेरला नवल वाटलें.

सायमनीडस म्हणाला, 'निःसंशय तो माझ्या जुन्या मालकाचाच मुलगा आहे. त्याचा हात धरून त्याला जवळ बसवावें व त्याच्या संपत्तीचा हिशेब त्याला द्यावा असा मला अनिवार मोह झाला पण तितक्यांत ह्या संपत्तीच्या संरक्षणासाठीं मला काय किंमत भरावी लागली, म्हणजे मला रोमी सुभेदाराकडून किती असह्य यातना भोगाव्या लागल्या त्यांचें स्मरण झालें; आणि म्हणूनच आलेला मोह दाबून मीं मनांत म्हटलें कीं, हा तरुण संपत्तीचा उपभोग घेण्यास खरोखर योग्य आहे किंवा नाहीं ह्याची कसोटी प्रथम पाहावी. तो तरुण म्हणाला कीं, कांहीं विशिष्ट हेतूनें त्यानें शस्त्रविद्येंत उच्च प्रकारचें शिक्षण घेऊन त्यांत पूर्ण प्रवीणता मिळविली. त्यानें तो आपला हेतु कांहीं उघड केला नाहीं. पण एस्तेर, मीं तो हेतु तेव्हांच ताडला. सूड हाच तो हेतु. त्याच्या तोंडून हा शब्द निघालाही असेल. पण बाळ, मी देखील आज इतकी वर्षं झालेल्या जुलमाबद्दल सूड उगवला जावा असेंच प्रार्थनेंत परमेश्वराला काकुळतीनें विनवीत आलों नाहीं काय? माझीं हाडें मारामुळें कडाकड मोडूं लागलीं तेव्हां रोमी अधिकारी व सैनिक माझ्याकडे पाहून खोखो हंसलेले मी मरेपर्यंत कधीं विसरणार नाहीं. सूड दृष्टीच्या टप्प्यांत आलेला दिसला व म्हणूनच मी तो तरुण निघून गेल्यावर इतक्या मोठ्यानें हंसलों.'

एस्तेरनें विचारलें, 'बाबा, तो तरुण गृहस्थ पुन्हां इकडे येईल का?'

'होय, योग्य वेळीं मलख त्याला आपल्या घरीं घेऊन येईल.'

# प्रकरण ७ वें

## नवीन ओळखी

बेनहर सायमनीडसच्या घरांतून निघाला व चालूं लागला. आई व बहीण यांच्याविषयीं कांहीं वर्तमान मिळविण्याच्या हेतूनें केलेला प्रयत्न निष्फळ झाल्यामुळें त्याची फार निराशा झाली होती. ज्या मोहिमेवर तो जावयाचा, तिचा सेनापति तेथें येऊन पोहोंचण्यास आणखी कांहीं दिवस अवकाश होता व प्रत्यक्ष मोहीम निघण्यास चांगला एक महिना लागणार होता, म्हणून या पश्चिम भागाची राजधानी असें जें हें जगप्रसिद्ध अंत्योखिया शहर त्याची शोभा पहाण्याचा त्यानें बेत केला. अति संपत्तिमान् व भरभराटलेलें म्हणूनच नव्हे तर ख्यालीखुशाली, चैनबाजी, व नाचरंग, यांचें माहेरघर म्हणून देखील त्याची 'कीर्ति' चोहोंकडे पसरली होती. ह्या काळांत ज्या नाचरंगानें व विलासानें रोमी साम्राज्यांतील सामाजिक जीवनाला भ्रष्टतेची कीड लागली व तें पोंखरलें गेलें. ती भ्रष्टता मूळ रोममध्यें सुरू होऊन सगळ्या साम्राज्यभर पसरली असें कांहीं ग्रंथकार प्रतिपादन करतात. पण वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट होती असें दुसऱ्यांचें म्हणणें आहे. पूर्वेकडील भागांतील अंत्योखिया, अलेक्झांड्रिया, व पूर्वेकडील सस्कृतींचीं आणि व्यापारांचीं जीं इतर मुख्य ठाणीं त्यांच्याचद्वारें उधळपट्टी व चैनबाजी यांचें बियाणें राजधानींत पेरलें गेलें.

अंत्योखिया शहरांत डॅफनी नांवाचें बन म्हणून एक नगरविलासस्थान होतें. येथें असलेल्या अनेक सुंदर बागबगीच्यांपैकीं प्रत्येकांत हरएक प्रकारच्या ऐषआरामाची व नाचरंगाची व्यवस्था ठेवण्यांत आलेली होती व नित्य नव्या नव्या टुमी निघतच होत्या. या बनामध्यें मध्यभागीं ग्रीक सौंदर्य-देवतेचें भव्य देऊळ होतें. पण तें देवस्थान होतें तरी त्यामुळें तेथें जमून क्रीडा करणाऱ्या व सुखोपभोग घेणाऱ्या बेपर्वा व रंगेल लोकांवर त्याचा कांहींच परिणाम होत नसे. त्यांच्या तेथील स्वेच्छाचाराला देवस्थानामुळें

काडीमात्र आळा पडत नसे. या बनाकडे जाणाऱ्या सुखलोलुप लोकांच्या गर्दींत बेनहर सांपडला. आज खेळ वा मनोरंजन यांकडे त्याचें लक्षच लागण्यासारखें नव्हतें. तो तिकडे लोकांबरोबर चालला होता असें म्हणण्यापेक्षां त्याचे पाय त्याला न कळत नेत होते असें म्हटलें तरी चालेल.

बेनहरनें एका दिशेकडे बोट दाखवून आपल्या अगदीं जवळच्या मनुष्याला विचारलें, ‘ तो तिकडे बगीचा का आहे ? ’

‘ छे, तें एका वनदेवतेचें स्थान आहे, ’ असें उत्तर बेनहरला त्याच्या मातृभाषेंत, म्हणजे इब्रीभाषेंत ऐकूं आलें.

तो चकित होऊन उद्गारला, ‘ काय, इब्री मनुष्य ! ’

‘ यरूशलेमांतील मार्केटपासून अगदीं जवळच माझा जन्म झाला होता.’

तितक्यांत जवळून रंगेल तरुणांची एक झुंड गेली त्यामुळें हे दोघे थोडे बाजूला ढकलले गेल्यानें त्यांचें भाषण थांबलें. मग लवकरच पुन्हा ते दोघे एकमेकांजवळ आल्यावर बेनहरनें विचारलें,

‘ आतां कोणत्या रस्त्यानें जावयाचें ? ’

दुसरा मनुष्य म्हणाला, ‘ मी जात आहें शर्यतीच्या मैदानावर. ’

‘ शर्यतीचें मैदान ? आणि या ठिकाणीं ? ’

‘ होय, आणि शर्यतीसाठीं सारथी शिकून पटाईत होत आहेत. ’

तेव्हां बेनहर त्याला म्हणाला, ‘ मी या तुमच्या शहरांत नवखा आहें. जर तुमची कांहीं हरकत नसेल तर मी तुमच्याबरोबर तिकडेच येतों. परलोकवासी दर्यासारंग एरियस यांचा मुलगा आहें मी. आपण कोण ? ’

‘ मी एथलाच एक लहानसा व्यापारी आहें. दर्यासारंग तर रोमी होते. तथापि, त्यांचा मुलगा यहूदी तऱ्हेच्या पोषाखांत ? ’

बेनहरनें उत्तर दिलें, ‘ मी त्यांचा दत्तकपुत्र आहें. ’

ते शर्यतीच्या मैदानाजवळ येऊं लागले तेव्हां त्यांना घोड्यांच्या टापांचा व रथांच्या चाकांचा आवाज येऊं लागला. आतां बेनहरचें मन या करमणुकीकडे वेधलें गेलें.

तो म्हणाला, ‘ येथें मनाची करमणूक होईलसें दिसतें. मला शर्यतीचा थोडासा अनुभव आहे. रोम शहरांतील क्रीडाभुवनांत मी अनोळखी नाहीं.’

हे दोघे ओट्यांवर जागा मिळून बसतात तोंच एक रथ तिकडून जाऊं लागला. हा रथ साधारपणपणें जड असून त्याचीं चाकें लहान, पुढला भाग वाटोळा असून रथांत बसाउतरावयाला वाट मागच्या बाजूला होती. सारथी रथांत उभा राहून रथाला जोडलेल्या चार घोड्यांना हांकीत होता. या सारथ्याच्या कलेंत सामर्थ्य, चतुराई व सराव हीं आवश्यक असत.

बेनहर म्हणाला, ‘ येथें सारथी रोमचेंच अनुकरण करतात असें दिसतें. पूर्वेकडील देशांत रथाला चारांच्या ऐवजीं फक्त दोनच घोडे असतात असें माझ्या ऐकिवांत आलें होतें. ’

एकंदर आठ रथ त्या बाजूनें गेले. कांहीं सावकाश तर कांहीं दुडक्या चालीवर असे निरनिराळ्या प्रकारें चतुराईनें रथ हांकण्यांत येत होते. त्यांच्या मागून नववा रथ आला तो अगदीं भरधांव आला. ह्या रथाचे पाणीदार, चपळ घोडे पाहून बेनरहरच्या मुखांतून प्रशंसोद्गार निघाले.

तो म्हणाला, ‘ मीं कैसर बादशहाचेहि तबेले पाहिलेले आहेत. पण तेथेंही असे उमदे घोडे माझ्या दृष्टीस पडले नाहींत. ’

पण हा रथ कठड्याजवळ येतांच घोडे बिचकले व सारथ्याच्या आहारा-बाहेर गेले. प्रेक्षकांच्या वरच्या रांगेंतून एकदम ओरड ऐकूं आली म्हणून हे दोघे तिकडे पाहूं लागले, तों त्यांना एक म्हातारा दिसला. त्याची दृष्टि भेदक होती, हातांच्या मुठी वळलेल्या व रागामुळें त्याची लांब पांढरी दाढीहि हालत असलेली त्यांनीं पाहिली. तो म्हातारा त्या घोडे अनावर झालेल्या रथावरील सारथ्याला, त्याच्या कमकुवतपणाबद्दल शिव्याशाप देऊं लागला तेव्हां इतर प्रेक्षकांना आश्चर्य वाटून मोठी गंमत झाली.

तो ओरडून म्हणाला, ‘ शापित रोमी ! “ मी हे घोडे आपल्या ताब्यांत ठेवूं शकेन हें त्यानें आपल्या निःसत्त्व लॅटिन देवदेवतांच्या शपथा वाहून सांगितलें.” हे घोडे गरुडासारखे चपळ आहेत तरी कोंकरांसारखे गरीब

स्वभावाचे आहेत, असें त्यानें शपथेवर सांगितलें.' नंतर आपल्या जवळच्या चाकरांना उद्देशून तो म्हणाला, 'व्हा पुढें, आणि धरा घोड्यांना कोणीतरी. त्यांच्या जन्मभाषेंत, रानटी अरबींत, त्यांच्याशीं बोला.' त्यानें मग अर्धवट स्वतःशींच म्हटलें, 'मीच खरा मूर्ख ! रोमीवर विश्वास ठेवण्याइतका मूर्खपणा व्हावा माझ्या हातून !'

आतां त्याला दम लागला म्हणूनच त्याचें तोंड बंद झालें.

बेनहरनें आपल्या बरोबरच्या गृहस्थाला म्हटलें, 'कोण आहे हा म्हातारा ?'

मलख (हें त्या गृहस्थाचें नांव) म्हणाला, 'तो एक बलिष्ठ अरब सरदार आहे. मिसर देशाच्या प्राचीन राजांजवळ असलेल्या शर्यतींच्या घोड्यांची अवलाद म्हणून प्रसिद्ध असलेल्या अनेक घोड्यांचा मालक आहे, आणि हा म्हातारा, ह्याचें नांव शेख इल्डेरीम असें आहे.'

बेनहरला अरब लोकांच्या चालीरीति चांगल्या माहीत होत्या, म्हणून अशा अरब सरदाराला त्याच्या पोटच्या मुलांबाळांइतके घोडे प्रिय असतात, ही गोष्ट त्याच्या लक्षांत आली व त्या म्हाताऱ्याच्या एवढ्या संतापाचें आतां त्याला आश्चर्य वाटलें नाहीं. अरब लोकांचे घोडे त्यांच्या तंबूंतच मुलांबाळांप्रमाणें लहानाचे मोठे झालेले असतात व त्यांची गणना कुटुंबांतील मंडळींतच करण्यांत येते, इतकें अरबांचें आपल्या घोड्यांवर प्रेम असतें.

ह्या घडलेल्या गोष्टीमुळें झालेली गडबड शांत होत आहे तों दुसरा एक चार घोड्यांचा रथ तेथें येऊन थबकला. इतर रथ आले तेव्हां लोकांनीं शांतपणें त्यांचें स्वागत केलें, परंतु हा रथ आला तेव्हां लोकांनीं आनंदाच्या आरोळ्या मारून व टाळ्यांचा कडकडाट करून त्याचें स्वागत केलें. या रथावरील सारथी एखाद्या राजपुत्राप्रमाणें किंवा अमीरउमरावाप्रमाणें वैभवशाली दिसत होता. त्या काळीं अशा प्रकारच्या खेळांत मोठमोठ्या खानदानी श्रीमंत घराण्यांतील लोकांनाही भाग घेण्याचा छंदच लागलेला होता. याच्या रथाला लावलेली आंतली जोडी काळी कुळकुळीत व बाहेरची जोडी पांढरी शुभ्र होती. रथाचीं चाकें हस्तिदंती असून त्याला पंचरशी धातूच्या धांवा बसवलेल्या होत्या. रथाच्या कण्याच्या दोन्ही टोकांना,

क्रूर वाघांच्या पितळी मूर्ती ज्यांवर खोदलेल्या आहेत अशीं टोपणें बसव-लेलीं होतीं. रथांतील सारथी ताठ उभा होता. त्याचें ठाण रेखीव होतें. त्यानें लगामाच्या दोऱ्यांचे तीन वेढे आपल्या कमरेभोंवतीं घालून घेतलेले होते. त्यानें डाव्या हातांत लगामाचे दोर धरले होते व उजव्या हातांत चाबूक घेतलेला होता. हा सारथी चांगलासा दिसण्यापूर्वींच त्याचे आवीर्भाव पाहून हा आपल्या परिचयाचा असावा असा विचार बेनहरच्या मनांत सहज येऊन गेला; म्हणून त्या सारथ्याचा चेहेरामोहरा नीट पहाण्याच्या हेतूनें बेनहर थोडा वांकून पाहूं लागला. त्यानें सारथ्याला तत्काळ ओळ-खलें व तो आश्चर्यचकित झाला. जणूं काय दगडी पुतळ्यासारखाच तो क्षणभर भासला. तो सारथी मेसला निघाला. मेसलाचा पोषाख भपकेबाज होता. तोच तो ताठा, व प्रेक्षकांच्या मताविषयीं तीच स्वभावजन्य बेपर्वा वृत्ति, हीं पाहून बेनहर समजून चुकला कीं, मेसलामध्यें इतक्या वर्षांत कांहीं बदल झाला नाहीं. त्याचा अहंमन्य व खोंचक स्वभाव पूर्वीं होता तसाच आजही कायम राहिलेला होता.

बेनहर व मलख असे दोघे आपल्या जागांवरून खालीं उतरत होते तों एक अरब दवंडीवाला ओरडून म्हणाला,

‘अहो पूर्वदेशीय लोक हो, भल्या शेख इल्डरीमला एका सारथ्याची गरज आहे. जो कोणी त्याचा रथ त्याच्या मनाप्रमाणें शर्यतींत धांववील त्याला फार मोठें बक्षिस मिळेल. जेथें जेथें असले पटाईत लोक जमतात तेथें तेथें त्यांना ह्या लावलेल्या बक्षिसाचें वर्तमान कळूं द्या.’

उतरतां उतरतां ही दवंडी कानीं आली तेव्हां बेनहर थबकला. बेनहर तें काम आतांच कबूल करून बसणार असें मलखला वाटलें. पण तसें कांहीं झालें नाहीं. ते दोघे जातां जातां एका मोठ्या कारंज्यापाशीं गेले. तेथें एक ज्योतिषी लोकांना त्यांचें नशीब सांगत होता. हे दोघे ती गंमत पहात उभे होते तों रस्त्यानें एक फार मोठा पांढरा उंट येत आहे असें त्यांना दिसलें. हा असाधारण उंट असल्यामुळें साहजिकच लोकांचें लक्ष त्याच्या-कडे विशेष लागलें. उंटहांक्याही तसाच भला धिप्पाड हबशी होता. त्यानें

उंट पाण्याच्या हौदाजवळ आणल्यावर खालीं बसवला. तेव्हां उंटावरील हौद्यांत एक रुबाबदार वृद्ध अमीर व फार रूपवती तरुणी अशीं बसलेलीं दिसलीं. हा अमीर मिसर देशाचा दिसत होता, व ती तरुणी त्याची मुलगी असावी असें भासत होतें. तिचीं उंचीं मौल्यवान् वस्त्रें व तिच्या अंगावरील जडजवाहीर यांवरून व ज्या भव्य उंटावरून तीं दोघें प्रवास करीत होतीं त्यावरून, त्यांची संपत्ति व दर्जा हीं मनांत भरण्यासारखीं होतीं. त्या तरुणीनें उंटहाक्यांजवळ एक पेला दिला व हौदांतून पाणी आणावयास सांगितलें. तितक्यांत घोड्यांच्या टापांचा खाडखाड आवाज ऐकूं येऊं लागला तेव्हां त्या उंटाच्या जवळपास असलेल्या लोकांत भयसूचक आरोळ्या झाल्या. लोक चारी दिशांनीं पळूं लागले.

मलख मोठ्यानें ओरडून बेनहरला म्हणाला, 'संभाळा, नाहींतर त्या रोमीच्या घोड्याखालीं तुडवले जाल.'

लोकांची पांगापांग झाली तेव्हां भरधांव येत असलेल्या मेसलाच्या रथाच्या अगदीं वाटेंतच खालीं बसलेला उंट व उंटहांक्या आहेत असें दिसलें व वेळींच ते बाजूला होण्याचा संभव दिसेना.

तेव्हां बेनहर त्या रथावरील सारथ्याला ओरडून म्हणाला, 'थांब. चाललास कोठें ? पुढें पहा. खेंच मागें. आवर घोडे.' पण सारथी ह्या लोकांच्या धांवपळीकडे पाहून हंसत होता व त्यानें बेनहरच्या ओरडण्याकडे काडीमात्र लक्ष दिलें नाहीं. रथ भरधांव सुटलेला होता. तो उंट व ती मंडळी यांच्या संरक्षणाचा दुसरा उपाय नाहीं असें पाहून बेनहर त्वेषानें तीरासारखा पुढें झाला व जवळ आलेल्या घोड्यांच्या लगामाचे दोर धरून त्यानें त्यांना असामान्य जोरानें मागें दाबलें त्यामुळें ते मागच्या पायांवर पडले. मग तो मोठ्यानें म्हणाला,

'रोमी राक्षसा, तुला मनुष्याच्या प्राणाची इतकीच का पर्वा आहे?'

मेसलाबरोबर जो त्याचा सोबती रथांत बसला होता तो रथाला बसलेल्या धक्क्यामुळें धाडकन् रथाखालीं रस्त्यांत पडला. तेव्हां प्रेक्षक लोकांना मोठा आनंद झाला. मेसला देखील पडतां पडतां सांवरला. तरी तो हंसत

हंसतच रथांतून उतरला आणि त्यानें घोड्यांचे लगाम आपल्या मनुष्याच्या अंगावर फेंकले व वाईट वाटल्याचा आव आणून तो त्या उंटाजवळ गेला व उंटावर बसलेल्यांची क्षमा मागूं लागला.

तो उंटावर बसलेल्या त्या तरुणीला म्हणाला, 'पलास देवतेशपथ तूं अत्यंत सुंदर तरुणी आहेस. संभाळून रहा, नाहींतर अपोल्लो देव आपली हरवलेली प्रिया तूंच आहेस असें समजेल.'

त्या तरुणीनें मेसलाच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. ती बेनहरकडे वळून त्याला मात्र म्हणाली, 'एवढा पेलाभरून पाणी आणण्याची तसदी घ्याल का? माझ्या बाबांना फार तहान लागली आहे.'

बेनहर त्या तरुणीच्या इच्छेप्रमाणें करूं लागला, तेव्हां त्याची व मेसलाची समोर नजरानजर झाली. त्याचा चेहरा अगदीं बेपर्वाईचा दिसत होता. मेसलानें बेनहरला ओळखलें नाहीं. त्यानें खऱ्याखुऱ्या विनोदी वृत्तीनें त्या तरुणीचा निरोप घेत म्हटलें,

'हे अनोळखी तरुणी, तूं जितकी सुंदर तितकीच निर्दय दिसतेस. जर देवदेवांनीं तुला हरण करून नेलें नाहीं तर पुन्हा आपली भेट जरूर जरूर होणार.'

तितकें बोलून त्यानें तिच्याकडे पाठ फिरवली व तो तेथून निघून गेला. ह्या वेळीं त्या तरुणीच्या मुद्रेवर ना राग, ना असंतुष्टपणा. उंट उठला व तीं दोघें आतां आपल्या मार्गास लागणार तों हौद्यांतील वृद्धानें बेनहरला आपल्याकडे बोलावलें व म्हटलें,

'तूं त्या गर्विष्ठ सारथ्याला आज चांगलीच अद्दल घडवलीस. मिसरकर बेलथासर असें माझें नांव आहे. थोर शेख इल्डरीम यांच्या खजूरीच्या मळ्यांतील बंगल्यांत त्यांचे पाहुणे म्हणून आम्ही उतरलों आहों. तेथें हे तरुणा, तूं आमची भेट घेऊन आम्हांला तुझे उतराई होण्याची संधि देण्यास चुकूं नको.'

◆ ◆ ◆

## प्रकरण ८ वें

# सूडाची योजना

बेनहरनें मलखचा खांदा हालवून विचारलें, 'काय हो मलख, मनुष्याला त्याच्या आईचा कधीं विसर पडेल का ?'

मलखनें उत्तर दिलें, 'तो मनुष्य इस्राएली असला तर त्याला आईचा विसर पडणें शक्य नाहीं,' व लगेच त्यानें पुढील शास्त्रवचन उच्चारलें: 'माझ्या मुला, तूं आपल्या बापाची आज्ञा पाळ; आपल्या आईची शिस्त सोडूं नको.'

तें ऐकून बेनहर म्हणाला, 'तुझ्या उत्तरावरून तूं यहूदी आहेस असें मी समजतों, आणि म्हणून तुझ्यावर विश्वास ठेवण्यास मला कांहीं वाटत नाहीं.' नंतर त्यानें आपली व आपल्या आईची ताटातूट होईपर्यंतचें आपलें सगळें चरित्र मलखला सांगितलें व म्हटलें,

'आतां पहा, माझ्या आईला ओढून माझ्यापासून घेऊन जात असतां निर्लज्जपणानें हंसणारा नीच मनुष्य तोच ह्या रथाचा सारथी आहे. मी ज्यावरून आपले प्राण ओवाळून टाकीन तें रहस्य त्याला ठाऊक आहे. माझी आई मेली किंवा जिवंत असल्यास तिची स्थिति काय आहे हें तोच सांगूं शकेल.'

'आणि मग विचारलें असतां तो सांगणार नाहीं का ?'

'नाहीं.'

'कां बरें ?'

'कारण मी यहूदी आहें व तो रोमी आहे.'

'तरीपण रोमी माणसांनाही जिभा आहेत व जिभेला गुंगवण्याचीं साधनें यहूदी लोकांजवळ आहेत.'

'पण या प्रकरणीं रहस्य सरकारी आहे व माझ्या वडिलांची जी मालमिळकत जप्त करण्यांत आली तिचा वांटा यानें दाबलेला आहे.'

तें ऐकून मलख म्हणाला, 'तर मग आज तुम्हीं त्याला ठार कसें मारलें नाहीं, याचेंच मला आतां आश्चर्य वाटतें.'

बेनहर म्हणाला, 'तसें केलें असतें तर त्या रहस्यावर कायमचें शिक्कामोर्तब केल्यासारखें झालें असतें. शिवाय, मनुष्यहत्त्या करण्यास आमच्या नियमशास्त्रानें मनाई केलेली आहे. तथापि, मी त्याची चांगलीच खोड मोडूं शकतों. तुम्ही जर मला साह्य करीत असलां तर मी तो प्रयत्न करून पहावयाला तयार आहें.'

आतां बेनहरविषयीं विशेष आदरभाव मलखच्या मनांत उत्पन्न झाला व बेनहरवर त्याचा पूर्ण विश्वास बसला. तो बेनहरला म्हणाला, 'तो सारथी रोमी आहे, आणि मी तर यहूदीवंशीय आहें. मी तुम्हांला शक्य तें साह्य करीन. तुम्हांला हवी तर तुम्ही सांगाल तशी शपथ मी वहातों.'

'छे छे, तसें करण्याची कांहीं गरज नाहीं. चला आपण पुढें जाऊं या.'

मध्येंच बेनहरनें मलखला एक जोड प्रश्न करून चकित केलें. त्यानें विचारलें, 'शेख इल्डरीम याला तुम्ही ओळखतां का? आणि त्यांचा तो खजुरीचा मळा किती लांब आहे?'

शेवटला प्रश्न ऐकून मलखला त्या उंटावरील हौद्यांत बसलेल्या सुंदर मिसरी तरुणीची आठवण झाली व आपला सोबती त्या सुंदरीविषयीं मनांत चिंतन करीत असल्यामुळें त्यानें हा प्रश्न केला असावा असा त्याचा तर्क झाला, व बेनहरला इतक्या लवकर आईचें विस्मरण कसें झालें याचें त्याला आश्चर्यही वाटलें.

तो म्हणाला, 'त्या खजुरीच्या मळ्याला घोड्यावरून दोन तासांत पोहोंचतां येईल व चपळ सांडीण असल्यास एका तासांत पोहोचतां येणें शक्य आहे.'

बेनहरनें विचारलें, 'ह्या होणाऱ्या शर्यतीविषयीं चोहोंकडे चांगली जाहिरात झालेली आहे का ? व त्या शर्यती होण्यास किती दिवस अवकाश आहे ?'

मलख म्हणाला, 'साम्राज्याच्या अगदीं कोनाकोपऱ्यापर्यंत ह्या शर्यतीची जाहिरात गाजवण्यांत आलेली आहे. ह्या रथांच्या शर्यती होण्यापूर्वीं व्हावयाच्या अशा कुस्त्यांचे व इतर व्यायामविषयक खेळांचे सामने नुकतेच झाले आहेत. त्या सामन्यांसाठीं पृथ्वीच्या चारी टोंकांपासून आलेले खेळाडू व प्रेक्षक अजून येथून गेलेले नाहींत. यशस्वी होणारांस मिळणारीं बक्षिसें तशीं भारीं किंमतीचीं ठेवलेलीं आहेत. हा सर्व जलसा रोमहून येणाऱ्या कॉन्सल मॅक्सेंटियस यांच्या सन्मानार्थ आहे. आमच्या शहराविषयीं मॅक्सेंटियसचा चांगला ग्रह व्हावा अशी आमच्या सुभेदारांची इच्छा आहे. तो अति सधन आहे, व उदार हातानें खर्च करण्याची त्याला ऐपत आहे. आजपासून सहाव्या दिवशीं ही रथांची शर्यत ठरलेली आहे.'

बेनहर म्हणाला, 'वेळ तर फार थोडा उरला आहे. तरी पुरेसा आहे.' नंतर शर्यतीसंबंधीं सर्व नियमबियम अगदीं रोमच्या नियमांप्रमाणेंच आहेत व मेसला शर्यतींत भाग घेणारा एक उमेदवार आहे, या दोन गोष्टींची बेनहरनें मलखपासून खात्री करून घेतली आणि मग विचारलें,

'मला माझा स्वतःच्या पसंतीचा रथ शर्यतींत घेतां येईल का ?'

आतां बेनहरच्या योजनेची कल्पना मलखला आली व मेसलाचें नाक खालीं करण्याचा संभव कसा विशेष आहे हेंही त्याच्या लक्षांत आलें. पण अत्यंत उत्कंठेच्या स्वरानें त्यानें विचारलें, 'पण तुम्हांस सराव आहे ना ?'

बेनहरनें उत्तर केलें, 'तें रोमलाच विचारा म्हणजे बरें. बादशहाचे घोडे मीं रोमींतील शर्यतींत दौडावे, असें प्रत्यक्ष बादशहा मला म्हणत होते.

'पण तुम्हीं तें मान्य केलें नाहीं ना ?'

'नाहीं म्हणजे ! नाहींच. मी यहूदी आहें व मीं तसें केलें असतें तर माझ्या वाडवडिलांच्या नांवाला काळिमा लागला असता, आणि आतां

येथील शर्यतीसाठीं मी पुढें आलोंच तर तो मिळणाऱ्या भारी बक्षिसाच्या लालुचीमुळें नव्हे हें मी शपथपूर्वक सांगतों.'

मलख त्याला मध्येंच थांबवून म्हणाला, 'नको, शपथ नको. अहो बक्षिसाची रक्कम सुमारें बारा लाख रुपये आहे. ते मिळाले तर मनुष्याला जन्माची बेगमी होईल.'

पण त्याची मला दद्दातच नाहीं. येथील सुभेदारांनीं बक्षिसाची रक्कम हल्लींच्या हजारपट केली असती तरी त्याची मला काडीमात्र किंमत वाटली नसती. मी शर्यतीसाठीं पुढें येणार तो केवळ माझ्या शत्रूचें नाक खालीं करण्यासाठीं. सूड घेण्यास नियमशास्त्राची परवानगी आहे.'

मलख म्हणाला, 'या शर्यतीसाठीं मेसला येणार ह्यांत शंकाच नाहीं. अंत्योखियांतील प्रत्येक उधळ्या रंगेल तरुणानें मेसलाच्या शर्यत जिंकण्या-वर पैजासुद्धां लावलेल्या आहेत. मेसलापेक्षां सरस असा उमेदवार पुढें आणून मेसलाला मागें टाकतां येत नाहीं ह्याबद्दल त्या लोकांना अति वाईट वाटतें हेंही पण खरेंच आहे.'

त्यावर बेनहर म्हणाला, 'हा रथ आणि हेच घोडे घेऊन तो मेसला शर्यत जिंकणार काय? मलख, तुम्हीं मला दिलेल्या माहितीबद्दल खरोखर मी तुमचा आभारी आहें. आतां त्या खजुरीच्या मळ्याची वाट काढा व शेख इल्डरीम यांची माझी ओळख करून द्या पाहूं. आतां क्षणाचाही विलंब लावतां कामा नये. कदाचित् उद्यांच त्याचे घोडे कोणी शर्यती-साठीं ठरवून घेईल.'

ते दोघे चालत चालत जवळच्या एका खेड्यांत गेले व तेथून दोन चपळ सांडणी भाड्यानें घेऊन ते शेखच्या मळ्याकडे चालले.

◆ ◆ ◆

# प्रकरण ९ वें

## मुक्तता करणाराचें वर्तमान

ही जोडी खजुरीच्या मळ्याकडे जात असतां बेनहर मलखला म्हणाला, 'ह्या शेखला आज आपण पाहिला त्यावरून तो एक सामान्य मनुष्य दिसतो. मग अति लोभी रोमी सुभेदारांची नजर चुकवून खजुरीच्या मळ्यासारखें मनोहर ठिकाण त्याला राखतां कसें आलें असावें ?'

मलख म्हणाला, 'पुष्कळ पिढ्या ह्याच्या वंशजांत शेख हें पद चालत आलेलें आहे. शिवाय एका राजाला त्याच्या शत्रूंनीं घेरून ठार मारण्यासाठीं तरवारी उपसल्या असतां तशा त्या प्राणसंकटांतून राजाचा प्राण ह्याच्या एका पूर्वजानें वांचवलेला आहे, एवढेंच नव्हे तर राजाला पुन्हा त्याची गादी मिळवून देण्यांत त्यानें फार साह्यही केलें होतें. त्या उपकाराची फेड म्हणून त्या राजानें वाळवंटी प्रदेशांत रहाणाऱ्या ह्या शेखाला येथें आणून नदीच्या कांठापासून तों थेट जवळच्या टेंकड्यांपर्यंतचा सर्व भाग वंशपरंपरेनें इनाम करून दिला. हल्लींचा शेखही येथें कायमचा रहात नाहीं, पण जेव्हां त्याची लहर लागते तेव्हां तो येथें डेरे राहुट्या ठोकून कांहीं दिवस रहातो.'

मलखच पुढें म्हणाला, 'या शहरांत सायमनीडस म्हणून एक प्रसिद्ध व्यापारी आहे. त्याच्याशीं असलेल्या कांहीं संबंधामुळें ह्या शेख इल्डरीमची व माझी ओळख झालेली आहे. ह्या शेखची व माझी सायमनीडसच्या घरीं बरेच वेळां भेटही झाली आहे.'

सायमनीडसचें नांव कानीं पडतांच ह्या वृद्धाच्या रूपवती तरुण मुलीची बेनहरला आठवण झाली. त्यानें तिच्या वडिलाला आपली दुःखपूर्ण कहाणी सांगितली तेव्हां ह्या तरुणीनें बेनहरला सहानुभूति दाखविली होती. तिचें मन त्याची हकिकत ऐकून फार कळवळलें होतें. पण तितक्यांत मलख पुढें

'रोमचा सूड घ्यावयाची इच्छा सदैव लागून राहिल्यामुळें सतत तळमळत असलेल्या लाखोंपैकीं एक हा वृद्ध आहे. रोमची संमति आहे तोंपर्यंत हेरोदाशिवाय दुसरा कोण यहूद्यांचा राजा होण्यासारखा आहे ?'

आतां खजुरीच्या मळ्यांत जे तंबू ठोकलेले होते त्यांजवळ येऊन हे दोघे पोहोचले व तितक्यांत त्यांना मागून घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं आला. शेख इल्डरीम व त्याचा परिवार आणि घोडे अंत्योखियाहून मुक्कामावर आल्याला थोडाच वेळ झाला होता. जुनी ओळख होती म्हणून इल्डरीमनें मलखचें स्नेहभावानें स्वागत केलें व आदरातिथ्य करणें हा अरब लोकांचा एक स्वभावविशेष असल्याकारणानें मलखबरोबर आलेल्या अनोळखी बेनहरचाहि आदरसत्कार करण्यांत कमतरता केली नाहीं. क्षेमकुशल विचारून झाल्यावर मलखनें इल्डरीमला बाजूला नेऊन आपला व आपला सोबती यांच्या भेटींतील हेतु त्याला कळवला, आणि शर्यतींत शेखचे घोडे दौडवून आपलें कौशल्य प्रगट करण्याची संधि बेनहरला देण्याचें आश्वासन शेखजवळून घेतल्यावर विशेष कामाचें निमित्त सांगून मलख त्याचा निरोप घेऊन परत अंत्योखियास आला.

आपणावर सोंपवलेल्या कामगिरींत मिळवलेल्या यशाविषयींची सविस्तर हकिकत धन्याला कळवण्यासाठीं मलख नीट सायमनीडसच्या घरीं गेला.

त्याला सायमनीडसनें विचारलें, 'हा तरुण गृहस्थ कोण असावा ?'

'तो यहूदा वंशाचा एक इस्राएली आहे.'

'त्याचें ध्येय व हेतु काय आहे ?'

'मुख्य हेतु आपल्या आईचा व बहिणीचा शोध लावणें; दुसरा, त्याचा रोमविरुद्ध, विशेषेंकरून मेसलाविरुद्ध, दावा आहे. आणि त्याचा सध्यांचा बेत म्हणजे मेसलाचें नाक खालीं करून त्याची नाचक्की करणें हा आहे.'

'पण त्याच्या सूडाची मजल येथपर्यंत का जाते ?'

त्यावर मलख म्हणाला, 'धनीसाहेब, तो यहूदीच आहे असें मी म्हणतों. याला मोठा आधार म्हणजे त्याच्या द्वेषाची तीव्रता ही होय. इल्डरीमची

भावना रोमविषयीं कशी आहे असा त्यानें मला प्रश्न केला तेव्हां तो द्वेषाग्नि एकदम भडकलेला मला दिसला. दुसरा विशेष आधार म्हणजे, त्या ज्ञानी मागी लोकांची सगळी हकिकत आणि "यहुद्यांचा राजा जन्मला तो कोठें ?" असा प्रश्न ऐकल्यावर त्याच्या तोंडून "रोमचें पाठबळ आहे तोंपर्यंत यहूद्यांचा राजा हेरोदाशिवाय दुसरा कोण होणार ?" असे जे उद्गार बाहेर पडले ते.'

'ह्या तुझ्या बोलण्याचा अर्थ काय मलख ?'

'रोमचा नाश झाला पाहिजे हाच.'

'मलख, पुरे. आतां जेवून चांगली विश्रांति घे. उद्यां तुला पुन्हा खजुरीच्या मळ्यांत जावें लागेल. मी इल्डरीमला एक पत्र लिहिणार आहें कीं तूं येत्या शर्यतींत त्या तरुणाला साह्य केलें पाहिजे.'

मलख गेल्यानंतर सायमनीडस खुर्चीवर बसल्याबसल्याच अर्धवट आपल्याशीं व अर्धवट खुर्चीच्या हातावर बसलेल्या आपल्या मुलीशीं पुढीलप्रमाणें बोलूं लागला :

'आतां माझ्या आयुष्याच्या अगदीं शेवटच्या काळांत परमेश्वर अत्यंत कृपावंत होऊन ह्या तरुणाला माझ्याकडे पाठवीत आहे. मला प्राप्त झालेल्या ह्या अफाट संपत्तीचें व मालमिळकतीचें कारण आतां माझ्या लक्षांत आलें. जन्मास आलेला राजा आतां चांगला प्रौढ पुरुष झाला असला पाहिजे आणि त्याला पैशाची व आमच्या ह्या तरुण धन्यासारख्या तरबेज, शूर मनुष्याची गरज लागणारच. आमचा मार्ग आतां कसा पाय उचलून चालण्यास योग्य झाला आहे व या मार्गाच्या टोंकाशीं वैभव व सूड आहे हें तुला दिसत नाहीं का एस्तेर ?'

'बाबा, बाबा, त्या तरुण गृहस्थाला आतांच्या आतां बोलावून घ्या, आणि त्याला या शर्यतीच्या फंदांत पडूं देऊं नका,' असें घाबऱ्या स्वरानें एस्तेर वडिलाला म्हणाली.

त्यानें विचारलें, 'कां बरें त्यानें शर्यतींत जाऊं नये ?'

'शर्यतीचें मैदान हें इस्त्राएली माणसाच्या कर्तृत्वाचें योग्य स्थान नव्हे.'

'मग काय शास्त्रीपंडिती? एस्तेर, खरेंच का एवढें हें कारण आहे?'

त्याच्या प्रश्नांतील मर्म समजल्यामुळें एस्तेरच्या मुद्रेवर लज्जेची छटा चमकली व अंतर्यामींचें सत्य रहस्य ती लपवूं न शकल्यामुळें त्या प्रेमळ वडिलांच्या अंत:करणांत किंचित् मत्सरभाव चमकल्यासारखें झालें.

तो म्हणाला, 'त्या तरुणाला गलबतें, बागा, मळे, इत्यादि सगळी संपत्ति मिळावयाची हें मी जाणून होतों. पण तुझ्या मृत आईची हुबेहुब प्रतिमा अशी जी तूं माझी लाडकी मुलगी त्या तुझ्या प्रीतीनें मी स्वत:ला अत्यंत संपन्न समजत होतों.'

एस्तेर समाधान करीत म्हणाली, 'बाबा, असें धीर सुटल्यासारखें कां बोलतां? तुम्ही अगदीं स्वस्थ असा. मी कांहीं तुम्हांला सोडून जायची नाहीं. जरी माझें प्रेम त्या तरुण गृहस्थानें ओढून घेतलें असलें तरी तुमची सेवाचाकरी करण्यांत मी कधीं अंतर पडूं देणार नाहीं. पण त्याचा प्राण धोक्यांत पडणार या कल्पनेनें अंगावर कांटाच उभा राहतो, एवढेंच.'

'माझ्या बाळे, तूं खरोखर परमेश्वराचा आशीर्वाद अशीच आहेस. माझें सर्वस्व गेलें तरी ह्या परमेश्वराच्या आशीर्वादानें मी सदा सधनच राहीन.' इतकें बोलून त्यानें चाकराला बोलावून त्याच्याकडून आपली खुर्ची ढकलीत ढकलीत घरांत नेण्यास सांगितलें व तो रात्रीची विश्रांति घेण्यासाठीं पडला.

शहरांत मलख आपल्या धन्याला सविस्तर हकीकत सांगत होता त्या वेळीं तिकडे बेनहर शेख इल्डरीमच्या तंबूंत एक चित्तवेधक गोष्ट ऐकण्यांत अगदीं गुंग होऊन गेला होता. कोणत्याहि गोष्टींत त्याचें लक्ष इतकें पूर्वीं कधीं वेधलें गेलें नव्हतें; त्यानें ह्या आपल्या यजमानाला आपलें खरें नांव सांगितलें नाहीं, पण त्यानें त्याची खात्री केली कीं, तो रोमी नव्हता तर यहूदी होता व त्याचा रोमवर दांत होता, आणि रोमचा द्वेष करण्यास शेखला जें कारण झालें होतें त्यापेक्षां त्याच्या द्वेषाला झालेलें कारण शतपटीनें भयंकर होतें.

बेनहरनें शेखची खात्री करीत म्हटलें, ‘शेखजी, मी तुम्हांला शपथपूर्वक सांगून ठेवतों कीं, मला सूड घेण्याची ही संधि तुम्हीं लाभू दिली तर बक्षिसाचा पैसा व कीर्ति हीं तुम्हांलाच ठेवीन.’

इल्डरीम म्हणाला, ‘ठीक आहे. पण या बाबतींतील तुझें कौशल्य कसें काय आहे? रथांच्या शर्यतींत रथ दौडवण्याचा अनुभव तुला कितपत आहे?’

त्यावर बेनहर म्हणाला ‘त्या संबंधानें शब्दांनीं उत्तर देण्याची माझी इच्छा नाहीं, पण उद्यां जवळच्या एखाद्या शेतांत मी प्रत्यक्ष तुम्हांला माझ्या नैपुण्याचें प्रमाण पटवतों म्हणजे झालें. कदाचित् त्या रोमी माणसाचें जें कौशल्य प्रगट झालें असेल त्यापेक्षांहि माझें कमी भरेल, नाहीं म्हणून कोणीं सांगावें?’

बेनहरच्या त्या बोलण्यानें इल्डरीमचें समाधान झालें व त्यानें चाकराला संध्याकाळचें जेवण वाढून घेऊन येण्याची आज्ञा केली. मग तो बेनहरला म्हणाला, ‘माझ्या घरीं दुसरा पाहुणा आलेला आहे तोहि आपल्याबरोबर जेवावयास आहे.’

नोकर जेवण आणीत होता तेव्हां इकडे बेलथासर आला. शेखचें व त्याचें क्षेमकुशल झाल्यावर त्याची व बेनहरची ओळख करून देण्यांत आली. बेनहरला निरखून पहातांच तो मिसरी बेलथासर आश्चर्यचकित झाल्यासारखा दिसला. तें पाहून इल्डरीमला मोठें कोडें पडलें; पण तितक्यांत बेलथासरच बेनहरला उद्देशून म्हणाला, ‘आज पाण्याच्या हौदाजवळ माझे प्राण आपण वांचवलें ना?’

बेनहरनें होकारदर्शक मान हलवली व म्हटलें, ‘तुमच्या मुलीनें माझ्याजवळ दिलेला पेला त्या गडबडींत तसाच माझ्याजवळ राहून गेला होता तो हा घ्या.’ असें बोलून त्यानें पेला काढून त्याच्यापुढें केला.

तेव्हां बेलथासर म्हणाला, ‘आज तुम्हांला त्या हौदाजवळ मजकडे पाठवणारा व आतां येथें आणणारा प्रभु परमेश्वर धन्यवादित असो. तुम्हींहि

त्याची स्तुति करा, कारण तुमचे उपकार फेडण्याचें सामर्थ्य त्यानें मला दिलें आहे व मी तें फेडल्याशिवाय राहणार नाहीं.'

हें त्या दोघांचें भाषण कानांवर पडत होतें तरी इल्डरीमला त्यांतलें कांहीं समजेना व तो बुचकळ्यांत पडला. त्या वेळीं बेलथासरनें पाण्याच्या हौदाजवळ रोमी रथाखालीं चेंगरून जाण्याचें प्राणसंकट ओढवलें असतां बेनहरनें मध्यें पडून अचाट पराक्रमानें तें कसें टाळलें, ती सगळी हकिकत शेखला सांगितली. ती ऐकल्यावर जितक्या संतापानें व आवेशानें त्यानें त्या उद्धट रोमीला शिव्याशाप दिले, तितक्याच आवेशानें पण निराळ्या शब्दांनीं त्यानें बेनहरला दूषण दिलें. कारण काय म्हणाल तर, त्यानें ही घडलेली हकिकत अगोदरच शेखला सांगून त्याच्या घरीं उतरलेल्या पाहुण्यावर उपकार करणाराचें उतराई होण्याची संधि दिली नाहीं, हेंच.

तेव्हां बेनहर आदरपूर्वक म्हणाला, 'पण लहान मोठ्या बक्षिसाच्या आशेनें तशी गोष्ट माझ्यानें होणें शक्य नाहीं. शेखजी, या वृद्ध गृहस्थासाठीं तर काय, पण तुमच्या एखाद्या नोकरचाकरावर जरी तसा प्रसंग आला असता तरी मी त्याच्या रक्षणार्थ असाच निरपेक्षबुद्धीनें प्रयत्न केल्याशिवाय कदापि राहिलों नसतों, ही खात्री बाळगा.'

तें ऐकून शेख बेलथासरला म्हणाला, 'हा तरुण गृहस्थ रोमी खास नव्हे, हें मी आतां तुम्हांला शपथेवर सांगतों.'

जेवण आटोपल्यावर एकमेव परमेश्वरावर श्रद्धा ठेवणारे असे ते तिघेजण बरीच रात्र होईपर्यंत बोलत बसले होते. सुमारें २७।२८ वर्षांपूर्वी बेलथासर व त्याचे दोन मित्र यांना अद्भुत तारा दिसून त्याकडून मार्गदर्शन झाल्याप्रमाणें दूरदूरचे आपापले देश सोडून बेथलहेमास नुकत्याच जन्मलेल्या राजाचा शोध करीत कसे गेले व त्या बाळाचें दर्शन त्यांना कसें झालें, हाच त्या तिघांच्या बोलण्याचा मुख्य विषय होता. येणाऱ्या मशीहाविषयींची यहूद्यांची उत्कट अपेक्षा बेनहरला पूर्णपणें

माहीत होती. यहूदी मुलाच्या शिक्षणांत या अपेक्षेवर जितका जोर दिला जाई तितका दुसऱ्या कोणत्याच गोष्टीवर दिला जात नसे, आणि म्हणूनच बेलथासरनें सांगितलेली हकिकत ऐकत असतां बेनहर इतका दंग होऊन गेला व त्याची अशी खात्री झाली कीं बेलथासर सांगत होता तें सर्व खरें असून येणारा मशीहा तोच तो बेथलहेमांत जन्मलेला व मागी लोकांनीं पूजिलेला बालक होय. ह्या अद्भुत प्रगटीकरणानें इस्राएलांत सर्वत्र खळबळ कशी उडाली नाहीं व आजपर्यंत आपणासहि ही गोष्ट कशी समजली नव्हती याचें बेनहरला आश्चर्य वाटलें.

बेनहरच्या मनांत दोन प्रश्न उभे राहिले. एक, तो बालक (आतां प्रौढ) कोठें आहे ? व दुसरा, त्याच्या कार्याचें धोरण काय आहे ? बेलथासरनें पुढें असेंहि सांगितलें कीं नंतर कांहीं दिवसांनीं त्या बालकाविषयीं माहिती आणण्यासाठीं जे जासूद पाठविले त्यांनीं असें वर्तमान आणलें 'यहूद्यांच्या राजपदाला हा नवा प्रतिस्पर्धि जन्मलेला ऐकतांच त्याचा लहानपणीं निश्चित नायनाट व्हावा म्हणून हेरोदनें त्या बेथलहेम गांवांतील दोन वर्षांच्या आंतील सर्व मुलांची क्रूरपणानें कत्तल करवली. अर्थातच त्या कत्तलींत तो मारला गेला.' पण त्या दिव्य बालकाचा नाश झाला नाहीं तर तो कोठें तरी गुप्तपणें राहून वाढला आहे अशी वृद्ध बेलथासरला मात्र पक्की खात्री होती, म्हणून आतां तो नवा राजा जाहीरपणें प्रगट होण्याची वेळ असल्यामुळें त्यावेळीं आपण हजर असावें यासाठींच बेलथासर या प्रमुख शहरीं आला होता.

बेलथासर म्हणाला, 'मला वाटतें तो बालक मारला गेला नाहीं, पण निदान या काळापुरतें तरी त्याचें येणें निष्फळ झालें व त्याचें कार्य तसेंच राहिलें, आणि आतां तो पुन्हा केव्हांतरी दिसेल. आमच्या प्रार्थनेला ज्या वाणीकडून उत्तर मिळालें त्याच वाणीच्या स्फूर्तीनें ह्या बाबतींत माझ्या अंतःकरणांत विचार उत्पन्न होतात. या पृथ्वीवरच असें एक राज्य आहे कीं, तें पृथ्वीवर असून पृथ्वीचें नाहीं. त्या राज्याच्या सीमा पृथ्वीहूनहि विस्तृत आहेत. आपल्याठायीं आत्मा आहे ही गोष्ट जशी सत्य

आहे तशीच त्या राज्याचें अस्तित्व हेंहि सत्य आहे. आपण जन्मापासून मरेपर्यंत या राज्यांतून प्रवास करीत असतों. तें राज्य आपल्या दृष्टीस पडत नाहीं, आणि स्वतःच्या आत्म्याची मनुष्याला ओळख होईपर्यंत तें राज्य दिसणें शक्य नाहीं; कारण तें राज्य मनुष्याच्या आत्म्यासाठीं आहे आणि आजपर्यंत मनुष्याच्या ध्यानींमनींहि आलें नसेल असें वैभव त्या राज्यांत भरून गेलेलें आहे, अगदीं अपूर्व, अद्वितीय, व परिपूर्ण. त्यांत वाढीला वावच नाहीं.'

बेनहर म्हणाला, 'अशा राज्याविषयीं माझ्या ऐकण्यांत कधींच कांहीं आलें नव्हतें आजपर्यंत.'

इल्डरीम म्हणाला, 'आणि मीं सुद्धां कधीं त्याविषयीं ऐकलें नव्हतें.'

तेव्हां बेलथासर म्हणाला, 'आणि तो बालक येऊन तें राज्य आपलें म्हणून हातांत घेईपर्यंत कदाचित् कोणालाहि त्या राज्याविषयीं माहिती होणार नाहीं. त्याच्याच हातांत ही गुरुकिल्ली आहे.'

बेलथासर निजावयास गेल्यावर, सरोवराच्या कांठीं थोडा वेळ फिरण्यासाठीं व आज ऐकलेल्या नवीन अद्भुत गोष्टीवर शांतपणें विचार करण्यासाठीं म्हणून बेनहर बाहेर पडला. आज कित्येक वर्षें रात्रंदिवस क्रांति हाच एक विचार त्याच्या अंतःकरणांत सारखा घोळत आला होता. तथापि त्याच्या कुटुंबाची झालेली वाताहात त्याच्या स्मरणांतून जाणें शक्य नव्हतें. पांच एक वर्षें रोमपासून जें कांहीं शिकण्यासारखें होतें तेवढें सर्व शिकून घेण्यासाठीं त्यानें अविश्रांत श्रम केले. त्यानें आपल्या मानवी कल्पना सृष्टींत जें भावी राज्य कल्पिलें होतें तें इतकें बलिष्ठ असावयाचें कीं त्यांत गर्वांध रोमी साम्राज्यसत्तेचा पूर्ण विध्वंस होऊन यरूशलेम सर्व जगाची राजधानी बनायची.

तो मनाशींच म्हणाला, 'हा बेलथासर सांगतो तें राज्य कसें काय असेल बरें? त्याच्या स्थापनेंत मनुष्याचा हात नाहीं, किंवा त्यांत प्रधान, सल्लागार, सैनिक, वगैरेंची गरज नाहीं. राज्ययंत्र चालवण्यासाठीं लष्करी

सामर्थ्याच्या ऐवजीं दुसरें कांहींतरी नवीन तत्त्व शोधून काढावें लागणार, पण तें तत्त्व कोणतें ?'

त्याच क्षणीं त्याच्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवून त्याच्याशीं बोलूं लागलें. त्यानें इल्डरीमला तेव्हांच ओळखलें. तो बेनहरच्या कानांत हलक्या स्वरानें म्हणाला, 'हे एरियसच्या मुला, तुझ्याशीं दोनच शब्द बोलावयाचे आहेत. आज रात्रीं तूं जें जें म्हणून ऐकलें त्यावर विश्वास ठेव, फक्त तो बालक जें राज्य स्थापन करील त्याचें स्वरूप कसें असणार याविषयीं मात्र सावध रहा. ह्या बाबीसंबंधानें अंत्योखियांतील प्रसिद्ध व्यापारी सायमनीडस यांच्याशीं तुझें बोलणें चालणें होईपर्यंत तूं आपलें मन कोणत्याहि प्रकारें कलुषित होऊं देऊं नको. त्या व्यापाऱ्याची व तुझी मी ओळख करून देईन. बेलथासर हा एक मनोराज्यांत दंग होणारा गृहस्थ आहे, पण सायमनीडस हा व्यवहारी मनुष्य आहे. हा बालकच यहूदी लोकांचा राजा व्हावयाचा आहे हें तो तुला तुमच्या संदेष्ट्यांच्या वचनांच्या आधारें दाखवून देईल. हा हेरोदासारखा नव्हे, तर त्याच्याहून फार चांगला व अति वैभवसंपन्न असा राजा होणार आहे.' तितकें बोलून शेख इल्डरीम परत तंबूकडे निघून गेला.

हा तरुण यहूदी पुटपुटत म्हणाला, 'सायमनीडस, सायमनीडस, हें नांव चोहोंकडून माझ्या कानीं येतें. माझ्या वडिलांच्या कारभाऱ्यानें मला चांगलें घेरल्यासारखेंच दिसतें.'

सरोवरांतून एक नाव जाऊं लागली त्यामुळें बेनहर आपल्या विचारतंद्रींतून जागा झाला. त्या नावेंतून एक गाणें ऐकूं येऊं लागलें. आवाज स्त्रीचा असून विलक्षण गोड होता, परंतु त्यांत दुःखाची व चिंतेची छटा भरली होती.

बेनहर म्हणाला, 'ही गाणारी स्त्री ती मिसरी तरुणीच होय. किती गोड आहे ती ?' ह्या वेळचे त्याचे हे शब्द एस्तेरनें ऐकले असते तर तिच्या अंतःकरणाची मोठी चलबिचल होऊन गेली असती.

याच रात्रीं घडलेली आणखी एक विशेष गोष्ट आपल्या नजरेंतून निसटतां उपयोगी नाहीं. नवीन मोहिमेवर नेमल्या गेलेल्या कॉन्सलच्या हाता-

खालची रोमी अंमलदारांची मंडळी आगाऊच अंत्योखियास येऊन पोहोंचली. ह्या सेनापतीचें मुख्य ठाणें नदींतील एका बेटावर असलेल्या भव्य व सुंदर वाड्यांत स्थापण्यांत आलें, आणि ही अधिकारी मंडळी तेथें आपल्या मुख्याची वाट पहात राहिली. यांच्यांत मेसला हा मुख्य होता. आज रात्रीं खाणेंपिणें व नाचरंग करण्यासाठीं बैठकीच्या दिवाणखान्यांत ही रोमी अंमलदारांची मंडळी जमली होती. त्यांतील एक रंगेल गडी मेसलाचें बोलणें मध्येंच थांबवून त्याला म्हणाला,

'तुम्हांला क्विंटस एरियस यांचा मुलगा माहीत आहे का ?'

मेसला म्हणाला, 'त्या दर्यासारंगाला एखादा मुलगा आहे ही गोष्ट देखील माझ्या ऐकिवांत नाहीं.'

'चांचे लोकांचा धुव्वा उडवून परत येईपर्यंत त्याला मुलगा नव्हता. तो त्या स्वारीवरून परत आला तेव्हां त्यानें आपल्याबरोबर एक तरुण आणला व दुसऱ्याच दिवशीं हा तरुण त्याचा दत्तक पुत्र झाला. तो तुमचा भाऊ शोभण्यासारखा आहे.'

दुसरा एक रंगेल गडी म्हणाला, 'भलतेंच कांहींतरी ! एरियस यहूदी व मेसला तर रोमी. दोघांत साम्य कसें असूं शकेल ?'

या मंडळीचा खेळ चाललेला होता आणि पहिल्या रंगेल अंमलदाराचे शब्द पुन्हां कानांवर आदळे तोंपर्यंत मेसलाचें त्याच्याकडे लक्षच नव्हतें. तो खेळण्याच्याच भरांत दंग होता. तो पहिला रंगेल अंमलदार म्हणाला, 'हा तरुण एरियस प्रथम आपल्या भावी पालक बापाला भेटला तेव्हां तो एक जन्मठेपेचा कैदी जहाजावर वल्हें मारणारा होता असें म्हणतात.' आतां हे शब्द ऐकल्यापासून मेसलाचें लक्ष त्याच्या बोलण्याकडे खेंचलें गेलें.

तोंच रंगेल पुढें म्हणाला, 'बाप मरण पावला, पण मुलगा ह्या नव्या मोहिमेंत मिळाला आहे. तो आज या शहरांत येऊन पोहोंचला आहे, पण मुख्य ठाण्यावर येथें दाखल झाला नाहीं. तो शहरांतच कोठेंतरी गुंगारा देऊन बसला आहे. त्याला रोममध्यें बादशहाचा आश्रय मिळाला. तो व्यायामांत व मर्दुमकीच्या सर्व खेळांत पटाईत झालेला आहे.'

तेव्हां हौदाजवळ मैदानांत रथामध्यें जो मेसलाबरोबर होता त्याला हांक मारून मेसला म्हणाला, 'अरे कायस, तुला आज ज्यानें रथांतून खालीं पाडलें तोच मनुष्य हा. ह्या तरुण एरियसशिवाय दुसरा तिसरा तो निःसंशय कोणी नव्हता, हा एरियस यहूदी आहे व रोमीही आहे. त्याचा पोषाख यहूदी तऱ्हेचा होता, तो रोमीप्रमाणेंच लॅटीन भाषा बोलला व त्याला पहिलवानाची शक्ति होती.'

ह्या मंडळीची खेळ करमणूक रात्रभर चालू राहिली. अगदीं पहांटे पहांटे ते सर्व विश्रांति घ्यावयास गेले. मेसला बराच द्राक्षारस त्या रात्रीं प्याला होता तरी त्यानें बिछान्यावर अंग टाकण्यापूर्वीं खालील पत्र लिहिलें :

'मेसलाकडून ग्राटस यांस,

मित्रा, तुला एक अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट आज सांगत आहे. यरुशलेमांतील हर नांवाचें कुटुंब तुला आठवतच असेल. जर तें न आठवण्याइतकी तुझी स्मरणशक्ति मंद झाली असली तर तुझ्या डोक्याला असलेल्या जखमेच्या वणावरून हात फिरव म्हणजे ती सतेज होईल. तुझा प्राण घेण्याचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्याबद्दल त्या सर्वच कुटुंबाला कैद करून त्याची वाट लावल्याला आज पांच वर्षें होऊन गेलीं. इतका काळ त्या कुटुंबाची जी संपत्ति व मिळकत जप्त करण्यांत आली तिचा उपभोग तूं आणि मी मिळून घेत आलों आहों. त्या कुटुंबांतील त्या दोघी स्त्रियांचें काय झालें तें केवळ तुला एकट्याला माहीत. त्या मेल्या का जिवंत आहेत हें समजण्याची थोडीशी जिज्ञासा मला लागली आहे.

'त्या कुटुंबांतील सर्वांचा नैसर्गिक रीतीनें झटपट शेवट व्हावा म्हणून जी योजना आपण केली, तिच्याप्रमाणें आपण त्या गुन्हेगाराला जन्मठेपेचा कैदी म्हणून गलबतावर वल्हीं मारण्यास पाठवून दिलें. तो तेथें केव्हांच मरूनहि गेला पाहिजे होता. पण पहा, तोच आतां पुन्हां रोमी उमरावाचा दत्तक पुत्र म्हणून पदवी व संपत्ति यांनीं युक्त होऊन प्रगट झाला आहे.

आज त्याची व माझी थोडाच वेळ प्रत्यक्ष नजरानजर झाली. त्यावेळीं मीं कांहीं त्याला ओळखलें नाहीं, तरी तो बेनहरच आहे ही आतां माझी खात्री झाली आहे. त्याच्या जागीं मी असतों तर अशा स्थितींत मीं काय केलें असतें असा विचार केल्यावर तो सूड उगण्याचा बेत करीत असला पाहिजे हें मला पैजेनें वाटतें.

'म्हणून मी तुला ही सावधगिरीची आगाऊ सूचना करीत आहे, व या बाबतींत तुझ्या सूचनांची अपेक्षा करीत आहे. तुझ्याकडून उत्तर येईपर्यंत मी त्याच्यावर पाळत ठेवीन. तो हल्लीं खजुरीच्या मळ्यांत राजद्रोही शेख इल्डरीम याच्या येथें राहत आहे. जेव्हां सर सेनापति कॉसल येथें येतील तेव्हां ते या शेखला कैद करून रोमला पाठवण्याचा बराच संभव दिसतो. ह्या आपल्या हाडवैऱ्याचा नायनाट करण्याविषयींची जी कांहीं युक्ति योजशील ती ह्या तुझ्या प्रेमळ मित्राला कळविल्याशिवाय राहूं नको, म्हणजे झालं.

तुझा प्रिय मित्र
मेसला.'

या पत्राची एक प्रत घेऊन एक जासूद जलमार्गानें गेला व दुसरी प्रत घेऊन दुसरा खुष्कीच्या मार्गानें गेला.

◆ ◆ ◆

## प्रकरण १० वें

# संपत्ति व मिळकत परत मिळते

दुसऱ्या दिवशीं सकाळीं रथ चालवणें व घोडे आहारांत ठेवणें यांतील प्रविणतेची परीक्षा म्हणून बेनहरनें घोडे दौडवून दाखवले. त्या वेळचें त्याचें कौशल्य पाहून शेख इल्डरीमला मोठा हर्ष झाला. तो एका घोड्यावर बसून चारी घोड्यांना कसें शिक्षण देतो तें पाहण्यास नोकर-चाकरांची गर्दी जमलेली होती. याच वेळीं मलख अंत्योखियाहून आला व त्यानें शेखला एक पुडकें दिलें व म्हटलें, 'सायमनीडस यांनीं तुम्हांवर परमेश्वराचा कृपाप्रसाद मागून हें पत्र आपण ताबडतोब वाचून पहावें अशी विनंति केली आहे.'

शेखनें तें पुडकें सोडलें तेव्हां त्यांत दोन पत्रें निघालीं. एका पत्रांत नेहमींचें क्षेमकुशल विचारल्यावर म्हटलें होतें,

'तुमच्या तळावर एरियस नांवाचा एक तरुण गृहस्थ आहे. तो मला फार प्रिय आहे. त्याचें पूर्वचरित्र मोठें आश्चर्यभारित आहे. तें मी तुम्हांला केव्हां तरी सांगेन. तो काय मागेल तें त्याला पुरवण्यांत यावें व सर्व खर्च माझ्या खातीं घालावा, पण मला त्याच्याविषयीं वाटणाऱ्या आस्थेचा त्याला मागमूसहि लागतां कामा नये.'

दुसऱ्या पत्रांत पुढीलप्रमाणें म्हटलें होतें :

'मित्रा, माझें एक म्हणणें नीट लक्षांत ठेव, तें म्हणजे कोणी मोठा रोमी अधिकारी येण्याची वेळ म्हणजे मालमत्ता बाळगणारांनीं सावध रहाण्याची वेळ होय, कारण त्याच वेळीं ती त्यांच्या हातांतून हिसकावली जाण्याचें मोठें भय असतें. आतां तुझ्या मालमिळकतीचा बराचसा भाग हेरोदाच्या संस्थानांत मोडत आहे म्हणून तुझ्यावर धाड यावयाची झाल्यास ती त्या संस्थानांतील अधिकाऱ्यांच्या गुप्त संमतीनेंच येईल. अंत्योखियाहून

दक्षिणेच्या बाजूला जाणाऱ्या रस्त्यावर ज्या ज्या ठिकाणीं तुझे विश्वासू हस्तक असतील त्या बाजूनें तुझ्या संबंधींचे जे कागदपत्र जातील त्यांवर त्यांनीं सक्त नजर ठेवावी, असें त्यांस निरोप पाठवून बजावून ठेव. तसे कागदपत्र घेऊन येथून जासूद रवानाहि झाले आहेत. पण तुझ्या विश्वासू नोकरांना आड रस्ते चांगले ठाऊक असल्यानें ते त्या जासुदांना सहज गांठूं शकतील. हें पत्र वाचून होतांच जाळून टाकावें.'

सायमनीडसच्या आज्ञेप्रमाणें वरील पत्रें घेऊन एका चपळ घोड्यावर स्वार झालेल्या अरब जासुदाच्या हातीं तीं पाठविण्यांत आलीं होतीं.

संध्याकाळच्या वेळीं बेनहर आपल्या तंबूंत विश्रांति घेत पडला असतां, एक चाकर त्याच्याकडे येऊन त्याला म्हणाला, '"आज आपण त्यांच्या-बरोबर सोबत म्हणून सरोवरावर याल तर आभार होतील" अशी बेलथा-सरची मुलगी, इराज, यांनीं आपणांस सलाम सांगून विनंति केली आहे.'

तो सरोवरावर गेला तेव्हां ती एका सुंदर हलक्याशा नावेंत आजू-बाजूला मऊ उशा घेऊन बसलेली होती व तो हबशी उंटहांक्या वल्हीं घेऊन बसला होता असें त्याला दिसलें. तिनें उंची झिरझिरीत वस्त्रें परिधान केलीं होतीं. नावेंत त्या दोघांचें मोकळेपणानें बोलणें चाललें. तिनें त्याला आपल्या मातृभूमीच्या, मिसर देशाच्या, मनोरंजक गोष्टी सांगितल्या व शृंगार आणि वीररसप्रधान अशीं गाणींहि म्हणून दाखवलीं.

मग ती त्याला म्हणाली, 'काल तुम्हीं ज्या रोमीच्या हातून आमचा प्राण वांचवला त्याची माहिती आतां मला सांगा.' पण बेनहरला तो विषय न रुचणारा निघाल्यामुळें त्यानें तिच्या प्रश्नाचें उत्तर देण्याची टाळाटाळ केली. तिनें त्या रोमीच्या धाडसाची व त्याच्या घोड्याच्या सौंदर्याची जी प्रशंसा केली ती त्याच्या अंतःकरणाला तापदायी झाली. मग तीं दोघें किनाऱ्याजवळ येऊन नावेंतून उतरलीं तेव्हां ती त्याला म्हणाली, 'आम्ही उद्यांच अंत्योखिया शहरांत जाणार.'

त्यानें विचारलें, 'पण तुम्ही शर्यतीच्या मैदानावर असाल ना?'

ती म्हणाली, ‘ असणार म्हणजे ! असणारच, ’

तो म्हणाला, ‘ मी तुम्हांला माझी खूण कळवीन. ’

मग त्यांनीं एकमेकांचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं खजूरीच्या मळ्यांत एक रोमी आला व त्यानें इल्डरीमच्या घोड्यावर चाबुकस्वाराची नोकरी मिळण्यासाठीं अर्ज केला. तेव्हां ‘माझ्याजवळ चाबुकस्वार आहे, ’ असें म्हणून शेखनें त्याला लावून दिलें. तेव्हां रोज त्याच्याकडे नोकरी मागण्याच्या निमित्तानें एकदोन तरी अर्जदार येऊं लागले. या युक्तीनें मेसलानें बेनहरच्या हालचालींवर पाळत ठेवली.

ह्याच दिवशीं शेख इल्डरीमच्याच जमातींपैकीं एक अरब जासूद त्याच्याकडे एक पत्र घेऊन आला व तें अत्यंत जरूरीचें असल्यामुळें ताबड-तोब तें वाचण्याची शेखला त्यानें विनंति केली. पत्र उघडून त्यावर नजर टाकतांच दिसून आलें कीं तें लॅटिनमध्यें लिहिलेलें होतें. ही भाषा शेखला येत नव्हती. यावेळीं बेनहर घोडे घेऊन मैदानावर सराव करीत होता. तो परत आल्यावर इल्डरीमनें त्याला तें पत्र वाचून दाखवावयास व त्याचें भाषांतर करण्यास सांगितलें. बेनहरनें तें पत्र हातांत घेतलें व पहिले चार दोन शब्द वाचले असतील तोंच त्याचें अंतःकरण थरारलें.

‘ मेसलाकडून ग्राटसला, ’—वाड्यांत मद्यपान व नाचरंग अपरात्रीं-पर्यंत चालल्यानंतर मेसलानें निजण्यापूर्वीं जें पत्र लिहिलें त्याची दोहोंपैकीं एक नक्कल ती होती. त्या पत्रांतील मजकुरावरून नजर फिरवीत असतां बेनहरच्या अंतःकरणांत एवढी खळबळ उडूं लागली कीं, त्याला आत्म-संयमन करणें अति कठीण गेलें. इतका वेळ शेख शांतपणें बाजूला वाट पहात बसला होता. बेनहर वाचतां वाचतां मध्येंच थांबून मोठ्यानें म्हणाला,

‘ त्या दोघी मेल्या अशी कांहीं बातमी त्यानें ऐकलेली दिसत नाहीं. त्याला त्यांच्याविषयीं अजून कांहींच माहिती नाहीं. धन्य, धन्य तो यहोवा !

अजून आशेला जागा आहे. त्या मेल्या असत्या तर ह्याला तें कळलेंच असतें.'

बेनहरचे ते शब्द ऐकून चकित झालेल्या शेखला तें पत्र आपल्याविषयीं कसें निघालें त्याविषयींचें त्याचें सविस्तर स्पष्टीकरण केल्यावर त्यानें पुढें असें वाचलें : 'तो हल्लीं खजुरीच्या मळयांत राजद्रोही शेख इल्डरीम—'

वृद्ध शेख आपली दाढी मुठींत घट्ट धरून संतापानें म्हणाला, 'काय, मी आणि राजद्रोही ! !'

तेव्हां बेनहर म्हणाला, 'तें त्याचें स्वतःचें तुमच्याविषयींचें मत आहे. पण त्याची धमकी तर ऐका.' असें बोलून बेनहर पुढें पत्र वाचूं लागला. 'जेव्हां सर सेनापती कॉन्सल येथें येतील तेव्हां ते या शेखला कैद करून रोमला पाठवण्याचा बराच संभव आहे.'

'रोमला ! मला ? दहा हजार भालाईत अरबांच्या शेखला ? मला रोमला पाठवणार ? ह्या उद्दामपणाला आळा केव्हां पडणार ? मी स्वतंत्र मनुष्य आहें, व माझे लोकहि स्वतंत्र आहेत. आम्हांला गुलामगिरींत मरण येणार ? अरेरे ! मी जर यावेळीं तरुण असतों, किंवा द्वेषभावनेला पवित्र-स्थान देणारा हर घराण्यांतील एक असतों तर......'अशा प्रकारें शेख, संताप व दुःख यांनीं काहून गेल्यामुळें, अगदीं दम लागेपर्यंत बोलत गेला. त्यानें बेनहरच्या खऱ्या नांवानें उल्लेख करतांच जवळच बसलेल्या बेनहरलां आश्चर्य वाटलें. त्यानें विचारलें,

'हें पत्र तुमच्या हातीं कसें लागलें ?'

'निरनिराळया शहरांना गेलेल्या रस्त्यांवर माझें विश्वासू टेहेळये ठेवलेले आहेत. त्यांनीं एका जासुदापासून हें पत्र काढून घेतलें.'

'हे टेहेळये तुमचे लोक आहेत ही गोष्ट जगजाहीर आहे का ?'

'मुळींच कोणालाहि माहीत नाहीं. ते लुटारू लोक समजले जातात, पण दरोडेखोर व लुटारू यांना पकडून ठार मारणें हेंच कार्य तर माझें आहे.'

'मी हर घराण्यांतला आहे हें तुम्हांला कसें समजलें हो ?'

शेख म्हणाला, 'या प्रश्नाचें उत्तर मी या वेळीं देऊं शकत नाहीं. ही गोष्ट गुप्त ठेवण्याचें मी वचन देऊन चुकलों आहे. आतां मी शहराकडे निघालों आहें. मी उद्यां तुम्हांला सांगेन.'

शेख तें आलेलें पत्र घेऊन एका तल्लख घोड्यावर स्वार होऊन अंत्योखिया-कडे भरधांव निघून गेला. इकडे बेनहर फार घोटाळ्यांत पडला. त्यानें आपल्या रथाची कसून पहाणी करण्यांत व घोड्यांना तालीम देण्यांत तिसऱ्या प्रहरपासूनचा सगळा वेळ घालवला. रात्र होऊन अंधार पडूं लागला. बेनहर आपल्या तंबूच्या दाराशीं बसला होता. एकाएकी घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला व थोड्याच वेळांत तेथें मलख येऊन धडकला. त्यानें बेनहरला सलाम करून म्हटलें,

'एरियसचे पुत्र जे आपण, त्या आपणास माझा प्रणाम. शेख इल्डरीमची आपणास अशी विनंति आहे कीं, आपण आतांच्या आतां निघून अंत्योखियास यावें. शेख तेथें तुमची वाट पहात आहेत.'

लवकरच हे दोघे गुपचूपपणें अंत्योखियाच्या सडकेनें रात्रीं भरधांव चालले. त्यांनीं वळणें घेत घेत शहरांत प्रवेश करण्याची खबरदारी घेतली. जातां जातां एका मोठ्या वखारीपाशीं येतांच मलखनें लगाम खेंचून घोडा उभा केला. सायमनीडसची ही वखार बेनहरनें तेव्हांच ओळखली व तो थक्क झाला. त्यानें मलखला विचारलें,

'शेखजा कोठें आहेत?'

'चला मी तुम्हांला नेऊन त्यांना भेटवतों,' असें म्हणून मलख त्याला घेऊन आंत गेला. थोड्याच वेळांत, त्याची व सायमनीडसची पहिली भेट ज्या दिवाणखान्यांत झाली होती त्याच दिवाणखान्यांत बेनहर आला. तेव्हां तेथें सायमनाडस, त्याची मुलगी, व शेख इल्डरीम हीं त्याच्या दृष्टीस पडलीं.

तेव्हां तो मनांतल्या मनांत म्हणाला, 'ही मंडळी मित्र का शत्रु?'

दोघां पुरुषांच्या चेहेऱ्यावर स्नेहभाव व्यक्त होत होता, तर एस्तेरच्या मुद्रेवर तो अधिक उठून दिसत होता. गुलामवृत्तीचा गंध नसलेल्या, खंबीर

मनाच्या सायमनीडसनें आपले हात छातीवर एकमेकांवर आडवे टाकून सेवकाप्रमाणें नम्र स्वरानें म्हटलें,

'हर घराण्यांतले आपण, आमच्या वाडवडिलांच्या देवाची शांति आपणांवर असो, अशी मी व माझी मंडळी यांची इच्छा आहे.'

बेनहरनें आदरपूर्वक म्हटलें, 'सायमनीडस, तुम्हांकडून आलेल्या ह्या पवित्र शांतीचा मी स्वीकार करतों व मुलानें वडिलांना सादर करावी त्याप्रमाणें मी ती परत आपणास सादर करीत आहें. आपल्या दोघांमध्यें परस्पर पूर्ण समजूत पटलेली असली म्हणजे झालें.'

'तुम्ही योग्य तेंच बोललां व आपल्याकडून येणाऱ्या मागणीचा आगाऊ अंदाज बांधून आपल्या वडिलांनीं माझेकडे सोंपवलेल्या सगळ्या कारभाराच्या हिशेबाचा तक्ता, हा मीं तयार करून ठेवला आहे,' असें म्हणून सायमनीडसनें एक कागद बेनहरच्या हातीं दिला. रोमी गिधाडाच्या हल्ल्यांतून सुमारें सहा लाख रुपये छपवून ठेवणें साधलें असें त्यांत दाखवलेलें होतें. ही हर घराण्याच्या माझ्याजवळ राहिलेल्या संपत्तींतील पुंजी. या पुंजीवर केलेल्या व्यवहारानें आज ती सगळी रक्कम मालमिळकतीच्यारूपानें तीस लाख रुपये झालेली आहे.

सायमनीडस पुढें म्हणाला, 'हे हरपुत्रा, यावरून तुला दिसून येईल कीं, आज तूं तीस लाखांच्या संपत्तीचा मालक झाला आहेस. जगांत तुझ्या इतका संपत्तिमान् आजच्या घटकेस तरी कोणी नाहीं.'

ह्या गृहस्थाचा हा अलौकिक प्रामाणिकपणा पाहून बेनहर सद्गदित झाला व म्हणाला, 'तुम्हीं मूळ रकमेवर जो कांहीं नफा मिळवला तो सगळा मी तुम्हांला परत करतों. पण त्याला माझी एकच अट आहे; ती अशी कीं, खर्चाची पर्वा न बाळगतां तुम्हीं मला, माझ्या आईच्या व बहिणीच्या शोधांत मदत करावी.'

शिवाय बेनहरनें आपल्या घराण्याच्या गुलामगिरींतून सायमनीडसला स्वतंत्र मनुष्य करण्याची तयारी दाखविली; पण आपण जन्माचे गुलाम म्हणून त्या घराण्याशीं बांधले गेलों असल्यामुळें यहूदी नियमशास्त्रानुसार

आपण मुक्त होऊंच शकत नाहीं हें सायमनीडसनें बेनहरला दाखवून दिलें. तेव्हां बेनहरचा नाइलाज झाला म्हणून त्यानें सायमनीडसला पुन्हा आपल्या सगळ्या संपत्तीवर पूर्वीप्रमाणें कारभारी म्हणून नेमलें. जेव्हां आपली पहिली भेट झाली तेव्हांच आपण माझ्या धन्याचे मुलगे आहां हें कसें ओळखलें, पण स्वभावाची खात्री होण्यासाठीं चवकशी होईपर्यंत ओळख कशी दिली नाहीं, वगैरे हकिकत त्यानें बेनहरला सांगितली. ती ऐकून बेनहरनें त्याच्या व्यवहारदक्षतेबद्दल त्याची प्रशंसा केली. बेनहरचें खरें नांव इल्डरीमला सायमनीडसकडून कळलें होतें ही गोष्ट इल्डरीमनें याच वेळीं सांगून टाकली.

मग खाणेंपिणें आटोपल्यावर हे तिघे बसून पुढील योजनेसंबंधीं चर्चा करूं लागले. पुष्कळ वर्षांमागें आपण यरूशलेमाहून उत्तरेकडच्या रस्त्यानें प्रवास करीत असतां, असाधारण उंचीच्या पांढऱ्या शुभ्र उंटावर बसून जाणारे तीन प्रवासी कसे भेटले व त्यांनीं आपणास व इतर वाटसरूंना 'यहूद्यांचा जो राजा जन्मला तो कोठें आहे ?' असा विचित्र प्रश्न कसा विचारला ती हकिकत बेनहरनें सांगून सायमनीडसला म्हटलें, 'त्या वेळीं त्या गोष्टीसंबंधीं थोडीशी गडबडही उडालेली होती. पण बेलथासरनें जुन्या गोष्टींची आठवण करीपर्यंत माझ्या स्मरणांतून ती गोष्ट अजिबात निघून गेली होती.'

'तुम्हांला बेलथासर भेटले होते का ?'

बेनहरनें उत्तर दिलें, 'भेट होऊन त्यांच्या तोंडून ती सगळी गोष्ट मीं ऐकली आहे.'

तेव्हां सायमनीडस आश्चर्यभरित स्वरानें म्हणाला, 'हा चमत्कारच म्हटला पाहिजे. त्यानें ती गोष्ट मला सांगितली तेव्हां मला देवाचा हेतु प्रगट झाला. तो राजा येईल तेव्हां तो गरीब आणि कोणी मित्र नसलेला असा असून, त्याच्याजवळ ना सैन्य, ना त्याच्या ताब्यांत शहरें व किल्ले असणार. नवीन राज्याची स्थापना होऊन रोमच्या साम्राज्याचा नायनाट

होऊन जाईल. धनीसाहेब ! तुम्ही तरुणपणाच्या शक्तीनें संपन्न, शस्त्रविद्येंत निष्णात असून तुमच्यापुढें संपत्तीचे ढीग आहेत. परमेश्वरानें तुम्हांला केवढी संधि दिली आहे ती पहा.'

बेनहरनें उत्सुकतेनें म्हटलें, 'पण तें राज्य कोठें आहे ? बेलथासर म्हणाला, तें राज्य आत्म्याचें असणार.'

'बेलथासरनें पुष्कळ अद्भुत गोष्टी पाहिल्या होत्या, पण संदेष्ट्यांना त्यांचा प्रकाश स्वर्गातून प्राप्त झाला होता; म्हणून आपण त्यांच्या वचनावर विश्वास ठेवला पाहिजे. एस्तेर, तोरा ( यहूदी धर्मग्रंथ ) घेऊन ये.'

मुलीनें ग्रंथ आणल्यावर सायमनीडसनें यशयादि संदेष्ट्यांचीं वचनें चाळलीं. त्यानें वाचलें, ' "आम्हांसाठीं बाल जन्मला आहे; आम्हांस पुत्र दिला आहे; त्याच्या खांद्यावर सत्ता राहील......त्याच्या सत्तावृद्धीला व शांतीला अंत नसणार; तो दाविदाच्या सिंहासनावर बसून त्याचें साम्राज्य चालवील आणि तेथून पुढें तें सर्वकाळ न्यायानें व धर्मानें दृढ व स्थिर करील." "परमेश्वर म्हणतो, पाहा, मी दाविदाकरितां एक धार्मिक अंकुर उगवीन; तो राजा होऊन राज्य करील, तो सुज्ञतेनें वागेल, देशांत धर्मन्याय करील असे दिवस येत आहेत." '

हीं व दुसरीं पुष्कळ वचनें वाचून दाखवून त्या व्यापाऱ्यानें आपल्या तरुण धन्याची खात्री केली व त्या रात्रीं त्या तिघांनीं एकमेकांस साह्य करण्याविषयींची आणभाक केली. मेसलाच्या पत्रावरून एक गोष्ट स्पष्ट झाली ती ही कीं, रोमी छावणींत बेनहरचा जीव सुरक्षित रहाणार नाहीं, म्हणून लवकरच होणाऱ्या रथांच्या शर्यती संपतांच त्यानें शेखच्या बरोबर वाळवंटी प्रदेशांत जावें, आणि तशा एकीकडील भागांत त्यानें गुप्तपणें आपल्या देशबांधवांचे लहान लहान संघ जमवून त्यांना युद्धकलेचें शिक्षण द्यावें. सायमनीडस वेळोवेळीं जी शस्त्रसामग्री खरेदी करून पाठवील ती गुप्त ठिकाणीं सांठवून ठेवण्याचें काम त्यानेंच करावयाचें. जेव्हां पुढें रोमशीं उघड वैर जाहीर

होईल तेव्हां बेनहरला एरियसपासून मिळालेली मालमिळकत रोमी लोकांच्या हातीं लागूं नये म्हणून सायमनीडसनें ती हळूहळू विकून टाकावी. अशा प्रकारें येणाऱ्या राजासाठीं तयारी करावयाची असें त्यांनीं ठरवलें.

बेनहर तेथून जाण्यापूर्वी एस्तेरनें त्याची भेट घेऊन त्यानें रोमशीं वैर करून दंगेधोपे, कत्तली, वगैरे सारख्या भयंकर कामांत पडूं नये म्हणून त्याला फार आग्रहपूर्वक विनवलें. ती शेवटीं म्हणाली,

'माझे धनी, महाराज...' ( ती गुलामाची मुलगी म्हणून त्याची गुलामच होती. )

बेनहर तिला थांबवून म्हणाला, 'छे, छे, एस्तेर, तूं मला त्या नांवानें हांक मारायची नाहीं. मला आपला भाऊ किंवा मित्र म्हण, पण कदापि मी तुझा धनी होणार नाहीं हें लक्षांत ठेव.'

एस्तेर म्हणाली, 'दुःखानें तुमचें तारुण्य होरपळून गेलें आहे. तें सगळेंच दुःखाला का वाहतां ?'

त्यानें उत्तर केलें, 'या बाबतींत निवड करणें माझ्या हातीं राहिलेलेंच नाहीं. मेसला व ग्राटस यांनीं माझा प्राण घेण्याचा निर्धार केलेला आहे. मी विजयी होईपर्यंत येथें किंवा रोममध्यें त्यांच्यापासून सुरक्षित राहूं शकत नाहीं.'

एस्तेरच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.

तें पाहून बेनहरनें विचारलें, 'माझ्याविषयीं तुला इतकें का वाटतें ?'

तिनें नुसतें 'होय' एवढेंच उत्तर दिलें.

तो म्हणाला, 'तर मग तूं माझी दुसरी तिर्झाच.'

तिनें विचारलें, 'ही तिर्झा कोण ?'

'ज्या माझ्या लाडक्या बहिणीला रोमींनीं हरण करून नेलें आहे व जिचा शोध लावल्याशिवाय मला स्वस्थता म्हणून कधींही वाटणार नाहीं तिचें नांव तिर्झा आहे.' इतकें बोलून त्यानें एस्तेरचा हात वर उचलून त्याचें चुंबन घेतलें व तो तेथून निघून गेला.

◆ ◆ ◆

## प्रकरण ११ वें

## शर्यती

शर्यतीचे सर्व नियम बरोबर पाळण्यांत इल्डरीमकडून हयगय करण्यांत येत नाहीं, याविषयीं दक्षता ठेवून बेनहर व मेसला यांच्या शर्यतींतील सामन्याकडे लोकांचें लक्ष अधिक लागावें म्हणून मलखनें बेनहरच्या यशस्वितेवर मोठमोठ्या रकमांच्या पैजा लावण्याची कारवाई करून ठेवली.

तो म्हणाला, 'रोमतिरांविषयीं रोमीला वाटणारा तिरस्कार प्रगट करण्यासाठीं त्यांच्याकडून जबर रकमांच्या पैजा लावल्याशिवाय रहाणार नाहींत.'

बेनहर मलखला म्हणाला, 'शेंकड्यांनीं पैज मारण्यास कचरूं नका, तर हजार लाखपर्यंत पैज चढवूं लागला तरी चढवीत जा. जर प्रत्यक्ष मेसलाशीं पैज असली, तर पांच, दहा, हजार नव्हे, पण पांचदहा लाखांपर्यंत पैज लावण्यास मागेंपुढें पाहूं नका. त्याचा ताठा उतरीत असतां त्याला दरिद्री करतां आलें तर काय नामी काम होईल !'

मेसला स्वतः हातपाय जोडून बसला नव्हता याविषयीं त्यांना भरपूर प्रमाण दिसून आलें होतें. शर्यतीचा कार्यक्रम जेव्हां वांटण्यांत आला तेव्हां त्यांत, इल्डरीमच्या चौकडीचा चाबुकस्वार म्हणून सारथ्याचें नांव एरियस असें नमूद न करतां, 'बेनहर, एक यहूदी,' असें नमूद केलें होतें. मेसला स्वतःला सगळ्या रोमचा प्रतिनिधि करून घेईल व सर्व रोमींचा त्याला पाठिंबा मिळेल अशीही धास्ती होती.

त्या रात्रीं राजवाड्यांतील दिवाणखान्यांत तरुण रोमींची गर्दी झालेली होती. गाणें, मद्यपान, व जुगार यांत सर्व मंडळी दंग होऊन गेली.

त्यांच्या खिशांतील वह्या रथांच्या सामन्याशिवाय बाकीच्या सर्व खेळां-वरील पैजांच्या टिपणांनीं भरून गेल्या होत्या. रथांच्या सामन्याच्या बाबतींत मात्र मेसलाचा प्रतिस्पर्धी म्हणून दुसरा कोणीहि पैज लावण्यास योग्य असा त्यांना सांपडेना. तेथें त्या सर्वांनीं मेसलाच्या रंगाच्या खुणा धारण केल्या होत्या. अर्थात् त्या दिवाणखान्यांत बेनहरच्या रंगाची खूण आपल्या पोषाखावर लावून एक गृहस्थ येतांच जमलेल्या सर्व मंडळींत मोठी खळबळ उडाली. बेनहरच्या गलबतांतून अंत्योखियास जो गृहस्थ आला व ज्यानें बेनहरला सायमनीडसविषयींची हकिकत सांगितली होती, तोच हा आतां आलेला गृहस्थ होता.

हा नवखा गृहस्थ दिवाणखान्याच्या मध्यभागीं असलेल्या मेजा-जवळच्या एका कोचावर बसला व त्यानें त्या तरुण रोमी मंडळीला त्यांच्या मोठेपणाच्या घमेंडीविषयीं चिडवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. होतां होतां प्रत्यक्ष मेसलाच आपल्या विजयावर एकाला सहा अशी पैज त्या गृहस्थाजवळ लावण्यास कबूल झाला.

मग मेसला म्हणाला, 'आतां रोमी व यहूदी यांच्यामधील फरक एकाला सहा आहे असें दिसून आलें, तर आतां पैजेची रक्कम किती असावी ?'

त्या नवीन आलेल्या गृहस्थानें आपल्या वहीवर एक आंकडा लिहिला व ती वही त्यानें मेसलाच्या हातांत दिली.

तेव्हां सर्व मंडळी ओरडत म्हणाली, 'वाचा, वाचा आंकडा.' मेसलानें तो वाचून दाखवला.

'टीप—रथांची शर्यत. रोमचा मेसला याची रोमचाच सॅनबॅलट याशीं पैज. मेसला म्हणाला, "मी यहूदी बेनहरला शर्यतींत मागें टाकीन. पैजेची रक्कम एक लक्ष रुपये. उलट मीं खरोखरच तसें न केल्यास सॅन-बॅलटला एकाच्या सहापट याप्रमाणें द्यावयाचे."

साक्षीदार : सॅनबॅलट'

कांहीं वेळ दिवाणखान्यांत अगदीं स्तब्धता होती. मेसलानें सही करण्यास आरंभ केला, तेव्हां सर्वजण त्याच्याकडे टकमकां पाहूं लागले. मेसलाचा चेहेरा निःस्तेज झाला. त्यानें लावलेल्या पैजेच्या चौथ्या हिश्शाइतकी देखील त्याची सगळी मालमिळकत नव्हती. पण आतां पुढें केलेल्या वहीवर तो सही न करतां तर सगळ्या मंडळींतील पुढारीपणाचें त्याचें स्थान जातें. तितक्यांत त्याच्या मनांत एक विचार आला. त्यानें विचारलें,

'तुम्ही यहूदी ना ? तर मग तुमच्याजवळ एक लाख कोठले ?'

तेव्हां सॅनबॅलटनें त्याच्या हातांत आणखी एक कागद दिला. मंडळीच्या आग्रहाच्या ओरडीमुळें त्याला तो मोठ्यानें वाचावा लागला. त्या कागदांत लिहिलें होतें कीं 'हा कागद ज्याच्या जवळ आहे त्या सॅनबॅलट गृहस्थाचे नांवें माझ्या पेढीवर अडीच लाख बादशाही नाणीं जमा आहेत. सायमनीडस.'

मग मेसला सॅनबॅलटला म्हणाला, 'एकाला सहा हें पैजेचें प्रमाण मीं मान्य केलें आहे, तर आतां पैजेची रक्कम नक्की करण्याची सवलत म्हणून माझी एक लाखाच्या ऐवजीं तीस हजार करा, म्हणजे मी सही करतों.'

सॅनबॅलटनें मेसलाच्या म्हणण्याप्रमाणें आंकडा बदलला व पैज पक्की झाली. तेव्हां मुद्दाम हिणवण्याच्या स्वरानें सॅनबॅलटनें सगळ्या मंडळीस उद्देशून म्हटलें, 'आतां तुम्ही सर्वजण माझ्याबरोबर या बाबतींत पंचवीस हजारांची पैज लावा पाहूं. माझी बाजू हरली तर मीं तुम्हांला पंचवीस हजार द्यावयाचे व तुमची बाजू हरली तर तुम्हीं मला तितकेच द्यावयाचे. आहे कबूल ?' मंडळीनें तेव्हांच आपली मान्यता दिली. एवढ्या मोठमोठ्या रकमांच्या पैजा रोमी व यहूदी यांच्या सामन्यावर लागल्यामुळें त्यांच्याकडेच शर्यतीच्या दिवशीं प्रेक्षकांचें सगळें लक्ष लागून राहिलें.

शर्यतीचा तो संस्मरणीय दिवस उगवला. मैदानावरील संगमरवरी कठड्यांपाशीं सुमारें दोन लाख प्रेक्षकांची अफाट गर्दी उसळली होती, आणि रथांच्या चढाओढींत अथेनै, सिदोन, बिझँटिअम व करिंथ इतक्या

निरनिराळ्या शहरचे उमेदवारांनीं भाग घेतला होता. तरी त्यांनीं जेव्हां आपल्या घोड्यांच्या चौकड्या प्रेक्षकांपुढें फिरवून दाखवल्या तेव्हां प्रेक्षकांच्या मोठ्या समुदायाला रोमी व यहूदी असा उत्कट पक्षाभिमान असलेला दिसला.

इल्डरीम व सायमनीडस एकमेकांजवळ बसले असून त्यांच्याच शेजारीं बेलथासरही होता. तो मात्र आपण कधीं असल्या शर्यतीबिर्यती पाहिलेल्या नाहींत असें असतां इथें कसें आलों कोण जाणें असें म्हणतच होता. त्याची मुलगी इराज नटून थटून आलेली होती, पण एस्तेरनें आपल्या तोंडावरील बुरखा घट्ट ओढून घेतलेला होता.

इराज एस्तेरला म्हणाली, ‘ तूं ह्या मेसलाला कधीं पाहिलें आहेस का ? ’

एस्तेर म्हणाली, ‘ नाहीं. ’

‘ तो अपल्लोसारखा सर्वांगसुंदर आहे, ’ इराज म्हणाली.

एस्तेरनें आपला बुरखा अधिक अंगासरपट ओढला व मनांत बेनहर-साठीं परमेश्वराला विनवलें.

जेथून शर्यत धांवण्यास आरंभ व्हावयाचा तेथें दोर लावून हद्द ठरवण्यांत आली होती. मैदानावर त्या हद्दीशीं भिडलेले सहा भाग आंखून सहा उमेदवारांची व्यवस्था केलेली होती. ठरलेली खूण होतांच प्रत्येक उमेदवाराच्या आवाराचें फाटक उघडलें जावयाचें व प्रत्येकानें आपल्या सामर्थ्याप्रमाणें हद्दीच्या आंत सोईची जागा पटकावण्यासाठीं येण्याकरतां आपली घोड्याची चौकडी भरधांव काढण्यास त्याला पूर्ण मोकळीक होती, पण तसें करतांना त्यानें विशेष खबरदारी घेण्याची तशीच आवश्यकता होती, कारण उमेदवाराच्या हद्दीशीं येऊन पोहोंचण्यासाठीं निघण्याच्या वेळीं त्यानें केलेल्या चुकीमुळें परीक्षक नाराज होऊन त्यानें त्याच्यासाठीं मर्यादेची दोरी खालीं करण्याची खूण न केल्यास परिणाम भयंकर व्हावयाचा. म्हणून त्या हद्दीच्या दोरीपर्यंत येण्याच्या वेळींही तशीच दक्षता उमेदवारानें घेणें आवश्यक होतें.

परीक्षक न्यायाधिशानें खूण करतांच शिंगाड्यानें शिंग फुंकलें व तत्काळ उमेद्‌वारांच्या आवारांचीं फाटकें खाडकन् उघडलीं गेलीं. सहा बंदुकांतून सहा गोळया निघाव्या त्याप्रमाणें हे सहा प्रतिस्पर्धी सारथी आपल्या चौकड्या भरधांव सोडून निघाले. मैदानाभोंवतींच्या कठड्यां-पाशीं बांधलेल्या बैठकांवर प्रेक्षक उड्या मारून उभे राहिले व मोठमोठ्यानें आरोळया मारून सारथ्यांना उत्तेजन देऊं लागले.

इराज मेसलाकडे बोट दाखवून म्हणाली, ‘ एस्तेर, तो पहा, तो येत आहे. ’

एस्तेरनें बेनहरकडे पहात म्हटलें, ‘ तो येत असलेला दिसतो खराच. ’

आवारांतील अंधारामधून एकदम मैदानावरील झगझगीत प्रकाशांत आल्यामुळें बेनहरचे डोळे प्रथम क्षणभर दिपल्यासारखे झाले. त्यानें मेसलाकडे नजर टाकली तेव्हां या मनुष्याचें अंतःस्वरूप दुष्ट, कपटी, साहसी, व भयंकर निश्चयी असेंच आहे असें त्याला वाटलें. पण याच वेळीं त्याचें स्वतःचें अंतःस्वरूप तशाच प्रकारें अत्यंत निग्रही बनलें आहे याची जाणीव बेनहरला होतीच. शिवाय त्यानें असेंही पाहिलें कीं मेसलानें सावधगिरी झुगारून देऊन तो एवढ्या बेफामपणानें हद्दीपाशीं निघाला होता कीं, त्याचा रथ हद्दीशीं येतांच दोरी पाडण्याचें परीक्षकाशीं आगाऊ ठरलेलें असल्याचा भास झाल्यावांचून राहिला नाहीं. इकडे दुसरे उमेद्‌वार आपले घोडे हद्दीकडे येत असतां जपून दौडवीत होते. मेसला इतक्या बेफामपणें दोरीपाशीं पोहोंचला कीं, दोरी पडतांना त्याच्या एका घोड्याच्या पायाला ती लागली देखील.

हवी ती सोईची जागा हद्दीच्या आंत आधीं मिळावी म्हणून रथ पळवीत असतां मेसलाच्या रथाच्या कण्याचें टोक, अथेनैकर सारथ्याच्या बाहेरील जोडीपैकीं एका घोड्याच्या पुढल्या पायाला लागलें व तो त्याच्या जोडीदाराच्या आंगावर आदळला व त्यामुळें त्या चारी घोड्यांचा गोंधळ उडाला. सारथ्यानें घोडे ताब्यांत आणण्यासाठीं उजवीकडे वळण

घेतलें तेव्हां त्याच्या रथाच्या मागच्या भागाला बिझँटिअमकर सारथ्याच्या रथाच्या चाकाचा धक्का बसला व सारथ्याचा पाय घसरला. धाडकन आवाज आला. रागाची आरोळी व भयाची किंचाळी ऐकूं आली, कारण अथेनैकर सारथी खालीं त्याच्याच घोड्यांच्या पायांत सांपडला. तो भयंकर प्रकार पहावेना म्हणून एस्तेरनें डोळे मिटून घेतले.

मेसला मागेंपुढें न पाहतां शर्यतीच्या रिंगणांतून चालला होता. त्याच्याकडे व त्याच्या घोड्याकडे नजर लावणाऱ्या अशा रोमी लोकांकडून आनंद-सूचक व ग्रीक लोकांकडून शापदर्शक प्रचंड आरोळ्या उठत होत्या. ग्रीक सारथ्याचें प्रेत बाजूला नेलेलें लोकांनीं पाहिलें. मेसलाच्या पाठोपाठ सिदोनकर, बिझँटिअमकर व करिंथकर यांचे रथ दवडत चालले होते. पण बेनहर कोठें होता ?

मर्यादेची दोरी पडली कीं मेसलाला मनाजोगी सर्वांत सोईस्कर आंतली जागा मिळणारच, हें जेव्हां बेनहरनें ताडलें तेव्हां त्यानें या वेळीं माघार पत्करली, आणि अथेनैकराला झालेल्या अपघातामुळें मागें पडलेल्या रथांच्या मागून त्यानें आरंभीं आरंभीं आपला रथ चालवला होता, पण लवकरच तो पुढें चमकला व मेसलाच्या अगदीं बरोबरीनें रथ चालवूं लागला. त्यानें घोडे हांकण्यांत जें कौशल्य प्रगट केलें त्यामुळें रोमींखेरीज इतर सर्व प्रेक्षकांकडून त्याच्या प्रशंसेपर आरोळ्या निघत होत्या.

'मेसला, मेसला, आमचें नांव राख,' अशा रोमींच्या आरोळ्या ऐकूं येत होत्या.

सॅनबॅलट बैठकीमधूनच ओरडत होता, 'यहूदी सारथ्यावर शंभर, पंधरा हजार.' त्यानें पैशाच्या टिपणांनीं आपली वही भरून काढली.

प्रत्येक रथानें मैदानाच्या रिंगणाचीं सात वळणें घेऊन शेवटीं पोहों-चावयाचें अशी शर्यतीची अट होती. शेवटीं टोंकाशीं असलेल्या खांबाला फेरी घालतांनाच सारथ्याच्या सगळ्या कौशल्याची कसोटी लागत असे.

मेसला व बेनहर हे पहिल्या वळणाशीं येऊन पोहोंचले तेव्हां सर्व प्रेक्षक-समुदाय आपण होऊनच स्तब्ध बसला. याच वेळीं मेसलानें बेनहरला शर्यतींत प्रथम पाहिलें व तत्काळ ओळखलें. तो आपली जुनी रोमी आरोळी मारीत म्हणाला, 'स्नेहदेवता खालीं ओढली गेली; युद्धदेवतेचाच विजय !' नंतर त्यानें आपल्या सरावलेल्या हातानें चाबकाचा खाडकन् आवाज करून अरबी घोड्यांवर असे कोरडे ओढले कीं, घोड्यांना तसा अनुभव पूर्वी कधींही आलेला नव्हता. क्षणभर जिकडे तिकडे अधिकच स्तब्धता झाली, परंतु मग मात्र सर्वत्र संतापाची एकच आरडाओरड ऐकूं येऊं लागली.

बेनहरच्या रथाचे ते चारी घोडे चमकले व त्यांनीं पुढें उड्या टाकल्या. आजपर्यंत कोणत्याही हातानें त्यांच्यावर असे फटकारे कधींच ओढले नव्हते. त्यांना अत्यंत ममताळूपणानें वागवल्यामुळें मनुष्यांमधील उदार व सुंदर अशा माणुसकीवर त्यांचा विश्वास बसला होता. पण मनुष्याच्या आजच्या निर्दयपणानें ते भडकले. घोड्यांच्या उड्यांमागून उड्या सुरू होतांच रथ घडघडां पुढें जाऊं लागला. कोणत्याही कामांतला अनुभव फळ दिल्यावांचून कधींही रहात नाहीं. बेनहरला त्याच्या जोरकस मनगटाचा व पंजाच्या पकडीचा विशेष उपयोग होता. पण हीं त्याला कोठें व कशीं लाभलीं ? ज्या ठिकाणीं बसून वल्हीं मारीत तो सतत समुद्राच्या पाण्याशीं झगडत तासचे तास बसत असे त्या गलबताशिवाय दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं ही कणखर तयारी होणार ? त्याचप्रमाणें समुद्राच्या प्रचंड लाटांच्या तडाख्यामुळें गलबतांना धक्के बसून जे हेलकावे खावे लागत त्या वेळच्या अनुभवामुळें आजूबाजूंना झोंक देऊन पुढें उडी घेणाऱ्या रथांत बेनहरला आपले पाय रोवल्यासारखे ठेवणें सोपें जात होतें.

आपल्या भरधांव सुटलेल्या घोड्यांस गोड व शांत स्वरानें चुचकारून बेनहरनें त्यांना आंवरून त्याच्याकडून पहिलें भयंकर वळण घेतलें. चटकन्

पुन्हा स्वतःचें पहिलें ठाण कायम करून पहिलें चक्कर संपण्याच्या वेळीं तो पुढें मेसलाच्या बरोबरीला येऊन पोहोंचला. रोमीशिवाय हरएक प्रेक्षकाच्या मनांत बेनहरविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली होती. त्याच्याउलट प्रेक्षकांची मेसलाच्या वर्तनाविषयींची नापसंती इतकी उघड दिसूं लागली कीं, मेसलाचा अहंकार थोडा कमी झाला व आपण थोडें जपून घेतलें पाहिजे हें तो समजला.

पुढें प्रत्येक चक्करामध्यें रथांचा अनुक्रम असा रहात चालला. सर्वांच्या पुढें बरोबरीनें मेसला व बेनहर यांचे रथ, त्यांच्यामागून सिदोनकराचा, बिझॅंटिअमकराचा, व शेवटीं करिंथकराचा असा रथांचा अनुक्रम. मागच्या तिन्ही सारथ्यांनीं आपापले रथ पुढें पहिल्या जोडीच्या बरोबरीनें आणण्यासाठीं शिकस्तीचे प्रयत्न केले, पण त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं असें पाहून त्यांचा अभिमान बाळगणाऱ्या प्रेक्षक लोकांची त्यांच्या यशाविषयीं निराशा झाली व त्यांचें लक्षहि आतां बेनहरच्या रथाकडे लागलें. त्यांना बेनहरविषयीं काळजी वाटूं लागली, कारण अजून रोमी मेसलानेंच भिंतीजवळची आपली जागा आपल्या हातांतून जाऊं दिली नव्हती. तरी देखील सॅनबॅलट कठड्यांजवळील बैठकींतून ओरडून म्हणाला, 'पंधरा हजार.' 'यहूदी पहिला येणार. ह्यावर पांच, दहा, पंधराहजाराची पैज.' रोमी लोक ही शर्यत विशेष मन घालून पहात होते. त्या सर्व प्रेक्षकांकडे पहात आपली वही वर करून पुन्हा पुन्हा सॅनबॅलट ओरडून म्हणाला, 'चला, लावा पैज. एक, दोन, पांच, दहा हजार. फार काय लाखपर्यंत माझी तयारी आहे.'

एक रोमी तरुण म्हणाला, 'मी लावतों तुझ्याशीं पैज.'

तितक्यांत त्याचा सोबती त्याला म्हणाला, 'तसें करूं नको.'

'कां बरें ?'

'पहा मेसला आपल्या घोड्यांच्या गतीची अखेरी करून बसला आहे. तो रथाला टेकला असून त्याच्या हातांतील लगामाच्या दोऱ्या कशा भुर-भुर उडाल्यासारख्या दिसत आहेत. पण तीच त्या यहूदी सारथ्याकडे नजर टाकून पहा.'

तेव्हां तो रोमी तरुण सोबत्याला म्हणाला, 'अरें खरेंच. आतां दिसतें मला सगळें. तो तर आपलें सगळें सामर्थ्य खर्च करून लगाम खेंचून धरीत आहे आणि म्हणून आमच्या मूर्ख मित्राला यावेळीं देवदेवतांनीं हात न दिल्यास तो इस्राएली त्याला तेव्हांच मागें सारील.'

तितक्यांत मेसलानें घोड्यांकडून अधिक झेंप घेववून आपला रथ थोडा पुढें काढला असें दिसलें, पण बेनहरनें रथाला मुद्दाम वळण देऊन त्याच्या मागें दुसरी जागा घेतली असें दिसतांच रोमी प्रेक्षकांकडून आनंदाच्या आरोळ्या निघाल्या. सॅनबॅलटनें आपली दुसरी वही पैजांच्या टिपणांनीं अगदीं भरून काढली. सायमनीडसचया बरोबर असलेल्या मंडळींपैकीं मेसला जिंकणार असें पाहून इराजलाच काय तो आनंद वाटला. मलखनें मोठ्या प्रयासानें आपली निराशा दाबली. बेनहर तितक्यांत कांहीं तरी डाव करण्याच्या विचारांत होता हें सायमनीडसनें ताडलें. त्याला हालवून इल्डरीम मोठ्यानें म्हणाला, 'पहा, माझे चारी घोडे किती हुशार व तजेलदार दिसत आहेत. अजून देखील, ते नुसते चालले आहेत. धांवणें पुढेंच आहे. नीट पहा.'

बेनहरला पाठिंबा देणारे प्रेक्षक मोठी आरडाओरड करीत घोड्यांच्या लगामाला हिसका देऊन त्यांच्यावर चाबकाचे फटकारे लगावण्यास सांगत होते. पण पांचवें वळण घेऊन झालें तरी बेनहरची विशेष चमक दिसेना. उलट, मेसलाच्या पाठोपाठची जागा हातची जाऊं नये म्हणून तो आपली शिकस्त करीत आहे असा भास वरवर पहाणारास होत होता. पण जेव्हां सारथ्यांनीं शेवटचें वळण घेतलें तेव्हां मलख त्या बाजूला सारखा पहात होता, कारण त्याच ठिकाणाशीं कांहींतरी विशेष गोष्ट घडेल असें त्याला

बेनहरनें पूर्वीच सांगून ठेवलेलें होतें, व म्हणून या वेळेची तो सारखी वाट पहात होता. एकाएकीं त्या यहूदी सारथ्यानें आपला झोंक घोड्यां-कडे वळवला व लगाम सैल केला व जणूं काय आपल्या स्वतःमधली जोरकस इच्छा व प्रवृत्ति हीच त्यानें आपल्या घोड्यांमध्यें घातली असें दिसलें, कारण घोडे बिचकल्यासारखे भासले. त्यांनीं चौघांनीं एकदम झांप टाकतांच मागें असलेला बेनहरचा रथ क्षणांत मेसलाच्या अगदीं बरो-बरीला आला. वळणामधील धोक्याची जागा आली त्यावेळीं आपल्या-मागें कांहींतरी विशेष होत असल्याचा मेसलाला भास झाला, पण तशा प्रसंगीं मागें वळून पाहण्याचें साहस त्याच्यानें झालें नाहीं. प्रेक्षकांच्या हालचालीवरूनहि त्याला कांहींच अंदाज बांधतां येईना. शर्यतीच्या गोंगाटांतून देखील ऐकूं येईल इतक्या मोठ्या आवाजानें चौकावर धांव-णाऱ्या आपल्या घोड्यांस अधिक गति देण्यासाठीं शेख इल्डरीम आपल्या भाषेतच बेनहरला सूचना करीत होता.

बेनहरनें मेसलाच्या पुढें येण्यासाठीं ठरवलेली झांप टाकली त्या वेळीं मेसला खांबाभोंवतींच्या चकरांत होता. या ठिकाणीं मेसलाचा रथ मागें टाकावयाचा म्हणजे बेनहरला अधिक मोठें वळण घेणें भाग होतें. प्रेक्षकांचें सगळें लक्ष आतां या करामतीकडे लागलें. बेनहरच्या अरबी चौकडीनें विलक्षण शिताफीनें उडी घेऊन मेसलाचा रथ मागें टाकला. तितक्यांतच काडधाड असा भयंकर आवाज झाला व शर्यतीचें सर्व मैदान तरारल्यासारखें झालें. उजव्या बाजूच्या अंगावर रोमीचा रथ कोसळला. रथाचा कणा काडकन् मोडून रथाचे तुकडे झाले व मेसला लगामाच्या दोऱ्यांत गुरफटून जमिनीवर सपशेल उपडा पडलेला दिसला !

त्याच्या मागोमाग सिदोनकराचा रथ वेगानें आला; तो रोमीच्या मोडलेल्या रथावर व घोड्यांवर आदळला. सारथी मोठ्या कष्टानें त्या अपघातांतून रांगतरांगत झटकन् बाजूला निघाला. तितक्यांत त्यानें पाहिलें तों, बेनहरच्या पाठोपाठ बिझँटिअमकरचा व त्याच्या मागोमाग कॉरिंथकरचा रथ असा क्रम त्याला दिसला.

प्रेक्षक लोक आपापल्या बैठकीवर उभें राहून मोठमोठ्या आरोळ्या व किंचाळ्या मारूं लागले. मोडलेल्या रथाच्या बाजूला पहाणारांना, मेसला एकदां बेफाम घोड्यांच्या पायांखालीं, तर एकदां रिकाम्या पडलेल्या रथाखालीं दिसला. तो स्तब्ध पडलेला होता. तो मेला असें पहाणारांना वाटलें. पण प्रेक्षकांतील बहुतेक लोकांचें लक्ष बेनहरच्या रथाकडे लागलें होतें. त्याचे घोडे जणूं काय सिंहच उड्यांवर उड्या घेत चालले आहेत असें दिसत होतें. मागें धडपड करणारा रथ नसता, तर ते घोडे नुसते उडत चालले आहेत, असें सुद्धां पहाणाराला वाटण्यासारखी स्थिति होती. जेव्हां कॉरिंथकराचा व बिझॉंटिअमकराचा रथ असे दोन्ही शर्यतीच्या शेवटच्या टप्प्याच्या अर्ध्यावरच होते तेव्हांच बेनहरचा रथ ठरलेल्या रेषेवर पहिल्यानें पोहोंचला व त्यानें शर्यत जिंकली.

कॉन्सल उठून उभा राहिला. घसा बसून जाईपर्यंत लोकांचें बेताल ओरडणें चालूच होतें. यशस्वी उमेदवारांचा गौरव करण्यासाठीं अध्यक्ष आपल्या आसनावरून खालीं उतरला. मुष्टियुद्धांत यशस्वी झालेल्या उमेदवारांत एक इतक्या खडबडीत चेहऱ्याचा होता कीं, त्यामुळेंच बेन-हरचें लक्ष त्याच्याकडे गेलें व त्यानें त्याला तेव्हांच ओळखलें. रोममध्यें मुष्टियोद्ध्यांच्या शिष्यमंडळींत ह्याचा बेनहर हाच सर्वांत पटाईत म्हणून आवडता शिष्य होता. नंतर बेनहरनें पाहिलें तों सिदोनकर हात हालवून त्याचें अभिनंदन करीत होते. एस्तेर जागची उठली नाहीं. पण इराज उभी राहिली व तिनें त्याच्याकडे पाहून आपल्या हातांतला पंखा हालवला. तिच्या चेहऱ्यावर हास्य झळकत होतें. हीं सुप्रसन्नतेचीं चिन्हें अत्यंत आल्हाददायीं होतीं यांत कांहीं संशय नाहीं; पण जर मेसलानें हा विजय मिळविला असता तर हा प्रेमाचिन्हांचा सगळा मारा त्याच्यावर झाला असता हें वाचकांच्या लक्षांत येईलच !

◆ ◆ ◆

## प्रकरण १२ वें

## कपटी डाव

अंत्योखिया शहरांतील खेळ व शर्यतींच्या ठरलेल्या दिवसाच्या आदल्या दिवशीं शेख इल्डरीमचा मुक्काम तेथून बहुतेक हालल्यासारखा दिसत होता. दुसऱ्या दिवशींच्या शर्यतींसाठीं लागणारें सामानसुमान मागें ठेवण्यांत आलें व बाकीचें सर्व कांहीं पाठवून देण्यांत आलें. शेखचे अनुयायी व त्यांचें सामानसुमान यांसह सर्व परिवार आपल्या वाळवंटी प्रदेशाच्या वाटेला लागला, तेव्हां एखादी जंगली जमातच्या जमात एका भागांतून दुसऱ्या भागांत वस्ती करण्यास जात आहे असा देखावा दिसला. त्यांना आपल्या प्रदेशाची सीमा गांठण्यास केवळ एक दिवस, म्हणजे बारा तास, मिळाले तर मग कोणत्याही व कसल्याही शत्रूचा हल्ला आला असतां त्यांच्या हातांतून निसटून जाणें त्यांना सहजसाध्य होतें. सायमनीडसच्या घरांत रात्रीं ठरलेल्या योजनेप्रमाणें शेख व बेनहर यांनीं मध्यरात्रीं अंत्योखियांतून निघावयाचें होतें.

शेख इल्डरीमला रोमी लोकांच्याच खेळांत अपूर्व यश मिळाल्यामुळें अत्यानंद झाला व या यशामुळें त्याचा नांवलौकिक वाढेल व त्याच्या निशाणाखालीं अधिक अनुयायी जमा होतील अशी त्याची समजूत झाली. तो बेनहरला भरपूर बक्षीस व देणग्या देऊं लागला, पण बेनहरनें कांहींच घेतलें नाहीं.

तो इल्डरीमला म्हणाला, 'तुमचा लोभ व पाठबळ हीं मला पुरें आहेत. तुमचें वाढतें सामर्थ्य येणाऱ्या राजासाठीं उपयोगी पडो. त्याच्यासाठीं म्हणून तें तुम्हांला प्राप्त झालें असावें व त्याची गरज आम्हांला लागणारच !'

ह्या दोघांचें संभाषण चालू असतां मलख आला. शहरांत मोठी गडबड उडून गेली होती, कारण विजयी होणारांना द्यावयाच्या बक्षीसाला कांहीं रोमी लोकांनीं विरोध चालवला. शिवाय पैजेबद्दल भराव्या लाग-

णाऱ्या रकमांबद्दलही या लोकांनीं कॉन्सलकडे तक्रार केली. तेव्हां कॉन्सलनें त्यांची ती तक्रार निकालासाठीं बादशहाकडे रोमला पाठवली. ही हकिकत ऐकली तेव्हां इल्डरीमला संताप आला व त्याचा चेहेरा लाल झाला. तेव्हां त्याला शांत करीत मलखनें त्याला सांगितलें, 'तुम्हांला मिळावयाची बक्षिसाची रक्कम तुमचे पेढीवाले जे सायमनीडस त्यांच्याकडे जमा होऊन देखील गेलेली आहे.' बक्षिसाची रक्कम देण्याच्या आड येणाऱ्या तक्रारी लोकांनीं तेव्हां अध्यक्षाला सांगितलें, 'बेनहरच्या रथाचा धक्का मेसलाच्या रथाच्या चाकाला बसला होता.' तें ऐकून अध्यक्ष हंसला व खांबासभोंवतीं जात असतां मेसलानें बेनहरच्या अरबी घोड्यांना ओढ-लेल्या चाबकाच्या फटकाऱ्यांची त्यानें या लोकांना आठवण करून दिली, व त्यांची तक्रार मनावर घेतली नाहीं.

बेनहरनें विचारलें, 'आतां सायमनीडसचें मत काय आहे ?'

मलख म्हणाला, 'माझ्या धन्याला ह्या एकंदर प्रकारामुळें खरोखर हंसूच आलें. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, जर रोमी मेसलानें पैजेचे पैसे भरले तर त्याचें दिवाळें वाजेल व जर न भरले तर त्याची छी:थू होईल. आतां रोमची पार्थियन लोकांविरुद्ध निघणारी स्वारी लवकरच वाळवंटी भागांतून जावयाची आहे, म्हणून रोम यावेळीं पूर्वेकडील लोकांना, विशेषेंकरून वाळवंटी प्रदेशांतून गेलेल्या रस्त्यांचें रक्षण करणारे जे अरब, त्यांचें मन दुखवण्याचें मनांतसुद्धां आणणार नाहीं. मेसलाला पैजेचे पैसे भरणें भाग पाडण्यांत येईल, अशी त्यांची खात्री आहे.'

शेख व बेनहर निघून जाण्यापूर्वीं दुसरा एक जासूद तेथें आला. त्यानें बेलथासरच्या मुलीचें, इराजचें, पत्र शेखला आणलें होतें. त्याच्या घोड्यांनीं मिळवलेल्या यशाबद्दल तिनें शेखचें अभिनंदन केलें होतें. शेखला आणखी एक निरोप त्या पत्रांत होता, तो असा :

'माझ्या वडिलांनीं इडरनीजच्या भव्य वाड्यांत मुक्काम केला आहे, व उद्यां प्रहरभर दिवस आल्यावर बेनहरनीं माझी भेट घ्यावी, अशी आमची इच्छा आहे, हें तुम्ही तरुण बेनहर यांस कळवावें !'

त्या मिसरी तरुणीची भेट घेण्याचें बेनहरनें ठरवलें. तें पाहून शेख हंसला व म्हणाला, 'मनुष्यानें तारुण्याचा उपभोग घेणेंच योग्य नव्हे का?' त्यानें बेनहरला वाट दाखवून आणण्यासाठीं त्याच्याजवळ आपला एक नोकर मागें ठेवून तो निघून गेला.

हा तरुण यहूदी त्या रूपवती मिसरी तरुणीला भेटावयास गेला, तेव्हां त्याचें हृदय धडधडत होतें. मागें एकदां रात्रीं तिनें ह्याला सरोवरावर येण्यासाठीं बोलावलें होतें, तशाच प्रकारचें या वेळचेंही बोलावणें होतें. गोष्टी सांगणें, गोड गायन, मनोहर हावभाव, इत्यादि प्रकारांनीं ती त्याचें आदरातिथ्य करणार. शहराच्या अगदीं मध्यभागीं असलेल्या त्या भव्य, सुंदर, टोलेजंग, कबऱ्या रंगाच्या संगमरवरी दगडांच्या वाड्यांत तिचें लावण्य अधिकच खुलून दिसणार.

बेनहरला जिन्यावरून गच्चीवर व तेथून एका मोठ्या दरवाजांतून एका सुशोभित महालासारख्या दिवाणखान्यांत नेण्यांत आलें. तेथील सर्व सामानसुमान भारी किंमतीचें व सुबक नक्षी काढलेलें असें होतें. भिंतीवर मनोहर देखावे रंगवलेले होते. तो त्या दिवाणखान्यांत जातांच, जितक्या गुपचूप तो दरवाजा उघडला गेला तितकाच गुपचूप तो बंद झाला.

हा तरुण इराजची वाट पहात असतां भिंतीवरील चित्रें, पुतळे, तसबिरी, वगैरेंचें बारीक निरीक्षण करूं लागला; पण अर्धा तास होऊन गेला तरी इराजचा पत्ता नाहीं असें पाहून तो अधीर झाला. ज्या दरवाजांतून तो आंत आला होता तो उघडण्याचा त्यानें प्रयत्न केला पण तो उघडेना तेव्हां आपण या ठिकाणीं कोंडलें गेलों असें त्याच्या लक्षांत आलें. दुसरीं दारेंही बंदच. त्या महालांत उजेड भरपूर होता. खिडकीचें नांव नव्हतें. या सर्व गोष्टींचा चांगला विचार केल्यावर आपल्याला कपटानें मोहांत पाडून शहराच्या अगदीं मध्यभागीं आणून मुद्दाम आपला प्राण घेण्याच्या हेतूनेंच असें कोंडून टाकण्यांत आलें असलें पाहिजे अशी त्याची खात्री होऊन चुकली. त्या तरुणाचा तो संशय खरा ठरला. एकदम दार उघडलें गेलें व दोन

माणसें आंत घुसलीं. त्यांच्यापैकीं एकाला त्यानें तेव्हांच ओळखलें. आदल्या दिवशीं विजयी मुष्टियोद्धा म्हणून विजयी होऊन ज्यानें बक्षिस मिळवलें होतें, तोच तो थोर्ड नांवाचा मल्ल. दोघेही मुष्टियुद्धाच्या तयारीनेंच आलेले आहेत असें त्यांचे कपडेच सांगत होते. बेनहरनें त्याला नांवानें हांक मारून आपण रोममध्यें तुमच्याजवळ ही विद्या शिकलों असें त्याला सांगितलें.

थोर्ड शपथ घेत म्हणाला, 'देवाशपथ मीं यहूदी मनुष्याला मल्लविद्या कधीं शिकवलीच नाहीं.'

'मी तुम्हांला ही गोष्ट सिद्ध करून देतों.'

'कशी?'

'तुम्ही येथें मला ठार मारण्यासाठीं आलां आहांत ना?'

'होय.'

'हा येथें तुमचाच शिष्य आहे; त्यानें एकट्यानें माझ्याबरोबर सामना करावा. म्हणजे मी त्याच्या शरीरावरच्या माऱ्यानें ती गोष्ट सिद्ध करून दाखवतों.'

तें ऐकून थोर्ड मोठ्यानें खो, खो हंसून म्हणाला, 'मी खूण करीपर्यंत थांब.' मग त्यानें एक कोच लाथेनें सरकावून त्या दोघांचा सामना नीट दिसेल अशा जागीं घेतला व तो त्यावर दाणकन् बसला, आणि मग त्यानें त्या दोघांना आरंभ करण्याविषयींची खूण केली. पण त्या मऊ कोचावर त्याला फार वेळ बसण्याचें सुख लाभलें नाहीं, कारण सांगावयास जितका वेळ लागत आहे त्यापेक्षां फारच कमी वेळांत त्या सामन्याचा शेवट झाला. बेनहरनें आपल्या प्रतिस्पर्ध्याला कानशिलावर असा कसून गुद्दा चढवला कीं तो तत्काळ बेशुद्ध होऊन त्याच्या पायांशीं दाणकन् पडला. तें पहातांच थोर्ड ताडकन् उठून उभा राहिला.

तो ओरडून म्हणाला, 'अरमिन देवाची शपथ हा माझाच डाव. ह्या डावावरच मीं कितीतरी मोहोरा मिळविल्या आहेत. तूं यहूदी नव्हेस. खरें सांग तूं कोण आहेस?'

८८९४

‘ माझें नांव एरियस. मी दर्यासारंग एरियसचा मुलगा.’

‘ थोर्डनें बेनहरच्याजवळ जाऊन त्याला चांगलें निरखून पाहिलें, तेव्हां त्याला संतोष झालेला दिसला.’

तो हंसत हंसत म्हणाला, ‘ येथें मला एक यहूदी सांपडेल, आणि तसल्या कुत्र्यांना मारणें हें देवतांना संतोषदायक असतें, असें त्यानें मला सांगितलें.’ मग त्यानें आपण होऊन बेनहरपुढें हात केला व दोघांचें हस्तांदोलन झालें. नंतर बेनहरनें विचारलें, ‘ हें तुला कोणीं सांगितलें ?’

‘ मेसलानें.’

‘ केव्हां सांगितलें ?’

‘ काल रात्रीं.’

‘ तो जखमी झाला होता असें मला वाटलें.’

‘ होय, आणि बिछान्यावर कण्हत पडला असतांच त्यानें हें मला सांगितलें.’

बेनहर विचारांत पडला. मेसला जखमी होऊन बिछान्यावर पडलेला असला तरी तो भयंकरच मनुष्य आहे व विशेष म्हणजे तो खुनशी आहे. आपल्या इष्ट योजनेंत अडथळा आणणें मेसलाला शक्य होतें. आपल्या शत्रूचा कांटा काढून टाकण्यासाठीं रोमींनें स्वीकारलेलाच मार्ग स्वीकारणें बरें आहे का ? मारेकऱ्याकडून मेसलालाच जगांतून नाहींसा करण्यास जरूर असलेलें द्रव्यबळ बेनहरजवळ भरपूर होतें. बेनहरच्या मनांत परस्परविरोधी विचारांचें तुंबळ युद्ध चालू असतांच त्याच्या पायांपाशीं पडलेल्या त्याच्या मारेकऱ्याच्या शरिराकडे त्याचें लक्ष गेलें. तो मारेकरी ह्याच्याच वयाचा असून या दोघांत साम्यही बरेंच होतें म्हटलें तरी चालेल. बेनहरच्या मनांत एक विलक्षण विचार आला. त्यानें थोर्डला विचारलें,

‘ मला ठार मारण्याबद्दल मेसला तुम्हांला काय देणार होता ?’

‘ सव्वालाख रुपये. ’

‘ तर मग मी सांगतों त्याप्रमाणें ऐकण्याचें तूं कबूल करीत असलास तर मी त्यांत आणखी तीन लाखांची भर घालण्यास तयार आहें. ’

थोर्ड मोठ्यानें विचार करीत म्हणाला, ‘ मीं काल मोठें बक्षीस मिळवलें. आतां तुम्ही इतकें भरीला घालीत असलां तर तुम्ही सांगाल तें मी करीन. फार काय सांगूं, तुम्हांला ठार करूं पाहणाऱ्या त्या रोमी अंमलदारालाही या पृथ्वीवरून नाहींसा करून टाकण्याची माझी तयारी आहे. ’

बेनहर म्हणाला, ‘ मी आपला तुला चार लाख देतों. शिवाय तुला कोणाचें रक्तही पाडण्याचें कारण नाहीं. येथें खालीं मरून पडलेल्या तुझ्या साथीदाराचा पोषाख मी आपल्या अंगावर घालतों व माझा पोषाख त्याच्या अंगावर चढवतों. मग हें प्रेत येथेंच टाकून आपण दोघे येथून निघून जाऊं. नंतर तूं मेसलाकडे जा व मेलेला तो मीच असें त्याला भासव व आपलें ठरलेलें बक्षीस त्याच्यापासून घे. ’

बेनहरचें वरील बोलणें ऐकून थोर्ड मनापासून हंसला. तो म्हणाला, ‘ चार लाख फक्त एका लबाडीची किंमत ! घातपाताचें नांव नाहीं. ठीक. एरियस, तुमचें बोलणें मला मान्य आहे. तुमचें येणें कधीं रोमला झालें तर थोर्ड ध नॉर्थमन याच्या द्राक्षारसाच्या दुकानामध्यें येण्यास विसरूं नका. मी तुम्हांला उत्तमपैकीं द्राक्षारस देईन. जरूर पडली तर मी बादशहाच्या येथून उसना मागून आणीन पण तुमची सरबराई करीन. ’

पोषाखांची अदलाबदल झाल्यावर थोर्डनें आंतून दारावर खुणेचे ठोके मारतांच तें उघडलें व ते दोघे बाहेर पडले. रात्र पडल्यानंतर कोणा जासुदाच्या हातीं चार लाखांचीं नाणीं बेनहरनें थोर्डच्या बिऱ्हाडीं पाठवावीं असें दोघांमध्यें ठरलें. त्या रात्रीं सायमनीडसच्या घरीं बेनहरनें इडरनीज वाड्यांत घडलेला सगळा प्रकार त्याला सांगितला. मग, पूर्वींच्या योजनेप्रमाणें बेनहरनें वाळवंटी प्रदेशांत शेख इल्डरीमकडे जाऊन रहावें असा त्यांचा बेत ठरला. थोडे दिवस जाऊं दिल्यावर सायमनीडसनें एरियसच्या मुलाचा शोध

सुरू करावा व तें प्रकरण थेट कॉन्सलकडे न्यावें. त्या चौकशींत खरें कारस्थान उघडकीस न आलें तर अशी खात्री वाळगण्यास हरकत नाहीं कीं बेनहर मेला असें समजून मेसला व ग्राटस निश्चिंत रहातील. अर्थात् मग बेनहरला यरूशलेममध्यें आपल्या आईचा व बहिणीचा शोध करण्यास ठीक पडेल.

तरुण बेनहर शहराजवळची नदी उतरून पलीकडे ठरलेल्या ठिकाणीं गेला. तेथें अरब वाटाड्या घोडे घेऊन तयार होता. त्यानें बेनहरकडे एक घोडा नेऊन म्हटलें, 'हा घोडा आपला आहे.' तो घोडा पहातांच बेनहर थक्क झाला, कारण शर्यतींत ज्या चौकडीनें विजय मिळवला होता त्या चौकडींतील सर्वांत चलाख जो अल्डेबॅनर नामक घोडा, तोच हा होता. शेखच्या खऱ्या प्रेमाचें दर्शक अशीच ती देणगी होती.

◆ ◆ ◆

## प्रकरण १३ वें
## शोधाची बातमी

मागील प्रकरणांतील घटना घडून आल्यावर एक महिना लोटला. यरूशलेमांत मोठी गडबड उडालेली दिसत होती, कारण सुभेदारांच्या बदलीचें वर्तमान येऊन पोहोंचलें होतें. सुभेदार व्हॅलिरिअस ग्राटस यांच्या जागीं पंत पिलात नांवाचे सुभेदार येणार अशी ती बातमी होती. गेल्या शर्यतींत रोमींपासून जिंकलेल्या पैशांतून पंचवीस हजारांची रक्कम सायमनीडसनें रोमचा मुख्य प्रधान सेजानस याला चारून ही ग्राटसची उचलबांगडी करण्याचें कारस्थान केलें होतें. यरूशलेमांत आपल्या आईबहिणीचा शोध लावीत असतां बेनहरला धोका पोहोंचण्याचें भय राहूं नये असा यांतील हेतु होता.

नवीन सुभेदार येऊन फार दिवस लोटले नाहींत तोंच एक सुभेदार जाऊन दुसरा आल्यानें त्यांच्या परिस्थितींत काडीमात्र फरक झाला नाहीं, हें यहूदी लोकांना समजून चुकलें. हा नवीन सुभेदार ग्राटसपेक्षां तिळ-

मात्र कमी नव्हता. हा अति गर्विष्ठ असून यहूदी लोकांच्या भावना पायाखालीं तुडवण्यास किंचित्‌ही मागेंपुढें पहात नसे. तथापि त्यानें एक चांगलें कार्य मात्र केलें. यहूदा प्रांतांतील सर्व तुरुंगांची कसून पहाणी करून त्यांतील सर्व कैद्यांच्या हकिकतीचें दप्तर नवें केलें जावें असा हुकूम त्यानें सोडला.

तुरुंगाच्या तपासणीचें काम जारीनें चालू झालें. यरूशलेमांतील प्रख्यात मंदिराच्या आवाराजवळच एक गढीसारखा मोठा बुरूज बांधलेला होता. येथें यरूशलेमासाठीं ठेवलेल्या रोमी शिबंदीचें मुख्य ठाणें होतें. येथेंच शिबंदीच्या रोमी सैनिकांची छावणी होती. ह्या गढीवरील तुरुंगाचा मुख्य अधिकारी गेसियस नांवाचा होता. तो एक दिवस गढीवरील पहारेकऱ्यांच्या अंमलदाराकडे घाबऱ्या घाबऱ्या आला.

तो अंमलदाराला म्हणाला, ‘आठ वर्षांपूर्वी व्हॅलिरिअस ग्राटस यांनीं मला ह्या गढीवरील तुरुंगावर मुख्य अधिकारी नेमलें. यरूशलेममध्यें मोठा दंगा झाल्याच्या दुसऱ्याच दिवसाची ही गोष्ट आहे. ह्या दिवशींच्या दंगलींत खुद्द सुभेदार ग्राटस यांनाच रस्त्याजवळच्या घरावरून एक कौल खालीं रस्त्यांत पडून डोक्याला जखम झाली होती. या तुरुंगांतिल सर्व खोल्यांचा नकाशा ग्राटस यांनीं मला दिला. यांतील अगदीं तळमजल्याचा नकाशा आहे हा.’ तसें म्हणून त्यानें अंमलदारापुढें असलेल्या मेजावर नकाशा उलगडला.

तो अधिकारीच पुढें म्हणाला, ‘ग्राटस यांनीं या मजल्यावरील पांच नंबरची खोली मुद्दाम दाखवली आणि अशी सक्त ताकीद मला दिली कीं, “ती खोली कांहीं झालें तरी कधींही उघडावयाची नाहीं.” भिंतीला असलेल्या एका भोंसक्यांतून आंत असलेल्या तिघां कैद्यांना अन्नपाणी द्यावयाचें. तेव्हां मीं विचारलें, “हे कैदी मेल्यास काय करावयाचें?” तेव्हां सुभेदारांनीं म्हटलें, “ही खोली हेंच त्यांचें थडगें. त्यांना तेथें मारण्यासाठीं कोंडण्यांत आलें आहे. तीं फारच भयंकर माणसें आहेत. असलीं माणसें एखादें सरकारी रहस्य माहीत करून घेतात व मग त्याचें असें फळ त्यांना भोगावें

लागतें." मग माझ्याकडे करड्या नजरेनें पहात सुभेदार म्हणाले, "आणि कधींकधीं फाजील जिज्ञासा गुन्ह्याहून भयंकर ठरते. हीं तिन्हीं कैदी माणसें आंधळीं, मुकीं (जीभ नसलेलीं), आहेत व ती खोली महारोगानें दूषित झालेली आहे. त्यांचें तेथें मरण ठरून चुकलेलें आहे." अंमलदारसाहेब, आतां आपणच सांगा कीं, हा नकाशा बरोबर आहे असें धरून मी चाललों हें योग्य होतें कीं नाहीं, सांगा?'

अंमलदार म्हणाला, 'योग्य होतें हें कोणीही सांगेल.'

अधिकारी म्हणाला, 'पण तो नकाशा चूक आहे.' तसें म्हणून त्यानें तेथल्या तेथें कागदावर दुसरा नकाशा काढून दाखवला आणि म्हटलें, 'हा त्या मजल्याचा खरा नकाशा आहे.'

तो अंमलदार म्हणाला, 'असें काय? आतां आलें माझ्या ध्यानांत. आतां तो नकाशा मी दुरुस्त करण्याची तजवीज करीन.'

पण गेसियसचें समाधान झालें नाहीं. तो पुढें म्हणाला, 'आतां ह्या पांच नंबरच्या खोलींत तीन कैदी आहेत असें मला सांगण्यांत आलें होतें. आणि म्हणून गेलीं आठ वर्षें सतत त्या भिंतीच्या भोंसक्यां-तून त्यांना अन्नपाणी आंत सोडण्यांत येत आहे. पण तें देखील मुळींच खरें नव्हतें.'

तेव्हां तो अंमलदार त्या अधिकाऱ्याला कांहींसें करड्या स्वरानें म्हणाला, 'तूं काय बोलत आहेस हें लक्षांत आण. व्हॅलिरिअस ग्राटस यांनीं लबाडी केल्याचें तूं स्पष्ट विधान करीत आहेस.'

पण त्या अधिकाऱ्यानें त्या बोलण्याकडे लक्ष न दिल्यासारखेंच करून तो पुढें म्हणाला, '"कसाही प्रसंग ओढवला तरी त्या खोलीचें दार उघडावयाचें नाहीं," अशी मला सुभेदारांची सक्त आज्ञा होती, पण काल आपल्या हुकुमानुसार जेव्हां तें दार उघडलें गेलें तेव्हां आंत मला फक्त एकच कैदी सांपडला. तो आंधळा, म्हातारा, मुका (जीभ नसलेला) आणि वस्त्रहीन, असा आहे. त्याच्या केंसांच्या जटा होऊन त्या त्याच्या कमरे-पर्यंत पोहोंचत आहेत. त्याची कातडी जनावराच्या चामड्यासारखी व नखें

वळून पक्षांच्या पंजांसारखीं बनलीं आहेत. तुझे सोबती कोठें आहेत असा प्रश्न त्याला मीं केला, तेव्हां त्यानें नकारार्थी मान हालवली. ती खोली बारकाईनें शोधून पाहिली पण तींत लहानसहान देखील हाडूक सांपडलें नाहीं, म्हणून मी म्हणतों, त्या खोलींत एकच कैदी होता.'

'पण, गेलीं आठ वर्षें तीन माणसांचें अन्न पुरवलें जात होतें त्याचें कसें काय ?'

अधिकारी म्हणाला, 'त्या बाबीशीं मी येतोंच आहें. मीं त्या कैद्याला आंघोळ घालून स्वच्छ करवलें व नवीन वस्त्र देऊन त्याला सोडून दिलें. पण तो आज पुन्हा परत आला व खुणाद्वारें असें आग्रह करून दर्शवूं लागला कीं, त्याला पुन्हा त्या तुरुंगाच्या खोलींत नेण्यांत यावें. मग मीही त्याच्याबरोबर त्या खोलींत गेलों. त्यानें मला अंधार असलेल्या एका कोपऱ्यांत नेलें. तेथें भिंतीला असलेलें एक भोंक त्यानें मला दाखवलें. माझ्या तपासणींत तें माझ्या नजरेंतून निसटलें होतें. त्यानें त्या भोंकांतून तोंड घालून जनावरासारखा कांहीं आवाज काढला. थोडें हलकें पण त्याच्या आवाजाला उत्तर आलें. मीं तत्काळ त्या मनुष्याला त्या भोंका-पासून ओढून बाजूला केलें व भोंकाशीं तोंड नेऊन मोठ्यानें ओरडून विचा-रलें, "कोण आहे बाहेर ?" यावर उत्तर आलें, "हे परमेश्वरा, तुझी अनंत-काल स्तुति असो." अंमलदारसाहेब, उत्तराचा आवाज स्त्रीचा होता. तेव्हां मीं विचारलें, "कोण आहेस तूं ?" उत्तर आलें, "मी एक इस्राएली स्त्री, माझ्या मुलीसह येथें कबरेंत जिवंत पुरल्यासारखी आहें. झटपट् कांहीं साह्य होईल तरच आम्हां दोघींचा प्राण वांचेल नाहींतर आम्ही मरूं." मीं त्यांना धीर दिला व हा असाच तुमच्याकडे धांवत आलों आहें.'

तें ऐकतांच त्या अंमलदाराचा चेहेरा कावराबावरा झाला. तरी तो त्या अधिकाऱ्याला म्हणाला, 'तूं केलेंस तें योग्य आहे. ग्राटसपेक्षां अधिक किंमतीचे रोमी अजून जगांत आहेत. चल, चपळाई कर. आपण त्या स्त्रियांना हवी ती मदत करूं व त्यांचा प्राण वांचवूं.'

त्या बंद करून टाकलेल्या खोलीची भिंत पाडण्यासाठीं हत्यारेंपात्यारें घेऊन ही जोडी तडक तुरुंगांत गेली.

◆ ◆ ◆

## प्रकरण १४ वें

# तुरुंगांतून मुक्तता

गेल्या प्रकरणाच्या शेवटीं वाचकांच्या तोंडून, ' शेवटीं, लागला शोध बेनहरच्या आईबहिणीचा ! ' असे उद्गार बाहेर पडले असतील. होय, त्या तुरुंगांतून बाहेर काढण्यांत आलेल्या स्त्रिया, बेनहरची आई व बहीण ह्याच होत्या. आज आठ वर्षे गढीच्या या भागांत खरोखरच खंदकांत खोदून तयार केलेल्या ह्या तुरुंगाच्या तळमजल्यावरील खोलींत—कबरेंत—या दोघी-जणी जिवंत पुरून ठेवल्या गेल्या होत्या. या खोलींत हवा येण्यासाठीं एक लहानसें भोंक ठेवलेलें होतें. ह्यांतून थोडासा प्रकाश आंत येई, तथापि खोलींत बहुतेक सगळा अंधारच असे. या दोघींना बाहेर काढलें गेलें तेव्हां त्यांची अवस्था कशी झालेली असेल हें वाचकांनीं पांच नंबरच्या खोलींत सांपडलेल्या म्हाताऱ्या आंधळ्या कैद्याच्या स्थितीवरून समजून घ्यावें. ह्यानेंच सतत आठ वर्षें ह्यांच्या खोलींत रोज येणारें अन्नपाणी त्या लहानशा भोंकांतून त्या मायलेकींना पुरवलें होतें.

एके काळीं सुखांत लोळत असलेल्या या दोन सुशिक्षित व सुस्वरूप स्त्रियांना तशा ठिकाणीं सतत आठ वर्षें किती भयंकर शारीरिक व मानसिक यातना झाल्या असतील त्यांचें वर्णन आमची लेखणी कशी करूं शकणार ? तिर्झाच्या तेरा वर्षांत आठ मिळविलीं म्हणजे वास्तविक ती पूर्ण उमलून फूल बनलेल्या कळीसारखी सौंदर्यसंपन्न असावयाची, पण तिच्या केसांच्या जटा वळल्या गेल्या असून तिच्या आईच्यासारखेच ते पांढरे होऊन गेलेले होते. जिवंत रहाण्याची त्यांची इच्छा अत्यंत तीव्र स्वरूपाची होती म्हणूनच त्या दोघी आजला जिवंत राहिल्या, नाहींतर यापूर्वी केव्हांच त्यांचा प्राण तशा असह्य स्थितींत निघून गेला असता. त्या दोघींनीं प्रथम कितीतरी दिवस बेनहरची आठवण काढून त्याच्याचविषयीं

चर्चा केली, आणि आज ना उद्यां, पण केव्हांतरी, तो त्यांचा शोध लावून त्यांची मुक्तता करील अशी उत्कट व दृढ आशा त्या दोघींना होती. हीच आशा त्यांच्या प्राणाला मुख्य आधार झाली होती.

त्या म्हणत, 'जोंपर्यंत त्याच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत तो आमची आठवण केल्याशिवाय रहाणारच नाहीं.' तो मेला असेल अशी कल्पनाच त्यांना करवेना.

पण एक दिवस असा उजाडला कीं, त्या दिवशीं त्यांना अन्नपाणी देऊन त्यांची सेवा करणारा तो कैदी पांच नंबरच्या खोलींत नव्हता. त्याला सोडून देण्यांत आलें होतें, म्हणून अर्थातच आज त्यांना भूक आणि तहान ह्यांचें दुःख भरींत भर असें झालें. तिर्झा आईच्या अंगावर टेकून बसली होती. तहानेनें तिचा जीव व्याकूळ झाल्यामुळें थेंबभर पाण्यासाठीं ती काकुळतीनें गयांवयां करीत होती.

तिची आई तिला म्हणाली, 'बाळ तिर्झा, शांत रहा. परमेश्वर दयाळू आहे. कोणी ना कोणी तरी येईल. आपण आपला विश्वास ढळूं देतां कामा नये.' मग आपण स्वप्नांत यहूदाला पाहिलें असें तिनें मुलीला सांगितलें.

तिर्झानें विचारलें, 'आई, त्यानें आपल्याला पाहिलें तर तो ओळखील तरी का? किती भयंकर फरक झाला आहे आपणां दोघींमध्यें.'

तितक्यांत त्यांनीं प्रथम ओळखीच्या कैद्याचा आवाज ऐकला व मागून अधिकाऱ्यांचा, 'कोण आहे बाहेर?' असा प्रश्न त्यांना ऐकूं आला.

तेव्हां, 'सदां सर्वदां परमेश्वराचा धन्यवाद असो,' असे उद्गार त्या आईच्या तोंडून निघाले व त्या दोघी मायलेंकी हुंदके देऊं लागल्या.

'आशा धरा. मी थोड्याच वेळांत येतों,' असा आवाज त्या दोघींनीं ऐकला.

नंतर लवकरच त्यांना मनुष्यांच्या बोलण्याचा आवाज आज इतक्या दिवसांनीं ऐकूं आला म्हणून तो फारच गोड वाटला. भिंतींत बुजवून

टाकलेला दरवाजा, भिंत पाडून मोकळा करण्याचें काम बाहेर चालू झाल्यामुळें त्यांना काम करणाऱ्या लोकांच्या बोलण्याचा आवाज ऐकूं गेला. मग भोंकांतून मशालींचा उजेड प्रथम दिसला. मोठें भगदाड पडल्यावर अंमलदाराला आंत जाण्यास रस्ता मिळावा म्हणून कामकरी माणसें बाजूला झालीं. तो अंमलदार आंत पाऊल टाकून एकदम थबकला, कारण त्या दोघी लाजेनें अधिक लांब जाऊन लपल्या. कारण त्यांच्या अंगावर वस्त्र नव्हतें, हें एक कारण. पण याशिवाय त्या दोघी लांब जाऊन उभ्या रहाण्याचें आणखी दुसरें एक कारण होतें. नियमशास्त्राविषयीं पूज्यभाव व कडकडीत धर्मनिष्ठा हीं त्या इस्राएली वृद्ध स्त्रीच्या रक्तांतच भिनलेलीं असल्यामुळें ती लांबूनच मोठ्यानें म्हणाली, 'अशुद्ध! अशुद्ध!! आमच्याजवळ येऊं नका. आम्हांला महारोग झालेला आहे.'

ते शब्द ओरडून बोलतांना त्या साध्वीच्या अंतःकरणाला केवढा पीळ पडला असेल याची खरी कल्पना होण्यास वाचकांना, या रोगासंबंधीं यहूदी लोकांनीं केलेल्या भयंकर नियमांची माहिती अवश्य लागेल. यहूदी लोकांच्या पवित्र नियमशास्त्राप्रमाणें ज्याला महारोग झाला असेल तो मनुष्य मेल्यासारखाच मानण्यांत यावयाचा. यापुढें तो केवळ परमेश्वराच्या क्रोधाचें चिन्ह असाच सगळ्या समाजाच्या नजरेपुढें असावयाचा. तशा मनुष्याला गांवांतून हांकून देण्यांत यावयाचें. त्याला आश्रयाची जागा म्हणजे एक तर कबरस्थानांतील थडग्यांत किंवा अरण्यांत कोठें तरी मनुष्यवस्तीपासून दूर; आणि प्रसंगीं त्यांच्याजवळ कोणी येऊं लागलें असें आढळतांच महारोगी मनुष्यानें, 'अशुद्ध ! अशुद्ध ! !' असें ओरडून, येणाऱ्या मनुष्याला पुढें न येण्याची सूचना केली पाहिजे.

त्या दोघींना आपली कैदखान्यांतून सुटका झाली म्हणून प्रथमदर्शनीच जो अत्यानंद झाला होता. तो स्वतःच्या महारोगाची अवस्था व नियमशास्त्राची आज्ञा या दोन गोष्टींचें स्मरण होतांच पार मावळला व म्हणून तशी आरोळी मारतांना त्या वृद्ध स्त्रीला प्राणांतिक वेदना झाल्या असल्यास नवल काय ? आतां त्यांना त्यांचा आवडता जुना वाडा लांबून दिसला तरी

त्यांत पाऊल टाकणें शक्य नव्हतें. रात्रंदिवस ज्या बेनहरविषयीं त्या दोघींचें नेहमीं संभाषण चाले, तो आज पुढें होऊन, 'आई, आई, ताई, ताई,' म्हणून मिठी मारण्यासाठीं पुढें धांवत आला तर, 'अशुद्ध ! अशुद्ध ! !' अशी आरोळी मारून त्याला तेथेंच थांबवावें लागेल, या विचारानेंच आईच्या हृदयाला विंचू डसल्याप्रमाणें वेदना झाल्या.

अंमलदारानें त्यांचीं नांवें व त्यांची सगळी हकिकत लिहून घेतली व तो तेथून निघून गेला. थोड्याच वेळानें एक गुलाम तेथें आला व त्यानें त्यांच्यापुढें अन्नपाणी, हात पुसण्यासाठीं टुवाल, व त्यांना घालण्यासाठीं कपडे, हीं ठेवलीं व तो निघून गेला. मग त्या दोघींनीं अंगावर वस्त्रें घातल्यावर त्यांना गढींतून बाहेर काढून यरूशलेमच्या रस्त्यावर सोडून देण्यांत आलें.

◆ ◆ ◆

## प्रकरण १५ वें

## आईबहिणीला बेनहरचें दर्शन

भिंत घालून बुजवून टाकलेल्या तुरुंगांतील एका खोलीचा लागलेला शोध व तेथील सर्व प्रकार यांविषयींचा आपला अहवाल गेसियस सांगत होता, त्याच वेळीं एक प्रवासानें थकून भागून गेलेला प्रवासी जैतूनांच्या डोंगराची कड्यासारखी चढण चढून वर आला व जेव्हां तेथून खालच्या पवित्र यरूशलेम शहराचा सुंदर, भव्य देखावा त्याच्या दृष्टीस पडला तेव्हां त्याच्या अंतःकरणांत परस्परविरोधी भावनांची भयंकर खळबळ उडाली. रोम शहर त्याच्या अगदीं चांगलें परिचयाचें झालेलें होतें. त्या रोमचें रमणीय सौंदर्य व अफाट वैभव यांची त्याच्या मनावर पडलेली छाप कमी होणें शक्य नव्हतें तरी त्याला यरूशलेम तिळमात्र कमी वाटलें नाहीं. त्याच्या मुसक्या बांधून त्याला फरफरां ओढीत नेल्या दिवसापासून आठ वर्षांचा काळ लोटल्यावर आज प्रथमच त्याचें जन्मस्थान, त्याच्या वाडवडिलांचें पुरातन शहर त्याच्या दृष्टीस पडलें होतें. हा प्रवाशी बेनहर होता. शिवाय या

पुरातन वैभवसंपन्न नगरीच्या मानेवर परकीय जुलमी सत्तेचें जूं पडल्यामुळें तिच्यावर आलेली अवकळा त्याला दिसत होती.

वाळवंटी प्रदेशांत शेख इल्डरीमबरोबर भावी राजा प्रगट होतांच जी राज्यक्रांति निश्चित होती, तिची पूर्व तयारी म्हणून संरक्षणासाठीं कोट-किल्ले, व माऱ्याच्या जागा, वगैरे तजवीज करण्यांत अविश्रांत श्रम करीत असलेल्या तरुण बेनहरकडे एक दिवस निरोप घेऊन जासूद आला. यरूशलेमांत ग्राटस सुभेदाराच्या जागीं पिलात नांवाचा नवीन सुभेदार रोमहून पाठवण्यांत आला आहे, मेसला जन्माचा अधू बनला असून त्याची समजूत बेनहर मेला अशीच आहे, वगैरे वर्तमान जासुदाकडून समजलें. तर आतां आपल्या आईबहिणीचा शोध लावण्यास त्यानें विलंब कां लावावा? त्या दोघींचा शोध लावून त्यांची सुटका करून त्यांना पुन्हा सुस्थितींत ठेवल्यावर मग येणाऱ्या राजासाठीं तयारी करण्यास तो पूर्णपणें मोकळा होण्यासारखा होता. बेनहरनें याप्रमाणें सर्व विचार केल्यावर शेखची रजा घेऊन तो यरूशलेमच्या मार्गाला लागला, आणि यरीहोस पोहोंचल्यावर, आपले अरब वाटाडचे तेथेंच घोडचांजवळ ठेवून, तो एकटाच पायीं यरूशलेमास यावयास निघाला होता.

मलखनें यरूशलेमांत त्याची भेट घ्यावी असें ठरलें होतें.

मागें रोमींनीं जेव्हां हर कुटुंबाची मालमिळकत विकण्यास काढली तेव्हां त्या मिळकतीच्या वारसाला ज्या अघोर रीतीनें नाहींसें करण्यांत आलें त्यासंबंधींची बातमी लोकांत पसरल्यामुळें त्या मिळकतीला गिऱ्हाईकच कोणी मिळालें नाहीं, हें सायमनीडसकडून बेनहरला समजलें होतें. आणि रोमी लोक हर वाडा बंद करण्याच्या बेतांत असतां जी एकनिष्ठ मिसरी दासी अमरा आंत घुसली होती तीच, अद्यापि, सायमनीडसनें तिला गुप्तपणें आधार दिल्यामुळें, त्या वाडचाची व्यवस्था पहात होती. पण बाहेरून शिक्कामोर्तब असलेल्या वाडचांत मधून मधून अमरा दृष्टीस पडूं लागल्यामुळें त्या वाडचांत भुताटकीचे खेळ होतात अशी लोकांची सम-

जूत झाली होती. तिच्यापासून आपणांस कांहींतरी बातमी कळेल, निदान त्या आपल्या म्हाताऱ्या दायीला भेटून व स्वतःचा आपला वाडा पुन्हा पाहूनही कांहीं कमी आनंद वाटणार नाहीं, अशा समजुतीनें तिला भेटण्याचा बेनहरनें बेत केला. लोकांचें लक्ष आपल्याकडे जाऊं नये म्हणून अगदीं दिवस मावळल्यावर मेंढरांचा कळप यरूशलेम शहरांत हांकून नेत असलेल्या मेंढक्याच्या जोडीनें तो शहरांत गेला

तो त्या अजिंक्य, भव्य, ऍंटोनिया गढीच्या जवळून गेला. त्या वेळीं त्या गढीची शहरावर जी सत्ता गाजे तिचा विचार त्याच्या मनांत येऊन त्याला दुःख वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. शेवटीं तो आपल्या वडिलोपार्जित वाड्यापाशीं येऊन पोहोंचला. उत्तरेकडील दरवाजावर बादशाही शिक्कामोर्तब कायम होतें व 'हा बादशाही मालमत्ता आहे,' अशी पाटीही लावलेली होती ती बेनहरच्या दृष्टीस पडली. हा दरवाजा गेलीं आठ वर्षें सारखा बंदच होता, म्हणून तो दक्षिणेकडील दरवाजापाशीं गेला, पण तेथेंही तशीच पाटी. त्यानें ती पाटी उखडून काढली व तेथल्या एका खड्ड्यांत फेंकून दिली आणि म्हणाला, 'ही त्यांची लबाडी आहे; हें घर माझें आहे.' मग तो पुन्हा उत्तरेकडील दरवाजापाशीं आला व त्यानें एक दगड घेऊन दरवाजावर पुष्कळदां जोराजोरानें ठोकलें पण उत्तराचा आवाज आला नाहीं; तें ठोकणें ऐकून अमरा तरी वाड्याच्या गच्चीवर दिसेल अशी त्याची अपेक्षा होती, परंतु ती पूर्ण झाली नाहीं. तो दरवाजाजवळच्या पायऱ्यांवर बसला, व किंचित् विसांवा घेण्यासाठीं म्हणून त्यानें जमिनीला पाठ लावली. तो प्रवासाच्या श्रमानें अगदीं गळून गेल्यामुळें त्याला तत्काळ गाढ झोंप लागली.

थोड्याच वेळांत गढीच्या बाजूनें दोन स्त्रिया इकडे आल्या. त्या एकएक पाऊल जपून टाकीत, थबकत व कानोसा घेत घेत चालल्या होत्या. हर वाड्यापाशीं येतांच एक दुसरीच्या अंगावर टेंकून हळूहळू हुंदके देऊं लागली.

त्या दोघींपैकीं वडील स्त्री म्हणाली, 'तिर्झा, आपण त्वरा केली पाहिजे.

उद्यां नागरिक आपणांस नगराबाहेर हांकून लावतील व मग पुन्हा कदापि इकडे पाऊल टाकतां येणार नाहीं, '

तिर्झा मटकन् खालीं बसली. मग क्षणभरानें म्हणाली, 'आठवणच रहात नाहीं मला. आई, आपण आपल्या घरीं चाललों आहों असें मला वाटलें पण आतां कोठलें आलें आहे घर नि दार! आपण दोघी मेलेल्यांत जमा झालेल्या आहोंत. '

त्या रांगत दरवाजापाशीं आल्या तेव्हां त्यांना तेथें लावलेली पाटी दिसली. 'ही बादशाही मालमत्ता आहे, ' असे तिच्यावरील शब्द वाचून ती वृद्ध बाई, दीर्घ उसासा टाकून कण्हत म्हणाली, 'त्यांनीं बाळाचें सर्वच लुबाडून घेतलें. तो गरीब बाळ मरणच पावला असावा. तो आपणांला साह्य करूं शकणार नाहीं. '

'मग आई, आतां कसें?'

'उद्यां आपल्याला रस्त्याच्या बाजूला जागा शोधून काढून जसे इतर महारोगी भीक मागतात त्यांप्रमाणें आपल्यालाही करणें भाग आहे. '

'आई, त्यापेक्षां आपण मेलेलें बरें. '

आई निश्चयी स्वरानें म्हणाली, 'तसें अगदीं बोलूं नको. परमेश्वरानें आपलें भवितव्य ठरवून ठेवलेलें आहे, आणि आपण तर त्याच्यावर अढळ श्रद्धा ठेवणारीं माणसें आहों. अशा ह्या स्थितींतही आपण त्याच्यावरच विसंबून राहूं. चल आतां येथून जाऊं या. '

त्या तेथून अगदीं चोरपावलांनीं चालत चालत त्या रस्त्याच्या कोंपऱ्यापाशीं आल्या. ह्या भागांत पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें. त्या प्रकाशांत या दोघींची हृदयविदारक स्थिति स्पष्ट दिसत होती. गाल बसलेले, ओंठ काळे पडलेले, डोळे खोल गेलेले, केंस पांढरे होऊन त्यांच्या बटा वळलेल्या, हात फुटलेले, अशी भयंकर त्यांची अवस्था झालेली दिसत होती. त्या दोघींत आई कोणती व मुलगी कोणती हें ओळखून काढणें अशक्यच होतें. त्या दोघींही खप्पड झालेल्या म्हाताऱ्या दिसत होत्या.

दरवाजाच्या पायऱ्यांवर मनुष्य पाहून त्या झटकन् रस्त्यापलीकडील छायेंत गेल्या. तेथून त्यांनीं वळून पाहिलें तों तो मनुष्य निजलेला आहे असें त्यांना दिसलें, म्हणून आई म्हणाली, ' तिर्झा, थोडा वेळ तूं येथें थांब, मी दरवाजा उघडतो का तें पहातें. '

ती रस्ता ओलांडून पुन्हा चोरट्या पावलांनीं दरवाजापाशीं येते तोंच पायऱ्यांवर निजलेला मनुष्य रस्त्याच्या बाजूला वळला तेव्हां त्याचें तोंड चंद्रप्रकाशांत स्पष्ट दिसूं लागलें. तत्काळ त्या माउलीनें एकदां खालीं वांकून त्या चेहेऱ्याकडे पाहिलें व लगेच वर डोळे करून मनांतल्या मनांत परमेश्वराला धन्यवाद दिला. झटकन् ती रस्त्याच्या पलीकडे तिर्झाकडे गेली. तिनें तिर्झाच्या कानांत हळूच गंभीरपणें म्हटलें, ' तिर्झा, तिर्झा, धन्य तो जिवंत परमेश्वर ! तो झोंप लागलेला तरुण मनुष्य माझा बाळ, तुझा भाऊच आहे. '

' कोण ? माझा भाऊ ? यहूदा ? '

' चल, पुन्हा एकदां त्याचें तोंड आपण दोघीजणी पाहून घेऊं. फक्त आणखी एकदांच आणि मग परमेश्वरा, तूं आपल्या ह्या दासींना साह्य कर. '

त्या दोघी हातांत हात घालून रस्त्याच्या पलीकडे गेल्या. तिऱ्हाइताला तीं दोन भुतेंच वाटलीं असतीं. जेव्हां त्यांची सावली त्या तरुणावर पडली तेव्हां त्या थांबल्या. त्या निजलेल्या तरुणाचा एक हात पायरीवर पडलेला होता. तिर्झानें तो उचलून त्याचा मुका घेतलाच असता.

पण आईनें तिच्या कानांत हळूच म्हटलें, ' तुझा प्राण जात असला तरी तसें करूं नको. आपण अशुद्ध आहों ! '

बेनहर रूपवान् होता. अर्थात् त्याच्या आईला तो सौंदर्याचा नुसता पुतळाच भासला. त्याला मागच्याप्रमाणें घट्ट पोटाशीं धरून कवटाळण्याची तीव्र इच्छा त्या मातेच्या अंतःकरणास ओढ लावूं लागली. पण तिची मुलावरील प्रीति जितकी कोमल तितकीच करडी होती. प्राण गेला

असता तरी देखील महारोगानें ग्रस्त झालेल्या ओठांचा स्पर्श त्याच्या गालाला त्या माउलीनें केला नसता. पण एकदां नुसता शेवटचा त्याच्या शरीराला क्षणभर स्पर्श करण्याची तिची इच्छा अनिवार झाली व ती गोष्ट करावयाची तर याच क्षणीं केली पाहिजे हेंही तिच्या लक्षांत आलें. ती रांगत रांगत त्याच्या पायांपाशीं गेली व धुळीनें भरलेल्या त्याच्या पायांतील वहाणांच्या तळाचे तिनें अनेकदां मुके घेतले.

तो झोपेंत पुन्हा या कुशीचा त्या कुशीला वळला व पुटपुटला.

'आई ! अमरा, माझी आई कोठें आहे ?' ते भावाच्या तोंडचे शब्द ऐकतांच तिर्घी त्याच्याकडे टक लावून पाहूं लागली. आईनें तर आपला हुंदका बाहेर फुटूं नये म्हणून रस्त्यावरील धुळींत तोंड खुपसलें ! तो तिला विसरला नव्हता. मग त्या दोघी स्त्रिया तेथून पुन्हा रस्ता ओलांडून पलीकडे गेल्या व तेथें गुडघे टेकून, पुढें काय होतें तें पहात बसल्या.

लवकरच तेथें एक ठेंगणी, काळीकुट्ट, पोंक आलेली, व मोलकरणीचा पोषाख केलेली, अशी स्त्री हळूहळू आली. तेथें पायऱ्यांवर कोणी निजलेलें आहे असें पाहून ती हलक्या पावलांनीं त्याला वळसा घालून दारापाशीं गेली. तिनें दाराचें कुलूप काढून आंत हात घालून दाराची एक फळी आवाज न करूं देतां उघडली. बरोबर आणलेली सामानाची टोपली तिनें आंत ठेवली व स्वतः आंत जाण्यापूर्वी पायऱ्यांवर निजलेल्या अनोळखी मनुष्याच्या चेहेऱ्याकडे न्याहाळून पहाण्याची जिज्ञासा तिला झाली व म्हणून ती परतली. रस्त्यापलीकडे त्या दोघी स्त्रिया हा प्रकार लक्षपूर्वक पहात होत्या. तितक्यांत त्यांच्या कानीं एक आश्चर्याची आरोळी आली ! मग त्या तिकडे पहातात तों, त्या मोलकरणीनें निजलेल्या मनुष्याचा पायरीवर पडलेला हात उचलला व त्याचे मटामट मुके घेतले. ज्या सुखासाठीं त्या दोघी मायलेंकी अधीर झालेल्या होत्या पण जें घेण्याचें धाडस त्यांच्यानें होण्यासारखें नव्हतें तें सुख त्या मोलकरणीला मिळत होतें !

त्या म्हातारीच्या मुके घेण्यानें बेनहरची झोंप मोडली व तो जागा झाला. तिनें रडतरडतच त्याला कंवटाळलें तेव्हां तिला ओळखून तो म्हणाला, 'अमरा, माझी अमराच आहेस का तूं ?' रस्त्याच्या पलीकडे त्या दोघींना हें इकडलें बोलणें ऐकूं जात होतें. त्यानें विचारलें, 'अमरा, आई आणि तिझी यांच्याविषयीं कांहीं बातमी सांग आधीं मला. सांग ना, त्या दोघी घरीं आहेत म्हणून; का त्या कोठें आहेत हें तुला कांहींच ठाऊक नाहीं ?' अमरानें रडतरडतच नकारार्थी मान हालवली.

मग तो तिला म्हणाला, 'चल, अमरा, तूं वाड्यांत जात होतीस ना ? चल, मी पण येतों तुझ्याबरोबर आंत.' तीं दोघें लागलींच आंत गेलीं व दरवाजा लागला. त्या दोघी मायलेंकी बंद झालेल्या दरवाजाकडे टक लावून पाहूं लागल्या. यापुढें त्या दरवाजाच्या आंत त्यांचें पाऊल पडणें शक्य नव्हतें. सकाळीं अधिकाऱ्यांनीं त्या दोघींना पहातांच त्यांना नगराबाहेर हुसकावून लावलें.

'तो गेला; तुम्ही मेलेल्यांत जमा झालां. आतां त्यांच्यामध्येंच जाऊन रहा,' असे अधिकाऱ्याचे उद्गार त्यांनीं ऐकले.

◆ ◆ ◆

## प्रकरण १६ वें

## क्रांतीची तयारी

बेनहर गेल्यापासून आजपर्यंत इतकीं वर्षें अमरानें त्याची खोली अगदीं होती तशीच सुव्यवस्थित ठेवली होती, तींत त्यानें रहावें अशी अमराची इच्छा होती. परंतु, तेथें रहाणें म्हणजे रोमचा ससेमिरा आपल्यामागें लावून घेण्यासारखें होईल, हें त्याला पक्कें ठाऊक होतें म्हणून तो त्या गोष्टीला कबूल नाहीं.

त्यानें एका साधारणशा खाणावळींत आपलें बिऱ्हाड केलें व संधि मिळेल त्याप्रमाणें रात्रीचा तो वाड्यांत येऊन भेट घेई. बेनहर आतां

लहान मुलगा राहिला नाहीं, पण चांगला प्रौढ झालेला आहे या गोष्टीचें त्या भोळ्या अमराला भानच राहिलें नाहीं. त्याच्या बाळपणच्या आवडीची मेवामिठाई व फळफळावळ घेण्यासाठीं तिनें सगळा बाजार पालथा घातला. मच्छीबाजार वेशीजवळ ती मध विकत घेत असतां, जवळ एक मनुष्य दुसऱ्याला एक गोष्ट सांगत होता त्याचें बोलणें हिला ऐकूं आल्यामुळें तिचें लक्ष त्या मनुष्याकडे गेलें. ज्या मनुष्यानें तुरुंगाच्या खोलींत जाऊन त्या मायलेंकींची सुटका केली त्या अंमलदाराला आंत जाण्यास मशाल दाखविली तोच, हा होता. त्यानें आपल्या बोलण्यांत त्या स्त्रियांच्या नांवाचा उल्लेख केला नव्हता, तरीही एकंदर हकिकतीवरून ह्या दोघीं स्त्रिया म्हणजे आपली धनीण व तिर्झाच होत हें अमरानें ताडलें. आपल्या तरुण धन्याला सांगण्यास आनंददायक वर्तमान समजलें म्हणून तिला अति हर्ष झाला व ती धांवतच घराकडे गेली.

पण मध्येंच ती थांबली. आई व बहीण यांना महारोग झालेला आहे हें वर्तमान ऐकतांच कदाचित् त्या दुःखाच्या धक्क्यानें त्याचा प्राणविण जाण्याची धास्ती तिला वाटली. त्याला ती गोष्ट समजली तर तो त्यांच्या शोधासाठीं कबरस्थानांत गेल्याशिवाय रहाणार नाहीं व मग त्यालाही तो भयंकर रोग लागेल असा विचार मनांत येतांच ती भोळी म्हातारी भीतीनें थरारली. म्हणून आपणांस समजलेल्या गोष्टीविषयीं सध्यां त्याला कांहीं सांगावयाचें नाहीं, पण स्वतः त्या दोघींचा शोध काढावयाचा असा तिनें मनाशीं निश्चय केला.

ठरलेल्या बेताप्रमाणें दुसऱ्या दिवशीं ती फराळाची करंडी बरोबर घेऊन ज्या विहिरीवर महारोग्यांना पाणी मिळत असें त्या विहिरीवर गेली. विहिरींवर महारोग्यांना पाणी काढण्यास परवानगी नव्हती, तर त्यांनीं भांडीं विहिरीजवळपास ठेवून लांब उभें रहावयाचें व वाटेच्या वाटसरूंनीं किंवा दुसऱ्या कोणाला त्यांची दया येऊन तो पाणी काढून त्यांची भांडीं भरीपर्यंत वाट पहात ताटकळत बसावयाचें.

सूर्य उगवल्यानंतर सुमारें अर्ध्या तासानें, 'गुन्हेगार टेंकडी'च्या दोन्हीं बाजूंना असलेल्या थडग्यांच्या मधून निघून महारोगी विहिरीकडे येऊं लागले. तो देखावा पाषाणहृदयी मनुष्याच्या अंतःकरणांतही कालवाकालव केल्याशिवाय राहिला नसता, इतका तो विरूप व किळसवाणा होता. कोणाच्या अंगावर वस्त्र आहे तर कोणाच्या नाहीं. कोणाचे हातपाय तर कोणाचें नाकतोंड, याप्रमाणें निरनिराळे अवयव झडून गेल्यामुळें त्यांच्याकडे पहातांच कोणालाही डोळे मिटून घ्यावेसें वाटावें. अशा त्या तेथें जमत असलेल्या महारोग्यांत अमरा आपल्या प्रिय धनिणीला ओळखून काढण्यास पहात होती. शेवटीं तिला दोन स्त्रिया म्हणण्यासारख्या विरूप न झालेल्या व कांहींशा इतरांपासून दूरदूर रहाण्यास पहात असलेल्या अशा दिसल्या. इतर महारोग्यांचें कमी अधिक बोलणेंही त्या दोघी निमूटपणें ऐकून घेत होत्या. आपणांस हव्या त्याच त्या दोघी असाव्या असें अमराला वाटलें व म्हणून ती थोडी अधिक पुढें झाली व तिनें त्यांच्याकडे न्याहाळून पाहिलें तेव्हां ती मागें फिरून म्हणाली, 'ह्या तर दोघी अगदीं म्हाताऱ्या दिसतात, म्हणून मी शोधीत आहें त्या कांहीं ह्या नव्हेत.' तितक्यांत 'अमरा,' अशी तिच्या नांवानें मारलेली हांक तिला ऐकूं आली व तिनें चमकून मागें पाहिलें व त्या हांक मारणाऱ्या स्त्रीकडे नजर रोखून विचारलें, 'कोण तूं?'

'तूं ज्यांचा शोध करीत आहेस, त्याच आम्ही.'

ती दासी पटकन् खालीं बसली. लागलीच उठून ती त्यांना मिठी मारण्यासाठीं पुढें झाली, परंतु तिच्या धनिणीनें तिला भानावर आणलें व तिच्याजवळ पाणी मागितलें. मग मोलकरणीला फराळाची करंडी उघडूं न देतां तिला संध्याकाळीं पुन्हां येण्यास सांगून ती अन्नपाणी उचलून मुलीला घेऊन कबरांकडे जाण्यास वळली.

चार पावलें गेल्यावर मोलकरणीस हांक मारून ती म्हणाली, 'पण

अमरा, आमचा शोध तुला लागला व आम्ही ह्या अशा स्थितींत आहों, यासंबंधीं माझ्या बाळाला अवाक्षर बोलतां कामा नये तूं.'

अमरा सद्गदित स्वरानें म्हणाली, 'बाईसाहेब, धन्यापासून ही गोष्ट लपवणें माझ्या जिवावर आलें आहे, कारण प्रत्येक भेटीच्या वेळीं धनी तुमची चौकशी प्रथम करतात.'

'अमरा, आम्हांला अशा अवस्थेंत त्याच्यानें पहावेल का ? आमचा शोध त्याला लागतांच कामा नये. आम्हांला ज्या कांहीं थोड्याशा वस्तूंची गरज लागेल त्या तूंच रोज आम्हांला आणून देत जा म्हणजे पुष्कळ झालें. आणि आतां यापुढें आमचे कांहीं फार दिवस राहिलेले नाहींत.'

अमराच्यानें कांहींच बोलवलें नाहीं. ती रडत रडतच परत शहरांत आली.

इकडे मलख यरूशलेमास येऊन बेनहर व तो असे दोघे आपल्या इच्छित मनुष्यांचा शोध कसून करूं लागले. मलख थेट गढींतील अंमलदाराकडे गेला व त्यानें त्याला हर कुटुंबाची सगळी हकिकत सविस्तर सांगून घडलेल्या प्रकारांत गुन्ह्याची बुद्धि मुळांतच नव्हती असें त्यानें प्रतिपादलें, व ह्या कुटुंबांतील हतभागी मंडळीचा शोध लागला तर त्यांना पुन्हा पूर्वस्थितीवर आणून ठेवण्यासाठीं त्यांच्या वतीनें बादशहांना अर्ज करण्याचा आपला हेतुही त्या अंमलदाराला कळवला, तेव्हां तुरुंगांत सांपडलेल्या दोघी स्त्रियांची हकिकत जी नुकतीच त्यानें नोंदून ठेवली होती ती त्यानें मलखला दाखवली. आपण शोध करीत असलेल्याच ह्या स्त्रिया होत अशी मलखची खात्री झाली व त्यानें ती हृदयद्रावक हकिकत बेनहरच्या कानीं घातली. तेव्हां असह्य दुःख, संताप, व त्वेष यांनीं बेनहरचें डोकें भगाणून गेलें व तो म्हणाला,

'काय, महारोगी ! माझी आई व तिर्झा ? त्यांना महारोगानें ग्रासलें ? किती दिवस असें चालावयाचें ?'

नंतर ते दोघे निघाले व महारोग्यांच्या भीक मागण्याच्या स्थानापाशीं गेले. तेथें जमलेल्या रोग्यांना त्यांनीं दानधर्म केला व त्यांना हव्या होत्या त्या दोघी स्त्रियांविषयीं चौकशीही त्या लोकांजवळ केली, पण त्यांना माहिती मिळाली नाहीं. ह्या दोघींना लागणाऱ्या सर्व वस्तु अमरानें पुरवल्यामुळें त्यांना भीक मागण्याच्या जागीं येण्याचें कारणच पडलें नाहीं. शिवाय त्या दोघी होतां होईल तितकें अगदीं एकीकडे लपून राहत होत्या. चार दोन दिवस नव्हे पण चांगले दोन महिने बेनहर व मलख यांनीं त्यांचा कसून शोध केला, पण तो लागेना म्हणून निराश होऊन त्यांनीं तो प्रयत्न सोडून दिला.

बेनहर स्वतःशीं म्हणाला, 'त्या दोघींनीं जंगल गांठलें असलें पाहिजे. माझी आई आतां मेल्यांत जमा. तिर्झाची तीच गत. सगळ्या कुटुंबांत मीच एकटा राहिलों कशाला ? हे आमच्या पूर्वजांच्या देवा, परमेश्वरा, ह्या रोमचा आम्हांवर असला जुलूम तूं किती काळ चालूं देणार ?'

संतापलेला, हताश, खुनशी असा बेनहर रस्त्यानें जात असतां एक लहानसा गालिली जमाव पिलात सुभेदाराच्या वाड्याकडे चाललेला त्याला दिसला व तो त्यांच्यांत मिळाला. तेथें पुढारी व वडील मंडळी आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्याचा प्रयत्न करीत होती. मंदिरांतील दानकोशांतील पैसा सार्वजनिक कामासाठीं रोमी सरकार खर्च करण्याच्या विचारांत होतें व त्या बाबतींत दाद मागण्यासाठींच आज सुभेदाराच्या वाड्याजवळ लोकांची गर्दी झाली होती. बाहेर येऊन लोकांचें म्हणणें ऐकण्याची वडील लोकांची विनंती त्यानें मान्य केली नाहीं. पण लोक हट्टी. ते ऐकेनात. ते तेथेंच वाड्यासमोर गर्दी करून वाट पहात बसले. तेव्हां कांहीं रोमी शिपाई यहूदी वेषानें हातांत काठ्या घेऊन वाड्यांतून बाहेर आले व त्यांनीं लोकांवर लाठीहल्ला सुरू केला. तें पाहून बेनहरनें आपल्या बरोबरच्या गालिली लोकांनाही लाठीबंद करून व त्यांचा पुढारी बनून त्यानें हल्ला करणारांशीं सामना दिला. बेनहरनें हल्ला करणारांचा पराभव करून त्यांना

तेथून पळून जाणें भाग पाडलें, पण मग सशस्त्र रोमी शिपायी पुढें येतांच बेनहरला आपल्या गालिली टोळीसह यांच्यापुढें मागें पाय घ्यावा लागला. वाड्याच्या आवाराच्या बाहेर आल्यावर एका रोमी शिपायानें द्वंद्वयुद्धास केलेलें आव्हान बेनहरनें स्वीकारलें व त्याच्याशीं सामना करून त्यानें त्याला युद्धांत ठार केलें.

लोकसमुदायानें बेनहरचा वीरपुरुष व स्वातंत्र्यदाता म्हणून मोठमोठ्यानें जयजयकार केला. मग त्यानें शहराबाहेर पुन्हा भेटून नवीन भावी राजाचें स्वागत करण्यासंबंधींची वाटाघाट करण्याचें गालिली मंडळीला वचन दिलें. मग पुढें तो त्या गालिली मंडळीबरोबर गालिल प्रांतांत गेला. तेथें या मंडळीनें बेनहरच्या यरूशलेमांतील पराक्रमाची कीर्ति चोहोंकडे पसरविली. थोड्याच दिवसांत त्यानें लोकांच्या सैन्याच्या तीन पलटणी बनवल्या. ह्या पलटणी घेऊन ‘ ज्वालामुखीचा रस ’ नांवाच्या ओसाड, रेताळ, प्रदेशांत तो गेला. तेथें त्यानें त्यांस लष्करी कवाईत व शस्त्रविद्या यांचे शिक्षण दिलें. ते चांगले तरबेज झाले तेव्हां त्यानें त्यांस आपआपल्या गांवीं पाठवलें व गुप्तपणें आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस लष्करी शिक्षण देण्याचें काम, पण विशेषेंकरून ज्या राज्यक्रांतीद्वारें रोमची जुलमी सत्ता उलथली जाईल व शलमोनाच्या सिंहासनावर नवीन येणारा राजा बसेल त्या क्रांतीची तळमळ लोकांत उत्पन्न करण्याचें काम त्यांच्यावर सोंपवलें. गालिली लोक अत्यंत जहाल व राष्ट्राभिमानी असल्यामुळें जंगलांतल्या वणव्याप्रमाणें हें क्रांतीचें वारें गालीलभर भडकलें.

इकडे शस्त्रें, अन्नसामुग्री, वगैरे सैन्याला लागणाऱ्या सर्व साहित्यांचा प्रचंड सांठा सायमनीडस व शेख इल्डरीम हे गुप्तपणें करून ठेवीत होते.

◆ ◆ ◆

## प्रकरण १७ वें

## मोहपाश

वाळवंटी प्रदेशांत ज्या गुहेंत बेनहरनें आपलें मुख्य ठाणें स्थापन केलें होतें त्या गुहेंत तो एक दिवस संध्याकाळीं विचार करीत बसला असतां यरूशलेमाहून मलखनें पाठवलेला एक जासूद त्याच्याकडे आला. त्यानें आणलेल्या पत्रांतील खालील उतारा बेनहरने वाचला.

'एक संदेष्टा प्रगट झाला आहे. तो एलिया आहे असें कित्येक म्हणतात. यरूशलेम नगरांतील व सगळ्या यहूदीया प्रांतांतील लोक, यार्देन नदीच्या तीरीं तो संदेष्टा राहतो तेथें, हजारोंनीं जात असतात. त्याच्याहून अधिक पराक्रमी असा एक पुरुष त्याच्यामागून येणार आहे हीच घोषणा तो संदेष्टा विशेषेंकरून करतो. ज्या येणाऱ्या पराक्रमी पुरुषाची आगाऊ घोषणा केली जाते तो पुरुष म्हणजेच तुम्ही वाट पहात असलेला भावी राजा होय, ह्यांत मला तिळमात्र शंका नाहीं. तुम्ही एकदां स्वतः येऊन ह्या संदेष्ट्याला भेटावें. मलख.'

ह्या आशाजनक वर्तमानामुळें बेनहरला अतिशय हर्ष झाला. त्यानें आपल्या गालिली अनुयायांना ही बातमी सांगून आपल्या पक्षाच्या सर्व लोकांस तयार रहाण्याची आगाऊ सूचना देण्यासाठीं त्यांना सगळ्या प्रांतभर पाठवलें, आणि आपण स्वतः बरोबर एक अरब वाटाड्या घेऊन मध्यरात्रीं रेताड मैदानापलीकडील पवित्र यरूशलेम शहरास जावयाला निघाला.

उजाडण्याच्या सुमारास बेनहरच्या वाटाड्यानें त्यांच्या मागें असलेल्या निर्जन वाळवंटांतून येणाऱ्या व्यक्तीकडे त्याचें लक्ष वेधलें. ही येणारी व्यक्ति एक घोडेस्वार असून त्याच्या हातांत उंटाची काढणी होती. तो स्वार थोडा अधिक पुढें आला तेव्हां तो उंट पाहून बेनहरला आश्चर्य वाटलें, कारण तो तसाच असाधारण उंच व पांढऱ्या शुभ्र रंगाचा

होता. तसला उंट एकदां दृष्टीस पडला म्हणजे सहसा त्याचें विस्मरण होत नाहीं. बेलथासर व त्याची मुलगी हीं जशा उंटावर बसून आलेलीं त्यानें पाहिलीं होतीं, तशाच जातीचा हा उंट दिसला व म्हणून बेनहरला आश्चर्य वाटलें. ते दोघे हळू हळूच पुढें चालूं लागले. असें करण्यांत त्यांचा हेतु हा कीं, त्या घोडेस्वारानें त्यांस गांठावें. आणि तशा त्या निर्जन ठिकाणीं पुन्हा अकल्पित रीतीनें बेलथासर व त्याची मुलगी आणि बेनहर यांची गांठ पडली. आपली इहलोकची यात्रा संपण्यापूर्वी पुन्हा एकदां त्या तारकाचें दर्शन झाल्यास पहावें म्हणून हा बेलथासर या वेळीं यरु-शलेमास चालला होता. तो ज्या व्यापारी तांडयाबरोबर प्रवासास निघाला होता त्याच्या सावकाश चालीचा बेलथासरला कंटाळा आला होता आणि लुटारू व क्रूर पशु यांच्यापासून परमेश्वर आपलें संरक्षण करील असा दृढ विश्वास ठेवून तो एकटाच झपाटयानें प्रवास करीत पुढें निघून आला. आतां तर उत्तम वाटाडयासह बेनहरची अकल्पित भेट झाली व तो जवळच्या वाटेनें, शक्य तितक्या लौकर यरूशलेमास पोहोंचण्यासाठीं शिकस्त करीत आहे, हें पाहून तर त्याचा ईश्वरीसूत्रावरील विश्वास अधिकच दृढ झाला.

बेनहर ज्या उद्देशानें यरुशलेमला चालला होता त्याविषयीं त्याच्या मनांत विचार घोळत होता तरी देखील त्या रूपवान मिसरी तरुणीला पाहून त्याच्या अंत:करणांत खळबळ झाल्याशिवाय राहिली नाहीं. त्याच्या भेटीमुळें तिला देखील आनंद झाला असें तिच्या चेहे-यावरून बेनहरला तरी खास वाटलें. वाटाडयानें यांना वाट दाखवीत टेकडयांच्या रांगांमध्यें पड-लेल्या खोऱ्यांतून एका स्वच्छ निर्मळ पाणी वहात असलेल्या ओढयाजवळ आणलें. याच ओढयाच्या पाण्यानें वाढलेल्या दाट छायेची एक राई तेथें होती. येथें येऊन पोहोंचल्यावर उंट खालीं बसला आणि त्या तरुणीला आणि तिच्या वडिलाला बेनहरनें हात देऊन खालीं उतरविलें. बेलथासर लागलाच हातपाय धुवून प्रार्थनेंत मग्न झाला. इकडे उंटहांक्याजवळून एक मोठा पेला

मागून घेऊन, 'चला आपण ओढ्यावर जाऊं,' असें म्हणून इराज बेनहरला घेऊन तिकडे गेली. बेनहरनें पेला भरून पाणी आणलें असतें पण इराजनें त्याला तसें करूं न देतां स्वतःच पेला भरून आणला व बेनहरला प्रथम पाणी पिण्याचा आग्रह केला.

ती त्याला म्हणाली, 'एखाद्या राजाचा प्रधान होण्यापेक्षां कोणा भाग्यवानाचा हुजऱ्या होणें अधिक चांगलें,' किंवा, 'शहाण्याचा व्हावें चाकर पण मूर्खाचा होऊं नये धनी,' अशा अर्थाची एक म्हण आमच्या भाषेंत आहे.

तेव्हां बेनहर आश्चर्य वाटून म्हणाला, 'भाग्यवान्, आणि मी ?'

'आपणच अंत्योखियांत रथांच्या शर्यतींत पहिले आलां नाहीं का ? तसेंच, यरूशलेमांत एका रोमीशीं तुमचें द्वंद्वयुद्ध झालें त्यांत आपण आपल्या प्रतिस्पर्ध्याला ठार केलें नाहीं का ?'

इराज आपल्या आयुष्यक्रमाकडे इतक्या आस्थेनें लक्ष देत आहे असें पाहून बेनहरला साभिमान आनंद झाल्यास नवल नाहीं. तथापि, आपल्या हरएक कामाची तिला इतकी सविस्तर माहिती कशी व्हावी याविषयीं त्याला आश्चर्य वाटलें व त्याचें मन भीतिग्रस्तही झालें. रोमीशीं झालेल्या द्वंद्वयुद्धाची हकिकत तिला कशी समजली हें त्याला कोडें पडलें, कारण त्या वेळीं त्यानें आपलें नांव कोणाला कळूं दिलें नव्हतें, व या द्वंद्वाशीं त्याचा असलेला संबंध सायमनीडस्, मलख, आणि इल्डरीम या तिघांनाच काय तो माहित होता, आणि तो पक्कें जाणून होता कीं, त्यांच्या गुप्त कटाविषयीं रोमला सुगावा लागला तर त्याच्यापेक्षां त्या तिघांचाच अधिक तोटा असल्यानें त्यांच्या हातून गुप्त गोष्ट फुटणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत ही तरुणी मित्र का शत्रु ? असा प्रश्न बेनहरच्या मनांत उभा राहिला. तिनें केलेल्या स्तुतीनें त्याला धन्य वाटलें हें जरी खरें, तरी त्याचें मन बावरलें होतें यांत कांहीं शंका नाहीं. त्याची ही स्थिति लक्षांत येऊन ती म्हणाली,

'अहो मिसरी देवदेवतांनों, एका शूर वीराचा शोध मला लागला म्हणून मी तुमची आभारी आहें; तसेंच वाड्यांत जो मेला तो माझा नरराज नव्हता म्हणून मी तुमचे अनंत उपकार मानतें.'

आतां तर आपल्या एकूण एक हालचालींची हिला खडान् खडा बातमी मिळत असते असें पाहून त्याचें मन अधिकच साशंक झालें. तिला हें सर्व वर्तमान कळतें कसें? एक विचार चटकन् त्याला चाटून गेला, म्हणजे त्याला संशय आला. एस्तेरच्या वडिलाशीं जेव्हां जेव्हां बेनहरचें संभाषण झालें तेव्हां तेव्हां तीही तेथें हजर असे. ती साधी व श्रद्धावान् तरुणी होती. पण ही मिसरी तरुणी फार चलाख व व्यवहारज्ञ होती. म्हणून हिनें त्या सरलहृदय एस्तेरच्या मनांत शिरून तिच्याकडून तिला न कळत विश्वासघात करवला नसेल ना! हाच तो संशय. आतां तर बेनहर यरूशलेमास जात होता, आणि त्याच्या गुप्त गोष्टींची सगळी माहिती शत्रूच्या हातीं लागलेली असल्यास त्याच्या प्राणावर संकट ठेवलेलें व शिवाय त्याची इष्ट योजना फिसकटण्याची जबर धास्ती होती हें त्याला कोणीं सांगायला पाहिजे होतें असें नाहीं.

बेलथासरची प्रार्थना संपून तो ओढ्याजवळ आला. बेनहरनें त्याला पाणी आणून दिल्यावर तीं तिघें जेवावयास बसलीं. या वेळीं येणाऱ्या राजाचें पुन्हा एकदां दर्शन घ्यावें, असा संदेश रोज बेलथासरला स्वप्नांत कसा मिळूं लागला व म्हणून तो यरूशलेमास यावयास कसा निघाला, वगैरे हकीकत त्यानें बेनहरला सांगितली. मग बेनहरनें त्याला आलेलें मलखचें पत्र दाखवलें, तेव्हां तें वाचून तो मोठ्यानें म्हणाला, 'हे देवा, तूं खरोखर विशेष कृपा दाखवीत आला आहेस. मला तारकाचें पुन्हा एकदां दर्शन व्हावें व मी त्याचें भजनपूजन करावें. मग हे देवा, मी सुखानें डोळे मिटीन. माझें तुझ्याजवळ एवढेंच नम्रतेचें मागणें आहे.'

ह्या वृद्ध गृहस्थाचा साधा, सरळ विश्वास व अगदीं साहजिक रीतीनें जणूं काय देव अगदीं जवळ उभा आहे अशा भावनेनें अत्यंत आपुलकीनें

त्यानें देवाला केलेली ती प्रार्थना ऐकून बेनहरचें अंतःकरण सद्गदित झालें. मग दोघांचें संभाषण बराच वेळ चाललें. आत्मिक जीवन, म्हणजे देवाच्या समागमें रहाण्याचा लाभ मानवी आत्म्याला मिळणें याविषयीं बेलथासरनें गोड विवेचन केलें.

तो म्हणाला, 'माझ्याविषयीं म्हणाल, तर सामान्य मनुष्याचें जीवन हजार वर्षें मिळण्यापेक्षां आत्म्याचें स्वतंत्र जीवन एकच तास मिळणें मी अधिक पसंत करतों.'

येणाऱ्या नवीन राजाच्या राज्याचें स्वरूप आत्मिक असणार असें त्यानें जोरानें प्रतिपादन केलें. तो म्हणाला,

'ह्या नव्या राजानें ऐहिक वैभवानें उतूं जाणाऱ्या साम्राज्याचीं सूत्रें हालवण्यास तो कांहीं कैसर किंवा हेरोद नव्हे, पण तो मानवी आत्म्यांचा उद्धारक असा आहे. उंची, मौल्यवान् वस्त्रें ल्यालेल्या, ढालतलवार घेतलेल्या व मस्तकावर मुगुट चढवलेल्या अशा राजाचा शोध तुम्ही करीत आलां, पण जो इतर मनुष्याप्रमाणेंच दिसण्यांत सामान्य आहे तरी अनंतकालिक जीवनाचा पूर्ण मार्ग शिकवणाऱ्या अशा महान् पुरुषोत्तमाचा शोध मी करीत आहें.'

या वृद्ध गृहस्थाचा साधा, अढळ विश्वास, व मोहक वक्तृत्व हीं पाहून कोणाचेंही हृदय उचंबळून आल्यावांचून राहिलें नसतें. मग बेनहरचें अंतःकरण, जें या विषयासंबंधीं अत्यंत उत्सुक होतें, तें सद्गदित झाल्यास काय नवल? येणाऱ्या मुक्तिदात्याविषयींचें त्याचें स्वतःचें मत व बेलथासरचें मत हीं दोन्ही जवळ जवळ ठेवून त्यानें चांगला मननपूर्वक विचार केला, व थोडी विश्रांति घेतली.

मग त्यांनीं आपला प्रवास पुन्हा सुरू केला. त्यांनीं लवकरच तो उंटांचा व्यापारी तांडा गांठून मागें टाकला आणि वाटाड्यानें त्यांना रात्रीच्या मुक्कामासाठीं, त्या रेताड प्रदेशांत क्वचित् ठिकाणींच असणाऱ्या, एका राई-

जवळ आणलें. प्रवासभर इराजनें आपल्या नैसर्गिक अनुपम सौंदर्याची बेनहरला चुणुक दाखवण्याची एकही संधि वायां जाऊं दिली नाहीं. ती अत्यंत चित्ताकर्षक हावभाव करून दुसऱ्याचें मन मोहून टाकण्याच्या कलेंत पूर्ण निष्णात होती. विलक्षण क्लेशदायी परिस्थितीमुळें बेनहरच्या अंतः-करणांत स्त्रीविषयक प्रेमभावनेचा उद्भवच अद्यापपर्यंत झालेला नव्हता, पण या सौंदर्यसंपन्न मोहक तरुण इराजनें ती प्रेमभावना आज त्याच्या अंतःकरणांत प्रथमच उत्पन्न केली.

मध्यरात्रीचा जागता पहारा बेनहरच्या वांट्याला आला होता, म्हणून तो हातांत भाला घेऊन वाळवंटांत डुकली घेत असलेल्या उंटाच्या बाजूला उभा राहिला. त्या वेळीं त्या निर्जन, ओसाड, रेताड मैदानांतील भीषण स्वरूपाच्या वातावरणानें तो हताश होण्याचा फार संभव होता, परंतु त्या दिवसभरांत घडून आलेल्या गोष्टींवर मनन करण्यांत दंग झाल्यामुळें त्याला सभोंवतींच्या वातावरणाचें भानच नव्हतें म्हटलें तरी चालेल. विशेषेंकरून त्या मिसरी सुंदरीच्या मोहक शृंगारचेष्टांची आठवण होऊन तो आनंदांत जणूं काय पोहूंच लागला.

एकाएकीं एक नाजूक हात मागून त्याच्या खांद्यावर पडतांच तो चमकला, पण वळून पहातो तों चिंतनांतील सुंदरी प्रत्यक्ष त्याच्यापुढें उभी !

ती हंसत हंसत म्हणाली, 'तुम्हांला भयचकित केलें, हें कबूल करतां कीं नाहीं ? बोला.'

'कोणीं ? शत्रूनें कीं काय ?' असें बेनहरनें उलट तिलाच विचारलें.

'काय ही तुमची कल्पना ! शत्रुत्व करणें म्हणजे द्वेष. माझा जन्म होतांच मिसरची संरक्षक देवता जी ईझिस तिनें माझ्या हृदयाचें चुंबन घेतलेलें आहे व म्हणून द्वेष ही भावना माझ्या वाऱ्यालाही उभी राहूं शकत नाहीं हें तुम्ही पक्कें लक्षांत ठेवा.'

'तुझें बोलणें तुझ्या वृद्ध वडिलांच्या बोलण्याप्रमाणें वाटत नाहीं. त्यांची व तुझी धर्मश्रद्धा एकच नाहीं का ?'

तिनें हंसतच उत्तर दिलें, 'एकच होईल, पण मी जेव्हां त्यांच्या वयाची होईन तेव्हांची ती गोष्ट. त्यांच्या देवाचें स्वरूप पाहून माझ्या तर अंगावर कांटाच उभा रहतो. काव्य, सुरा, विनोद, व प्रेम यांनीं स्फुरलेला असा धर्म तरुणपणीं मानवतो. पण हे हर-कुल-तिलका, तुझ्याजवळ माझी एक प्रार्थना आहे.'

'तुझ्या नुसत्या इच्छेलाहि कोणाच्यानें नकार देववेल असें मला कांहीं वाटत नाहीं.'

'तुम्हांला साहाय्य करण्याची माझी इच्छा आहे.'

आतां बेनहरसुद्धां हंसत हंसत म्हणाला, 'अगोदर मला साह्य कशाला हवें आहे हेंच मला कळत नाहीं, व शिवाय मला तूं साह्य तरी कसलें करूं शकणार ?'

ती म्हणाली, 'आज जशीं मला स्वप्नें दिसत होतीं, तशींच तीं तुम्हांलाहि दिसत होतीं. तुम्ही ज्याच्या भेटीला जाणार तो राजा हेरोदासारखा पण त्याच्याहून किती तरी पटीनें प्रतापी व वैभवसंपन्न असणार. जमिनीवर व समुद्रावरही अनेक लढाया होतील. तेव्हां ज्यानें अगदीं आरंभापासून व उत्कृष्ट असें साहाय्य त्या राजाला केलें, त्याला तो राजा प्रसन्न होऊन मागेल तें देण्यास कधींतरी मागेंपुढें पाहील का ?'

तें ऐकून बेनहर म्हणाला, 'सुभेदाऱ्या आणि मांडलिक राजेपण हीं प्रतिफळें तुझ्या डोळ्यांपुढें दिसतात, आणि खरोखर हे मिसरी सुंदरी, तुझ्यासारखी धोरणी, सौंदर्यराशी, राजतेजानें झळकणारी राणी दुसरी होणें शक्यच नाहीं. पण जर हें अत्यंत मधुर प्रतिफळ युद्धाच्या धुमश्चक्रीनेंच प्राप्त व्हावयाचें, तर मग तूं मला त्या कामीं साहाय्य कसें करणार ?'

त्यानें तिच्या सांगण्यावरून आपल्या अंगावरील झगा उंटाला लागून वाळूवर घातला. तेव्हां ती त्यावर बसून उंटाच्या पाठीला टेंकली. तोहि तिच्या अगदीं जवळ बसला. तिनें आपला एक हात त्याच्या गळ्यांत घातला व आपलें तोंड अगदीं त्याच्या तोंडाजवळ नेऊन, सृष्टि उत्पन्न

करण्याच्या कामीं ओसैरिस देवाला त्याच्या पत्नीनें, म्हणजे ईसिस देवीनें, कसें साहाय्य केलें, ती कथा त्याला हलक्या आवाजांत सांगितली. मग ती मोठ्यानें म्हणाली,

'तुम्हांला त्या राजाची भेट होईल. तुमच्या तरवारीच्या अचाट पराक्रमानें अनेक विजय मिळाल्यामुळें तो तुमच्यावर प्रसन्न होऊन मौल्यवान् देणग्यांचा नुसता पाऊस पाडील, आणि हा माझा शूर वीर सगळ्या सैन्यांत अद्वितीय योद्धा म्हणून त्याची कीर्ति सर्वत्र गाजेल.' एवढें बोलून तिनें त्याच्याकडे सस्मित पाहिलें.

तिचें तोंड त्याच्या तोंडाजवळच होतें. त्यानें तें जवळ घेऊन मोहवश होऊन तिचें अनेक वेळां चुंबन घेतलें व म्हटलें, 'हे मिसरी प्रेमदेवते, जर संस्थानावर राजपदें देण्याची सत्ता राजाच्या हातांत आली तर एक निःसंशय मला प्राप्त होईल, आणि त्या संस्थानच्या राणीचा मुगुट, ज्या ह्या सौंदर्यशालिनीनें मला आपल्या मोहांत जखडून टाकलें आहे तिच्याच मस्तकावर मी ठेवीन. तूं माझी होशील, माझी राणी होशील, व अशी दुसरी सौंदर्यसंपन्न राणी होणारच नाहीं.'

आणि ती देखील प्रेमाचें मिष दाखवून उलट त्याचें चुंबन घेऊन त्याला म्हणाली, 'आणि तुम्ही मला सर्व कांहीं सांगत जाल ना ?'

तो तिचा प्रश्न ऐकून मात्र त्याचा उत्साह थोडासा थंड पडला. त्यानें उलट तिलाच विचारलें, 'माझें तुझ्यावर गाढ प्रेम असणें एवढें तुला पुरेसें नाहीं ?'

ती किंचित् रागाचा झटका आणून झटकन् उठून उभी राहिली व जातां जातां म्हणाली, 'खरेंच तुम्ही निष्ठुर आहां.' मग ती उंटाचा मुका घेत, 'किती अकृत्रिम, एकनिष्ठ, व प्रेमळ आहे हा पशु. निदान याची तरी प्रीति संशयविषानें दूषित झाली नाहीं,' असें म्हणत हां हां म्हणतां तेथून निघून गेली.

◆ ◆ ◆

## प्रकरण १८ वें

# बेनहरला येशूचें दर्शन

तिसऱ्या दिवशीं आमची ही लहानशी प्रवासी मंडळी दुपारच्या जेवणासाठीं व विश्रांतीसाठीं याबूक नामक नदीच्या कांठीं उतरली. येथें सुमारें शेंसवाशें प्रवाशांचा तळ पडलेला त्यांना दिसला. त्यांच्यापैकीं एका गृहस्थाशीं भाषण केल्यावरून, यार्देन नदीच्या कांठीं एका प्रख्यात उपदेशकाचा उपदेश ऐकण्यास चोहोंकडून अलोट गर्दी लोटत असते, व तेथूनच ही प्रवासी मंडळी या वेळीं परत चालली होती, हें बेनहरला कळलें.

बेनहरनें विचारलें, ‘त्या उपदेशकाचें नांव काय?’

ह्या प्रश्नाचें, ‘जखर्याचा पुत्र योहान,’ असें उत्तर आलें.

‘त्याच्या उपदेशाचें सार तरी काय असतें?’

‘सर्व लोकांना तर त्याचा उपदेश म्हणजे एक नवीनच तत्त्व वाटतें. पश्चात्ताप व बाप्तिस्मा असें त्या तत्त्वाचें नांव. मोठमोठ्या शास्त्री लोकांनाही हा उपदेशक आहे तरी कोण याचा उलगडा होत नाहीं, मग आम्हां सामान्य जनांना तो होत नाहीं ह्यांत नवल तें काय? “आपण ख्रिस्त किंवा एलिया आहों,” असें तो म्हणत नाहीं एवढेंच नव्हे, पण सर्व विचारणारांस त्याचें एकच उत्तर असतें, तें म्हणजे, “परमेश्वराचा मार्ग नीट करा असें अरण्यांत ओरडणाऱ्याची वाणी मी आहें.”’

तेव्हां बेलथासरनें विचारलें, ‘ह्या उपदेशकाची भेट कोठें होईल आम्हांला?’

‘बेथबारा येथें,’ असें उत्तर त्याला मिळालें.

तें ऐकून तो वृद्ध बेलथासर बेनहरला म्हणाला, ‘तर मग चला आपण त्वरा करूं या. नाहीं तर तारक प्रगट होण्याच्या वेळीं आपण तेथें नसावयाचें.’

बेनहर व इराज ह्यांनाही त्वरा करण्याची इच्छा नव्हती असें नाहीं. ही मंडळी यार्देन नदीच्या तीरीं बेथबारा येथें येऊन पोहोंचली. तेथें चोहोंकडे तंबूराहुट्या ठोकलेल्या असून जनावरें चारणीस लावलेलीं आहेत असा देखावा त्यांच्या दृष्टीस पडला. अगदीं नदीजवळ त्या संदेष्ट्याचा उपदेश ऐकत हजारों लोकांची गर्दी उभी होती. पण ही आमची मंडळी जसजशी त्या गर्दीजवळ जाऊं लागली तसतशी ती गर्दी मोडूं लागलेली दिसली. ह्या आमच्या मंडळीला येण्यास फारच उशीर झाला, तेव्हां बेलथासर निराशेनें कपाळावर हात मारून घेऊं लागला. तें पाहून बेनहर त्याला धीर देत म्हणाला, 'असें अगदींच हातपाय गाळण्याचें काय कारण? आपण येथेंच बाजूला थोडा वेळ थांबूं या. कदाचित् याच बाजूनें तो संदेष्टा येणार नाहीं कशावरून?'

संदेष्ट्याच्या उपदेशावर विचार करण्यांत गढून गेलेले ते लोक, या बाजूला उभ्या असलेल्या तिघांकडे लक्ष न देतां, पुढें निघून जात होते. त्या अलौकिक उपदेशकाची भेट होण्याची त्यांची आशा मावळणार, तोंच त्यांच्याकडे एक व्यक्ति येत आहे असें त्यांनीं पाहिलें. त्या व्यक्तीला पाहतांच त्यांच्या मनांतील इतर सर्वच विचार कोठच्या कोठें निघून गेले व त्यांचें सगळें लक्ष त्या येणाऱ्या व्यक्तीकडे खेंचलें गेलें. ती व्यक्ति दिसण्यांत बहुतेक जंगली दिसत होती म्हटलें तरी चालेल. त्याची दाढी आंखूड व केंस लांब वाढलेले होते. त्या केंसांना जटांचें स्वरूप आलेलें पाहून थंडी, वारा, व पाऊस ह्यांची त्या व्यक्तीनें पर्वाच केलेली नसल्याचें प्रमाण पटत होतें. त्या व्यक्तीच्या अंगांत उंटाच्या केंसांचा एक खरबरीत पायघोळ झगा असून तिनें कमरेला एक कातड्याचा कमरबंद बांधलेला होता व हातांत एक भली मोठी जाडजूड काठी घेतलेली होती. तिचे डोळे अत्यंत तेजस्वी असून ती झपाझप चालतांना दोन्ही बाजूंना आपली गहिरी नजर अशा प्रकारें टाकीत होती कीं जणूं काय कोणा तरी व्यक्तीचा शोध चालला असावा असेंच बाजूच्या पाहणाराला वाटण्यासारखें होतें.

इराजनें ती व्यक्ति स्पष्टपणें पाहिली तेव्हां प्रथम तिला आश्चर्य वाटलें, पण मग त्याच्याविषयीं तिच्या मनांत तुच्छता उत्पन्न होऊन ती बेनहरला म्हणाली, 'तुमच्या येणाऱ्या राजाच्या आगमनाची घोषणा करणारे राजदूत का हे ?'

ह्या उपदेशकाच्या बाह्य स्वरूपाच्या विक्षिप्तपणाविषयीं त्याला पूर्वींच माहिती झालेली होती व तो स्वतः ह्या धर्माचें अध्ययन केलेला असा होता, तथापि विशेषेंकरून ह्या रंगेल मिसरी तरुणीनें त्याला आपल्या मोहपाशांत अडकवून त्याच्यावर आपल्या मताची छाप पाडली म्हणून येणाऱ्या राजाच्या पराक्रमाचीं व वैभवसंपन्नतेचीं अशीं रमणीय दृश्यें त्याच्या मनोभूमिकेतर रंगवलीं गेलीं कीं, त्या सौंदर्यशालिनी इराजचा तो खोंचक प्रश्न ऐकून त्याला लाजल्यासारखें झालें व तशाच स्वरानें तो म्हणाला, 'होय, तोच हा संदेष्टा आहे.'

बेलथासर अगदीं स्तब्ध बसला होता. त्याचे ओठ हालत होते त्यावरून तो मनांतल्या मनांत प्रार्थना करीत असावा असें म्हणतां येईल. ती विक्षिप्त दिसणारी व्यक्ति म्हणजेच तो संदेष्टा. या आमच्या मंडळीपासून तो वीस-एक यार्ड अंतरावर असेल तोंच त्याची नजर एका पुरुषावर पडली. हा पुरुष जवळच एका मोठ्या धोंड्यावर बसून इतका वेळ ध्यानांत मग्न झाला होता, पण याच वेळीं तो उठून उभा राहिला व आमच्या प्रवासी मंडळीकडेच येऊं लागला. त्याच्याकडे नजर जातांच संदेष्ट्यानें आपल्या तोंडावर आलेले आपले केंस एका हातानें मागें सारून आपली नजर त्या पुरुषावर रोंखली व दोन्ही हात वर आकाशाकडे उभारून किंचित् काळ एखाद्या दगडी पुतळ्यासारखा तो निश्चल दिसला. तत्काळ सभोंवतींच्या लोकांत स्तब्धता पसरली व सर्व लोकांचें लक्ष त्या पुरुषाकडे व संदेष्ट्याकडे लागलें. त्यानें हळू हळू आपले उभारलेले हात खालीं केले व आपल्या उजव्या हातानें त्या पुरुषाकडे पहाण्यास खुणावीत आपल्या खणखणीत आवाजानें तो म्हणाला, 'हा पहा, जगाचें पाप हरण करणारा देवाचा कोंकरा.'

बेलथासर गुडघे टेकून त्या संदेष्ट्यानें दाखवलेल्या पुरुषाकडे पाहूं लागला. पुन्हा एकदां संदेष्ट्यानें आपल्या खणखणीत आवाजानें म्हटलें, 'ज्याविषयीं मीं सांगितलें कीं, जो माझ्यापुढें झाला आहे, कारण तो माझ्यापूर्वीं होता असा पुरुष माझ्या मागून येत आहे, तो हाच आहे. मी त्याला ओळखीत नव्हतों, तरी त्यानें इस्राएलास प्रगट व्हावें म्हणून मी येऊन पाण्यानें बाप्तिस्मा करतों. मीं आत्म्याला कबुतरासारखें आकाशांतून उतरतांना पाहिलें आहे; आणि तो त्याजवर राहिला. मी त्याला ओळखीत नव्हतों; तरी ज्यानें मला पाण्यानें बाप्तिस्मा करावयास पाठविलें त्यानें मला सांगितलें होतें कीं ज्या कोणावर आत्मा उतरतांना व राहतांना पाहशील तोच पवित्र आत्म्यानें बाप्तिस्मा करणारा आहे. मीं पाहिलें आहे व साक्ष दिली आहे कीं हा देवाचा पुत्र आहे.'

बेलथासरच्या कानीं संदेष्ट्याचे ते शेवटले शब्द पडतांच, 'होय तोच, तोच हा,' असे उद्गार बाहेर पडले व तो एकदम बेशुद्ध होऊन खालीं पडला.

इकडे संदेष्ट्यानें दाखवलेल्या पुरुषाकडे बेनहर तीव्र नजरेनें पहात होता. त्याच्या रेंखीव, पवित्र, शरीरयष्टीकडे पाहून बेनहर थक्क झाला. त्याच्या चेहेऱ्यावर विवेकाचें सामर्थ्य, कोमलपणा, शालीनता, व पावित्र्य यांच्या संगमामुळें उत्पन्न झालेलें तेज झळकतांना पाहून बेनहर क्षणभर दिपल्यासारखा झाला. पण त्याच्या मनांत एकाच विचाराला जागा होती. हा पुरुष कोण? कोठला? मशीहा? राजा? बाह्यस्वरूप तरी राजतेजाच्या व वैभवाच्या अगदीं उलट दिसत होतें. त्या पुरुषाच्या शांत, गंभीर मुद्रेकडे पहाणाराच्या मनांत युद्ध व जयापजय यांच्या संबंधींची कल्पना व इतरांवर सत्ता गाजवण्याची लालसा अघोर व किळसवाणी वाटल्याशिवाय रहात नसे, हें मात्र अगदीं खरें. बेलथासरचेंच म्हणणें खरें व सायमनीडसचें चूक. शलमोनाच्या राज्याचा पुनरुद्धार करण्याचा विचार ह्या पुरुषाच्या मनांतच नाहीं. त्याच्यांत ना हेरोदाची वृत्ति, ना त्याचें कल्पनाचातुर्य. हा राजाही असेल कदाचित्, पण रोमसारख्या किंवा त्याहूनही बलिष्ठ

अशा साम्राज्याचें सिंहासन भूषवणारा पुरुषसिंह हा नव्हे, असें बेनहरचें मन त्याला म्हणे.

ह्या पुरुषाविषयीं वर सांगितल्याप्रमाणें बेनहरच्या मनांत विचार दृढ होत चालला असतां, मध्येंच कोणत्यातरी एका गोष्टीची आठवण हळूच आपलें डोकें वर काढूं लागली. तो मनांत म्हणाला, 'या पुरुषाला मीं मागें केव्हां-तरी पाहिल्याचें मला पक्कें आठवतें. पण कोठें व केव्हां पाहिलें असावें ?' तो क्षणभर अगदीं स्तब्ध झाला. एकाएकीं त्याच्या मनःचक्षूंपुढें एक मागला देखावा दिसूं लागला. त्याला जन्मठेपीचा कैदी बनवून वल्हीं मारण्या-साठीं आरमारी गलबतावर ओढीत नेण्यांत येत असतां त्याच्यावर पहारा करणाऱ्या सैनिकांनीं नासरेथ गांवाजवळ पाणी पिऊन थोडा वेळ विश्रांति घेण्यासाठीं मुक्काम केला होता व तेथें ज्या व्यक्तीनें त्याला पाणी पाजलें व त्याच्याकडे सहानुभूतिपूर्वक प्रेमपूर्ण दृष्टीनें पहात त्याचें समाधान केलें, तीच ही व्यक्ति, या वेळीं त्याच्यापुढें उभा राहिलेला पुरुष होय. त्या वेळीं ह्या चेहेऱ्याचें जें चित्र त्याच्या अंतःकरणावर उमटलें होतें तें आज इतकीं वर्षें झालीं तरी सतेजच राहिलेलें होतें. तो एकदम आपल्या उपकारकर्त्यापुढें आपली कृतज्ञता प्रगट करण्याच्या हेतूनें घोड्यावरून खालीं उतरला व त्या पुरुषाकडे जाणार तोंच, 'हे हर-कुल-तिलका, धांव आणि मला साहाय्य कर, नाहींतर माझ्या बाबांचा प्राण चालला,' असे करुणा भाकणारे शब्द त्याच्या कानीं पडल्यामुळें तो थबकला.

नंतर दुसऱ्या दिवशीं 'हा पहा, जगाचें पाप हरण करणारा, देवाचा कोंकरा,' अशी योहानानें त्या आदल्या दिवशींच्याच पुरुषाविषयीं लोकसमुदायाला साक्ष दिली.

तेव्हां बेनहरनें आपल्याजवळ उभ्या असलेल्या एका मनुष्याला विचारलें, 'अहो, तो पुरुष आहे तरी कोण ?'

तेव्हां त्या मनुष्यानें थट्टेखोरपणानें उत्तर दिलें, 'तो त्या नासरेथ गांवांतला एक सुतार आहे.'

◆ ◆ ◆

# प्रकरण १९ वें

## येशूचीं अद्भुत कृत्यें

गेल्या प्रकरणाच्या शेवटीं आलेली गोष्ट बेथबारा येथें घडल्याला तीन वर्षांचा काळ लोटला. या अवधींत मलखनें, बेनहरच्या वतीनें म्हणून, बेनहरची जी वाडा वगैरे यरूशलेमांतील वडिलार्जित मालमिळकत जप्त झालेली होती ती पंत पिलात सुभेदारापासून विकत घेतली आणि तिची डागडुजी करून तिला पूर्वीची शोभा आणली होती. बेलथासर व इराज हीं या वाड्यांत राहूं लागलीं होतीं. बेनहर गालिलांतच आपल्या संकल्पित योजनांची घडी बसवीत ह्या नासरेथकर पुरुषाच्या हालचालींचें सूक्ष्म निरीक्षण करण्यांत आपला सगळा वेळ खर्च करीत होता. त्याला दिवसेंदिवस हा नासरेथकर पुरुष म्हणजे एक अधिकाधिक बिकट कोडेंच होत चालला होता. त्या पुरुषानें अशीं कांहीं अलौकिक कृत्यें केलीं कीं त्यामुळें त्याचा स्वभाव व उद्दिष्ट कार्य याविषयीं बेनहर अधिकाधिक घोंटाळ्यांत पडत चालला. सायमनीडस व एस्तेर आज बऱ्याच वर्षांनीं यरूशलेमास वल्हांडण-सण साजरा करण्यासाठीं आलीं होतीं. तीं हर वाड्याच्या धाब्यावर बांध-लेल्या वरील ‘वसंत भुवनांत’ उतरलीं होतीं. तरुणपणीं याच ठिकाणीं उभें राहून प्रिय यरूशलेम शहराचा मनोहर देखावा आपण नेहमीं पहात असल्याची आठवण सायमनीडसला हल्लीं रोज होऊन सानंद अभिमान वाटूं लागला.

एक दिवस एका जासुदानें येऊन एस्तेरच्या हातीं शिक्का मारलेलें एक पत्र दिलें. पत्रावरील शिक्का हर घराण्याचा आहे असें ओळखतांच तिच्या चेहऱ्यावर लज्जेची छटा चमकली. तिची प्रतिस्पर्धीण जी मिसरी रंगेल तरुणी, तिनें हिच्या प्रिय वीर पुरुषाला इतकें भारून टाकलें होतें कीं जणूं त्याच्यावर पूर्ण स्वामित्व चालवण्याचाच अधिकार तिला प्राप्त झाला आहे, ही गोष्ट एस्तेरच्या लक्षांत यावयास फारसा अवधी लागला नाहीं. तिचा वीर

पुरुष त्या रंगेल मिसरी तरुणींच्या पाशांत पूर्ण जखडला गेला असावा असेंच तिला वाटत होतें. तथापि, त्या सरलहृदय बाल एस्तेरला स्वतःच्या हानीसाठीं नव्हे तर तिच्या त्या वीर पुरुषाच्या कल्याणाच्या दृष्टीनेंच त्याच्याविषयीं मनस्वी दुःख झालें. इराजचें बेनहरवरील प्रेम स्वार्थमूलक व महत्त्वाकांक्षेनें प्रेरित आहे अशी तिची प्रामाणिक समजूत होती. एस्तेरनें वडिलांच्या आज्ञेवरून पत्रावरील शिक्का फोडला व ती पत्र वाचूं लागली.

‘ नीसान, ८ वा दिवस.

‘ गालिलांतून यरूशलेमाकडे जाणारा रस्ता.

‘नासरेथकरही याच रस्त्यानें जात आहे. मी त्याच्याबरोबरच पण त्याला न कळत चाललों आहें. माझ्याबरोबर माझी एक संपूर्ण पलटण आहे. माझी दुसरी पलटण मागें थोडी दूर, पण वाट चालत आहे. वल्हांडण सणाच्या समारंभामुळें गर्दीमध्यें ही माझी कारवाई उघडकीस येण्याचा संभव नाहीं. तो नासरेथकर या प्रवासाला निघाला तेव्हांच, “आपण यरूशलेमास जाऊं व तेथें माझ्याविषयीं संदेष्ट्यांनीं सांगून ठेवलेल्या सर्व गोष्टी पूर्ण केल्या जातील, असें तो म्हणाला.” आपली वाट पहात बसण्याची वेळ आतां संपत आली आहे. घाई फार आहे. सायमनीडस, तुम्हांला शांति असो.’

एस्तेरच्या नांवाचा उल्लेख पत्रांत शेवटीं देखील केलेला नव्हता म्हणून तिला अति दुःख झालें.

सायमनीडस म्हणाला, ‘आतां ते बेथानीस येऊन पोहोंचले असतील, व बेनहरची व आपली प्रत्यक्ष भेटच आज रात्रीं होण्याचा संभव आहे. ’

इराज वाड्याच्या धाब्यावर आली व जेथें कोठें दोघींना एकांतीं संभाषण करतां येईल अशा एका जागीं ती एस्तेरला घेऊन गेली. आपण बेनहरचें मन कसें मोहून घेतलें, याविषयींचा आपला पराक्रम तिनें येथें ह्या यहूदी तरुणीला, एस्तेरला, वर्णन केला, व रोममध्यें असलेला सुंदर वाडा बेनहरनें

तिला देऊं केला होता तें देखील सांगण्यास ती विसरली नाहीं. ती हकिकत सांगणें चाललें असतांच त्यांना रस्त्यांत कोणाच्या तरी विशिष्ट पावलांची चाहूल लागली व त्या दोघी रस्त्याकडे पहातात, तों बेनहर आवाराच्या फाटकांतून आंत येत असलेला त्यांच्या दृष्टीस पडला. तत्काळ इराज उठली व त्याला भेटण्यासाठीं घाईघाईनें गेली, पण एस्तेरनें आपल्या हातांनीं आपले डोळे झांकून घेतले. तिच्या डोळ्यांतून टप टप गळणारे अश्रु बोटांमधल्या भेगांतून बाहेर येत होते.

बेनहर व इराज जोडीनें गच्चीवर आलीं. तेथें एस्तेरला पाहून तो दचकला. मध्यें गेलेल्या तीन एक वर्षांच्या काळांत त्यानें तिला पाहिलेंच नव्हतें, म्हणून यावेळीं एस्तेरच्या तारुण्याचा भर असून तिच्या सौंदर्याचा विकास पूर्ण झालेला असल्यामुळें तिला पाहून तो चमकला, हें साहाजिकच होतें. बेनहरनें तिला क्षेमकुशल विचारलें व त्याचप्रमाणें तिचे वडिल आणि बेलथासर यांची भेट झाली. त्या दोघांनीं बेनहरला आपल्या दोघांमध्यें असलेल्या आसनावर बसावयास लावलें व ही सगळी मंडळी, नासरेथकर व त्याचें चाललेलें कार्य याविषयीं बेनहरच्या तोंडून हकिकत ऐकण्यास उत्सुक आणि अधीर झालेली होती. बेनहर आपली हकिकत सांगण्यास आरंभ करणार तोंच मागून त्याला कोणाची तरी चाहूल लागली, म्हणून त्यानें मागें वळून पाहिलें, तों अमरा, त्याची अत्यंत एकनिष्ठ दायी, धांवतच येऊन त्याच्या पायांजवळ बसली. तिनें त्याच्या पायांना घट्ट मिठी मारली व त्याच्या हाताचे मुके घेतले. बेनहरचें अंतःकरण अत्यंत सद्गदित झालें. त्यानें तिच्या कपाळावर आलेले तिचे पांढरे केंस आपल्या हातानें हळूच मागें सारले आणि तिचा मुका घेत म्हटलें, 'अमरा, त्यांच्याविषयीं कांहींच का माहिती नाहीं मला सांगण्यासारखी ? माझी आई व तिची कोठें असतील? त्यांचा मागमूस सुद्धां नाहींना?' अमराचें उत्तर जोराचा हुंदका देऊन रडणें हेंच आलें.

तेव्हां बेनहर गंभीरपणें तिला म्हणाला, 'जशी परमेश्वराची मर्जी

असेल तसें होणार. अमरा, ऊठ, आणि माझ्याजवळ नीट बस पाहूं, कारण तुझ्याशीं मला किती तरी बोलावयाचें आहे.'

नंतर नासरेथकर व त्याचें कार्य या आपल्या मूळ विषयाकडे वळून तो पुरुषांना उद्देशून म्हणाला, 'ज्याचें बरेंचसें भवितव्य ह्या नासरेथकरावर अवलंबून आहे त्यानें जितक्या दक्षतेनें त्याच्या मागोमाग जावयास पाहिजे तितक्या दक्षतेनें मी आज बरेच दिवस ह्याच्या मागें चालून त्याच्या कृत्यांचें बारकि निरीक्षण करीत आलों. सर्व प्रकारच्या परिस्थितींत मीं त्याला पाहिलें आहे. त्यावरून तो माझ्यासारखाच नव्हे, माझ्याहून कांहींतरी विशेषच आहे, अशी माझी खात्री होऊन चुकली.'

सायमनीडसनें विचारलें, 'तें विशेष काय?' पण बेलथासरनें त्याला विचारलें, 'मला त्याची भेट कोठें होण्यासारखी आहे?'

बेनहर म्हणाला, 'तो उद्यां शहरांत येणार आहे. तो आपल्या बारा पट्ट शिष्यांसह प्रवास करीत आहे. अमीर–उमरावांसह थाटानें जाणाऱ्या राजापेक्षां तो अगदींच निराळा वाटतो. तुम्ही माझ्यापेक्षां दूरदृष्टीचें आहां, तर तुम्हीच मला सांगा, कीं ज्याला नुसत्या शब्दानें पायांजवळचे दगड देखील सोनें बनविण्याचें सामर्थ्य असतांही जो स्वखुषीनें दारिद्र्य पसंत करतो त्याला काय म्हणावें?'

इराजनें विचारलें, 'त्याच्या अंगीं तसें सामर्थ्य आहे हें तुम्हांला कसें समजलें?'

बेनहर म्हणाला, 'त्यानें क्षणांत पाण्याचा द्राक्षारस बनवलेला मीं स्वत: पाहिला आहे.'

सायमनीडस म्हणाला, 'सर्वच विलक्षण! पण संपत्तिमान् होण्याचें सामर्थ्य अंगीं असून दारिद्र्यांत रहाणें हें विशेष आहे. तो इतका का निर्धन आहे?'

बेनहर म्हणाला, 'त्याच्या मालकीचें असें कांहींच नाहीं, व दुसऱ्याच्या मालमिळकतीचा त्याला तिळमात्र हेवा वाटत नाहीं. केवळ पांच भाकरी व

दोन मासळ्या एवढ्या अन्नावर त्यानें पांच हजारांना पोटभर जेवण घातलें व उरल्यासुरल्या तुकड्यातुकड्यांनीं कित्येक टोपल्या भरल्या. हा चमत्कार मीं प्रत्यक्ष पाहिला. पण तो रोगी लोकांस रोगमुक्त करतो तेंव्हां याहीपेक्षां मोठें सामर्थ्य दृष्टीस पडतें. यरीहोहून येत असणाऱ्या वाटेवर त्याला दोन आंधळे भेटले. त्यानें त्या दोघांच्या डोळ्यांना केवळ स्पर्श करतांच त्यांना दृष्टि प्राप्त झाली. चार मनुष्यांनीं एका पक्षघाती माणसाला उचलून आणून त्याच्यापुढें सोडलें. त्यानें त्या पक्षघात्याला, "ऊठ, आपली बाज उचलून घरीं जा," असें म्हणतांच तो रोगमुक्त झाला व बाज घेऊन घरीं गेला.'

'मीं तुम्हांला आतां सांगितलेल्या गोष्टी कांहीं लोकांच्या मतें हातचलाखीच्या व नजरबंदीच्या आहेत. तुम्हांला वाटतें का तसें? पण थांबा, त्यानें ह्यांहून अधिक अद्भुत गोष्टी केलेल्या मीं पाहिल्या त्या सांगतों. महारोगासारखा भयंकर रोग केवळ मरणानेंच जावयाचा हें तर तुम्हांला माहीतच आहे.' हे त्याचे शब्द अमराच्या कानीं पडतांच ती चमकली व अधिकच उत्सुकतेनें त्याचें भाषण ऐकूं लागली.

बेनहर पुढें म्हणाला, 'एका महारोग्यानें त्याच्याजवळ येऊन म्हटलें, "आपली इच्छा असली तर मला शुद्ध करावयास आपण शक्तिमान् आहां." तेंव्हां त्यानें त्याला म्हटलें. "माझी इच्छा आहे, शुद्ध हो." तत्काळ ज्या आम्हीं शेंकडों लोकांनीं तो अलौकिक चमत्कार पाहिला त्या आम्हांसारखा तो झाला!' अमरा एकदम उभी राहिली. त्याचे हे शब्द ऐकून ती चकित होऊन गेली होती.

बेनहर म्हणाला, 'आणखी एकदां असें झालें कीं दहा महारोग्यांची टोळीच, "अहो येशू, गुरुजी, आम्हांवर दया करा," असें म्हणत त्याच्याजवळ गेली. तेंव्हां त्यानें त्यांस म्हटलें, "तुम्ही जाऊन आपणांस याजकाला दाखवा." ते तसें करावयास जात असतां वाटेंतच ते रोगमुक्त झाले.'

सायमनीडस गंभीरपणें म्हणाला, 'आजपर्यंत इस्राएलांत इतक्या अद्भुत गोष्टी पूर्वीं कधींच घडल्या नव्हत्या.' सायमनीडसचें बोलणें चालू असतांच अमरा तेथून निघून गेली तें कोणाच्या लक्षांत आलें नाहीं.

बेनहरचें बोलणें पुन्हा सुरू झालें. तो म्हणाला, 'असले हे अद्भुत चमत्कार पाहून माझ्या मनावर काय परिणाम झाला असेल त्याची कल्पनाच करा; पण माझ्या शंकाकुशंका व आश्चर्य यांची परिसीमा अजून पुढेंच व्हावयाची होती. माझे अनुयायी जे गालिली ते अधीर, अविचारी, व साहसी स्वभावाचे. अर्थात् त्यांच्यानें दम निघेना. "त्यानें स्वतःला राजा म्हणवून घेण्यास पुढें सरसावयाची वेळ हीच," असें ते सर्वच्या सर्वच बोलूं लागले. मलाही त्यांचें तें म्हणणें पटलें व म्हणून एकदां तो हजारों लोकांपुढें बोलत असतां, त्याची इच्छा जमेस न धरतां, आम्ही राजा म्हणून त्याच्या नांवाची द्वाही फिरवून त्याच्या डोक्यावर राजमुगुट घालणार, तोंच तो कोठच्या कोठें नाहींसाच झाला ! मग तो पुन्हा आमच्या दृष्टीस पडला तेव्हां तो मचव्यांत बसून सरोवराच्या पलीकडे चालला होता. संपत्ति, सत्ता, व राज्यपद यांसाठीं दुसरे लोक नुसते वेडे होतात, पण त्याच्या पायांशीं ह्या गोष्टी आल्या तरी त्याच्या मनावर या गोष्टींचा कांहींच परिणाम होत नाहीं. आतां असल्या पुरुषाला काय म्हणावें ?'

वृद्ध बेलथासर म्हणाला, 'धन्य तो परमेश्वर. त्याच्या संदेष्ट्यांचीं वचनें अगदीं खरीं आहेत; आपण आपलें शांत राहून त्याचें एक एक कार्य पहावें हाच उत्तम मार्ग.'

बेनहर म्हणाला, 'पण माझें सांगणें अजून संपलें नाहीं. ज्या मनुष्यावर मृत्यूचा घाला पडून जो त्याच्या ताब्यांत गेला त्याला मृत्यूच्या हातांतून कोणीं ओढून आणल्याचें तुमच्या कधीं ऐकिवांत आलें आहे काय ? एकदां शेवटचा दम निघून गेल्यावर तो कोणाला परत मिळाला आहे का ?'

बेलथासर उद्गारला, 'नाहीं, हें फक्त देवालाच शक्य आहे.'

बेनहरनें पूज्य भावानें मान लववली. नंतर तो म्हणाला, ‘ एकदां नाईन गांवांतून एका तरुणाचें प्रेत घेऊन लोक कबरस्थानाकडे निघाले. गांवाच्या वेशीजवळच त्यांना हा पुरुष भेटला, आणि जशी आई निजलेल्या मुलाला हालवून जागें करते त्याप्रमाणें ह्यानें केलें. ह्यानें त्या प्रेताला स्पर्श करून त्यांत जीव परत आणला व तो तरुण त्याच्या आईच्या हवालीं केला. मीं जें जें तुम्हांला आतां सांगितलें त्यांतलें कांहीं देखील ऐकीव नाहीं, तर मीं प्रत्यक्ष सर्व पाहिलें आहे. अहो, या पवित्र नगराला लागूनच असलेल्या त्या बेथानी गांवांत लाजार नांवाचा तरुण गृहस्थ मरण पावला व त्याला कबरेंत ठेवून चार दिवस लोटले होते. अर्थात् तें प्रेत सडूं सुद्धां लागलें असलें पाहिजे. पण ह्या लोकोत्तर पुरुषानें त्याला पुन्हा जिवंत केलें. आतां ह्या नासरेथकर पुरुषाला अद्वितीय म्हटल्याशिवाय कोणाच्यानें रहावेल का ? ’

अशा प्रकारें या मंडळीचें संभाषण मध्यरात्र उलटून जाईपर्यंत चाललें व मग बेनहर बेथानीस निघून गेला.

## प्रकरण २० वें

## महारोगापासून मुक्तता

दुसऱ्या दिवशीं सकाळीं शहराची वेस उघतांच पहिल्यानें बाहेर पडलेली व्यक्ति अमरा होती. तिनें आपल्याबरोबर जेवणाच्या पदार्थांनीं भरलेली करंडी घेतलेली होती. गेलीं दोनतीन वर्षें ती अगदीं नित्य नेमानें, जसा सूर्य रोज उगवावयाचा तशी, याप्रमाणें करीत असल्यामुळें, आज ती अंगांतील सर्व शक्ति एकवटून पाय उचलून चालली होती तरी त्याबद्दल कोणाला तसें नवल वाटलें नाहीं. ही अमरा आपल्या धनिणीकडे तितक्या तांतडीनें कां चालली होती हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच.

आतां कोठें नुकतेंच उजाडलें होतें, व ती हतभागी स्त्री आपल्या मुलीसह ज्या कबरेच्या आडोशानें रहात असे, त्या कबरेशींच उठून बसली होती. तिर्झा अजून आंतल्या बाजूस झोपेंतच होती. ह्या हतभागी स्त्रीकडे पहातांच

कोणाच्याही मनांत सहानुभूति उत्पन्न झाल्याशिवाय रहाणें शक्य नव्हतें, इतकें तें हृदयद्रावक दृश्य होतें. एका काळीं काळेभोर तुळतुळीत रेशमासारखे मऊ असलेले तिचे केंस पांढरे शुभ्र होऊन तिच्या खांद्यावरून थोडे पुढें आले होते, व त्यांच्या जटा झाल्या होत्या. तिच्या नाकपुड्या व पापण्या यांचा कांहीं भाग झडून गेला होता. तिची मान गांधींनीं भरली होती. नखें उडून गेलेलीं व हातापायांना गांठी गांठी उठून त्यांतून लस वहात होती. एका काळीं हर घराण्याची वैभवसंपन्न व राणी शोभण्यासारखी गृहदेवता आज अशी विद्रूप अवस्थेंत पाहून कोणाच्या हृदयाचें पाणी पाणी होणार नाहीं बरें !

टेकडीच्या मध्यावर असलेल्या विहिरीजवळील मोठ्या दगडावर अमरा जेवणाची करंडी थोड्याच वेळांत आणून ठेवील हें तिला ठाऊक होतें. परंतु अमरा नेहमींच्या जागीं, विहिरीजवळ न थांबतां नीट सगळी टेकडी चढून आली व धापा टाकीत टाकीत पुढें येत आहे, आणि तिच्या झुकांड्या जात आहेत असें पहातांच ह्या स्त्रीला आश्चर्य वाटून ती घाईघाईनें उठली. तिनें आपलें सर्वांग चादरीनें गुंडाळून, 'अशुद्ध ! अशुद्ध ! !' असें ती मोठ्यानें ओरडली. पण धनिणीनें हरप्रयत्न केला तरी न जुमानतां अमरानें तिच्या चादरीच्या टोंकाचा मुका घेतला, व ती आपल्या धनिणीचे पाय धरणार होती.

तेव्हां ती विधवा, महारोगी स्त्री, ओरडून म्हणाली, 'अमरा, ए अमरा, काय भलतेंच केलेंस हें ! नियमशास्त्रानुसार तूं स्वतःला व्यर्थ दंडपात्र करून घेतलेंस. आतां तुला आमचें साह्य करण्यासाठीं किंवा तुला स्वतःच्या व्यवहारासाठीं देखील शहरांत, मनुष्यवस्तींत, प्रवेश करण्याची मनाई आहे. महामूर्ख आहेस तूं अमरा ! वेडे, आतां आम्हां दोघींना अन्न कोण बरें आणील ? आतां आमचें अन्नावांचून कसें व्हावयाचें ? तूंच पहा बरें.'

अशा प्रकारें ती दुःखित व अधिकच हताश होऊन अमराचा निषेध करीत असतां आंतून तिर्झा तेथें आली. तिला पाहतांच अमरा रांगत रांग-

तच तिच्याकडे जाण्याचा प्रयत्न करूं लागली हें पाहून तिची धनीण ओरडून म्हणाली, ‘ तूं तिझ्रांला स्पर्श करतां कामा नये अशी माझी तुला आज्ञाच आहे. विहिरीवर येणाऱ्या कोणी तुला खालीं उतरत जातांना पहाण्यापूर्वींच तूं विहिरीपाशीं पोहोंच कशी. पण आतां काय उपयोग ! तसें करण्याची वेळ निघून गेली. आतां तुला येथें आमच्यापाशीं राहून आमच्याच नशिबाचा वांटा उचलला पाहिजे. ऊठ आतां. ’

पण अमरानें गुडघे टेकले, हात जोडले, व म्हटलें, ‘ हे स्वामिनी, मी मूर्ख नाहीं व मूर्खपणाचें कांहीं केलेंही नाहीं. तुम्हांला आनंददायक वर्तमान सांगण्यासाठींच मी येथें आलें. ’

‘ यहूदाविषयीं का ? ’

‘ ऐका. तुम्हां दोघींना ह्या भयंकर रोगापासून क्षणांत मुक्त करूं शकेल असा एक समर्थ पुरुष आहे. त्याच्या नुसत्या शब्दानें रोगी बरे होतात, एवढेंच काय, पण मेलेला मनुष्यसुद्धां जिवंत होतो. मी तुम्हांला त्याच्याकडे घेऊन जाण्यासाठींच हें तुमच्यापर्यंत येण्याचें धाडस केलें. ’

सद्गदित कंठानें तिची धनीण म्हणाली, ‘ किती भोळी ही आमचीं अमरा ! ’

त्यावर अमरा म्हणाली, ‘ परमेश्वराची शपथ, मीं खरें तेंच सांगितलें आहे. आतां थोड्या वेळानें तोच महासमर्थ पुरुष या बाजूनें यरूशलेमला जाणार आहे, म्हणून म्हणतें, चटकन् जेवून घ्या, म्हणजे आपण रस्त्याला लागूं. ’

ह्या अलौकिक, समर्थ उपदेशकाविषयींचें व त्याच्या रोगहारी सामर्थ्याविषयींचें वर्तमान ज्याप्रमाणें देशाच्या कोनाकोपऱ्यांतही जाऊन पोहोंचलें होतें, त्याप्रमाणें कबरस्थानांत रहाणाऱ्या ह्या महारोग्यांच्या वसाहतींतही तें थोडेंफार कळलेंच होतें. या दोघी हतभागी स्त्रियांनीं तें वर्तमान उत्सुकतेनें ऐकलें.

वयस्कर स्त्रीनें विचारलें, ‘ अमरा, हा महापुरुष कोण आहे ? ’

'एक नासरेथकर आहे.'

'त्याच्याविषयीं तुला कोणीं सांगितलें ?'

'धनीसाहेबांनींच.'

'कोणीं ? यहूदानें ? तो वाड्यांत आला का ?'

'होय, काल संध्याकाळीं ते आले.'

'हें वर्तमान आम्हांला सांगण्यास त्यानें का तुला पाठवलें ?'

'तुम्ही मरून गेलां अशी त्यांची समजूत झालेली आहे.'

ज्यानें एका महारोग्याला शुद्ध केलें असा एक संदेष्टा इस्राएलांत मागें होऊन गेलेला आहे याची आठवण या विधवेला झाली. बऱ्याच वर्षांमागें एका प्रख्यात संदेष्ट्याच्या जन्मकाळीं खळबळ उडून गेल्याचें वर्तमान ऐकल्याचेंही स्मरण तिला यावेळीं झालें. तो संदेष्टा यावेळीं चांगला प्रौढावस्थेंत आलेला असला पाहिजे असें तिनें ताडलें. अमराजवळून त्यासंबंधीं आणखी माहिती विचारल्यावर ह्या नासरेथकराकडे जाण्याचें तिनें ठरवलें. ह्यांना तो तितकाही लांबचा प्रवास किती जड गेला असेल त्याचें वर्णन न केलेलेंच बरें. वल्हांडणसणासाठीं यरूशलेमांत चोहोंकडून लोक लोटत होते. त्यांना टाळून वांकडीं तिकडीं वळणें घेत घेत ह्या स्त्रियांना जावें लागल्यामुळेंही मजल जास्त पडली. पण त्याला उपाय नव्हता. जर का लोकांना त्यांचा अडथळा झाला असता तर त्यांनीं ह्यांना शिव्याशाप दिले असते किंवा प्रसंगविशेषीं धोंडमार करून ठार देखील मारलें असतें. वाटेनें जात असतां अगोदरच रोगाच्या वेदनांनीं दुखणारे पाय चालणें फार झाल्यामुळें टेकणें जिवावर येऊं लागलें. तेव्हां तिर्झा तर एका ठिकाणीं बसली, व आतां तिला मागें ठेवून आईनें व अमरानें त्या थोर पुरुषाकडे जावें असें तिनें आईला म्हटलें सुद्धां. अडचणींत आणखी एक अडचण अशी होती कीं बेथानीहून यरूशलेम नगरास जावयाला रस्ते दोन होते. तो रोगमुक्त करणारा समर्थ पुरुष आपल्या शिष्यमंडळीसह कोणत्या रस्त्यानें जाणार हें ह्यांना माहीत नव्हतें.

ह्या स्त्रिया एका आडव्या रस्त्यापाशीं आल्या. हा रस्ता म्हणजे दगडी पाऊलवाटच. आपल्याकडे एक मनुष्य येत आहे असें पाहून त्याला सावध करण्यासाठीं जी आरोळी नेहमीं मारावयाची ती त्यांनीं मारली, तरी त्यानें पर्वा केली नाहीं. तो त्यांच्यापासून चारएक यार्डांवर येऊन थबकला सुद्धां.

तेव्हां बेनहरची आई त्याला म्हणाली, 'आम्ही कोणत्या रोगानें ग्रासलेल्या स्त्रिया आहों हें नाहीं का तुमच्या लक्षांत येत ?'

त्यावर त्यानें म्हटलें, 'बाई, तुमच्यासारख्या स्थितींत असलेल्यांशीं जो नुसते दोन शब्द बोलला असतां तीं तत्काळ रोगमुक्त होतात अशा समर्थ पुरुषाचा जासूद मी आहें.'

'काय, त्या नासरेथकराचे जासूद तुम्ही ?'

'होय, त्याच मशिहाचा.'

'तो यरूशलेमाला आज खरेंच जावयाचा आहे का ?'

'तो तिकडे जाण्यास निघालेला आहे.'

'कोणत्या रस्त्यानें ?'

'ह्याच रस्त्यानें येणार तो.'

बेनहरच्या आईनें वर डोळे करून परमेश्वराचें स्तवन केलें.

त्या मनुष्यानें विचारलें, 'हा कोण आहे असें तुम्हांला वाटतें ?'

ती म्हणाली, 'देवाचा पुत्र.'

त्यावर तो मनुष्य म्हणाला, 'तर मग तुम्ही येथेंच तो येईपर्यंत बाजूला थांबा, आणि तो दिसल्याबरोबर तिळमात्र न भितां त्याला आरोळी मारून त्याची करुणा भाका. तो शहरांत येत आहे हें वर्तमान शहरांतील त्याच्या मित्रवर्गाला कळवण्यासाठीं मी पुढें चाललों आहें.' तितकें बोलून त्यानें किंचितही न कचरतां आपल्याजवळ असलेला पाण्यानें भरलेला तुंबा त्या बाईच्या हातीं दिला.

तिनें विचारलें, 'तुम्ही यहूदी आहां का ?'

त्यानें उत्तर दिलें, 'यहूदी तर आहेंच, पण त्याहून विशेष म्हणजे खरी प्रीति पटवून देणाऱ्या ख्रिस्ताचा मी एक अनुयायी आहें.'

तो मनुष्य निघून गेल्यावर त्या दोघी पाणी प्याल्या व रस्त्यापासून जवळच असलेल्या एका उंचशा खडकावर जाऊन बसल्या. हळू हळू शहरच्या बाजूनें दोन दोन चार चार अशी मंडळी येऊं लागलेली दिसली. त्यांच्या मागें मोठाच लोकसमुदाय येत होता. बेथानीकडील बाजूनेंही लोकांचा मोठा जमाव नाचत, गात, जयजयकार करीत, खजूरीच्या फांद्या नाचवीत शहरच्या रोंखानें येत होता. ह्या स्त्रिया ज्या खडकावर उत्कंठेनें वाट पहात बसल्या होत्या त्याच्या समोरच ह्या दोन्ही बाजूंनीं येणाऱ्या समुदायांची गांठ पडेल असा सुमार दिसत होता.

तिर्झा म्हणाली, 'आई, पण एवढ्या प्रचंड गोंगाटांत आपली हांक त्या महापुरुषाला ऐकूं कशी जाणार ?'

आईनें अमराला विचारलें, 'त्या दहा महारोग्यांनीं त्या उपदेशकाला कशी आरोळी मारली म्हणून यहूदानें सांगितलें ?'

तिनें उत्तर केलें, 'हे प्रभू, आम्हांवर दया कर,' अशी.

बेथानीकडून ओरडत आरडत व नाचत गात येणाऱ्या लोकसमुदायाच्या मध्यभागीं गाढवाच्या शिंगरावर बसून शुभ्र झगा घातलेला पुरुष येत असलेला त्यांना दिसला. त्याच्या डोक्याला कांहीं नव्हतें. त्याचे लांब सडक केंस त्याच्या मानेवर रुळत होते. तो डावीउजवीकडे पहातसुद्धां नव्हता. जणूं काय आपल्यासभोंवतीं काय चाललें आहे ह्याची त्याला जाणीवही नाहीं, असें त्याच्या मुद्रेवरून दिसत होतें. लोकांचा ओघ अधिकाधिक जवळ जवळ येत चालला तेव्हां शिंगरावर बसलेला पुरुष तोच नासरेथकर संदेष्टा होय अशी ह्या स्त्रियांची खात्री झाली. लवकरच शहरांतून येणारे अगदीं पुढें असलेले कित्येक लोक या समुदायाला मिळाले व त्यांच्या बरोबर गाणीं गाऊन जयजयकार करूं लागले. ह्या खडकावर उभ्या राहिलेल्या महारोगी स्त्रियांकडे कांहीं लोकांची दृष्टि जातांच त्यांना ते संतापानें शिव्याशाप व धमक्याही देऊं लागले. पण आपण ज्याला भेटावयास सामोरे आलों आहों त्या महापुरुषाचा स्वभाव त्यांना माहीत होता. त्यांनीं, 'हे प्रभू, आम्हांवर दया कर. हे गुरु, हे स्वामी,

आमची गरज तूं जाणतोस, आमची विनंति ऐक व आम्हांवर कृपादृष्टि कर,' असें जीव तोडून ओरडत येणाऱ्या त्या स्त्रीला त्याच्याकडे जाण्यास वाट करून दिली.

त्यानें त्या स्त्रीला पाहून आपलें शिंगरूं थांबवलें व विचारलें, 'हें करण्याचें मला सामर्थ्य आहे असा तुझा विश्वास आहे का ?'

बेनहरच्या आईनें उत्तर केलें, 'संदेष्ट्यांनीं ज्याच्याविषयीं कथन करून ठेवलेलें होतें तो मशीहाच तूं आहेस, अशी माझी खात्री आहे.'

तिचे ते श्रद्धायुक्त शब्द ऐकून त्या महापुरुषाच्या मुद्रेवर प्रसन्नता झळकली व तो प्रेमळ स्वरानें म्हणाला, 'हे स्त्रिये, तुझी श्रद्धा असाधारण आहे. तुझ्या श्रद्धेचें फळ तुला प्राप्त होवो. शांत चित्तानें जा.'

त्या महापुरुषाचें स्वर्गीय तरी पण मानवी अंत:करण, आपण अत्यंत लज्जास्पद मरण भोगण्यास चाललों आहों हें जाणत असून देखील, 'परमोच्चावर देवाला गौरव असो व त्यानें पाठवलेला हा त्याचा पुत्र त्रिवार धन्य असो,' हे त्या कृतज्ञ विधवेच्या तोंडून निघालेले स्तुतिपर उद्गार ऐकून सद्गदित झाले.

ती तिर्झाजवळ येऊन म्हणाली, 'आपलें तारण झालें. त्या महापुरुषानें तसें वचनच मला दिलें. खरोखरच तो मशीहा आहे.'

एकाएकीं सर्व अंगांत नवजीवन सळसळल्यासारखें त्या मायलेंकींला वाटलें. त्यांचे झडलेले अवयवांचे भाग पूर्ववत् चांगले झाले, त्यांचें स्वरूप क्षणांत बदलून गेलें व त्यांचें हृदय आनंदानें भरून आलें. क्षणार्धांत त्यांचा रोग जाऊन त्यांचीं शरिरें इतर चांगल्या मनुष्यांसारखीं झालीं.

त्या दोघींचें होत असलेलें हें रूपांतर एका अनपेक्षित व्यक्तीच्या दृष्टीस पडत होतें. आपणांस ठाऊकच आहे कीं, हा महापुरुष कोण हें कोडें उलगडतां यावें म्हणून बेनहर त्या महापुरुषाची प्रत्येक हालचाल व कृत्य अगदीं बारकाईनें पहात होता. अत्यंत विद्रूप झालेल्या महारोगी स्त्रीजवळ येतांच महापुरुषानें शिंगरूं उभें केलेलें लोकसमुदायांत असलेल्या बेनहरच्या नजरेंतून चुकलें नाहीं. त्यानें तसल्या विद्रूप स्थितींत आईला

ओळखलें नाहीं, व खरोखरच तिच्यांत तसा न ओळखण्यासारखा फरक पडलेला होता. आतां त्या स्त्रीच्या स्वरूपांत कसा फेरफार होतो तें पहाण्यासाठीं तो गर्दीमधून निघून एकीकडे उभा राहून त्या उंचवट्यावर असलेल्या महारोगी स्त्रियांकडे पाहूं लागला. तितक्यांत त्याचा अरब वाटाड्या दोन घोडे हातांत धरून त्याच्याकडे आल्यानें त्याचें लक्ष वाटाड्याकडे गेलें. नंतर पुन्हा त्यानें आपली दृष्टि त्या स्त्रियांकडे वळवली तेव्हां प्रथम त्याला अमरा दिसली.

तो मोठ्यानें म्हणाला, 'देवाची शपथ, ती अमराच आहे ना ?'

जवळच उभ्या असलेल्या दोन स्त्रियांकडे बोट दाखवीत अमरा बेनहरला म्हणाली, 'धनीसाहेब, ह्यांच्याशीं बोला आधीं.'

त्या दोघींपैकीं एक स्त्री वर डोळे करून देवाच्या स्तुतीपर स्तोत्र पुटपुटत होती. तिच्याकडे बेनहरनें नजर फिरवतांच ती आई असल्याचें तत्काळ ओळखलें. लागलेंच मायलेंकांनीं एकमेकांस घट्ट मिठी मारली. मग बहीणभावांची भेट झाली. नंतर आई, मुलगा, व मुलगी अशा तिघांनीं परमेश्वराच्या उपकारस्तुतीचें स्तोत्र म्हटलें.

बेनहरनें आपल्या अंगावरील झगा तिघींच्या अंगावर टाकला तेव्हां त्याच्या कमरेला तरवार लटकलेली दिसली. ती पाहून आईनें विचारलें, 'बाळ, हल्लीं युद्धाची का वेळ आहे ?'

'कदाचित् ह्या नासरेथकराच्या प्राणाचें रक्षण करण्याचा प्रसंग येण्यासारखा आहे,' असें त्यानें उडतें उत्तर दिलें.

'तर मग त्याला शत्रु झालेले आहेत का ?'

'होय, झाले आहेत. आणि दुःखाची गोष्ट म्हणजे त्यांच्यामध्यें स्वकीय, यहूदीच, पुष्कळ आहेत.'

'हा महापुरुष इस्राएली व शांत वृत्तीचा असा नाहीं का ?'

'त्या बाबतींत ह्याच्यासारखा आजपर्यंत दुसरा कोणीही झालेला नाहीं; पण शास्त्री लोकांच्या दृष्टीनें, तो महान् अपराधी व दोषी आहे. ह्या महापुरुषाच्या दृष्टीनें निष्ठावंत यहूदी व सुंता न झालेला विदेशी दोघेही कृपेला सारखेच पात्र आहेत. तो एका नवीन युगाचीच घोषणा करतो.'

◆ ◆ ◆

# प्रकरण २१ वें

## खऱ्या प्रेमाची ओळख

या रोगमुक्त झालेल्या स्त्रियांचा नऊ दिवसांचा प्रायश्चित्ताचा विधि पूर्ण होऊन याजक त्या रोगमुक्त झाल्याचें जाहीर करीपर्यंत त्यांना शहरांत येण्यास नियमशास्त्राची परवानगी नव्हती. त्या स्त्रियांचा स्पर्श झाल्यामुळें बेनहरला या पवित्र सणांत भाग घेणें अशक्य झालें, म्हणून त्यानें त्या महारोग्यांच्या वसाहतीच्या बाजूलाच तंबू ठोकवले व सर्वांच्या सुखसोयींची व्यवस्था करून घेतली. शहराच्या सभोंवतींच्या बहुतेक सगळ्या भागांत सणासाठीं यरूशलेमास आलेल्या असंख्य यात्रेकरूंचा तळ पडलेला होता.

या यात्रेकरूंमध्यें ब्रिटनमधले व पूर्वेकडून थेट हिंदुस्थानांतील यहूदी लोकही ह्या सणासाठीं आलेले पाहून बेनहरला अति आश्चर्य वाटलें. तो स्वतःशीं म्हणाला, 'रोमाविरुद्ध बंड पुकारण्यास ही उत्तम संधि कदाचित् याच संधीची वाट तो नासरेथकर पहात असण्याचा मोठा संभव आहे, आणि ती त्याची योजना धूर्तपणाची आहे ह्यांत शंका नाहीं. आम्ही त्याला गालिलांत राजपद देण्यास पहात होतों त्या वेळेपेक्षां ही हल्लींची वेळ त्याच्या राज्याची द्वाहि फिरवण्यास अधिक चांगली आहे. या वेळीं येथें उभारल्या गेलेल्या बंडाचें वर्तमान सगळ्या पृथ्वीवर तेव्हांच पसरेल व बंडाचा वणवा चोहोंकडे एकदम पेटेल. माझ्या आईबहिणींचे इतके अनन्वित हाल केलेल्या रोमीविषयीं सूड घेण्यास मी किती अधीर झालों आहें. नासरेथकरानें या वेळीं आरोळी मारली, तर आपल्यावर झालेल्या रोमी जुलमामुळें अगदीं त्रस्त झालेले लाखों लोक रोमवर सूड उगवण्यासाठीं हां हां म्हणतां त्याच्या झेंड्यासभोंवतीं गोळा होतील. निःसंशय तो धोरणी पुरुष योग्य संधीची वाट पहात होता, आणि आतां ती आली आहे.'

ज्यांनीं आपल्या झग्याच्या आंत शस्त्रें लपवून घेतलेलीं आहेत असे धडधाकट लोक बेनहरकडे त्याच्या तंबूवर त्याला भेटण्यासाठीं वारंवार

येऊं लागले. त्यांच्याविषयीं आईनें केलेल्या चौकशीला, गालिलांतली आपली मित्रमंडळी आहे, असें बेनहरनें उत्तर दिलें.

वल्हांडण सणाच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं बेनहर घोड्यावर स्वार होऊन शहरांत गेला व एका विश्रांतिगृहांत उतरला. तेथें आपला घोडा ठेवून तो स्वतःच्या वाडिलोपार्जित वाड्यांत आला. मलखविषयीं विचारपूस करतां तो बाहेर गेला आहे असें उत्तर आलें. त्याच्या मनांत जरी मिसरी तरुणीला सलाम सांगावयाचा विशेष विचार होता तरी बेलथासरलाच त्यानें सलाम पाठवला. आज गेल्या कांहीं दिवसांत तिच्याविषयींचा विचार त्याच्या मनांत आला नव्हता, पण त्याच्या आवडीचा उंची पोषाख करून ती सौंदर्यसंपन्न तरुणी एका खोलींत फिरत असलेली दृष्टीस पडतांच तिच्या-विषयींच्या मोहानें त्याच्या मनांत उसळी मारली. तो तिला भेटण्यास उडी मारून पुढें होणार तोंच तिच्या आविर्भावांवरून त्याला कांहीं निराळाच भास झाल्यामुळें तो थबकला. या वेळेपावेतों तिचा प्रत्येक भाव व शब्द, त्याचें मन आकर्षण करून घेण्यासाठींच असलेला त्याला नेहमीं भासत असे, पण आतां तिच्यामध्यें कांहींतरी विलक्षण बदल झाला असल्याचें तिच्या चर्येवरून दिसत होतें व हा बदल त्याला सावध करीत होता.

ती भेटतांच म्हणाली, 'हे हरकुलोत्पन्न, तुमचें येणें कसें अगदीं वेळेवर झालें. तुम्हीं जें माझें आदरातिथ्य इतके दिवस येथें करवलें त्याबद्दल मी आपली फार आभारी आहें. उद्यां आलां असतां तर ही आभार मानण्याची संधि मला मिळाली नसती.'

बेनहरनें नुसती मान किंचित् लववली, पण त्यानें तिच्या चेहेऱ्यावरील आपली दृष्टि मात्र चळूं दिली नाहीं.

आतां मात्र ती स्पष्ट उपरोधिक स्वरानें म्हणाली, 'ज्या देवाच्या पुत्रा-कडून—ज्या नासरेथकराकडून—कसकसली अपेक्षा केलेली होती तो आतां कोठें आहे ? त्यानें रोमी सत्तेचीं छकलें उडवलीं का ? पंचरशी धातूच्या सिंहमूर्तींनीं सुशोभित केलेलें असें त्याचें तें सिंहासन कोठें आहे ? तसाच

त्याचा तो राजवाडा तरी कोठें आहे? त्यानें मेलेल्याला जिवंत केलें ना? मग त्याला निव्वळ सोन्याचा महाल नाहीं का एकदम उत्पन्न करतां येणार?'

बेनहरनें तुसड्या स्वरानेंच उत्तर केलें, 'मी कांहीं त्याचा शरीररक्षक नाहीं.' ती त्याच्या मध्येंच आलेल्या उत्तराकडे दुर्लक्ष करून म्हणाली, 'तुम्हांला येथें व अशा वेशांत कसें मी पहातें? सुभेदार, अमीरउमराव, किंवा प्रधान यांच्यापैकीं कोणासारखाही तुमचा पोषाख दिसत नाहीं. तुम्हांला मिळणाऱ्या ज्या राज्याची राणी मी होणार होतें तें राज्य अजून मिळालेंच नसावें असें यावरून दिसतें.'

बेनहरनें पहिल्याच स्वरांत उत्तर दिलें, 'तुमचा हा उतावीळपणा आहे. तो राजवाडा नि तें सिंहासन यांसाठीं आणखी एकदोन, किंवा आठएक दिवसही वाट नाहीं का आपण पाहूं शकत?'

ती म्हणाली, 'तुमचा तो राजा तुम्हीं कल्पनाराज्यांत पाहिला. मंदिराच्या पायऱ्यांवर उभा राहून राजा ह्या नात्यानें तोच प्रगट होणार होता असें तुम्हींच ना प्रतिज्ञेवर सांगितलें होतें? खजूरीच्या फांद्या उडवीत चाललेली ती लोकांची प्रचंड मिरवणूक पहावयाला मोठी रमणीय होती खरी, तथापि थयथय नाचणाऱ्या तल्लख, पाणिदार घोड्यावर स्वार झालेला व मुद्रेवर भावि राजतेज झळकत आहे अशा वीरपुरुषाचा शोध मीं केला पण व्यर्थ! त्याचप्रमाणें हरकुलांतील शूर पुरुषाच्या हाताखालीं चाललेली गालिली स्वारांची पलटण दृष्टीस पडेल म्हणून उत्कंटेनें चोहोंकडे नजर फेंकली, पण याही बाबतींत मला निराश व्हावें लागलें. आणि आतां मीं काय पाहिलें? स्त्रियांसारख्या कोमल चेहेऱ्याचा एक पुरुष गाढवीच्या शिंगरावर बसून चालला असून त्याचे डोळे दुःखाश्रूंनीं भरलेले आहेत. काय म्हणावें ह्या दृश्याला!' इतकें म्हणून तिनें एकप्रकारचें विकट हास्य केलें. तें पाहून बेनहरच्या अंगावर शहारे आले.

ती पुढें म्हणाली, 'त्या वेळीं कांहीं मी हंसलें नाहीं. मी स्वतःला म्हटलें, "थांब जरा. जगाचें स्वामित्व आपल्या हातीं लवकरच घेणाऱ्या पुरुष-

सिंहाला साजेल अशा प्रकारें मंदिरांतच स्वतःला प्रगट करूं दे." मी व माझ्याच सारखी अशीच अपेक्षा करणारीं लाखों मनुष्यें अगदीं आतुरतेनें त्याची वाट पहात बसलों. रोमी साम्राज्यसत्तेचें चक्र तडकल्याचा आवाज आतां ऐकूं येईल म्हणून आम्ही सारखा कानोसा घेऊं लागलों, पण सर्व फुकट गेलें. तुमचा तो जग जिंकणारा आपला झगा अंगासभोंवतीं घट्ट धरून, अवाक्षर न काढतां अगदीं एकीकडच्या वेशींतून शहराबाहेर निघूनही गेला.'

तिनें या देखाव्याचें काढलेलें चित्र इतकें हुबेहूब निघालें होतें कीं त्यामुळें त्या शब्दचित्र काढणाऱ्या तरुणीला क्षणभर बेनहर विसरला. रोमवर सूड उगवण्याचें साधन म्हणून त्यानें ह्या नासरेथकरावर जो विश्वास टाकला होता तो पार ढांसळलेला पाहून त्याचें मन व्यग्र झालें. तरी पण स्त्रीप्रमाणें नाजुक चेहेरा, केंस, व अश्रुपूर्ण नेत्र अशी ती दिव्य व्यक्ति अंतर्यामीं त्याला अधिकाधिक जवळची वाटूं लागली हेंही खरेंच.

बेनहर म्हणाला, 'हे बेलथासर कन्ये, आतां ही शब्दांची कसरत पुरे झाली. तुझी इच्छा काय आहे ती कळूं दे, कारण ह्यांत तुझा कांहींतरी हेतु मला स्पष्ट दिसत आहे. ती कळली म्हणजे मी उत्तर देतों. मग आपली कधीं भेटच झालेली नव्हती असें मानून आपण आपापल्या भिन्न मार्गानें जाऊं.'

ती म्हणाली, 'तुमच्याविषयीं मला इतकी माहिती आहे ही गोष्ट लक्षांत ठेवून ना?'

बेनहरनें म्हटलें, 'अशी काय माहिती आहे तुला माझ्याविषयीं?'

'तुम्हांमध्यें यहूद्यापेक्षां रोमीचा अंश मला अधिक दिसतो व म्हणून तुमचा बचाव करावा अशीदेखील माझें मन ओढ घेतें?'

'कोणाचा बचाव? माझा?'

ती म्हणाली, 'माझ्या माहितीचा एक यहूदी तरुण आहे. तो पळून आलेला जन्मठेपेचा वल्हीं मारणारा कैदी होता. त्यानें इडर्नांजवाड्यांत एका पहिलवानाला ठार मारलें.' बेनहर चमकला. 'त्याच यहूद्यानें ह्या यरूशलेमच्या भर चौकांत एका रोमीला ठार मारलें. या वेळीं तो रात्रीं सुभेदाराला

कैद करण्यासाठीं गालिली लोकांच्या तीन पलटणी घेऊन येथें आलेला आहे व त्याचा साथीदार शेख इल्डरीम हा अरब सरदार आहे.' मग त्याच्या मनावर अधिक छाप पडावी म्हणून थोड्या हलक्या स्वरांत ती म्हणाली, 'समजा कीं ह्या सर्व गोष्टी रोममध्यें मुख्य प्रधान सेजानस याच्या कानावर घालण्यांत आल्या व आणखी असेंही वर सांगण्यांत आलें कीं सगळ्या रोमी साम्राज्यांत ह्याच्या एवढा संपत्तिमान् दुसरा कोणी नाहीं. एवढी अलोट संपत्ति जप्त करून तो मुख्य प्रधान लोकांना कोणतें नाटक करून दाखवील ?'

त्यावर बेनहर म्हणाला, 'तुझ्या जागीं मी असतों तर या गोष्टी मुख्य प्रधानाला कळवण्यास क्षणाचाही विलंब लावला नसता. माझ्यापुढें अफाट वाळवंटी प्रदेश आहे, म्हणून सांगतों कीं रोमचा समर्थ हात कितीही लांब पोचत असला तरी तो मला पकडूं शकणार नाहीं. असो. तुझें कल्याण असो.'

ती म्हणाली, 'थोडें थांबा. रोमसारख्या रंगेल शहरांत राहिलेल्या तुम्हांला तें रेताळ मैदान अगदीं उदास भासेल. मला तुमची कींव येते आणि म्हणून सांगतें कीं माझ्या सांगण्याप्रमाणें वागाल तर अजूनही मी तुमचा बचाव करूं शकतें.' या वेळचें तिचें बोलणें लाडिक असल्यामुळें बेनहरला तिच्या सौंदर्याचा मोह पडण्याचा संभव होता, परंतु नुकतेंच तिचें अंतरंग त्याच्या दृष्टीस पडल्यामुळें तो सावध राहिला.

ती पुढें म्हणाली, 'तुमचा बाळपणचा एक जिवलग मित्र होता. तुम्ही दोघें भांडला. त्यानें तुमचा अन्याय केला. त्या गोष्टीला कांहीं वर्षें लोटल्यावर अंत्योखिया येथील शर्यतीच्या मैदानावर तुम्हां दोघांची गांठ पडली.—'

'मेसला !'

'होय, मेसलाच त्याचें नांव. तुम्ही त्याचे सावकार आहां. त्याला त्याच्या अपराधांची क्षमा करा. त्याची पैजेंत हरलेली संपत्ति त्याला परत द्या. तुम्हांला तीस हजार रुपये म्हणजे कांहींच नाहीं. हे हर-कुल-दीपका, उदारहृदयी पुरुषा, मेसलाला भीक मागण्याच्या प्रसंगांतून सोडव.'

अशा प्रकारें ही मिसरी तरुणी बेनहरला मेसलाच्या वतीनें काकुळतीनें विनवीत असतां तिच्या मागच्या बाजूस त्याला मेसलाची मूर्ति

पाहिल्यासारखा भास झाला. त्याचा चेहेरा पूर्वीप्रमाणेंच खुनशी व गर्विष्ठ दिसला. बेनहरनें तिला विचारलें, ‘अशी विनंति करण्यास तुला मेसलानें माझ्याकडे पाठवलें आहे का ?’

तिनें ठाळाटाळ करीत म्हटलें, ‘त्याचाही स्वभाव तुमच्यासारखाच दिलदार आहे.’

‘मी त्याच्या जागीं व तो माझ्या जागीं या वेळीं असता तर त्यानें तूं म्हणत आहेस असें वर्तन केलें असतें का ?’

ती अडखळत अडखळत म्हणाली, ‘तो आहे एक—’

बेनहर मध्येंच तिला थांबवून म्हणाला, ‘आलें माझ्या लक्षांत. तो आहे रोमी आणि मी पडलों यहूदी, म्हणून तूं असें म्हणणार होतीस कीं ज्या प्रकारचें वर्तन मी त्याच्याशीं करणें माझें कर्तव्य ठरतें, तशा प्रकारच्या वर्तनाची अपेक्षा त्याच्यापासून मी करूं शकत नाहीं. खरें ना ? तर आतां माझें ऐक आणि सावध रहा. तूं माझ्या मनांत असल्या प्रकारचा संताप उत्पन्न करतेस कीं त्यामुळें, तूं एक स्त्री व शिवाय सौंदर्यवान् आहेस या गोष्टीचें स्मरण न रहातां केवळ शत्रूचा गुप्त हेर एवढेंच मला दिसूं लागण्याचें भय आहे.’

तत्काळ तिलाही संताप चढला व ती त्वेशानें म्हणाली, ‘टरफलें फुंकणाऱ्या प्राण्या, मेसला दृष्टीस पडल्यानंतर तुझ्यावर माझें प्रेम रहाणें कधींतरी शक्य होतें का ? त्याचें दास्य करण्यासाठींच तुझ्यासारखे लोक जन्मास आलेले असतात. त्याचें तेवढें द्रव्य त्याला परत मिळालें असतें तर तेवढ्यावर त्यानें समजूत घेतली असती. पण आतां मी सांगतें कीं तूं तीस हजारांत आणखी एक लाखांची भर टाकली पाहिजे. येथें ज्या व्यापाऱ्याच्या पेढीवर तुझा सर्व कारभार चालतो त्याच्या पेढीवर एक लक्ष व तीस हजार रुपये देण्याची व्यवस्था उद्यां दुपारच्या आंत तुझ्याकडून झाली नाहीं, तर रोममध्यें मुख्य प्रधान सेजानस याच्यापुढें तुला तुझ्या वर्तनाचा जाब द्यावा लागेल, म्हणून सांगतें शहाणपणानें वागण्यांतच तुझें हित आहे. बरें, येतें मी.’

तितकें बोलून ती जाऊं लागली पण तिला अडवून बेनहर म्हणाला, ‘ तुला मेसला उद्यां भेटो, किंवा परवां भेटो, त्या वेळीं त्याला सांग कीं, त्यानें माझ्यापासून लुबाडलेली संपत्ति मला परत मिळाली; त्यानें मला झिजून झिजून मरण यावें म्हणून ज्या जन्मठेपेच्या गुलामगिरींत अडकवलें होतें तिच्यांतून मी निसटलों; ज्या माझ्या आईला व बहिणीला त्यानें जिवंतच कबरेंत गाडलें होतें त्या दोघी सुरक्षित बाहेर पडल्या व हल्लीं माझ्याजवळ आहेत व ज्या नासरेथकराचा तूं द्वेष करतोस त्याच्याच कृपादृष्टीमुळें त्या दोघी जिवंत व निरोगी आहेत. त्यानें अनाथांचे जे अनेक अपराध केले त्यांबद्दलच ही अन्नान्न दशेची व छीः थूः करून घेण्याची शिक्षा त्याला झाली आहे. ती पाहून मला आनंद होतो असेंही त्याला सांगण्यास विसरूं नको. तुझ्या व त्याच्याही समाधानाकरितां आणखी असेंही त्याला कळव कीं, मुख्य प्रधान माझी मालमिळकत जप्त करण्यासाठीं येईल तेव्हां त्याला माझें असें कांहींसुद्धां मिळणार नाहीं. रोममधली माझी मिळकत विकून टाकण्यांत येऊन ती रक्कम पृथ्वीवर पसरून ठेवली गेली आहे. सायमनीडसच्या व्यापारधंद्याला प्रत्यक्ष बादशहांनीं दिलेल्या परवान्याचें संरक्षक कवच आहे व त्याबद्दल योग्य तें द्रव्य सरकारांत भरलें गेलें आहे. दुसरे सर्व मार्ग जरी बंद झाले तरी माझ्या संपत्तींतील एक पैसाही त्याच्या हातीं लागूं शकणार नाहीं, कारण तशी परिस्थिति उत्पन्न झाल्यास मी आपली सगळी संपत्ति देणगी पत्रानें बादशहांनाच नजर करीन म्हणजे झालें. आणि मेसलाला असेंही सांग कीं मी केवळ शब्दांनीं त्याला शाप देत नाहीं, पण माझ्या द्वेषाचें दर्शक चिन्ह अशी तूंच त्याच्याकडे पाठविली आहे. तूं हा माझा निरोप त्याला बोलून दाखवशील तेव्हां माझ्या शब्दांतलें मर्म मेसलाची तल्लख रोमी बुद्धि त्याला सांगेल. जा आतां तूं, व मीही हा निघालोंच. ’

ती दिसेनाशी झाली, तेव्हां आपण तिच्याजवळ मनांतली गोष्ट बोलून गेल्याबद्दल तो स्वतःला दूषण देऊं लागला. तो तडक गच्चीवर गेला व सायमनीडसची खुर्ची, जेथून शहराचा देखावा नीट दिसेल अशा जागीं

ठेवलेली पाहून तेथें गेला. पण खुर्चीवर सायमनीडस वसलेला नव्हता. एस्तेर खुर्चीवर पाय घेऊन शांत झोंपलेली त्याच्या दृष्टीस पडली. त्या यहूदी तरुणीचा त्याच्यावरील साधाभोळा विश्वास व त्याच्यावरील एकनिष्ठ भक्ति ही एका बाजूला व त्या मिसरी तरुणीचें घातकी वर्तन दुसऱ्या बाजूला, असें चित्र बेनहरच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. या तरुणाची मानखंडना झाल्यामुळेंच आतां त्याला कोमल स्वभावी एस्तेरचें मोल कळूं लागलें.

## प्रकरण २२ वें

## विश्वासघात

बेनहर आपला घोडा घेण्यासाठीं विश्रांतिगृहांत चालला असतां, मशालींचा उजेड घेऊन लोकांचा जमाव जात असलेला त्याच्या दृष्टीस पडला. अशा मिरवणुकी म्हणजे कांहीं नवीन प्रकार नव्हता. पण मशालींच्या उजेडांत मध्येंच भाल्याचीं फळें चमकतांना पाहून त्याला नवल वाटलें. यहूदी लोकांच्या धार्मिक मिरवणुकींत रोमी सैनिकांचें कारण काय ? हा लोकांचा जमाव आणखी थोडा पुढें आला तेव्हां तर बेनहरला अधिकच आश्चर्य वाटलें, कारण त्या जमावांत रोमी सैनिक असून मंदिरांतील कांहीं यहूदी धर्माधिकारी होते व त्यांचे नोकर आपल्या धन्यांना कंदिलांच्या उजेडांत वाट दाखवीत होते. या दोन पक्षांच्या लोकांच्या मध्यभागीं एका मनुष्याला जबरदस्तीनें, त्याच्या इच्छेविरुद्ध चालवल्याचें भासलें, म्हणून त्या मनुष्याचा चेहेरा नीट पहावयाच्या हेतूनें बेनहरनें पुढें होऊन पाहिलें व 'इस्कर्योत !' असा उद्गार एकदम त्याच्या तोंडून बाहेर पडला. बेनहरला नासरेथकर व त्याचे शिष्य यांची ओळख चांगली झालेली होती व म्हणून इस्कर्योतला तेव्हांच त्यानें ओळखलें. त्याची इच्छा बेनहरशीं कांहींतरी बोलावयाची असावी म्हणून त्यानें मानही त्याच्याकडे वळवली. बेनहर त्या गर्दींत घुसून अगदीं जवळ आला होता. पण एका याजकानें त्याला बाजूला सारीत म्हटलें, 'कोण आहेस तूं ? जा निघून.' बेनहर क्षणभर गोंधळला

व थोडा आणखी मागें त्या घोळक्याबरोबरच चालूं लागला. हा प्रकार काय आहे तें पहाण्याचा त्यानें निश्चय केला. हा जमाव शहराच्या वेशींतून बाहेर पडला, किद्रोन नांवाची ओहळ उतरून वर चढला व बाजूला असलेल्या एका जैतूनाच्या मळ्याच्या फाटकाशीं जाऊन पोहोंचला. जमावाच्या अगदीं पुढल्या भागीं चालणाऱ्यांकडून थांबवण्याची आज्ञा झाली व जमाव थबकला. फक्त सैनिक मार्गेपुढें करूं लागले. बेनहरनें दाटींतून मार्ग काढला व तो फाटकाजवळ गेला तेव्हां फाटकापाशींच त्याला एक शुभ्र वस्त्र पांघरलेली आकृति दिसली. ती आकृति तो नासरेथकरच होता. जमाव त्याला पहातांच घाबरला. बेनहरनें इस्कर्योतकडे नजर टाकली तेव्हां त्याच्या लक्षांत आलें कीं, विश्वासघातानें या ठिकाणीं जमावाला वाट दाखवीत आणणारा तोच आज इतकीं वर्षें बेनहर ज्या प्रसंगाला तोंड देण्यासाठीं तयारी करीत आला होता तोच आणीबाणीचा हा प्रसंग. आतां त्यानें काय करायाचें ? नासरेथकराचा बचाव करण्यासाठीं शत्रूवर झडप घालण्याची त्याची तयारी होती, पण स्वसंरक्षण करण्याचें सामर्थ्य त्या नासरेथकरामध्यें भरपूर आहे हें त्याला पक्कें ठाऊक होतें. आणि म्हणून तो आपलें तें दिव्य सामर्थ्य आतां कसें प्रगट करतो हें पहाण्यास बेनहर अधीर झाला. तो अजून स्वत:वरूनच त्या महान् गुरूची परीक्षा करीत होता.

तितक्यांत त्या शुभ्र झगा ल्यालेल्या व्यक्तीनें जमावाला उद्देशून विचारलें,

'तुम्ही कोणाला शोधीत आहां ?'

याजकानें उत्तर दिलें, 'नासरेथकर येशूला.'

'मीच तो आहें,' असें उत्तर त्याला मिळालें.

ते शब्द ऐकतांच सगळा जमाव घाबरून चार पावलें मागेंच हटला, पण यहूदा इस्कर्योतनें पुढें होऊन 'हे गुरु,' असें म्हणून गुरूचें चुंबन घेतलें.

तेव्हां तो नासरेथकर म्हणाला, 'चुंबन घेऊन मनुष्याच्या पुत्राला धरून देतोस काय ?'

जमाव त्याच्यावर चालून जाऊं लागला व त्याचे शिष्यही धांवत धांवत मध्यें आले. त्यांच्यापैकीं एकानें आपल्याजवळची तरवार उपसून जमावांतील एका चाकराचा कान छाटून टाकला. तथापि गुरूला जमावानें कैद केलेंच. शिष्यांच्यानें अटकाव झाला नाहीं. पण त्या नासरेथकरानें आपल्या सहनशीलतेची अगदीं कमाल केली. 'त्यांचें एवढें होऊं द्या,' असें म्हणून त्यानें त्या जखमी कानाला स्पर्श करून तो पहिल्यासारखा केला व कान कापून टाकणाऱ्या आपल्या उतावळ्या शिष्याचा त्या कर्मा-बद्दल निषेधही केला.

मग त्यानें जमावाकडे वळून विचारलें, 'जसें लुटाऱ्यावर जावें तसें तुम्हीं तरवारी व सोटे घेऊन निघाला काय? मी प्रतिदिवशीं मंदिरांत तुमच्याबरोबर असतांना तुम्हीं मजवर हात टाकिला नाहीं, पण ही तुमची घटका आणि अंधाराची सत्ता आहे.' तेव्हांच लोकांनीं त्याला घेरलें. बेनहर येशूच्या शिष्य मंडळीला शोधूं लागला पण एकाचाही तेथें पत्ता नव्हता. सर्वजण पळून गेले होते.

नुसता फुंकर घालून ज्या लोकांची राख करण्याचें सामर्थ्य अंगीं त्याच लोकांना शांतपणें स्वतःस कैद करूं देणारा पुरुष कोण असावा हें कोडें बेनहरला उकलेना. त्यानें झटकन् आपल्या अंगावरचा झगा मळ्याच्या आवाराच्या भिंतीवर टाकला व तो जमावांत घुसला, व हळूहळू वाट काढीत गुरूच्या अगदीं जवळ जाऊन भिडला. तो कोणा याज-काचा चाकर असेल असें लोकांना वाटलें.

तो त्या नासरेथकराला अगदीं हळूच म्हणाला, 'गुरुजी, मी तुमचा एकनिष्ठ मित्र आहें. मीं आपली सुटका केली तर तिला आपण मान्यता द्याल ना? तुम्ही स्वखुषीनें या लोकांबरोबर चाललां आहां का?'

पण त्या नासरेथकरानें वर मान करूनही त्याच्याकडे पाहिलें नाहीं. तितक्यांत एक संशयी मनुष्य बेनहरकडे पाहून म्हणाला, 'हा मनुष्य त्याच्या टोळींतलाच दिसतो. ठोका त्याला. करा ठार.' कांहीं लोकांनीं

तत्काळ बेनहरवर हातही टाकले, पण तो हिसकाहिसकीं करून सुटला व अंधारांत पळून गेला. मळ्यापाशीं जाऊन त्यानें आपला झगा अंगावर चढवला आणि आपला घोडा घेण्यासाठीं तो विश्रांतिगृहाकडे झपाट्यानें गेला व घोड्यावर स्वार होऊन शहराबाहेरील आपल्या तंबूवर येऊन पोहोचला. दुसऱ्या दिवशीं त्या नासरेथकराला भेटून त्या बाबतींत आणखी त्याला विचारण्याचा बेत त्यानें केला. याच रात्रीं चौकशीसाठीं गुरूला मुख्य याजकाच्या वाड्यांत नेलें असल्याची बेनहरला कल्पनाच होणें शक्य नव्हतें. तो जड अंतःकरणानें बिछान्यावर पडला. या नासरेथकर संदेष्ट्यावर विसंबून राहून यहूदी लोकांचें राज्य स्थापलें जाण्याची आशा धरणें व्यर्थ होय एवढेंच मात्र त्याला आतां दिसूं लागलें.

◆ ◆ ◆

## प्रकरण २३ वें

## मनाचा गोंधळ

सकाळीं दोन माणसें भरधांव घोडे फेंकीत बेनहरच्या भेटीला तंबूवर आलीं; ते बेनहरला आवेशानें म्हणाले, 'त्या नासरेथकराचा प्राण वांचवा-वयाचें मनांत असल्यास आपण आतां क्षणभरही फुकट घालवतां कामा नये. त्याला गुलगुथा टेंकडीच्या रस्त्यानें नेऊं सुद्धां लागले आहेत, व तेंथें वधस्तंभ तयार ठेवलेला आहे.'

बेनहरनें चकित होऊन म्हटलें, 'काय ! वधस्तंभ !'

'होय. लोकांनीं त्याला मुख्य याजकाकडे नेलें व रात्रींच त्याची चौकशी करण्यांत आली व मग याजक त्याला घेऊन पिलात सुभेदाराकडे गेले. त्याला सोडून देण्याचा प्रयत्न सुभेदारानें दोनदां करून पाहिला. पण, "त्याला वधस्तंभावर खिळा, वधस्तंभावर खिळा," अशी लोकांनीं सारखी ओरड केली; तेव्हां शेवटीं पिलातानें पाणी घेऊन समुदायासमोर हात धुवून म्हटलें, "मी या धार्मिक मनुष्याच्या रक्ताविषयीं निर्दोष आहें."'

तें ऐकून बेनहर ओरडून म्हणाला, 'हे पवित्र बापा अब्राहामा, ह्या इस्राएली

मनुष्याला त्याच्या जातभाईपेक्षां एका रोमीनें अधिक दया दाखवावी ना! आतां आपल्या पलटणी प्रथम जमवूं या.'

आलेल्या दोघांपैकीं दुसरा बेनहरला म्हणाला, 'सरदारसाहेब, आपल्या पलटणींतील आम्हां दोघांशिवाय बाकी सर्वजण याजकांच्या पक्षाला जाऊन मिळाले आहेत'

बेनहर त्या बोलणाराच्या तोंडाकडे टकमकां पहात होता, पण त्याच्या डोळ्यापुढें आदल्या रात्रीं पाहिलेलेंच दृश्य उभें राहिलें, व 'हे माझ्या बापा, हें प्याल्यावांचून टळून जात नसलें तर तुझ्या इच्छेप्रमाणें होवो,' असे एका वाणींतून त्या वेळीं निघालेले शब्द आतांही त्याच्या कानांत घुमूं लागले. त्याची सुटका करण्याची बेनहरनें स्वतः तयारी दाखवली होती, पण त्यानें मान्यता दिली नाहीं. मग बेनहर मनांतल्या मनांत म्हणाला, 'आतां हें मरण टळणें शक्य दिसत नाहीं. त्या पुरुषाला हें मरण त्याच्याहूनही श्रेष्ठ संकल्पानुसार असल्याचें माहीत असल्यामुळेंच तो समजून उमजून शांतपणें त्याच रोखानें चालत आला. मीं आजपर्यंत केलेल्या योजना व श्रम हीं सर्व ईश्वरीसूत्राविरुद्ध होतीं कीं काय?' पलटण सोडून गालिली सैनिक निघून विरुद्ध बाजूला मिळाल्यामुळें त्याच्या सर्व योजना आपोआपच थंड पडल्या. तरी तो मोठ्या प्रयासानें चित्त स्थिर करून त्या दोघांना म्हणाला, 'गड्यांनो, चला, आपण त्या गुलगुथा टेकडीवर जाऊं.'

पण ते पहातात तों शहरांतून त्या शिक्षेच्या ठिकाणाकडे जाणारा रस्ता लोकांनीं भरून गेलेला होता. लोकांची फारच गर्दी वाढत होती, म्हणून एका घराच्या कोपऱ्याला थोडी जागा पाहून ह्या तिघांना घोड्यावरून खालीं उतरून उभें राहावें लागलें. त्यांच्या जवळून चाललेल्या लोकांत निरनिराळ्या सर्व ज्ञात भाषांत त्यांचें बोलणें चाललें होतें. सणासाठीं यरूशलेमास बाहेरून आलेल्या लोकांत केवळ यहूदीया प्रांतांतून आलेले लोकच नव्हते. त्यांमध्यें पार्थी, मेदी, एलामी, मेसोपटेम्या, कप्पादुकिआ, पंत, आसिया फ्रुगिया, पंफूलिया, मिसर, व लिबुवा देश यांतील राहणारे, यहूदी

व यहुदीमतानुसारी असे रोमी प्रवासी, क्रेतीय, व अरब, वगैरे अनेक परदेशीय लोकही पुष्कळ होते. ह्या एकाकी नासरेथकराचें मरण पहाण्यास जणूं सगळें जगच यरूशलेमास जमल्यासारखें झालें होतें.

याच सुमारास सायमनीडसचे नोकर आपल्या धन्याची खुर्ची ढकलीत लोकसमुदायाबरोबरच येत असतांना दिसले. खुर्चीबरोबर एस्तेर चालली होती. मागें थोड्या अंतरावर एका पडदे लावलेल्या पालखींत अत्यंत वृद्ध झालेला बेलथासर बसलेला होता व ती पालखी भोई वाहून नेत होते. लोकांची गर्दी पुढें निघून जाईपर्यंत आपल्याजवळ उभें राहण्याची सूचना बेनहरनें ह्या मंडळीला केली.

बेलथासरनें विचारलें, 'तो पुरुषोत्तम आपल्या दृष्टीस पडेल का ?' 'कोण ? तो नासरेथकर काय ? होय, तो याच बाजूनें आपल्याजवळून जाईल.' हें बेनहरचें उत्तर ऐकून तो वृद्ध सद्गदित स्वरानें म्हणाला, 'हे प्रिय प्रभू, आणखी फक्त एकदांच दर्शन होऊं दे. आजचा हा दिवस जगाला भयंकर जाणार खास.'

तितक्यांत मोठाच गलबला सुरू झाला. बेनहरच्या दोघां अनुयायांपैकीं एक जण लांबवर पाहून म्हणाला, 'ती पहा, तीच मंडळी येत आहे.' हळू हळू लोकांची गर्दी फारच वाढूं लागली. लोकसमुदायाचें स्वरूपही पालटलेलें दिसत होतें. तें दृश्य पाहून बेनहर म्हणाला, 'हें यरूशलेम आलें खरें.' शेंकडों मुलें, 'यहुद्यांचे राजे आले; महाराजांसाठीं वाट सोडा,' असें ओरडत नाचत येत होतीं.

तो देखावा पाहून सायमनीडस म्हणाला, 'हीं मुलें जाणतीं होतील तेव्हां या शलमोन राजाच्या नगरीचे कोण हाल होतील !'

त्यांच्या मागोमाग रोमी सैनिकांची एक तुकडी आपल्या लष्करी शिस्तीप्रमाणें चालली होती. सभोंवतीं चाललेल्या लोकसमुदायांतील खळबळीसंबंधानें त्या सैनिकांना तिळमात्र पर्वा वाटत नव्हती.

त्यांच्यानंतर तो नासरेथकर येत होता. तो अगदीं मरणोन्मुख झालेला दिसत होता. त्याच्या अंगांतील झग्याला रक्ताचे डाग पडले असून तो झगा ठिकठिकाणीं फाटलाही होता. तो अनवाणी चालला होता व त्याच्या ठेंचाळलेल्या पायांतून निघणाऱ्या रक्ताचे थेंब पावलोपावलीं टपकत होते.

त्याच्या डोक्यांत कांट्यांचा मुगुट दाबून बसवल्यामुळें तोंडावरून रक्ताचे ओघळ वाहून सुकले होते. त्याचे हात बांधलेले होते व त्याच्या गळ्यांत लेख लिहिलेली पाटी अडकवलेली होती. शहरांतच येतां येतां खांद्यावरील खांबाच्या ओझ्यामुळें थकून तो एकदम पडला, म्हणून तें ओझें कमी करण्यासाठीं तो खांब ट्रिपोलीमधील एका कुरनेकर, शिमोन, याच्या खांद्यावर देण्यांत आला. बरोबर शिपायांचा पहारा असतांही मधून मधून जमावांतून कोणी त्याला काठी टोंची, तर कोणी खडे मारी. तो नासरेथकर खालीं मान घालून ह्या सर्व खोड्या सोशीत हळू हळू पावलें टाकीत होता, पण घराच्या कोपऱ्याजवळ आमची मंडळी वाट पहात उभी होती त्या जागेसमोर येतांच त्या दु:खी पुरुषानें आपलें कोमेजून गेलेलें तोंड वर करून ह्या मंडळींतील प्रत्येकाकडे नजर टाकली. एकदां पाहिलेलें तें दृश्य त्यांपैकीं कोणी मरेपर्यंत विसरलें नाहीं. वृद्ध बेलथासरच्या तोंडून तर अक्षरही निघेना. तो बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. सायमनीडसच्या तोंडून कण्हत, कण्हत, 'परमेश्वरा, हे माझ्या परमेश्वरा!' एवढाच उद्गार निघाला.

सायमनीडसनें भानावर येऊन विचारलें, 'हे हरकुळांतील वीरा, तुझ्या तयार केलेल्या पलटणी कोठें आहेत या वेळीं ?'

बेनहरनें निराशेनें उत्तर दिलें, 'या दोघांशिवाय बाकी सर्व जण आपला पक्ष सोडून शत्रूला जाऊन मिळाले.'

'तर मग सगळेंच आटोपलें! आतां ह्या सत्पुरुषाचें मरण टळणें कठीण.'

त्या नासरेथकराच्या मागून दोन चोर आपापले खांब खांद्यावर घेऊन चालले होते. त्यांच्या मागून मुख्य याजक आपल्या भरजरी पोषाखांत, त्याच्या मागून सॅन्हेद्रिन सभेचे सभासद, व त्यांच्या मागून याजक व शास्त्री मंडळी आपापले उंची पोषाख घालून चाललेली होती. थोडा वेळ सायमनीडसनें त्या गर्विष्ठ मुख्य याजकाच्या क्रूर चेहऱ्याकडे पाहिलें व म्हटलें,

'हा नासरेथकर राजाच आहे, अशी आतां शेवटच्या घटकेस मात्र माझी खात्री झाली. एका साध्या अपराध्यासाठीं किंवा तोतयासाठीं एवढ्या मोठ्यामोठ्या लोकांचा लवाजमा बरोबर घेऊन अशी मिरवणूक आजपर्यंत झाली नाहीं. मला उठून त्याच्या मागोमाग चालत जातां आलें असतें तर किती चांगलें झालें असतें!'

शहरांतील गुंड लोकांची गर्दी आतां तिकडून जाऊं लागली. रक्तासाठीं हपापलेल्या लांडग्यांसारखें क्रौर्य त्यांच्या चेहऱ्यांवर दिसत होतें. पण ज्याच्या रक्ताची तहान त्यांना लागली होती त्याचा चेहरा किती शांत दिसत होता ! नासरेथांतील ह्या विहिरीजवळ ह्याच नासरेथकरानें बेनहरच्या कपाळावर हात ठेवला होता, व त्या दिव्य स्पर्शाची या वेळीं बेनहरला आठवण झाली. त्याची आई व बहीण यांना रोगमुक्त करण्याच्या वेळीं ह्याच्याच वाणींतून निघालेले गोड शब्द आतां त्याच्या कानांत पुन्हा घुमूं लागले, तितक्यांत याच्या गालिली पलटणींतील कांहीं सैनिक त्याला दिसले. त्यांना एका बाजूला घेऊन तो म्हणाला,

माझ्याजवळून तरवारी व युद्धाची विद्या ज्यांनीं घेतली तेच ना तुम्ही? आतां हीच वेळ घाव घालावयाची आहे. अजून आपण त्याचा प्राण वांचवूं शकतों. आतां थांबतां उपयोगी नाहीं. प्रत्येक क्षण मोलाचा आहे.'

त्या सैनिक मंडळीनें मुळींच हालचाल केली नाहीं. त्यांपैकीं एक जण म्हणाला, 'हर कुलोत्पन्न यहुदा, तुम्ही भ्रमांत आहां. अहो, हा नासरेथकर राजा नव्हेच. त्याच्यांत राजाचें पाणीच नाहीं. त्यानें परमेश्वराकडे व दाविदाच्या सिंहासनाकडेही पाठ फिरवली. तो कांहीं राजा नाहीं व गालील प्रांतही त्याच्या बाजूला नाहीं. त्याला आलेलें हें मरण त्यानें भोगायलाच पाहिजे. पण यहुदा, तुम्हीं दिलेलीं शस्त्रें आमच्याजवळ आहेत, एवढें पक्कें ध्यानांत ठेवा. आपल्या यहुदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां रोमी सत्तेवर घाव घालण्यास तुम्ही हांक माराल त्या क्षणीं आम्ही सर्व जण तयार आहों, आणि केवळ आम्हीच आहों असें नव्हे तर सगळा गालील तुमच्या मागें लोटला म्हणून समजा.'

बेनहरचें मन गोंधळून गेलें. त्याला कांहींच सुचेना. पण पुढें पुनरुत्थानानंतर जेव्हां त्याला समजलें कीं मरण भोगणें त्याला आवश्यक होतें, तेव्हां या वेळीं त्याचें मन आंवरून धरणारा तो नासरेथकरच होता हें त्याच्या लक्षांत आलें. तितक्यांत 'चला, आपण चालूं लागूं,' असें सायमनीडसनें म्हटल्यावर ती मंडळी चालूं लागली. बेनहर एस्तेरच्या बाजूनें एखाद्या भांबावलेल्या मनुष्यासारखा चालला.

◆ ◆ ◆

## प्रकरण २४ वें

## वधस्तंभ

मनुष्याच्या कवटीच्या आकारासारख्या ह्या गुलगुथा नामक टेकडीच्या सभोंवतीं आज जिकडे तिकडे लोकसमुदाय एखाद्या समुद्रासारखा पसरला होता. टेकडीपाशीं रोमी सैनिकांचें कडें पडलें होतें तेथपर्यंत बेनहर, आपल्या पक्षाची मंडळी घेऊन मोठ्या प्रयासानें वाट काढीत काढीत जाऊन पोहों-चला. ह्या मैदानावर आज कांहीं नाहीं म्हटलें तरी ८।१० लाख लोक जमले होते. द्वेष, किंवा प्रेम, किंवा जिज्ञासा हें त्यांच्या येथें येण्याचें कारण.

मध्यें ठेवलेल्या मोकळया जागेंत लवकरच मारले जाणारे उभे असून जवळच मुख्य याजक उभा राहून, अपराध्यांना वधस्तंभावर खिळवण्याची जी तयारी चालली होती त्यावर देखरेख करीत होता. तो काम करणारांस म्हणाला, 'आटपा लवकर लवकर, कारण देशाला विटाळ होऊं नये म्हणून सूर्य मावळण्यापूर्वीं वधस्तंभावर खिळलेल्यांचा प्राण जायला पाहिजे, अशी नियमशास्त्राची आज्ञा आहे.'

एका सैनिकानें थोड्याशा कळवळ्यानें पेलाभर पेय नासरेथकरापुढें केलें, पण त्यानें तें घेतलें नाहीं. एका सैनिकानें त्याच्या गळयांत अडक-वलेली पाटी काढून ती खांबाला वरच्या भागीं खिळे ठोकून पक्की बसवली. ह्या पाटीवर 'यहुद्यांचा राजा' असे शब्द लिहिलेले होते. बेनहरच्या डोळयांसमोर होणाऱ्या त्या भयंकर प्रकारांत आतां त्याला कांहीं निराळाच अर्थ दिसूं लागला. 'पुनरुत्थान व जीवन मी आहें,' असे त्या नासरेथ-कराच्या तोंडून निघालेले शब्द बेनहरच्या कानीं पडले होते, ते आतां पुन्हा त्याच्या कानांत घुमूं लागले. ह्या शब्दांमुळें डोळयांसमोर घडणाऱ्या गोष्टींत बेनहरला नवीन अर्थ प्रतीत होऊं लागला.

वधस्तंभ व खड्डे तयार होतांच मुख्य याजक येशूकडे बोट दाखवून म्हणाला, 'प्रथम ह्या देवनिंदकाला वधस्तंभावर खिळा. त्याच्यानें मंदिराला किंचितही धक्का देववला नाहीं, हें त्याला दिसत राहावें म्हणून त्याचें

तोंड पवित्र मंदिराकडे असावें. ह्या 'देवपुत्रा'च्या अंगीं स्वतःचा प्राण वांचवण्याचें सामर्थ्य असणारच.'

सैनिकांनीं येशूला धरून वधस्तंभावर घातले. खिळे ठोकून त्याचे हात-पाय खांबाला खिळवले जात होते. एका सैनिकानें त्याचे पाय ढोंपरां-पासून खालीं एकावर एक चढवले आणि एकच मोठा खिळा ठोकून ते खांबाशीं पक्के केले. मग तो खांब खड्ड्यांत उभा करून पुरण्यांत आला. त्या सुकून गेलेल्या ओंठांतून कसलीच किंचाळी बाहेर पडली नाहीं, किंवा कण्हणें ऐकूं आलें नाहीं. पण 'हे बापा, ह्यांना क्षमा कर; हे काय करतात हें ह्यांस समजत नाहीं,' एवढे शब्द आले.

भरदुपारची वेळ होत आली. एकाएकीं आकाशांत अंधकार पसरूं लागला व हळू हळू अंधाराची छाया दाट होऊं लागलेली पाहून लोकसमु-दायाच्या तोंडचें पाणी पळालें. सर्वत्र भीषण स्तब्धता पसरली.

'ही कृष्णछाया निघून जाईल,' असें म्हणून सायमनीडस एस्तेरला धीर देत होता.

बेनहर म्हणाला, 'छे छे, तसें नव्हे; ह्या भयंकर देखाव्याचें अति हृदय-द्रावक भीषण स्वरूप, आम्हांवर स्वर्गीय कृपा झाल्यामुळें, झांकलें जात आहे. अहो सायमनीडस, तो खांबावर खिळलेला नासरेथकर निःसंशय देवपुत्रच होय.' मग वृद्ध बेलथासरच्या खांद्यावर हलकेच हात ठेवून तो त्याला म्हणाला, 'बेलथासर, तुमचेंच म्हणणें अखेर खरें ठरलें. हा नासरेथकर देवाचा पुत्र होय.'

बेलथासर म्हणाला, 'तो लहान बालक असतां गव्हाणींत मीं प्रथम त्याला पाहिलें आणि म्हणून मीं त्याला प्रथम ओळखलें. त्यांत आश्चर्यकारक कांहींच नाहीं, पण असला हा दिवस पहाण्यास मीं जिवंत रहावें ना ? माझ्या दुसऱ्या दोघां स्नेह्यांप्रमाणेंच यापूर्वीं माझे डोळे कायमचे मिटले असते तर, हे देवा, फार बरें झालें असतें असें मला वाटतें.'

ज्या दोघां लुटारूंना याच वेळीं खांबांवर खिळलें होतें त्यांचे खांब खड्ड्यांत पुरण्याचें काम संपलें तेव्हांच सैनिकांचें कडें उठलें व अर्थातच लोकांना

अधिक जवळ जाण्यास अडचण राहिली नाहीं. कांहीं लोकांनीं खांबावर खिळलेल्या नासरेथकराकडे पाहून तिरस्कारानें मान हालवीत त्याला शिव्याशाप दिले, आणि कांहीं त्या दोघां चोरांकडे पाहून हळहळले! इकडे जसजसा अंधकार दाट पडूं लागला तसतशी एस्तेरला अधिक भीति वाटून तीं स्वतःला घरीं घेऊन जाण्याविषयीं बापाला आग्रहानें विनवूं लागली. पण सायमनीडसनें प्रथम आपणांस त्या खांबाच्या अगदीं जवळ घेऊन जाण्याचा आग्रह धरला. ज्या खांबावर नासरेथकराला खिळलेलें होतें त्याजवळ कांहीं स्त्रियांनीं येऊन गुडघे टेकले असें ह्या मंडळीला दिसलें. त्या नासरेथकरानें त्या गुडघे टेकलेल्या मंडळींत आपली आई व एक शिष्य यांना ओळखून प्रथम आईला शिष्य दर्शवून म्हटलें, 'बाई, पहा हा तुझा पुत्र,' व शिष्याला आई दर्शवून म्हटलें, 'पहा, ही तुझी आई.'

दुसरा व तिसरा प्रहर टळला. खांबावर खिळलेले चोर ओरडून आरडून गयांवयां करूं लागले. पण तो नासरेथकर अगदीं हूं कीं चूं करीत नव्हता. सर्वत्र पसरत चाललेल्या दाट अंधारामुळें लोक भयभीत होऊन त्यांची गाळण उडूं लागली. फार काय, पण मुख्य याजक व त्याच्याबरोबर आलेले वडील आणि याजक मंडळी ही सुद्धां लटलट कांपूं लागली. त्यांनीं घेतलेल्या बळीचें आतां त्यांना अधिकच भय वाटूं लागलें.

बेनहरच्या खळबळून गेलेल्या मनांत विश्वास उत्पन्न होऊन तें शांत झालें व आतां ह्या एकंदर प्रकाराचा शेवट जितक्या लवकर होईल तितकें चांगलें एवढेंच त्याला वाटूं लागलें. सायमनीडसही कांपत होता व त्याचा विश्वास बसण्याच्या बेतांत होता. एस्तेरनें घरीं जाण्याचा इतका आग्रह केला तरी त्यानें ऐकलें नाहीं. अगदीं शेवट होईपर्यंत त्यानें थांबण्याचा हट्ट धरला. खांबावर खिळलेल्या एका लुटारूच्या किंचाळ्या व कण्हणें थोडें बंद झालें व तो शेजारींच खांबावर खिळलेल्या नासरेथकराला उद्देशून म्हणाला, 'तूं ख्रिस्त आहेस ना ? तर स्वतःचा व आमचा बचाव कर.' तें ऐकून लोकसमुदायांतील कांहींनीं टाळ्या पिटल्या. मग नासरेथकराचें उत्तर ऐकण्यासाठीं गप्प होऊन ते कानोसा घेऊं लागले तेव्हां दुसऱ्या लुटारूचे शब्द त्यांना ऐकूं

आले: ‘ तुलाहि तोच दंड असतां तूं देवाला भीत नाहींस काय ? आपला दंड तर यथान्याय आहे; कारण आपण आपल्या कर्मांचें योग्य फळ भोगीत आहों; परंतु यानें कांहीं अयोग्य केलें नाहीं. ’ मग त्या लुटारूनें, शक्य तितकी आपली मान नासरेथकराकडे वळवून म्हटलें, ‘ हे येशू, तूं आपल्या राजाधिकारानें येशील तेव्हां माझी आठवण ठेव. ’

तें ऐकून सायमनीडस दचकला. बेनहर त्याला म्हणाला, ‘ तुम्ही ही साक्ष ऐकतां ना ? आतां नासरेथकर आपल्या राज्यांत कोठें तरी प्रवेश करीत आहे असें तो म्हणतो आणि हेंच स्वप्नांत ऐकल्याप्रमाणें माझ्या कानांत एकसारखें घुमत आहे बराच वेळ. ’

सायमनीडस त्याचा हात दाबून म्हणाला, ‘ शांत बसा थोडा वेळ. आपण त्या नासरेथकराचें उत्तर काय येतें तें ऐकूं या. ’ तितक्यांत खांबावरून अगदीं स्पष्ट स्वरानें उच्चारलेले शब्द या मंडळीला ऐकूं आले: ‘मी तुला खचित सांगतों, तूं आज मजबरोबर सुखलोकांत असशील. ’

सायमनीडसनें हात जोडून म्हटलें, ‘ इतकें पुरें झालें. हे प्रभू, आतां माझा विश्वास बसला. माझ्या अंतःकरणांतील संशयरूपी अंधार पार नाहींसा झाला. ’ त्याच्या अंतःकरणांतील भयंकर यातना सोसल्याची आठवण व सूड घेण्याची भावना ह्या समूळ नाहींशा होऊन त्याचें अंतःकरण शांतीनें भरून गेलें. पण नासरेथकराच्या त्या शब्दांनीं मुख्य याजकादि पुढाऱ्यांचें मन भयचकित होऊन बावरून गेलें.

नासरेथकराचा प्राण निघून जाण्याची वेळ जवळ येऊन ठेपली हें खांबाच्या अगदीं जवळ असलेल्या लोकांना स्पष्ट दिसून आलें, तितक्यांत नासरेथकराच्या वाणींतून, ‘माझ्या देवा, माझ्या देवा, तूं माझा त्याग कां केला ? ’ असे शब्द अत्यंत स्पष्ट स्वरानें बाहेर पडले.

खांबाच्या जवळच द्राक्षारस व पाणी यांच्या मिश्रणाचें पात्र ठेवलेलें बेन-हरच्या दृष्टीस पडलें. त्यानें तेव्हांच एक स्पंज त्या पात्रांत बुचकळून एका लांब काडीवर ठेवून नासरेथकराच्या ओंठांना लावला, पण व्यर्थ. वेळ निघून

गेली होती. नासरेथकराची दृष्टि स्वर्गाकडे कशावर तरी नीट रोखली गेलेली आहे असें बेनहरला दिसून आलें, आणि त्या अगदीं सुकून गेलेल्या ओंठां-तून विजयसूचक स्वरानें, 'पूर्ण झालें आहे !' एवढे शब्द बाहेर पडले.

त्याच्या डोळयांतलें तेज नाहींसें झालें व मान खालीं लोंबकळून हनुवटी छातीवर टेकली गेली. तशाच स्थितींत उच्च स्वरांत ओरडून तो म्हणाला, 'हे बापा, मी आपला आत्मा तुझ्या हातीं सोंपवितों.' हे शब्द नासरेथकराच्या वाणींतून बाहेर पडलेले बेनहर वगैरे मंडळीला ऐकूं आले. लागलेंच तें गळून गेलेलें शरीर थरारलें व त्या प्रेमानें थबथबलेल्या हृदयाचा शेवटचा ठोका पडून तें कायमचें बंद पडलें.

तेव्हां बेनहर आपल्या मित्रमंडळीला म्हणाला, 'आटोपलें सगळें; त्याचा प्राण निघून गेला.' ती गोष्ट जमलेल्या लोकसमुदायांत हां हां म्हणतां पस-रली. तत्काळ लोकांच्या मनोभावनेची प्रतिक्रिया सुरू झाली. त्याचा प्राण निघून गेला व आतां ते एकमेकांस, 'आपण ह्याला कशासाठीं ठार मारलें ?' असें विचारूं लागले, पण कोणालाहि त्या प्रश्नाचें उत्तर देतां येईना. त्याचें रक्त ह्या लोकांच्या माथीं होतें. लोक एकमेकांकडे डोळे ताणताणून पाहूं लागले, तर इकडे पायांखालची जमीन हादरूं लागली. दाट पडलेला अंधार कमी कमी होऊं लागला, व तीन खांबांवर खिळलेल्या त्या तीन रक्तबंबाळ शरिराचा भयंकर देखावा स्पष्ट दिसूं लागला. तो दृष्टीस पडतांच लोक-समुदायामध्यें एकच गोंधळ उडाला व ते अगदीं भयभीत होऊन सैरावैरा पळूं लागले. अर्थात् त्या रेटारेटींत व ढकलाढकलींत कित्येक खालीं पडून चेंगरलेहि गेले. धरणीकंपाच्या धक्क्यानें जमीन हादरल्यामुळें पळणाऱ्या लोकांना पळतां भुई थोडी असें झालें. कित्येक एकमेकांच्या अंगावर उच-लून फेकले गेले. त्या नासरेथकरांचें रक्त त्यांनीं आपल्या माथ्यांवर ओतू-नच घेतलें होतें. अशा प्राणसंकटांत देवाचा धांवा करण्याची बुद्धि तरी कोठली होणार ? थोड्याच वेळांत तेथें रोमी सैनिक, कांहीं एकनिष्ठ स्त्रिया, व बेनहरच्या टोळीपैकीं कांहीं, एवढीच मंडळी राहिली. बाकी सर्व कोठच्या

गेले. या मागें राहिलेल्या मंडळीला देखील हादरणाऱ्या ...ें नेट धरून तेथेंच राहणें पुष्कळ जड जात होतें.

बे...रें एस्तेरला म्हणाला, 'डोळे झांक, आणि परमेश्वरावर व या नुकत्याच नीचपणानें मारल्या गेलेल्या महापुरुषाच्या आत्म्यावर अचल निष्ठा ठेव.'

सायमनीडस म्हणाला, 'पण तसें नको; आजपासून आपण त्याचा उल्लेख, "ख्रिस्त" असाच करीत जाऊं.' इतकें बोलून तो स्तब्ध झाला. पण बेलथासर अगदीं कसलीच हालचाल करीत नाहीं असें लक्षांत येतांच बेनहर त्याच्याजवळ जाऊन पहातो, तों तो गतप्राण झालेला होता. तो गुरूबरोबर रहाण्यास सौख्यलोकांत गेला. मग ही मंडळी तें प्रेत घेऊन घराकडे परतली. घडलेला दुःखद वृत्तांत इराजला कळवण्यासाठीं बेनहर तिला पाहूं लागला, पण ती सांपडेना. ती घरांतून निघून गेली असें त्याला मग आढळलें. तिनें कांहींच पत्ता मागें ठेवलेला नव्हता. ह्या मंडळीनें मोठ्या पूज्य भावानें वृद्ध बेलथासरच्या प्रेताला मूठमाती दिली. आपला जवळचा आप्त गेल्याप्रमाणें ह्या मंडळीला दुःख वाटलें.

अशुचितेचे दिवस संपल्यामुळें बेनहरची आई व बहीण यांना घरीं घेऊन येण्याचा सुदिन उगवला; आणि योगायोग म्हणतात तो हाच कीं, त्याच दिवशीं तो नासरेथकर पुन्हा जिवंत झाला हें अत्यंत अद्भुत वर्तमान बेनहरादि मंडळीच्या कानीं आलें. ह्यांनीं नासरेथकराचें अद्भुत सामर्थ्य इतकेदां प्रत्यक्ष पाहिलें होतें कीं, ह्या 'न भूतो न भविष्यति' अशा अद्भुत गोष्टीवरही त्यांचा विश्वास बसण्यास अडचण पडली नाहीं. 'पुनरुत्थान व जीवन मी आहें,' हे त्याचे शब्द ह्यांना आठवले.

ख्रिस्ताला वधस्तंभावर खिळवलें जाणें व त्याचें पुनरुत्थान या दोन्ही गोष्टी घडून आल्याला पांच वर्षांचा काळ लोटला. आज रोम शहरांत आपल्या भव्य, सुंदर वाड्यांत आतां बेनहरची धर्मपत्नी झालेली एस्तेर आपल्या दोन गोजिरवाण्या बालकांच्या खेळण्याकुदण्याकडे पहात

त्यांचें कौतुक करीत होती. या वेळीं तिचें पूर्ण विकास पावले
अधिकच खुलून दिसत होतें. समोंवतीं रमणीय बागबगीचा अ
टोलेजंग वाड्याची स्वामिनी झाल्यानें तिचें बाळपणचें स्वप्न
सत्यसृष्टींत उतरलें. आपल्या मुलांचें कौतुक करीत बसलेल्या ए
'आपल्या भेटीसाठीं कोणी एक स्त्री आलेली आहे,' असें एक दासी
म्हणाली. मग धनिणीच्या आज्ञेवरून ती दासी त्या स्त्रीला घेऊन तेथें
'बेलथासरची मुलगी इराज आहें मी,' असें बोलेपर्यंत एस्तेरनें
ओळखलें नाहीं. ती चकित झाली.

एस्तेरनें चटकन् प्रसंगावधान ठेवून इराजला बसण्यासाठीं
आणण्यास दासीला सांगितलें, पण इराज मना करीत म्हणाली, '
नको, कारण मी लगेच परत निघणार.'

नशिबानें तिला हात दिला नाहीं, हें इराजच्या एकंदर परिस्थि
स्पष्ट दिसून येत होतें. तिचा पूर्वींचा सुंदर चेहरा आतां कसासा
होता. अयोग्य प्रकारें जीवनक्रम घालवीत असल्याचीं सर्व चिन्हें ति
उघड उघड दिसत होतीं. त्या दोघी स्त्रिया, अगदीं अवाक्षर न
बराच वेळ एकमेकींकडे नुसत्या पहात राहिल्या. मग शेवटीं इराज म्

'हीं तुमचीं मुलें का?'

'होय; तुम्ही त्यांच्याशीं नाहीं का एखादा शब्द बोलत?'

इराज म्हणाली, 'नाहीं. मला पाहून तीं बालकें उगाच भितीलबितील
तसें बोलून ती निघून जाऊं लागली, पण चार पावलें गेल्यावर पुन्हा एस
जवळ येऊन ती म्हणाली, 'त्यांचा शत्रु मेला असा तुमच्या पतीला म
निरोप सांगा, आणि त्यानें माझ्या केलेल्या दुर्दशेचें प्रायश्चित्त म्हण
मींच त्याला ठार केलें असेंही कळवा. तुमच्या पतीचा नाश करण्याचा
जो मीं प्रयत्न केला त्याचें योग्य फळ मला असें मिळालें आहे कीं, माझी
अवस्था पाहून त्यांनादेखील माझी कींव करावीशी वाटेल. आणखी असेंहि

खरे रोमी बनावयाचें म्हणजे पशूच बनणें होय असें
आलें. बरें, आतां आपली रजा घेतें.' एवढें म्हणून ती
ली.

त्रें अंतःकरण कळवळून आल्यामुळें तिचे डोळे पाण्यानें भरून आले.
नुकर न स्वरानें इराजला म्हणाली, 'थांबा थोड्या. माझ्या पतींना भेटा.
निष्ठा चा पुष्कळ, पुष्कळच शोध केला, पण तुमचा पत्ता लागला नाहीं.
सा मीं ख्रिस्ती आहों. आम्ही शक्य तितकें तुम्हांला साह्य करूं.'
उल्लेख मीं स्वतः आपला मार्ग पसंत केला आहे. माझा सगळा बाजार
बेलथा टोपेल.' इतकें बोलून ती झपकन् निघून गेली. तिनें पाण्यांत
त्याच्या आत्महत्या केली व अशा प्रकारें हालअपेष्टेंतून आपली
रक्षण्य घेतली असें चौकशीअंतीं कांहीं दिवसांनीं कळलें.
घडलेला स अगदीं पिकलें पान होईपर्यंत राहिला. नीरो बादशहाच्या
पण त ा १० व्या वर्षी रोममध्यें ख्रिस्ती लोकांच्या भयंकर छळाला
कांहीं बेनहर, एस्तेर, त्यांचीं दोन्हीं बालकें, व अगदीं वयोवृद्ध
वृद्ध मनीडस, अशीं सर्व अंत्योखियांतील आपल्या वखारीच्या
प्रमाणें ीं होतीं. सायमनीडस आपल्या व्यापारधंद्याचा पसारा आटोपूं
अंत्योखियाच्या बंदरांत त्याचें एकच गलबत नांगरलेलें होतें.
उ गलबतें त्यानें विकून टाकलीं होतीं.

स बेनहरकडे एक अरब जासूद आला व त्यानें एक मोहोरबंद
च्या हातीं दिला. हा लखोटा शेख इल्डरीम यांच्या मुलाकडून
आहे असें बेनहरनें पाहिलें. शेख इल्डरीम पार्थियन लोकांवरील
मारला गेल्यामुळें त्याचा मुलगा त्याच्या मागें त्याच्या जमातीचा
ाला होता. ह्या लखोट्यांत एक देणगीपत्र होतें. ह्या पत्राप्रमाणें
ची राई' म्हटलेली शेख इल्डरीमची मालमिळकत त्यानें बेन-
नांवें करून दिलेली होती.

ती सगळी हकिकत ऐकून सायमनीडस म्हणाला, 'हे हरकुलभूषणा,
ला एवढी संपत्ति मिळण्याचें कारण काय हें तुमच्या लक्षांत आलें का?'

बेनहर म्हणाला, 'तें कारण माझ्या केव्हांच लक्षांत ... खली गेलेली मला प्राप्त होणारी सगळी संपत्ति ती देणाऱ्याच्या सेवेंतच ... या ओंठां- मीं निश्चियसुद्धां करून ठेवलेला आहे. त्याच्या सेवेंत ... कसा उपयोग करावा तें आपण मला सांगा.'

सायमनीडस म्हणाला, 'तुम्हीं अंत्योखियांतील ख्रिस्ती मंडळीला मोठमोठ्या देणग्या दिलेल्या मला माहीत आहेत.' शेख इल्डरीमनें दिलेल्या एवढ्या मालमत्तेच्या देणगीचें वृत्त बेनहरला कळलें त्याच वेळीं रोममध्यें बादशाही हुकमानें तेथील ख्रिस्ती लोकांच्या छळाला आरंभ झाल्याचें शोकजनक वर्तमान येऊन थडकलें. ह्या रोम राजधानींत ख्रिस्ताची साक्ष बंद होतां कामा नये, असें जेव्हां सायमनीडस म्हणाला, तेव्हां बेन-हरनें विचारलें,

'ही साक्षीची ज्योत तेथें सदां तेवत रहावी म्हणून मीं काय करावें ?'

सायमनीडस म्हणाला, 'एवढा राक्षसासारखा क्रूर असून देखील, मृताची राख व थडगीं हीं दोन नीरो बादशहा पवित्र समजतो. जर तुम्हांला जमिनी-वर ख्रिस्ती मंडळीसाठीं भक्तिस्थानें बांधतां येत नसलीं, तर जमिनीच्या पोटांत तीं बांधून काढा म्हणजे भीति कमी; आणि धर्मश्रद्धेसाठीं प्राण-र्पण करणाऱ्या सर्वांच्या प्रेतांची अवहेलना होऊं नये, म्हणून तीं आणून ह्या जमिनीच्या पोटांत तयार केलेल्या ठिकाणीं ठेवीत जा, म्हणजे पुरे.'

सायमनीडसनें सुचवलेली योजना बेनहरला पसंत पडली, व ती अमलांत आणण्यासाठीं तो ताबडतोब रोमला गेला. दर वर्षीं आजतागायत हजारों प्रवासी रोममधलीं हीं जमिनीच्या पोटांत बांधून काढलेलीं भक्तिस्थानें व कबरस्थानें पहावर ... असतात. नीरोच्या छळाच्या वेळीं भक्ती ... असल्यामुळें, ख्रिस्ती लोक त्यांत आश्रय ... ति बेनहरनें आपल्या संपत्तीचा व्यय केला; ... णजे रोमी साम्राज्य ख्रिस्ती लोकांनींच जिंकलें.

REFBK-0009814